# वेदान्तबोध  एक समग्र अध्ययन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

पीएच्.डी. संस्कृतच्या उपाधीसाठी प्रस्तुत
शोधनिबंध

श्री बालमुकुंद लोहिया
संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केन्द्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे
२०१३

## निर्देशकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री.माधव दामोदर फाटक यांनी अज्ञात लेखकाच्या वेदान्तबोध अथवा बोधार्या या ग्रंथावर लिहिलेला वेदान्तबोध एक समग्र अध्ययन हा शोधनिबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ च्या पीएच. डी. उपाधिसाठी माझ्या देखरेखीखाली लिहून प्रस्तुत केला आहे.ही त्यांची स्वतंत्र कृती असून परीक्षक मंडळासमोर प्रस्तुत करण्याची अनुमती आहे.

डॉ. गौरी माहुलीकर

# प्रतिज्ञा

मी माधव दामोदर फाटक प्रतिज्ञा करतो की, वेदान्तबोध एक समग्र अध्ययन हा शोधनिबंध जो पीएच्.डी. उपाधीसाठी प्रस्तुत केला आहे तो मी केवळ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.येथेच सादर केलेला आहे अन्यत्र कुठेही केलेला नाही तसेच या (हस्तलिखितावर) ग्रंथावर अन्य कोणीही कोणत्याही उपाधीसाठी काम केलेले नाही.

माधव दामोदर फाटक

# ऋणनिर्देश

हा शोधनिबंध तयार करताना मला अनेक लोकांचे सहाय्य झाले, त्यांचा निर्देश न करता निबंध सादर करणे योग्य होणार नाही .

सर्वात प्रथम माझ्यासाठी शोधनिर्देशक म्हणून असलेल्या डॉ माहुलीकर मॅडम यांचा उल्लेख करावा लागेल . विलेपार्ले संन्यास आश्रम येथे चालणा या काशी संस्कृत विद्यालयाचे प्राचार्य श्री अमरनाथ झा यांचीही मला वेळोवळी मदत झाली आहे . भारतीय विद्याभवन मुंबई येथील ग्रंथालय, जेथून मला शोधनिबंधासाठी निवडलेले हस्तलिखित मिळाले तसेच पदव्युत्तर व शोधविभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेही मोलाचे सहाय्य झाले आहे .
टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ.श्रीपाद भट यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन कधीच विसरता येणार नाही .
या सर्व महानुभावांच्या मदतीवरच हा शोधनिबंध आकारास आला आहे हे निश्चित .

माधव दामोदर फाटक

## विषयानुकमणिका


| अनु क | नाव | पृष्ठांक |
|---|---|---|
| 0१ | प्रस्तावना | १ ते १२ |
| 0२ | हस्तलिखित शास्त्र | १४ ते १८ |
| 0३ | बोधार्या विवरण | १९ ते १२५ |
| 0४ | वेदान्ताचे प्रधान साधन साधनचतुष्टय व इतर | १२६ ते १४९ |
| 0५ | उपसंहार | १५0 ते १६१ |
| परिशिष्टे | | |
| 0१ | हस्तलिखित मूळ | १६२ ते २0२ |
| 0२ | प्रकरणग्रंथ | २0३ ते २0६ |
| 0३ | वेदांतबोध व अन्य ग्रंथ | २0७ ते २१८ |
| 0४ | आर्यांचे विषयवार गट | २१९ ते २३१ |
| 0५ | ग्रंथातील निवडक दृष्टांत | २३२ ते २३६ |
| 0६ | आर्याची सूची | २३७ ते २४३ |
| 0७ | संदर्भग्रंथ सूची | २४४ ते २४६ |

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

पारंगत पदवीपरीक्षेसाठी तसेच त्यापूर्वी आचार्य उपाधीसाठी अभ्यास करताना वेदान्त विषयाची अधिक ओळख झाली होती त्यामुळे त्याच विषयात संशोधनपर अभ्यास करावा असे ठरले.मोठमोठ्या प्रसिद्ध आचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा किंवा त्यावरील भाष्यांचा अभ्यास करावा व त्यातील साम्य अथवा विरोध शोधून त्याचा तुलनात्मक अभ्यास करावा असे सुचविले जात होते. योगदर्शनात गीतेतील योग व पतञ्जलिप्रणीत योग,सांख्यदर्शनातील ईश्वरकृष्णाचे सांख्य व गीताकारांचे सांख्य , श्रीमच्छंकराचार्यांनी वेगवेगळ्या प्रसंगी मांडलेल्या विचारांची तुलना करावी असंही मनात येत होते पण अशा खण्डनमण्डनात्मक विषयास मागे टाकून एखाद्या नव्या अप्रकाशित ग्रंथावर काम करावे व वेदान्ताच्या अभ्यासकांना एक नवीन ग्रंथ मिळवून द्यावा हा विचार अधिक प्रबळ ठरला व बोधार्या/वेदान्तबोध या ग्रंथाची निवड केली.

वेदान्तबोध-बोधार्या शीर्षकाविषयी

वस्तुतः मिळालेल्या हस्तलिखितावर बोधार्या हेच नाव लिहिले आहे . पण बोधार्या या नावावरून बोध करून देणा-या आर्या एवढेच कळते, कशाचा बोध हे कळत नाही . वेदान्तबोध या नावावरून वेदान्ताचा बोध हा अर्थ सुचविला जातो जो या ठिकाणी अभिप्रेत आहे.

वेदान्तबोध म्हणजे वेदान्ताचा बोध किंवा वेदान्त हाच बोध असे दोन विग्रह संभवतात यापैकी प्रस्तुत प्रबंधात वेदान्ताचा बोध हाच अर्थ अभिप्रेत आहे.बोधार्या म्हणजे बोध करून देणा-या आर्या म्हणून बोधार्या हे नाव सार्थ ठरते.

आर्या या लोकप्रसिद्ध छंदाचा उपयोग करून वेदान्ताची गहन तत्त्वे लेखकाने सोपी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'वेदान्तबोध एक समग्र अध्ययन हे प्रस्तुत प्रबंधाचे शीर्षक आहे. सदर प्रबंधात या मूळग्रंथात असलेल्या १६१आर्यांचे व्याकरण व छंदांच्या दृष्टीने परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे;तसेच यात आलेल्या पंचकोश,लक्षणा, महावाक्यादि वेदान्तविषयक संकल्पनाही वेगळ्या टीपा लिहून स्पष्ट केल्या आहेत.प्रत्येक आर्येचा अन्वयार्थ आवश्यक तेथे तळटीपा देउन स्पष्ट केला आहे.

भारतीय विद्याभवन या संस्थेच्या मुम्बई येथील ग्रंथसंग्रहालयात या ग्रंथाची एक प्रत ९0२ कमांकावर मिळाली. डॉ. राइस यांनी संपादित केलेल्या व मैसूर कूर्ग येथून १८८४ मध्ये प्रकाशित झालेल्या Catalouge of Manuscripts in Mysore & Coorg या मैसूर सरकारच्या छापखान्याकडून प्रकाशित एका सूचीनुसार १४५0 या कमांकावरील बोधार्याचे सदाशिव ब्रह्मेन्द्रस्वामी लेखक असल्याचे कळते,पण भारतीय विद्याभवन येथून मिळालेल्या प्रतीमध्ये लेखकाचा किंवा लेखनिकाचा उल्लेख आढळत नाही.National Mission for Manuscripts या संकेतस्थळाबर बोधार्या नावाचे एक हस्तलिखित Oriental Institute (Advait) Baroda येथे Manus No 7790 ( c ) असल्याचे कळले पण तपासाअंती या नावाचे काही नसल्याचे कळले,त्यामुळे उपलब्ध प्रतीवरूनच निष्कर्ष काढावे लागले.कागदाच्या प्रकारावरून व लेखनाच्या शैलीवरून हे लेखन केव्हातरी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाले असावे असे वाटते. कागदावर असलेला वॉटरमार्क ज्यात १८४८ चा आकडा व INEWEY अशी अक्षरे दिसतात तसेच वॉटरमार्क मध्ये दिसणारे राणीचे मस्तक या सर्व गोष्टी लेखकाने ग्रंथलेखन केव्हा केले असावे याचा अंदाज बांधायला मदत करतात. पोथीसारख्या कागदाच्या घडया, लेखनाच्या दोन्ही बाजूस आखलेल्या जोडरेघा, नको असलेले अक्षर झाकण्यासाठी वापरलेला पिवळा रंग यावरून या लेखनाची प्राचीनता कळून येते.ग्रंथाच्या पुष्पिकेत लेखकाचे अथवा लेखनिकाचे नाव व कालनिर्देश आढळत नसल्याने तर्कावरच मदार ठेवावी लागते.

## SURVEY OF RESEARCH वेदान्तविषयक ग्रंथांचा आढावा

वेदान्तविययक ग्रंथावर संशोधन करावयाचे ठरल्यावर या विषयात आधी कोणी कोणी लेखन केले आहे ते शोधून त्याचा आढावा घेणे आवश्यक ठरले.संशोधनासाठी निवडलेला ग्रंथ वेदान्तातील केवलाद्वैत मताचा असल्याने त्या मताचा अवलंब करणारे ग्रंथ निवडले गेले.वेदान्तबोध हा प्रकरणग्रंथाच्या श्रेणीतील असल्याने विशेषरूपाने प्रकरणग्रंथांनी मांडलेल्या विचारांचा आढावा घेतला.

शंकराचार्यांचा आत्मबोध असाच एक प्रकरणग्रंथ आहे.ज्यात आचार्यांनी काही नवीन सांगितले नाही तर उपनिषदातील विचारच सोपे करून मांडले आहेत.विद्या-अविद्या, पंचकोश अशा अत्यंत महत्त्वाच्या

विषयांना स्पर्श करत पुढे अज्ञानी मनुष्याचे  वर्णन केले आहे.अज्ञानी माणूस आत्म्यासच कर्ता मानून चालत असतो हे अनेक दृष्टांत देऊन सांगितले आहे.पुढे आत्मबोधातील २४ वा श्लोक आत्म्याचे अलिप्तपण मांडतो.  नेति नेति  या औपनिषदिक विचाराचा आधार घेत सगळ्या उपाधींचा नाश कसा होईल व ब्रह्मानुभव कसा येईल हे ३७ पर्यंत च्या श्लोकात मांडले आहे.कंठा हरवला म्हणून भ्रमाने सगळीकडे शोधणा-या मनुष्यास अन्य कोणीतरी अरे कंठा तर गळ्यातच आहे असे सांगितल्यावर जसे कळते तसेच आत्मतत्त्व सदैव सन्निधच असते फक्त ते पाहता आले पाहिजे हे खुलवून सांगितले आहे. ३८ व्या श्लोकात ध्यानविधि सांगून पुढे ६८ श्लोकापर्यंत ब्रह्म वर्णन केले आहे. हे सर्व निरूपण संक्षेपाने व शास्त्रीय पारिभाषिक शब्द वापरून केलेले आहे.यात सहज प्रवेश करून त्याच्या सहाय्याने प्रगती करण्यासाठी गुरूच्या मार्गदर्शनाची गरज लागू शकेल .

पण शोधनिबंधाचा विषय असलेल्या वेदान्तबोध ग्रंथात गर विषयक आदर,कर्मानुष्ठानाचा निषेध, महावाक्यविचार, आत्म्याचे सतत प्रकाशमान असणे अशा वेगवेगळ्या मुद्द्यांचा आधार घेत निरूपित वेदान्त सामान्य साधकांस अधिक सोपा वाटेल असे वाटते.

आत्मानात्मविवेक हा आचार्यांचा आणखी एक प्रकरणग्रंथ

या ग्रंथात आचार्य आत्मा शब्दाने चैतन्याचे ग्रहण करतात व अनात्मा शब्दाने शरीराचे.पुढे या शरीराचे स्थूल सूक्ष्म व कारण असे अवस्थेनुसार भेद सांगतात.स्थूल शरीर अंडजादि ४ प्रकारांचे,सूक्ष्म शरीर १७ घटकांचे सांगून पुढे ज्ञानेंद्रिये, कर्मेन्द्रिये, पाच कोश, पंचीकरण अशा शास्त्रीय विषयांचे निरूपण करून हे सर्व अनात्मा संज्ञेन वर्ण्य आहेत हे सांगितले आहे.लगेचच साधनचतुष्टयाची आवश्यकता प्रतिपादली आहे.ज्ञेय असे ब्रह्म तेवढेच नित्य व त्याखेरीज सर्व अनित्य,कर्माने संपादित वित्तादि पदार्थ नष्ट होतात तसेच पुण्यलोकही नष्ट होतात हा उपनिषद्विचार सहजरीत्या मांडला आहे.

असे सर्व बुद्धीगम्य निरूपण समजून घेण्यासाठी सूक्ष्मबुद्धी तसेच शास्त्रीय ग्रंथांचे अध्ययन करण्यास लागणारी मनाची तयारी आवश्यक आहे.

सिद्धान्तबिंदु हा मधुसूदन सरस्वतींचा ग्रंथ  दशश्लोकी  या शंकराचार्यांच्या ग्रंथावर आधारित व प्रकरणग्रंथांच्या श्रेणीत येतो.

आचार्यरचित दहा श्लोकात मधुसूदनसरस्वती ज्या महान तत्त्वांना पाहतात व त्यांचे समर्पक निरूपण करतात ते अद्भूत आहे. आत्मा अनात्मा,ज्ञान अज्ञान,अध्यास ,जीव, ईश्वर, आभासवाद, प्रतिबिंबवाद, अवच्छेदवाद इत्यादि अनेक मतांचा ऊहापोह केला आहे. एवढेच नव्हे तर मूलतत्त्वे किती ? सृष्टीचे स्वरूप काय आहे ? सुख, दुःख, राग, द्वेष इत्यादि भावांनी युक्त आभ्यंतर सृष्टीचे स्वरूप काय? अशा अनेकानेक विषयांवर मधुसूदनसरस्वतींनी विचार प्रकट केले आहेत.

इतक्या गहन गंभीर ग्रंथाचे अध्ययन करून त्यातील मर्म समजण्यास विद्यार्थ्याची खूपच तयारी हवी. वेदान्तबोध ग्रंथाचा काळ व परिस्थिती पाहता इतक्या तयारीचा वाचक विरळाच असणार त्यामुळे वेदान्तबोधकारांना यातील शास्त्रीय मांडणी,विभिन्न वाद, विद्या-अविद्या,उपाधि अशा अवघड व सामान्य साधकास अनावश्यक वाटणारे विषय सोडून ग्रंथ लेखन आवश्यक वाटले असावे. साधकाने साधनसंपन्न म्हणजेच नित्यानित्यादि साधनांनी संपन्न असावे एवढे सांगणे सामान्य साधकास पुरते. शेवटच्या १०५ पासून पुढे येणा-या आर्यातील अनुभूती आलेल्या माणसाची लक्षणे सामान्य वाचकास आपल्याला काय काय ओलांडून जावयाचे आहे हे कळण्यासाठी किंवा नोक्ष मोक्ष म्हणतात ती अवस्था कशी असते हे कळण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

## विषयनिवडीची कारणमीमांसा

वेदान्ताबरोबर भक्ती,योग इत्यादींची चर्चा होत असते. विचारशील माणसांना आपले खरे हित कशाने होइल याची चिन्ता वाटत असते कर्म, योग, भक्ति, तंत्र, तीर्थयात्रा, गायनादि कला, दानधर्म अशा अनेक मार्गांची भलामण त्या त्या विचारांचे लोक करत असतात.आमच्या मार्गाने शाश्वत आनंदाची प्राप्ती होईल असा विश्वासही ही मंडळी देत असतात.

मोक्षविषयक विचार पाहू लागल्यास,

न्याय ः- दुःखजन्मप्रवृत्ति तदंतरापायादपवर्गः।

वैशेषिक ः- तत्त्वज्ञानात् निःश्रेयसम्।

सांख्य ः- त्रिविधदुःख-अत्यन्तनिवृत्तिः अत्यन्तपुरुषार्थः।

योग ः- पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यम् ( स्वरूपप्रतिष्ठा वा)

अशी मतभिन्नता दिसत असली तरीही आत्यन्तिक दुःखनिवृत्ति चा विचार समान दिसतो.

तसेच शिवमहिम्नः स्तोत्रातील

त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।

रुचीनां वैचि यात् ऋजुकुटिलनानापथजुषां नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ।।

या सातव्या श्लोकाप्रमाणे सगळे मार्ग शेवटी एकाच ठिकाणी जात असतात; तसेच वर वर्णिलेल्या सगळ्या मार्गातून शेवटी आपापल्या मार्गाने वेदप्रतिपादित तत्त्वज्ञानाचा बोध होत असतो असे वाटते.रूपे वेगळी दिसत असली तरी त्यातील देवत्व एकच असते, प्रपंच नाशिवंत आहे, या मनुष्य जन्मासारखे दुर्लभ काही नाही असे सर्वत्र समान आसणारे विचार सगळ्या मार्गात दिसतात. जे वेदान्ताच्या ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या या विचाराचाच मागोवा घेतात असे वाटते.

वेदान्ताचे तत्त्वज्ञान समजण्यास फारसे अवघड नसले तरी पचण्यास मात्र लोकांना अवघड वाटते. कारण नित्यानित्यविवेक करून आपल्या नेहमीच्या संपर्कातील आवडत्या वस्तूना अनित्य समजून त्यावरील आसक्ती सोडणे,शमादि षट्संपत्तीचा संग्रह करणे सामान्य माणसांना नकोसे वाटते. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या असं आचार्य म्हणतात पण भोवताली दिसणारे, अनुभवाला येणारे, सुखदुःखांचे कारण असणारे जग मिथ्या आहे याचा अर्थ कळत नाही, समजला तरी वळत नाही असे काहीसे होत असते.

वेदांचा अन्तिम भाग अर्थात् उपनिषदे म्हणजे वेदान्त अथवा अन्त शब्दाचा निष्कर्ष असा अर्थ लक्षात घेतल्यास वेदांचे सार म्हणजे वेदान्त असं म्हणण्याची पद्धत आहे. पण प्रस्थानत्रयीमध्ये समाविष्ट केले जाणारे ब्रह्मसूत्र उपनिषदे व भगवद्गीता हे मिळून प्रधानरूपाने वेदान्त म्हटला जातो. याखेरीज आदिशंकराचार्य,विद्यारण्यमुनी, मधुसूदनसरस्वती, वाचस्पति मिश्र या बरोबरच रामानुजादिसारख्या विद्वानमंडळींच्या ग्रंथांनाही वेदान्तग्रंथ[1] म्हणून मान्यता आहे.डॉ इन्दू देशपांडे आपल्या ब्रह्मसूत्रावरील श्रीनिम्बार्कभाष्य या निबंधात (अवलोकन मार्च 2011) लिहितात, परब्रह्माचा साक्षात्कार हे मोक्षाचे

---

[1] जीवब्रह्माभेदबोधक वाक्यम् ।वेदानामन्तोऽवसानभागः। सर्वलक्षणसंग्रह २८०७, २८०८
वेदशिरोभागो ब्रह्मप्रतिपादक उपनिषद्रूपो ग्रन्थविशेषः।अत्र उपनिषदर्थ निर्णायकत्वेन ब्रह्मसूत्राणामपि वेदान्तत्वमुपचर्यते इति विज्ञेयम्।न्यायकोश

स्वरूप आहे. मोक्षप्राप्तीला साधनभूत विवेक,वैराग्य इत्यादींची विशेषत्वाने चर्चा ज्यात होते ते सर्व विचारधन वेदान्त या शब्दाने ओळखले जाते.

वेदान्तग्रंथ कोणास म्हणावे या विषयी अजून एक स्पष्ट असे मत इथे उद्धृत करणे आवश्यक वाटते.

यंबकरामशास्त्री भट्ट आपल्या सिद्धान्तबिन्दु ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात

वेदस्य अन्तो, बोधकतासम्बन्धेन तात्पर्यविषयो यत्रेति व्युत्पत्त्या यद्यपि तत्त्वमस्यादिमहावाक्यानामेव वेदान्तत्वं तथापि वाक्यार्थबोधे पदार्थज्ञानं कारणम् इति न्यायेन तदादिपदार्थशोधकस्य निखिलागमसारभूतस्य चतुर्लक्षण्यात्मकस्य शारीरकस्य तदनुकूलयुक्त्यादिसमर्पकत्वेन भामत्यादिनिबन्धानामपि वेदान्तत्वे नास्ति क्षतिः।

शिक्षाकल्पादि सहा अंगे वेदपुर षाची म्हणून वर्णिली जातात व षडंगवेदाध्ययनाची कल्पना पूर्वापार चालत आलेली आहे. याहून वेगळी संहिता, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे ,कथा व बृहत्कथा हे सहा वेदांचे विभाग मानले जातात. यापैकी उपनिषदात ज्ञानाच्या मार्गाने मोक्षाप्रत जाण्याचा उपाय दाखवला आहे. उपनिषदांची संख्या २०० हून अधिक आहे पण पहिली १० ते १२ उपनिषदेच प्रधान मानली जातात व या उपनिषदांवर पूज्यपाद शंकराचार्यानी भाष्ये लिहून अद्वैतमत ठामपणे प्रतिपादले आहे.शंकराचार्यांपूर्वी गौडपादाचार्यांनी अद्वैत मताचा पाया घातला होता असे दिसते.

अशा या गहन वेदान्तविषयास स्पष्ट करणारी अनेक पुस्तके पुस्तिका वेळोवेळी वेगवेगळ्या मठांकडून सत्संग प्रवचनांच्या वेळी वाटली जात असतात.असे सर्व साहित्य फारश्या गांभीर्याने घेतले जात नाही.आपल्या बरोबरीच्या माणसाचे सांगणे अतिपरिचयामुळे जसे दुर्लक्षिले जाते तसे काहीसे या छोट्या पुस्तकांचे होत असावे. आणखी दुसरे असे की गंभीर अभ्यासकांचे समाधान अशा पुस्तकांनी होत नाही. त्यामुळे अशा अभ्यासकांना आनंद देऊ शकेल व त्याच बरोबर जुन्याएका लेखकाच्या प्रयत्नांना विद्वन्मान्यता मिळेल या हेतूने ह्या प्राचीन हस्तलिखित संपादनरूप विषयाची निवड केली.

## विषयाची सयुक्तिकता

आपल्या संस्कृतीने मानवी जीवनाचे अन्तिम ध्येय मोक्ष मानले आहे.हे साधण्यासाठी अनेकानेक मार्गही रूढ झालेले आहेत. प्राधान्याने सहा दर्शने,कर्म , ज्ञान , भक्ति ही सर्व साधने मोक्षदायक मानली

जातात.ज्याच्या त्याच्या धारणेनुसार ती ती व्यक्ति त्या त्या मार्गाचे अनुसरण करत असते. उपनिषदांचे मत ज्ञानादेव तु कैवल्यम् असे असल्यामुळे[1] ती ज्ञानमार्गाने जाण्याचा सल्ला देतात. भगवद्‌गीतेनेही न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते (४ .३८)असे म्हटले आहे.

बोधः अन्यसाधनेभ्यः न साक्षान्मुक्त्यैकसाधनम्।

पाकस्य वह्निवत् ज्ञानं विना मोक्षो न सिध्यति।।(संदर्भः- पण्डित पीतांबरजी संपादित पंचदशी प्रस्तावना) भाव असा की , जसे अन्न शिजवण्यासाठी लाकडे भांडी इत्यादी साधनांची आवश्यकता असते पण मुख्य जो अग्नी त्याच्याशिवाय इतर साधने निर पयोगी असतात तसेच मोक्षप्राप्तीच्या मार्गावर कर्म,उपासनादि साधने चित्तशुद्धीचे काम करतात पण अंतिम लक्ष्य गाठण्यासाठी ज्ञानच हवे.

तप-तीर्थयात्रादिकांच्या योगाने स्वर्गप्राप्ती होईल कदाचित् पण मुक्ति नाही असे योगवासिष्ठात[2] सुद्धा म्हटले आहे .

तसेच विवेकचूडामणि ४७ मध्ये आचार्य म्हणतात

वेदान्तार्थविचारेण जायते ज्ञानमुत्तमम्।

तेनात्यन्तिकसंसारदुःखनाशो भवत्यनु।। दुसरीकडे

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः (भ गी ३ .२०) तसेच कुरू कर्मैव तस्मात्त्वम् पूर्वै पूर्वतरं कृतम् (भ गी ४ . १५) अशी गीतेतील वचने कर्मानुष्ठानाचा आग्रह प्रतिपादत असली तरीही कर्म व उपासना हे अविद्येच्या अन्तर्गत असल्यामुळे अविद्येची निवृत्ती करू शकत नाहीत.कर्म व उपासनेस अविद्यात्मक म्हणण्याचे कारण असे की एकाच प्रकारच्या उपासनेने दोन वेगवेगळया साधकांना वेगवेगळी फळे मिळताना दिसतात.असे असले तरीही चित्तशुद्धीसाठी कर्म व उपासना यांची जोड हवीच.

त्यामुळे ज्ञानमार्गाने मोक्ष मिळवण्याचा जे कोणी प्रयत्न करत असतील त्यांना उपनिषदांचा, ब्रह्मसूत्रांचा,भगवद्‌गीतेचा अभ्यास करण्याशिवाय पर्याय नाही; पण हे करण्यासाठी मार्गदर्शनाची गरज

---

[1] अज्ञानादेव संसारो ज्ञानादेव विमुच्यते।योगतत्त्वोपनिषत् १६

[2] न शाम्यति तपस्तीर्थैर्भ्रान्तिर्नाम कदाचन।

तपस्तीर्थादिना स्वर्गाः प्राप्यन्ते न तु मुक्तता।।योग वासिस्ठ नि उ १७४ .२६

भासेल व ते मिळणे एवढे सोपे नाही;पण म्हणून अभ्यासच करू नये असे तर म्हणता येत नाही; म्हणून या वर वर सोप्या वाटणा या ग्रंथाची ओळख करून देणे गरजेचे वाटते.

## विस्तार व मर्यादा

वेगवेगळ्या हस्तलिखितांच्या संग्रहालयात जरी हजारो हस्तलिखिते सग्रहित असली व कितीही आवड असली तरी एकटा माणूस त्यांना प्रकाशात आणू शकत नाही.जरी स्वतःच्या विषयाशी संबंधित हस्तलिखितांचे संशोधन करायचे एखाद्याने ठरवले तरीही ते अशक्यप्रायच वाटते.हस्तलिखितांच्या सूची वाचताना अतिशय अर्थपूर्ण व आकर्षक अशी खाली दिलेली अनेक नावे वाचनात आली

| | |
|---|---|
| अज्ञानध्वान्त दीपिका | सोमनाथभट्ट |
| अद्वैतचन्द्रिका | गौडब्रह्मानन्द |
| अद्वैतमकरंदसटीकम् | प्रकाशानन्द |
| अद्वैतामृतम् | जगन्नाथ सरस्वती |
| अष्टश्लोकी | पराशरभट्ट |
| अष्टश्लोकीव्याख्या | वैष्णवदास |
| आत्मविलास | शम्भुराम |
| पञ्चकोशविवेक | अज्ञातलेखक |
| महावाक्यरत्नावली | रामचन्द्रतीर्थ |

ही झाली वेदान्त ग्रंथांची सूची अन्य विषयांकडे नजर टाकली तर विषयाची व्याप्ती कळते.

| | |
|---|---|
| महायान स्तोत्र | बौद्धमत |
| कालज्ञान | शंभुनाथ |
| लघुजातक | वराहमिहिर |
| लघुशब्देन्दुशेखर | नागेशभट्ट |
| क्षुद्ररोगनिदान | रामचन्द्रशर्मा |
| मसुरिका चिकित्सा | चकपाणि दत्त |
| मूढगर्भनिदान | रामचन्द्रशर्मा |

पदार्थचन्द्रिका चन्द्रनन्दन

ही काही प्रातिनिधिक नावे आहेत. केवळ अद्वैतवेदान्ताच्या क्षेत्रात अप्रकाशित अशी किती हस्तलिखिते असतील सांगणे कठीण आहे.ही सगळी हस्तलिखिते कशा अवस्थेत असतील, त्यातील किती संपूर्ण असतील, किती वाचण्याजोगी असतील, किती मूळ लेखकाच्या हातची व किती लेखनिकानी नकलून घेतलेली हे कळण्यासाठी जिथे जिथे ही असतील तिथे तिथे जाऊन तपासणी केल्यावरच समजू शकेल.

जरी प्रस्तुत प्रबंधाला वेदान्तबोध एक समग्र अध्ययन असे नाव दिलेले असले तरी मूळ लेखकाचे सगळे विचार समजतील व त्यांचे यथार्थ प्रतिपादन करता येईल असा दावा करता येणार नाही.क्वचित्प्रसंगी लेखकाचा विचार अगदी बिनचूक व्यक्त करता येईल तर क्वचित् मूळ लेखकाचा भाव नीट मांडला नाही असे सुजाण वाचकाना वाटू शकेल.

पञ्चकोश, लक्षणा, महावाक्ये अशा महत्त्वाच्या विषयांवर शोधनिबंधात लिहिलेल्या माहितीस सुद्धा मर्यादा आहेत.

## संशोधन पद्धत

संशोधन म्हणजे काय ?

ज्ञानाचा शोध.

एखाद्या विशिष्ट विषयाबद्दल शास्त्रशुद्ध व पद्धतशीरपणे घेतलेला माहितीचा शोध.

कोणत्याही ज्ञान शाखेत काही नवीन तथ्ये शोधून काढण्यासाठी काळजीपूर्वक केलेला प्रयत्न.

ज्ञाताकडून अज्ञाताकडे केलेला प्रवास.

अद्यापि न उलगडलेले सत्य उलगडून दाखवण्याचा प्रयत्न.

संशोधनास प्रेरित करणा-या गोष्टी

- बौद्धिक आनंद मिळवणे.
- सृजनात्मक आनंद मिळवण्याची इच्छा .
- समाजाला/अभ्यासकांना विषयासंबंधी अधिक ज्ञान मिळावे अशी इच्छा.

- मानसन्मान मिळवण्याची इच्छा.
- विषयाला पुष्ट करणे, विषयातील मतमतांतरांचा आढावा घेणे, पदवी व तिच्या अनुषंगाने मिळणारे फायदे मिळवणे.
- प्रश्न सोडवण्याची, नवीन समस्या उलगडण्याची इच्छा.

संशोधनप्रणालीत दोन मुख्य प्रवाह दिसतात

१. मूलभूत संशोधन (Fundamental research)

२. उपयोजित संशोधन (Applied research)

मूलभूत संशोधन हे विचारांची प्रगल्भता, तात्विक समाधान, या फायद्यांबरोबरच उपयोजित संशोधनास प्रेरक ठरू शकते तर उपयोजित संशोधन हे उत्पादनवाढीस, अधिक चांगल्या दर्जाच्या वस्तू बनवण्यासाठी, लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी व अशा अनेक इतर बाबींसाठी उपयोगी ठरते.

मूलभूत संशोधन पुन्हा २ पोटप्रकारात दिसून येते

१. मूळ ग्रन्थाचे वाचन

२. अनुवादित अथवा संपादित ग्रन्थाचे वाचन

समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षण या व अशा अनेक विषयातील संशोधन हे मुलाखती घेऊन, प्रश्नावल्या सोडवून घेऊन व त्यातून काढल्या जाणा-या निष्कर्षांवर आधारित असते.

प्रस्तुत संशोधन हे अप्रकाशित हस्तलिखितावर आधारित असल्यामुळे  मूलभूत संशोधन या पद्धतीचे मानावे लागेल.

हस्तलिखिताची प्रतिलिपी मिळवणे हा पहिला टप्पा, जर हस्तलिखित दुसरीकडे सुद्धा संग्रहित असले तर तेथूनही प्रतिलिपी मिळवून दोन्हीची तुलना करून त्यातील अधिक चांगल्या अवस्थेतील व विश्वासार्ह प्रत संशोधनासाठी निवडणे  हा दुसरा टप्पा.या नंतर प्रत्यक्ष संशोधनाच्या कामास सुरवात करता येते . हे कामही दोन भागात विभागता येते.

१. मूळ ग्रंथाचे वाचन
२. हस्तलिखितशास्त्राच्या आधाराने मूळग्रंथाचे परीक्षण, लेखनिकाने वापरलेली लेखनशैली, लेखनातील शुद्धाशुद्धता, ज्यावरून काळ व भौगोलिक स्थानाचा अंदाज बांधण्यात मदत होऊ शकते (लेखनिक हे विद्वान असतच असे नाही तसेच पगार देउन लेखन करून घेतले जात असे त्यामुळे लेखनात चुका घडण्यास अधिक वाव असे)

पाठाची चिकित्सा, संशोधन, शुद्ध पाठ तयार करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते .

ग्रन्थाचे वाचन सुरू केल्यावर  ग्रन्थात आलेल्या विभिन्न संकल्पना कळतात त्या तपासून पहाण्यासाठी पूरक ग्रन्थांचे वाचन करणे .

दुस-या  भागात लेखकाने योजलेले दृष्टान्त, वेदान्तातील रूढकल्पनांचे केलेले स्पष्टीकरण, स्वीकारलेले आदर्श,काही खण्डनमण्डनात्मक विचार असल्यास त्यांचा विमर्श,वापरलेले छन्द , छन्दांचा प्रयोग करताना घेतलेले स्वातं□य या व अशा गोष्टींचा विचार येतो.या खेरीज वेदान्तशास्त्रास उपकारक असे लेखकाने काय दिले आहे? लेखनात लेखकाची अनुभूती कशी दिसून येते ? अशा प्रश्नांचा विचारही याच भागात होतो.

३. प्रत्येक आर्या स्वच्छ सुटसुटीत लिहून अन्वय,व्याख्या,अनुवाद, आवश्यक तेथे तळटीपा देऊन अर्थ बोध चांगल्यारीतीने होईल अशी प्रत तयार करणे हे पुढच्या टप्प्याचे काम आहे.(बोधार्या या ग्रंथावर प्रथमच संशोधन होत असल्याने संस्कृत व्याख्या सुद्धा संशोधकानेच लिहिली आहे.)

प्रकरणांची रचना

| | |
|---|---|
| प्रकरण पहिले | प्रस्तावना |
| प्रकरण दुसरे | संशोधनासाठी निवडलेला ग्रंथ हस्तिलिखित असल्यामुळे हस्तलिखितशास्त्राची चर्चा करणे आवश्यक वाटले . त्या अनुषंगाने हस्तलिखिताचे परीक्षण करून काही निरीक्षणे या प्रकरणात नोंदवली आहेत . |
| प्रकरण तिसरे | आर्यांचा अन्वय,व्याख्या व अनुवाद आवश्यक तेथे तळटीपा देऊन या प्रकरणात दिला आहे . लेखकाच्या रचनेचा व्यवस्थित आस्वाद येथे वाचकांना घेता येईल . |
| प्रकरण चवथे | संशोधनाचा ग्रंथ वेदांतपर असल्याने साधनचतुष्टय व पंचकोश याविषयी चिंतन ओघानेच आलेले आहे . |
| प्रकरण पाचवे | उपसंहार |
| परिशिष्टे १ ले | या परिशिष्टात वाचकांस मूळ हस्तलिखित व त्याची सुधारित टाईपसेट केलेली प्रत तळटीपांसह वाचावयास मिळेल . |
| २ रे | वेदान्तबोध एक प्रकरणगंथ |
| ३ रे | वेदान्तबोध व अन्य वेदान्तग्रंथ |
| ४ थे | मुख्य ग्रंथात आलेल्या विषयांची वाचकांना साधारण कल्पना यावी म्हणून आर्यांचे विषयवार गट करून त्यावरील टीपा या प्रकरणात दिल्या आहेत . |
| ५ वे | वेदांतबोधातील निवडक दृष्टांत |
| ६ वे | आर्यांची अक्षरानुकमाने सूची |
| ७ वे | संदर्भग्रंथ सूची |

निरीक्षण व निष्कर्ष

संशोधनासाठी घेतलेल्या वेदान्तबोध या ग्रन्थाचे हस्तलिखितशास्त्र, वेदान्तदर्शनातील महत्त्वाच्या कल्पना, लेखकाची व लेखनिकाची शैली अशा अनेक अंगांनी अध्ययन करताना काही वैशिष्ट्ये जाणवली ती अशी .

संशोधनासाठी मिळालेली प्रत ही मूळ लेखकाची आहे असे म्हणता येत नाही कारण कुठेही लेखकाने स्वतःच्या नावाचा उल्लेख केलेला नाही पण श्रीनिवासगुरु भानु मे गगनतलं भासयति अशा शब्दात गुरु विषयक आदर व्यक्त केला आहे, तसेच शंकराचार्यांना वंदन करून केवलाद्वैत परंपरा सुचवली आहे .

पंचकोश, लक्षणा, तत्त्वमसि चे पदशः निरूपण, वेदमहती, गुरुकृपेची आवश्यकता अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर लेखकाने आपले विचार मांडले आहेत . यावरून वेदान्तविषयाची थोडक्यात ओळख करून देण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसताो . या साठी पूर्वापार वापराले गेलेले दृष्टांत योजून लेखकाने विषय सोपा केलेला दिसतो . नु , खलु , किम् अशा संवादात्मक पदांचा समयोचित वापर केल्याने संपूर्ण लेखन वाचकांच्या हृदायास भिडते, सोपे वाटते .

१०५ पाासून पुढील सर्व आर्या वाचकास वेगळ्याच मनोभूमिकेवर घेऊन जातात . अ पासून क्ष पर्यंत प्रत्येक वर्णाचा कमाने वापर करत रचलेल्या या आर्या लेखकाचा वेगवेगळ्या शास्त्रांचा अभ्यास दाखवून देतात .

स्वतःच्या नावाचा उल्लेख न करण्यातून लेखकाची प्रसिद्धिपराङ्मुखता दिसून येते . वेदान्तदर्शन सोप्या भाषेत व गेयस्वरूपात लोकांपर्यंत पोहचवण्याचा लेखकाचा हेतू स्पष्ट दिसतो . आर्यांची रचना अशा कुशलतेने केली आहे की जुन्या पारायण परंपरेने पाठ करणा-या साधकांस हळु हळू चढत्या कमाने विषयात प्रवेश करता येईल व शेवटी ज्ञान किंवा आत्मानुभूती कशास म्हणतात तेही कळेल .

ॐॐॐॐॐ

## हस्तलिखित मजकुराची समीक्षा

लिखित सामुग्रीची हस्तलिखितांच्या आधाराने समीक्षा करण्याचे एक शास्त्र आहे. ही समीक्षा म्हणजे कुशल व बुद्धिमान मनुष्याने पद्धतशीरपणे हस्तलिखिताचे केलेले परीक्षण होय. मूळ लेखकाला वाटलेले विचार अथवा त्या विचारांच्या जवळ असणारे विचार हस्तलिखितातून कसे व्यक्त होतात हे दाखवण्याची जबाबदारी समीक्षकाची असते.

शेकडो वर्षापूर्वी जगलेल्या एखाद्या विद्वान लेखकाच्या मनात डोकावून हस्तलिखितातील शब्दांचा बोध करवून देणे सोपे काम नाही त्यासाठी शिस्तबद्ध प्रशिक्षण व हस्तलिखित शास्त्राच्या मूलतत्त्वांची माहिती हवी. म्हणून कसेही केलेले वाचन वा संपादन मूळ अर्थापासून दूर जाण्याचा धोका असतो. कोणत्याही हस्तलिखिताचे संपादन म्हणजे केवळ ते छापून काढणे नाही तर त्यात निहित अर्थ त्या विषयाच्या वाचकांसाठी खुला करून देणे.

त्यामुळे कोणत्याही हस्तलिखिताच्या संपादकापाशी खालील ५ कौशल्ये असणे आवश्यक आहे.

- संपादकास त्या भाषेची चांगली ओळख असली पाहिजे विशेषतः म्हणी, वाक्प्रचार, संस्कृतिविषयक संकल्पना माहीत असल्या पाहिजेत.
- भाषेचे व्याकरण अवगत असले पाहिजे.
- भाषेच्या लेखनशैलीची चांगली जाण असली पाहिजे.
- भाषेतील शब्दांच्या विविध अर्थछटांची जाणीव असली पाहिजे.
- जर एखाद्या शास्त्रीय विषयावरील हस्तलिखिताचे संपादन होत असेल तर त्या विषयातील पारिभाषिक शब्दांची ही चांगली जाण असली पाहिजे.

उदाहरणार्थ -- जर विषय व्याकरणाचा असेल तर प्रत्याहार, यण्, कारक, संप्रसारण, अधिकार इत्यादि शब्दांचा अर्थ नीट माहीत असला पाहिजे.

जर श्रौतग्रंथाचे संपादन असेल तर वापरली जाणारी पात्रे, वेगवेगळे अग्नी, वेगवेगळ्या प्रकारच्या इष्टी या सर्वांची जाण असली पाहिजे .

- संपादकाने लेखकाच्या काळातील सामाजिक राजकीय परिस्थिती बरोबरच देशकालाचे भान ठेवले पाहिजे .

हस्तलिखित शास्त्राच्या दृष्टीने बोधार्या /वेदान्तबोध ग्रंथाच्या उपलब्ध प्रतीचे परीक्षण करताना पुढील गोष्टी लक्षात आल्या .

| | |
|---|---|
| बांधणीप्रकार | पोथी |
| लेखन सामुग्री | कागद व बोरू |
| एकूण पाने | पाने २० पृष्ठे ४० |

शेवटची दोन पाने वगळता प्रत्येक पानावर ७ ओळी, शेवटच्या दोन पानांवर ८- ८ ओळी

प्रत्येक ओळीत २२ ते २५ अक्षरे

या पार्श्वभूमीवर बोधार्या ग्रंथाचे संपादन करतांना काही विशेष चुका दिसून आल्या त्या अशा

अक्षर गाळून टाकणे ः यांत्रिकपणे लिहिताना पाठोपाठ येणारे अक्षर गाळले जाते . याला इंग्रजीत haplology असे म्हणतात . यात बुद्धिपुरःसर गाळण्याबरोबरच न कळत गाळणे सुद्धा येते .

उदाहरणार्थ -१ घनतरमोहतमिस्त्रकरपरिध्वंसभानुनिकरगेहम् या १२०[कड] व्या आर्येतील दुस-या चरणात भानुनिकरगेहोऽहम् असे लिहिण्याच्या ऐवजी भानुनिकरगेहम् . असे लिहिणे या दोषाचे उदाहरण आहे .
२ सीकरफेनतरङ्गाः सिन्धोरपराणि नखलवस्तुनि या १४४[कड] व्या आर्येतील चवथ्या चरणात नखलववस्तुनि असे लिहिण्याच्या ऐवजी नखलवस्तुनि असे लिहिणे या दोषाचे उदाहरण आहे .

अक्षराची भर घालणे ः कधीतरी न कळत, अपघाताने, तर कधीतरी समजून उमजून लेखनिक अक्षराची भर घालतो .

अक्षर बदलणे ः लेखनिक आपल्याला योग्य वाटणारे अक्षर घालतो . सारख्या दिसणा-या अक्षराच्या जागी दुसरे अक्षर लिहितो .

उदाहरणार्थ -१ देशिकवरं दयालुं वन्देऽहं निहितसकलसन्देहम्।[अव] २ या ठिकाणी निहतसकलसन्देह असे असावयास हवे तेथे निहितसकलसन्देह असे लेखनिकाने आपल्या मनानेच केलेले असावे .

३१ व्या आर्येत

प्रत्यक्षंत्वं परोक्षंत्वं परिपूर्णत्वं च सद्वितीयत्वम्। [अव]

क्ष या अक्षरावर अनुस्वार चूक दिसतो . प्रत्यक्षत्वं परोक्षत्वं हा पाठ योग्य आहे .

संस्कृतचे चांगलेज्ञान नसणारे लोक असे अयोग्य अनुस्वार देताना दिसतात .

४३ व्या आर्येत छान्दोग्य उपनिषदातील आचार्यवान् हि पुरु षो वेदेत्यर्थस्य वेदसिद्धत्वात्।। [कड] हा वाक्यांश लिहिताना गडबडीने वान् या प्रत्ययाआधिच हि घातलेला दिसतो .

७५ व्या आर्येत घटकरकाद्या लेखनिकाची चूक वाटते घटकरकादयः हे पद बरोबर आहे .

कारणमृदि विदितायां घटकरकाद्या यथावगम्यन्ते।।७५ [कड]

७९व्या आर्येत मुळ संहितेत काकपद घालून भवति शब्दाची जागा बदलण्याचे कारण लक्षात येत नाही . नेहमीचा परिपाठ सोडून शब्द खाली लिहिला आहे .

तस्मात्सदेव तत्त्वं सर्वेषां भवति कारणं जगताम्।७९ [कड]

तसेच १५६ व्या आर्येत

वारिजबुद्बुदरक्षामूढाः कुर्वन्ति मोहबन्धनम् ।।[कड] मध्ये वारिजबुदबुदराक्षामूढाःशब्दात क्षा वर अनावश्यक अनुस्वार मूळ लेखात आहे.

कुर्वति असे रूप मुळ लेखात आहे पण ते कुर्वन्ति असे असावयास हवे.

तसेच १५७ व्या आर्येत

मूळ पाठ यथा ह्याही असा आहे पण यथा ह्यहि हा योग्य पाठ आहे

जलमिव मृगतृष्णायां शुक्तौ रजतं यथा ह्यहि रज्ज्वाम्। [अव]

लेखनिकाने कसे लिहावे या गोष्टीचे सुंदर निरूपण समर्थ रामदासांनी दासबोधाच्या लेखनक्रियानिरूपण या समासात असे केलेले आहे.

वाटोळे सरळे मोकळे। वोतले मसीचे काळे।
कुळकुळीत वोळी चालिल्या ढाळे। मुक्तमाळा जैशा।।२।।
अक्षरमात्र तितुके नीट। नेमस्त पैस काने नीट।
आडव्या मात्रा त्याही नीट। आर्कुली वेलांट्या।।३।।
पहिले अक्षर जो काढीले। ग्रंथ संपेतो पाहात गेले।
येका टाकेची लिहिले। ऐसे वाटे।।४।।
अक्षराचे काळेपण। टाकाचे ठोसरपण।
तैसेची वळणवाकण। सारिखेची।।५।।
वोळीस वोळी लागेना। आर्कुली मात्रा भेदीना।
खालिले वोळीस स्पर्शेना। अथवा लंबाक्षर।।६।।

१. १७२0 च्या आसपास दक्षिण भारतात वावरणा-या सदाशिव ब्रह्मेन्द्रस्वामी ची कृती असलेला हा ग्रंथ १८४८ च्या मागेपुढे नकलून घेतलेला आहे. यावरून एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात वेदांतविषयाची आवड जनमानसात होती हे दिसून येते.

२. या प्रतीवर मूळ लेखकाची स्वाक्षरी नाही किंवा अन्य कोणा विद्वानाची स्वाक्षरी अथवा टिप्पणी नाही त्यामुळे या प्रतीस अप्रमाणित प्रत म्हणावे लागेल.

३. या प्रतीत केवळ मूळ संहिताच आहे कोणाचेही भाष्य अथवा टीपा नाहीत त्यामुळे हस्तलिखितशास्त्राच्या निकषांनुसार हे लेखन एकपाठ या संज्ञेचे होइल.

४. घडीची पाने, कागदावर आढळणारा १८४८ चा वॉटरमार्क व राणीच्या मुकुटाचे चित्र या खुणांवरून भारतात इंग्रजांचे शासन सुरू झालेल्या प्रांतात हा ग्रंथ नकलून घेतला असावा असे वाटते.

५ . हस्तलिखितांचे लेखनिक सामान्यपणे ज्या पद्धतीने लेखन करतात त्याच पद्धतींचा अवलंब इथेही केलेला दिसतो .

अ . दोन शब्दात जागा न सोडणे

आ . चरणाच्या शेवटी येणारा अनुस्वार हलन्त मकाराच्या स्वरूपात न लिहिणे .

इ . अ काराचा लोप दाखवणारे ऽ अवग्रह चिह्न न देणे .

ई . अनुस्वारांच्या साठी अनुनासिकांचा उपयोग न करणे .

उ . चुकून राहिलेला शब्द अथवा अक्षर समासात लिहितात व ते कळण्यासाठी इंग्रजी व्ही अक्षराची खूण वापरतात .

ऊ . नको असलेले अक्षर अथवा शब्द खोडण्या साठी हरताळ वापरलेला दिसतो .

ए . संस्कृत मुळाक्षरात नसलेला ळ लेखनिकाने ८ वेळा वापरलेला दिसतो . यावरून असे म्हणता येइल की महाराष्ट्र, कर्नाटक अथवा गुजरात या पैकी एखाद्या प्रदेशात लेखनिकाचे वास्तव्य असावे .

ऐ . लेखनाच्या दोन्ही बाजूस आखलेल्या उभ्या समांतर रेषा जुन्या शैलीचा परिचय देतात .

ओ . ग्रंथात फक्त श्रीनिवास या गुरूच्या नावाचा निर्देश आहे व अद्वैतपरंपरा दाखविणारे शंकराचार्यांचे नमन आहे स्वतःचा नामनिर्देश नाही . त्यावरून लेखक प्रसिद्धिपराङ्मुख असावा असे वाटते . ग्रंथलेखन स्वान्तःसुखाय असावे असेही म्हणता येईल .

ॐॐॐॐॐ

# प्रकरण तिसरे

## बोधार्या विवरण

### श्रीगणेशाय नमः

श्री गुरु चरणद्वन्द्वं वन्देहं मथितदुस्सहद्वन्द्वम्।

भ्रान्तिग्रहोपशान्तिं पांसुमयं यस्य भसितमातनुते।।१।।

अन्वयः- मथितदुस्सहद्वंद्वम् श्रीगुरु चरणद्वंद्वम् अहं वन्दे यस्य पांसुमयं भसितं भ्रान्तिग्रहोपशान्तिम् आतनुते।

व्याख्या - मथितेति। दुःखेन सहते इति दुःसहः। दुःसहं च असौ द्वंद्वं युग्मं दुःसहद्वंद्व।मथितं उन्मादितं दुःसहद्वंद्वं येन सः मथितदुःसहद्वंद्वः। तं गुरोः चरणद्वंद्वं वामदक्षिणयोर्युगलं गुरु चरणद्वंद्वं। अहं वन्दे नमामि। यस्य गुरुचरणद्वंद्वस्य पांसुमयं रेणुमयं तत्प्रकृतवचने मयट् ५। ४।२१ भसितं तेजःदीप्तिः। भ्रान्तिरूप ग्रहाणां शान्तिं शमम् आतनुते विस्तारयति।ग्रह शव्देन भयंकरजलचरेव विषयासक्तिः तथा आकाशस्थदुष्टग्रहाणां निर्देशः भवति।

अनुवाद - सहन करण्यास अतिशय कठीण अशी द्वंद्वे[1] ज्यांनी घुसळून घुसळून नाहीशी केली अशा श्रीगुरुं च्या चरणद्वयांना मी नमन करतो.(त्या गुरु चरणांची आणखी महती सांगतात)ज्या धूलीयुक्त गुरु चरणांचे तेज भ्रान्तिरूप[2] ग्रहपीडेचा नाश करते.

देशिकवरं दयालुं वन्देऽहं निहितसकलसन्देहम्।

यच्चरणद्वयमद्वयम् अनुभवमुपदिशति तत्त्वमस्यर्थम्।।२।।

अन्वयः -अहं निहतसकलसन्देहं दयालुं देशिकवरं वन्दे।यच्चरणद्वयम् तत्त्वमसि इत्यस्य अद्वयम् अर्थम् उपदिशति।(यद्यपि हस्तलिखिते निहित इति शव्दः पठ्यते तथापि निहत शव्देन सम्यगर्थबोधः)

---

1 सुखदुःखादि टोकाचे अनुभव

2परमार्थाने सत्य असणा-या विषयांना असत्य मानणे व असत्यास सत्य मानणे.
 निष्फलप्रवृत्तिजनको बोधः २२१७ सर्वलक्षणसंग्रहः

3 स्पृहिगृहिपतिदयिनिद्रातन्द्राश्रद्धाभ्यः आलुच्।पा सू ३.२.१५८

व्याख्या-अहं स्वयं इत्यर्थः। निहतः नष्टः समग्रः संशयः येन सः निहतसकलसन्देहः। तं निहतसकलसन्देहं। दिशति बोधयति इति देशिकः। वरः च असौ देशिकवरः।तं देशिकवरं दयालु[3] दयाशीलं कार णिकं नमामि।यस्य चरणद्वयमिति आदरबोधकः प्रयोगः पादकमले तत्त्वमसि वाक्यस्य न द्वयं अद्वयं ऐक्यबोधकं एकमात्रम् इत्यर्थः। अर्थम् नाम भावः उपदिशति स्पष्टं निरूपयति ।

अनुवाद - सर्व संशयांचा[1] नाश करणा-या अत्यंत दयाळू अशा श्रेष्ठ गुरुं ना मी वंदन करतो.ज्याची दोन्ही पाउले तत्त्वमसि या महावाक्याचा[2] अनुपम असा अर्थ समजावून देतात.( पाउले अर्थ समजावून देतात याचा शब्दशः अर्थ न घेता गुरु स्वतः बोध करवतात असा घ्यायचा गुरु विषयक आत्यन्तिक आदर व्यक्त करण्यसाठी गुरु च्या चरणांचा फक्त उल्लेख करण्याची पद्धत होती)

पहिल्या दोन श्लोकात गुरु वन्दन झाल्यावर आता कोणत्या प्रकारचा शिष्य अर्थात् कोणत्या गुणवत्तेने युक्त शिष्य गुरुं कडून ज्ञान मिळवण्याचा अधिकारी होतो हे सांगतात .

संसारदावपावकसन्तप्तः सकलसाधनोपेतः।

स्वात्मनिरूपणनिपुणैः वाक्यैः शिष्यः प्रबोध्यते गुरूणा।। ३।।

अन्वयः - संसारदावपावकसंतप्तः सकलसाधनोपेतः शिष्यः स्वात्मनिरूपणनिपुणैः वाक्यैः गुरूणा प्रबोध्यते।

व्याख्या - संसारेति। संसरति जीवः जन्ममृत्युचक्रे अनेन इति संसारः। संसार एव दावः अनलः संसारदावः। गहनं वनं तस्मिन् जातः।यः पावकः पावनं करोतीति अनलः संसारदावपावकः। तेन सन्तप्तः अतिशयतप्तः संसारदावपावकसंतप्तः। तापकारणात् निर्मलः। यथा तापनात् सुवर्ण शुद्धं भवति

---

[1] साधु वस्तु होऊन ठेला।संशय ब्रह्मांडाबाहेर गेला।निश्चय चळेना ऐसा झाला।या नाव सिद्ध।।दासबोध ओ १0 स १0 द ५

[2] आकाराने लहान पण गहन अर्थ सांगणारी वाक्ये.

वाक्यं स्याद् योग्यताकाङ्क्षासत्तियुक्तःपदोच्चयः।वाक्योच्चयो महावाक्यमित्थं वाक्यं द्विधा मतम्।।साहित्य दर्पण २ .१

1 प्रज्ञानं ब्रह्म। ऐतरेयोपनिषद् १। ५। ३

२ अयमात्मा ब्रह्म। माण्डूक्योपनिषद् १। २,

३ तत्त्वमसि। छान्दोग्योपनिषद् ६। ८। ७

४ अहं ब्रह्मास्मि। बृहदारण्यकोपनिष्द १। ४। १0,

तथा शुद्धः इत्यर्थः ।तथा सकलैः साधनैः[1] युक्तः विद्यार्थिः। स्व एव आत्मा स्वात्मा तस्य निरूपणं स्वात्मनिरूपणं तस्मिन् निपुणः अभिज्ञः स्वात्मनिरूपणनिपुणः।स्वात्मनिरूपणपरैः वाक्यैः आचार्यद्वारा शिष्यः प्रबोध्यते बोधितः भवति।

अनुवाद - संसाररूप जंगलातील वणव्याने पोळलेला व सर्व साधनांनी संपन्न म्हणजेच साधनचतुष्टय संपन्न असा शिष्य आत्म्याचे यथार्थ निरूपण करणा-या वाक्यांनी गुरु कडून बोध प्राप्त करतो.समर्थ रामदास दासबोधात ५.३.३४ मध्ये जो संसारदुःखे दुखवला।जो त्रिविधतापे पोळला।तोचि अधिकारी झाला।परमार्थासी।।अशा शब्दात अधिकारी व्यक्तीचे वर्णन करतात.

जंगलात शिरल्यावर आधीच दिशांचे भान हारपते त्यातच जर अचानक वणवा लागला तर जी अवस्था होईल तिच्याशी संसाराचे साम्य दाखवून जीवाची अगतिकता यथार्थ दाखविली आहे.

नाहमिति वेत्ति योऽसौ सत्यं ब्रह्मैव वेत्ति नास्तीति।

अहमस्मीति विजानन् ब्रह्मैवासौ स्वयं विजानाति।। ४।।

अन्वयः - न अहम् इति यः वेत्ति असौ नास्तीति (प्रकारेण) सत्यं ब्रह्मैव वेत्ति।अहम् अस्मि इति विजानन् (अपि परमार्थेन स) असौ ब्रह्मैव स्वयं विजानाति।

व्याख्या - नाहमिति यः अहंभावरहितः स्वविषयक अभिमान एव अहंभावः[2] तेन अहंभावेन रहितः भवति। तथा आचरति च। ईदृशः साधकः नाहं इति परमार्थेन ज्ञात्वा। तेन ज्ञानेन सर्वदा वर्तमानं ब्रह्मैव जानाति। यदि अहममस्मि इति तस्य भावः तर्हि अहमेव सर्वत्र व्याप्य तिष्ठामि इति भावेन अपि स ब्रह्ममेव जानाति।

अनुवाद - मी नाही असे समजणारा पर्यायाने अन्य कशाचे तरी अस्तित्व मानून सत्य ब्रह्मालाच जाणत असतो. तर मी आहे असे जाणणारा परमार्थाने ब्रह्माचाच स्वीकार करत असतो ब्रह्मालाच जाणत

---

[1] नित्यानित्यविवेक,इहामुत्रफलभोगविराग,शमादिसंपत्ति,मुमुक्षुत्व ही ४ साधने म्हणजे ब्रह्मप्राप्तीची बहिरंग साधने व श्रवण मनन निदिध्यासन ही अंतरंग साधने आहेत.

[2] अहंकारः स विज्ञेयः कर्ताभोक्ताभिमान्ययम्।सत्त्वादिगुणयोगेन चावस्थात्रयमश्नुते।।विवेक चूडामणिः १०४

असतो. तत् पद सुचवले आहे.पुढे ९८ व्या आर्येत आपल्याहून अन्य कशाचे तरी अस्तित्व मानणे म्हणजे ब्रह्माचे अस्तित्व मानणे हे दाखवले आहे.

अस्ति स्वयमित्यस्मिन् अर्थे कस्यास्ति संशयः पुंसः।

तत्रापि संशयश्चेत् संशयिता यः स एव भवसि त्वम्।।५।।

अन्वयः - (अहम्)स्वयम् अस्ति इत्यस्मिन् अर्थे कस्य पुंसः संशयः अस्ति (न कस्यापि इति भावः) तत्रापि (एवं सत्यपि यदि)चेत् संशयः तर्हि यः संशयिता स एव त्वं भवसि (नाम) त्वं[1] पदस्य वाच्यः भवसि।

व्याख्या -अहं स्वयम् अस्मि न वा ईदृशः सन्देहः कस्यापि पुर षस्य नास्ति। मम जिव्हा अस्ति न वा' इति यदि कश्चिद् वदति तर्हि यथा तस्य कथनं निरर्थकं तथा एष संशयोऽपि निरर्थकः इति भावः।तथापि यदि संशयः उच्यते नाम आत्मनः आस्तिक्यं अधिकृत्य भ्रम अस्ति तर्हि यः पुरुषः संशयिता संशयकर्ता स त्वमेव असि अर्थात् तव अस्तित्वं सिद्धमेव।

अनुवाद - मी स्वतः आहे की नाही असा संशय कोणासही येत नाही कारण स्वतःच्या अस्तित्वाचे भान सर्वांनाच असते.अशी वस्तुस्थिती असतानाही जर कोणास संशय असेल तर संशय घेणारा म्हणजे तू स्वतः झालास व अशा रीतीने तुझे अस्तित्व सिद्ध झाले असाच विचार पंचदशीच्या ३-या प्रकरणात येतो[2]. त्वं पदाचा बोध या प्रकाराने करून दिला गेला.

जीवब्रह्माभेदः

ब्रह्म त्वमेव तस्मात् नाहं ब्रह्मेति मोहमात्रमिदम्।

मोहेन भवति भेदः क्लेशाः सर्वे भवन्ति तन्मूलाः।।६।।

अन्वयः - त्वमिति।। त्वमेव ब्रह्म (असि) तस्मात् नाहम् ब्रह्म इति इदम् (ज्ञानं) मोहमात्रम् (अस्ति)।मोहेन भेदः भवति। सर्वे क्लेशाः तन्मूलाः भवन्ति।

---

[1] त्वं पदाचा विचार शारीरभाष्यात सन्ध्यधिकरणात- स्वप्नावस्थेमध्ये कोणताही लौकिक प्रकाश नसताना माणूस आत्मप्रकाशात स्वप्न पाहतो तो स्वप्न पाहणारा त्वं पदाचा बोधक होय.तसेच कर्मानुस्मृतिशब्दविधि या अधिकरणात – झोपेतून जागा झाल्यावर झोपण्यापूर्वी अर्धे झालेले काम पूर्णत्वास नेतो,नातेवाईक तसेच पूर्वजांचेही स्मरण ठेवतो तो त्वं पदाचा बोधक होय.

[2] अस्ति तावत्स्वयं नाम विवादाविषयत्वतः।स्वस्मिन्नपि विवादश्चेत्प्रतिवाद्यत्र को भवेत्।।२३.३ पञ्चदशी

व्याख्या - शिष्यमधिकृत्य गुरुः वदति। बृंह् व्यापकत्वात् ब्रह्म त्वमेव असि। अतः नाहं ब्रह्म इति चिन्तनं नाम मोहः चित्तवैकल्यम्। मुह् वैचित्ये भ्रमावस्था मोहमात्रं द्वयसज्दघ्नञ्मात्रचः पाणिनीसूत्र ८.२.३७ केवलमोहरूपः इत्यर्थः।मोहेन मोहकारणात् भेदः अन्तरायः जीवब्रह्मणो भेदः।अविद्यादि[1] क्लेशाः भेदमूलाः भवन्ति। भेदस्वीकारात् अनुभूयन्ते इत्यर्थः।यदा अहं जीव इति भावः जायते तदा अहम् अज्ञः तज्ज्ञःइत्यादयः भावाः समुत्पन्नाः भवन्ति एषा एव अविद्या।

अनुवाद -तू स्वतःच ब्रह्म आहेस, म्हणून मी ब्रह्म नाही असे ज्ञान म्हणजे केवल मोह होय. मोह म्हणजे नित्यानित्यविवेकाचा अभाव,या मोहामुळेच जीव व ब्रह्म असा भेद वाटतो.हा भेद म्हणजेच अविद्या[२] व सर्व क्लेश त्या अविद्येच्या मुळे अनुभवास येत असतात. असि पद सुचवले जात आहे.

न क्लेशपञ्चकमिदं भजते कृतकोशपञ्चकविवेकः।
अतः एव पञ्चकोशान् कुशलधियः सन्ततं विचिन्वन्ति।।७।।

अन्वयः - कृतकोशपञ्चकविवेक इदं क्लेशपञ्चकं न भजते अतः एव कुशलधियः संततं पञ्चकोशान् विचिन्वन्ति।

व्याख्या- कृतकोशपञ्चकविवेकेति।कोशो नाम कश्चिदाकारः यस्मिन् पदार्थाः स्थाप्यन्ते। कोशानां पञ्चकं कोशपञ्चकम्। तस्मिन् विवेकःसम्यग्विचारणा कोशपञ्चकविवेकः।स येन कृतः सःकृतकोशपञ्च्कविवेकः।अयं वर्ण्यमानःअविद्यादि पञ्चक्लेशानां समूहः न भजते न प्राप्नोति इत्यर्थः। अतः एव कुशं लुनाति इति कुशलः पटुः। कुशला धिः येषां ते विचक्षणाः। संततं पुनः पुनः पञ्चकोशानां विवेकेन चिन्तनं कुर्वन्ति।

अनुवाद -ज्याने पञ्चकोशांवर[3] विवेक केला म्हणजेच त्यांचे यथार्थ स्वरूप जाणून घेतले त्याला अविद्यादि पञ्चक्लेश बाधक ठरत नाहीत म्हणूनच बुद्धिमान पुर ष नेहमी पञ्चकोशांचे विवरण करतात.

---

[1] अविद्याा,अस्मिता,राग,द्वेष व अभिनिवेश या पाचांना योग दर्शनाने क्लेश असे म्हटले आहे या ५ मनोविकारांमुळे जीवास अस्वस्थतता वाटू लागते व या अस्वस्थतेमुळे पीडा

[2] संसारः परमार्थोऽयं संलग्नःस्वात्मवस्तुनि।इति भ्रान्तिरविद्या स्याद्विद्ययैषा निवर्तते।। ११0 तृप्तिदीप पञ्चदशी

[3] पंचकोश- स्थूल शरीरापासून सुरू होउन स्वभावतःच आनंदमय असलेल्या सूक्ष्म अशा आत्म्यापार्यंत या कोशांची कल्पना केलेली आहे.अन्नमय म्हणजे स्थूल शरीर,त्यानंतरचा अधिक सूक्ष्म प्राणमय,त्याहून अंतर्भागात असणारा विज्ञानमय, विज्ञानमयाहून सूक्ष्म मनोमय व

पञ्चकोशांच्या विवेकाची आवश्यकता सांगतांना पञ्चकोशांनी आत्मतत्व कसे आवृत्त होते हे समजवण्यासाठी शंकराचार्य पाण्यातील शेवाळ्याचा दृष्टान्त देतात.

कोशैरन्नमयाद्यैः पञ्चभिरात्मा न संवृत्तो भाति।

निजशक्तिसमुत्पन्नैः शैवालपटलैरिवाम्बुवापीस्थम्।।विवेक चूडामणी १५१

पाण्यातूनच उत्पन्न झालेले शेवाळे पाण्यास झाकून टाकते व पाणी दिसेनासे होते तसेच आत्म्यावरच आश्रित असलेल्या या अन्नमयादि कोशांच्या बलवान होण्याने आत्मा झाकला जातो.जसे शेवाळे दूर केल्यावर त्याखालचे स्वच्छ पाणी दिसते तसेच पंचकोशांच्या विवेकानंतर आत्म्याचे ज्ञान होते.

अन्नप्राणमनोमयविज्ञानानन्दपञ्चकोशानाम्।

एकैकान्तरभाजां भजति विवेकात् प्राकाशतामात्मा।।८।।

अन्वयः एकैकान्तरभाजाम् अन्नप्राणमनोमयविज्ञानानंदपञ्चकोशानाम् विवेकात् आत्मा प्राकाशतां भजति।

व्याख्या -एकैकान्तरेति। एकस्य अन्तर्भागे अन्यः तिष्ठति इति। प्रथमस्य अन्तर्भागे द्वितीयः द्वितीयस्य अन्तभागे तृतीयः एवं कमेण एकैकान्तरभाजः। तेषाम् अन्नमयादिकोशानां विवेकः नाम चिज्जडयोर्विवेकः। तस्मात् विवेकात् आत्मा क्षेत्रज्ञः। प्रकाशस्य समूहः भावः प्राकाशः। ग्रामजनबन्धुभ्यस्तल् ।४.२.४३ तां प्राकाशतां भजति प्रकटः भवति इत्यर्थः।

अनुवाद - अनुकमाने एकेकाच्या अन्तर्भागात असणा या अन्नमयादींवर विवेक[1] केल्यामुळे आत्मा प्रकाशाने भरून जातो प्रकट होतो.म्हणजेच जीवास आत्मज्ञानाची अनुभूती येते.एखाद्या बिंदुभोवती वर्तुळे काढून त्यांना बाहेरून आतल्या दिशेने अन्नमयापासून नावे देत बिंदूस आनंदमय असे नाव दिल्यास पंच कोशांची रचना डोळयासमोर येऊ शकते.

वपुः इदमन्नमयाख्यः कोशोनात्मा जडो घटप्रायः।

प्रागुत्पत्तेः पश्चात् तदभावस्यापि दृश्यमानत्वात्।।९।।

---

सर्वात सूक्ष्म व अंतर्भागी असणारा आनंदमय असे थोडक्यात कोशांचे वर्णन होईल.आधुनिक भौतिक विज्ञानास हे कोश आढळत नाहीत.पण आध्यत्मिक प्रगतीच्या पातळ्या वर्णन करताना या कोशांचा आधार घेतला जातो.

[1] विवेक शब्द विच् या निवडणे अशा अर्थाच्या धातूपासून बनला आहे व नित्य अनित्य यातील भेद कळणे हा अर्थ इथे अभिप्रेत आहे

आत्माभासस्य जीवस्य संसारो नात्मवस्तुनः। इति बोधो भवेद्विद्या लभ्यतेऽसौ विचारणात्।।१११ तृप्तिदीप पञ्चदशी

अन्वयः - इदम् अन्नमयाख्यः कोशः वपुः जडः घटप्रायः (अस्ति तथा) उत्पत्तेः प्राग् पश्चादपि तदभावस्य दृश्यमानत्वात् न आत्मा। आत्मा भवितुं न अर्हति इत्यर्थः।

व्याख्या - इदमिति। अयं वर्ण्यमानः अन्नपानादिभिः पुष्टः अन्नस्य विकारःअन्नमयः इत्याख्यया प्रसिद्धः। कोशः नाम वपुः। उप्यन्ते सर्व दुःखानि अत्र इति वपुः। मृण्मयघट इव जडः महाभूतानां संघातात् उत्पन्नः अतः भूतवज्जडः अचेतनः वर्तते। यतः उत्पत्तेः पूर्व सृजनात् प्राक् तथा अनंतरमपि तस्य अभावः दृश्यते। यद्यत् उत्पत्तिविनाशशीलम् अस्ति तत्तत् आत्मा इति संज्ञां न अर्हति।

अनुवाद -हा अन्नमय कोश स्थूल व एखाद्या घटाप्रमाणे जड आहे.कारण उत्पत्तीच्या पूर्वी व नाशानंतरही याचा अभाव दिसून येतो.येथे प्रागभाव व प्रध्वंसाभाव[1] यांच्या सहायाने चार्वाक व जे अन्य सामान्य जन देहालाच आत्मा मानतात त्यांच्या मताचे निराकरण केले आहे.या अन्नमयाचे वर्णन विवेकचूडामणिमध्ये ७४व्या श्लोकात शंकराचार्य असे करतात

मज्जास्थिमेदः पलरक्तचर्म त्वगाह्वयैर्धातुभिरेभिरन्वितम।

पादोरूवक्षभुजपृष्ठमस्तकैरङ्गैरूपाङ्गैरूपयुक्तमेतत।।

कोशः प्राणमयोऽयं वायुविशेषो वपुषि अवच्छिन्नः।

अस्य कथमात्मता स्यात् क्षुत्तृष्णाभ्याम् उपेयुषःपीडाम्।।१०।।

अन्वयः - अयं प्राणमयकोशः (नाम)वायुविशेषः वपुषि अवछिन्नः क्षुत्तृष्णाभ्याम् पीडाम् उपेयुष अस्य आत्मता कथं स्यात्।

व्याख्या -अयं वर्ण्यमानः। द्वितीयः प्राणैः असुभिः ओतप्रोतः परिपूर्णः अतः प्राणमय इत्युच्यते। पञ्चप्राणाः[2] वायुरूपाः एव अतः वायुविशेषः। वपुषि शरीरे अवछिन्नः द्विधा त्रिधाकृतः

---

[1] अभाव चार प्रकारचा मानला आहे
**प्रागभाव** एखाद्या वस्तूच्या उत्पन्न होण्यापूर्वीचे तिचे नसणे
**प्रध्वंसाभाव** उत्पन्न झालेला पदार्थ तुटून फुटून नष्ट होणे
**अन्योन्याभाव** एका ठिकाणी असलेली वस्तू दुसरीकडे नसणे
**अत्यन्ताभाव** कधीच असू न शकणारी वस्तू जसे सशाचे शिंग

[2] **५ प्राण** हृदि प्राणः गुदेऽपानः समानो नाभिदेशगः। उदानः कण्ठदेशस्थो व्यानः सर्वशरीरगः।।२९

इतस्ततः विकीर्णः पुनः कीदृशः क्षुधापिपासादिभिः पीडाः कष्टान् उपेयुषः अनुभूयमानः एवं विकारग्रस्तः अस्य आत्मता कथं स्यात् ।कथम् अत्र सन्देहाथे न तु प्रश्नार्थे। अतः आत्मता वक्तुं न शक्यते इत्यर्थः।

अनुवाद -हा वायुविशेषस्वरूपाचा, स्थूल शरीराप्रमाणे अनेक अवयव असलेला व व्यानरूपाने चक्षुरादि इन्द्रियांचा प्रेरक , इन्द्रियांच्या माध्यमातून क्षुधातृष्णादि विकार होणारा आहे याचे आत्मत्व कसे बरं मानता येइल? भुकेने तहानेने प्राण व्याकूळ झाले असा वाक्यपयोग व्यवहारात वापराला जातो .जो क्षुधातृष्णादींनी पाणांचे कासाविस होणे दाखवतो .

कुरुते वपुषि अहंतां गेहादौ यः करोति ममतां च।

राग[1]द्वेषविधेयो नासौ आत्मा मनोमयः कोशः। ।११। ।

अन्वयः - यः वपुषि अहंतां करोति गेहादौ ममतां च कुरूते ।असौ (पुनः कीदृश) रागद्वेषविधेयः(ई दृशः) मनोमयकोशः आत्मा (इति वक्तुं) न (शक्यते)।

व्याख्या -य इति।यः मनुजः वपुषि शरीरमधिकृत्य अहंतां करोति।आत्मानं शरीराकारं मन्यते। गेहादौ आदि शब्देन क्षेत्रगोष्ठादीनां ग्रहणं भवति। ममतां करोति। ममत्व भावेन वर्तते अर्थात् इदं मम गृहं अहमेव अस्य स्वामी इति प्रकारेण आसक्तः भवति। तथा च यः रागद्वेषादिभावान् प्रदर्शयति। इत्येवं हेय भावयुक्तः मनोमयकोशः निश्चयेन आत्मा न।

अनुवाद - जो शरीराविषयी अभिमान बाळगतो , घर व इतर भौतिक पदार्थाविषयी माझं माझं असा भाव बाळगतो आणखी असे की रागद्वेषादि विकारही याच्याठिकाणी दिसून येतात कधी कामाने व्याप्त तर कधी कोधाने व्याप्त होणारा असा हा मनोमयकोश चंचलस्वभाव असल्याने आत्मा कसा बरे म्हणता येईल?

---

**५ उपप्राण** नागः कूर्मश्च कृकरो देवदत्तो धनञ्जयः।नागादुद्गिरणञ्चापि कूर्मादुन्मिलनं तथा।
धनञ्जयात्पोषणञ्च देवदत्तात् च जृम्भणम्।कृकराच्च क्षुतं जातमिति योगविदो विदुः। । ३० आत्मानात्मविवेकः

[1] राग- प्राप्तेषु विषयेषु रञ्जना,द्वेष- यज्जातीयं अर्थ दुःखहेतुत्वेन अनुभूतवान् पुनः उपलभमानः तं द्वेष्टि स अयं द्वेषः।

सुप्तौ स्वयं विलीना बोधे व्याप्ता कलेवरं सकलम्।

विज्ञानशब्दवाच्यो चित्प्रतिविम्बानबुद्धिः अप्यात्मा।।१२।।

अन्वयः -यः सुप्तौ स्वयं विलीना (भवति), बोधे सकलं कलेवरं व्याप्त (तिष्ठति)।स विज्ञाानशब्दवाच्यः चित्प्रतिविंबानुबुद्धिः अप्यात्मा न।

व्याख्या -य इति।यः जीवः सुप्तौ गहननिद्राप्रसंगे। विलीनः ली द्रवीकरणे विशेषरूपेण द्रवीभूतः भवति नाम अहं अमुकनामा अमुकगोत्रः इत्यादि किमपि स्मरणं न धारयति। तथा च प्रबोधं प्राप्य जागरितो भूत्वा सकलं शरीरं नखशिखान्तं व्याप्य तिष्ठति। स ईदृग्विधः विज्ञानशब्दवाच्यः विज्ञानमयकोशशब्देन वर्णितः। चित्प्रतिविंबानुबुद्धि चेतसः प्रतिबिम्ब इव अथवा तदनुसारबुद्धिः अपि आत्मा संज्ञां न अर्हति।

अनुवाद - जो सुषुप्तिमध्ये स्वतः विलीन होतो व जागृतावस्थेमध्ये समग्र शरीर व्यापून राहतो तो विज्ञानमयकोश नावाने ओळखला जाणारा चैतन्याचे जणू प्रतिबिंबच असणारा आत्मा असू शकत नाही.या कोशाच्या ठिकाणी घटादि पदार्थांप्रमाणे उत्पत्ती व विलय दिसून येत असल्याने याला आत्मा म्हणता येत नाही.[1]

सुप्तिगतैः सुखलेशैःअभिमनुते यः सुखीभवामीति।

आनन्दकोशनामा असौ अहंकारः कथं भवेदात्मा।।१३।।

अन्वयः -सुप्तिगतैः (यदा सुषुप्ति अवस्था प्राप्यते तदा) सुखलेशैः ( या काचित् सुखानुभूतिः भवति तया) यः सुखीभवामीति अभिमनुते (मन्यते) असौ आनंदकोशनामा अहंकारः कथम् आत्मा भवेत्।

व्याख्या -सुप्तिगतै[2]ः इति सुषुप्तिं गतः। सुखस्य लेशैः सुखलेशैः। अनुकूलवेदना एव सुखम्। लिश् अल्पीभावे सुखस्य अत्यल्पेन अंशेन। यः जीवः सुखीभवामि नाम एतदेव सुखम् इति अभिमनुते विशेषेण मन्यते। स आनन्दकोशनामा आनन्दमयकोश इत्याख्यया ज्ञातः। अहंकारः अभिमानात्मिका अन्त-ः करणवृत्तिः। आत्मा कथं स्यात् ।केनापि प्रकारेण वक्तुं न शक्यते इत्यर्थः।

---

1पाच कोश म्हणजे आत्मज्ञानावरील प्रतिकात्मक आवरणे होत.या आवरणांना ओलांडून गेल्याशिवाय ज्ञानाची अनुभूती येत नाही म्हणून यांचे अनात्मत्व दाखवले जात आहे.

[2] द्वितीयाश्रितातीतपतितगतअस्त्यत्यप्राप्तापन्नैः।पा २.१.२४

अनुवाद -गाढ झोपेत येणारी अत्यल्प अशी सुखानुभूति घेऊन मी सुखी झालो असे म्हणणारा ( जागा झाल्यावर पुन्हा वर्तमान परिस्थितीमुळे त्या सुखाचा अभाव समजणारा) असा अहंकाररूप आनंदमयकोश आत्मा कसा म्हणता येईल? कधी सुख तर कधी दुःखाचा अनुभव घेणारा अहंकाररूप आनंदमयकोश आत्मा म्हणता येत नाही कारण आत्मा हा सुखदुःखाच्या पर असल्याचे शास्त्रे सांगतात. द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं मुण्डकोपनिषद् २.२.१ मंत्रात आत्मा सुखदुःखांच्या पलीकडे असल्याचे सांगीतले आहेच.

यः स्फुरति बिम्बभूतः स भवेदानन्द एव सकलात्मा।
प्राग् ऊर्ध्वमपि च सत्वात् अविकारित्वात् अवध्यमानत्वात्।।१४।।

अन्वयः -यः बिम्बभूतः स्फुरति स आनन्दः एव सकलात्मा भवेत् ( कुतः ?) प्राग् ऊर्ध्वमपि सत्वात् च अविकारित्वात्[1] अवध्यमानत्वात्[2] च।

व्याख्या -य इति। बिम्बभूतः निराकारः सन्नपि बिम्बाकारः जातः च्विरूपम्[3]।अत्यन्त लघ्वाकारः सन्नपि स्फुरति स्पन्दते ।परिमाणाभावात् यस्य वर्णनम् अशक्यम् स सदैव स्फुरमाणः आत्मा संज्ञाम् अर्हति। कुतः। प्राग् पूर्वस्मिन् काले तथा ऊर्ध्वं शरीरनाशपश्चादपि सत्त्वात् अविनाशित्वात् निर्विकारत्वात् ।विकारो नाम स्वरूपस्य विनाशे वा अविनाशे द्रव्यान्तरारम्भकत्वं। तस्य अभावात् तथा च अवध्यमानत्वात् नित्यमुक्तत्वात्।

अनुवाद - जो बिम्बरूपाने प्रत्येक छोट्या मोठया आनंदाच्या प्रसंगी उपस्थित असतो तोच आत्मा असला पाहिजे . जीवाच्या अस्तित्वाच्या आधी व नंतरही तो असतोच व तो कशानेही बांधला जात नाही. नवव्या आर्यपासून एकेका कोशाचे वर्णन करून त्याच्या आत्मत्वाचेही निराकरण केले या ठिकाणी आनंदमयकोशाचे स्वरूप व आत्मत्व सिद्ध केले.

---

[1] अविकारित्व अविकार्योऽयमुच्यते भ गी ३.२५
[2] अबध्यमानत्व कालत्रयविमुक्तोऽस्मि मै>युपनिषत् ३.२१
[3] कृभ्वस्तियोगे सम्पद्यकर्तरि च्वि।५.४.५0

अन्नमयादेः अस्मात् अपरं यदि नानुभूयते किंचित्।

अनुभविता अन्नमयादेः अस्तीत्यस्मिन् कश्चित्प्रलापः।।१५।।

अन्वयः -अस्मात् अन्नमयादेः (अन्नमयकोशात्) यदि अपरं किञ्चित् नानुभूयते ( तर्हि) अनुभविता अन्नमयादेः अस्ति इत्यस्मिन् (कथने किम्) कश्चित् प्रलापः।न किमपि इत्यर्थः।

व्याख्या -अस्मादिति। अन्नमयकोश एव परमार्थेन सत्यः अतः अस्मादन्यत् श्रेष्ठं न किमपि अनुभूयते वर्त ते इति देहात्मवादिनः वदन्ति।एवं सति ।देह अर्थात् अनुभविताा एव आत्मा इति येषां मतिः ते स्थूलशरीराकारमेव सन्ति। तेषु परमश्रेष्ठम् आत्मतत्त्वं नास्ति इत्यस्मिन् विधाने कः प्रलापःका अर्थहीनता?

अनुवाद - जर कोणास अन्नमयकोशाहून (पञ्चकोशांच्या पलीकडले)अन्य काहीच अनुभवास येत नसेल अर्थात् जे शरीरादिकासच आत्मा समजत असतील तर असा समज असणा-यांना (पञ्चकोशांच्यापरीघात) शरीररूपच म्हणण्यात कोणता दोष आहे? अन्नमय अशा शरीरासच सर्वश्रेष्ठ मानणा-या पंथास देहात्मवादी[1] असे म्हणतात .

## आत्मतत्त्व १६ ते २३

स्वयमेवानुभवत्वात् यद्यपि एतस्य नानुभाव्यत्वम्।

सकृदपि अभावशङ्का न भवेत् बोधस्वरूपसत्तायाः।।१६।।

अन्वयः - यद्यपि स्वयमेवानुभवत्वात् एतस्य अनुभाव्यत्वं न (विद्यते) तथापि अस्य बोधस्वरूपसत्तायाः सकृदपि अभावशंका न भवेत्।

व्याख्या -यद्यपीति।यथा वर्णितं तथा सत्यपि। इदम् आत्मतत्वं स्वयमेव सर्वविषयाणाम् भोक्तारूपेण वर्तते अनुभवान् गृह्णाति। अतः नान्यः कोऽपि अस्य अनुभविता विद्यते,अस्य उपलम्भः अनुभवः न शक्यः इत्यर्थः।न कश्चित् अस्य अनुभविता अतः अस्य बोधः कदापि केनापि न शक्यः। अर्थात् अस्य अभाव एव स्यात् इति सन्देहः सकृदपि किञ्चिदपि अयोग्यः  निरर्थकः इति भावः।

[1] देहात्मवादाची मुख्य सूत्रे १ प्रत्यक्ष हेच पमाण २ अर्थकाम हेच दोन पुर षार्थ ३ परलोक नाही ४ मृत्यू हाच मोक्ष

अनुवाद - हा आत्मा स्वतःच सर्व विश्वाचा अनुभव घेत असल्यामुळे हा अन्य कोणासही अनुभवता येत नाही। असं असलं तरीही या आत्मतत्त्वाची बोधस्वरूप अशी जी सत्ता तिच्या अभावाची शंका येऊ नये .

स्वयमेवानभूतित्वाद्विद्यते नानुभाव्यता।ज्ञातृज्ञानांतराभावादज्ञेयो न त्वसत्तया।।पंचदशी ३ .१३

पञ्चदशीकारांचे ही मत असेच दिसते .श्लोकाचा प्रथम चरण जवळ जवळ सारखाच दिसतो .आत्मतत्वाचे अज्ञान हे ज्ञातृज्ञानांतराभावामुळे (म्हणजेच आत्म्याहून वेगळा ज्ञाता व आत्म्याहून वेगळे ज्ञान असत नाही ) असते आत्मतत्वाच्या असत् पणामुळे नसते .ज्ञान न होण्याचे कारण ज्ञात्याची शक्ति कमी असणं हे असून आत्मतत्त्वाचे असत्पण नाही .यासारखेच आत्मतत्त्वाचे वर्णन डोळ्याचा डोळा कानाचा कान इत्यादि शब्दात केनोपनिषदात वाचावयास मिळते .

अनुभवति विश्वमात्मा विश्वेनासौ न चानुभूयेत।
न खलु प्रकाश्यते (प्रकाशयते)असौ विश्वमशेषं प्रकाशयन्भानुः।। १७।।

अन्वयः - असौ आत्मा विश्वमनुभवति विश्वेन न असौ अनुभूयेत यथा हि अशेषं विश्वं प्रकाशयन् भानुः न खलु[1] (विश्वेन/केनापि) प्रकाश्यते[2]।

व्याख्या - असाविति वर्ण्यमानः। आत्मा क्षेत्रज्ञः विश्वं चराचरम् अनुभवति सम्यक् जानाति किन्तु विश्वेन असौ नानुभूयेत विश्वं नाम चराचरसृष्ट्याः कोऽपि पदार्थः एनम् ज्ञातुं न शक्नोति इत्यर्थः।दृष्टान्तेन[3] एतदेव पूर्वोक्तं तत्त्वं निरूपयति।भगवान् सहस्ररश्मिःअशेषविश्वं न शेषम् अशेषं समग्रम् इत्यर्थः प्रकाशयति दृग्गोचरं करोति ईदृशं प्रचण्डं सामर्थ्यं यस्य स सूर्यःअपि तत् आत्मतत्त्वं प्रकटयितुम् असमर्थः।

अनुवाद - हा आत्मा विश्वाचा अनुभव घेतो म्हणजेच समग्र विश्वाला जाणतो पण विश्वातील कोणताही पदार्थ या आत्मतत्त्वास जाणू शकत नाही ( न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा) जसे

---

[1] खलु स्याद्वाक्यभूषायां जिज्ञासायां च सान्त्वने।वीप्सा मान निषेधेषु पूरणे पदवाक्ययोः।। मेदिनी
खलु शब्दाने इथे खात्री निःसंदेहस्थिति सुचवली आहे .

[2] मूळ संहितेत प्रकाश्यते असे कर्मणि रूप आहे पण भानुः या शब्दाबरोबर प्रकाशयते हे बरोबर वाटते .

[3] दृष्टान्तः वादिप्रतिवादिनोः साध्यसाधनोभयप्रकारक तदभावद्वयप्रकारक अन्यतरनिश्चयविषयः .१४१३ सर्वलक्षणसंग्रहः

सहस्ररश्मि सूर्य समस्त जगास प्रकाशित करतो पण त्या आत्मतत्त्वास प्रकाशित करू शकत नाही . (श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः शृण्वन्तोऽपि बहवो यं न विद्युः  कठोपनिषद् १ . २ . ७)

येनेदं जानते सर्वं तं केनान्येन जानताम्। विज्ञातारं केन विद्याच्छक्तं वेद्ये तु साधनम्। ।पञ्चदशी ३ १७

या आर्येचा प्रथमार्ध शंकराचार्यांच्या  तत्त्वोपदेश  नावाच्या ग्रंथातील १५ व्या श्लोकाशी साम्य दाखवितो

विश्वमात्माऽनुभवति तेनासौ नानुभूयते। विश्वं प्रकाशयत्यात्मा तेनासौ न प्रकाश्यते। ।

तदिदं तादृशं ईदृशम् एतावत् तावत् इति च यन्न भवेत्।

ब्रह्म तत् अवधेयं नो चेत् विषयो भवेत् परोक्षं च। ।१८। ।

अन्वयः -तदिदं तादृशं ईदृशम् एतावत् तावत् इति ( एतादृशैः वस्तुपरिमाणदर्शकशब्दैः )यन्न भवेत् तत् ब्रह्म अवधेयं नो चेत् (ब्रह्म) विषयः परोक्षं भवेत्।

व्याख्या -तदिदमिति। तदिदं अत्यन्तनिकटं। तादृशं अन्येन पदार्थेन तुल्यं। ईदृशं समीपस्थेन पदार्थेन समं। एतावत् तावत् नाम परिमाणयुक्तं ।यत्  न वर्तते तत् ब्रह्म आत्मभूः इति अवगन्तव्यं। अन्यथा सः ब्रह्मरूपविषयः परोक्षः अप्रत्यक्षः स्यात् किन्तु स ब्रह्मरूपविषयःनामरूपातीत अस्ति इति उपनिषदां मतम्।

अनुवाद - ते हे, तसे, असे, येवढे, तेवढे अशा प्रकारे जे वर्णिले जाऊ शकत नाही ते ब्रह्म असे जाणावं नाहीतर म्हणजेच जर त्याचे अशा शब्दात वर्णन होउ शकले तर ते ब्रह्म परोक्ष  होइल . जे सर्वथा शक्य नाही कारण ब्रह्म नामरूपातीत असल्याचे शास्त्रे सांगतात .

यद्वाचा अनभ्युदितं येन वागभ्युद्यते ।तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते। ।

यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतं। तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते। ।केनोपनिषद् १ . १ . ५

( प्रथम चरणात  भवेत्  असे विध्यर्थक क्रियापद योजले आहे पण अर्थ लावताना वर्तमानकालाचे भवति असे रूप समजून व्याख्या व अनुवाद केला आहे .)

इदम् इदम् इति प्रतीते वस्तुनि सर्वत्र बाध्यमानेऽपि।

अनिदम् अबाध्यं तत्त्वं सत्त्वादेतस्य न च परोक्षत्वम्। ।१९। ।

अन्वयः - इदम् इदम् इति प्रतीते सर्वत्र बाध्यमानेऽपि वस्तुनि अनिदम् अबाध्यम् एतत तत्त्वम्।एतस्य सत्त्वात् न परोक्षत्वम्।

व्याख्या - इदमिति।इदं नाम हस्तगतं वा इन्द्रियैः अनुभवगम्यं।ईदृशं यस्य स्वरूपं वर्तते तत् तत् बाध्यमानं नाशवान् अस्ति। इति विवेकात् ज्ञायते ।तथापि तेष्वेव पदार्थेषु अनिदं वर्णनातीतं अबाध्यं सर्वदा वर्तमानम् एतत् श्लोकविषयजातं तत्त्वम् सूक्ष्मरूपेण अस्ति। अस्य आत्मतत्त्वस्य सत्स्वरूपत्वात् सर्वदा वर्तमानत्वात् परोक्षत्वम् अक्ष्णः परत्वम् अगोचरत्वं न।

अनुवाद - हे हे अशी भोवतालच्या पदार्थांची प्रतीती येत असूनही विवेकाने पाहू गेल्यास त्या वस्तूंचा फोलपणा कळून येतो.व इदम् अशा शब्दात ज्याचे वर्णन होऊ शकत नाही व ज्याचा निरासही करता येत नाही असे आत्मतत्त्व सत्त्वमय असल्याने सर्वदा सभोवतालच्या पदार्थांना व्यापून असल्याने संमुखच असते ते अदृश्य आहे असे म्हणता येत नाही.

न अवेद्यम् अपि परोक्षं भवति ब्रह्म स्वयम्प्रकाशत्वात्।
सत्यं ज्ञानम् अनन्तं ब्रह्मेति एतस्य लक्षणं प्रथते।।२०।।

अन्वयः -स्वयंप्रकाशत्वात् न अवेद्यम् अपि ब्रह्म परोक्षं भवति। सत्यं ज्ञानम् अनन्तं ब्रह्मेति एतस्य (श्रुत्युक्तं[1]) लक्षणं प्रथते।

व्याख्या -स्वयंप्रकाशत्वादिति।स्वयंप्रकाशयुक्तत्वात् प्रभायुक्तत्वात् नान्यत् किमपि प्रकाशकमपेक्षते।विद् ज्ञाने अवबोधने न अवेद्यं बोधगम्यम् सन्नपि इत्यर्थः। ब्रह्म परोक्षं अक्ष्णः परम् अगोचरम् इन्द्रियातीतं भवति।सत्यं सर्वदा विद्यमानं। ज्ञानं ज्ञानस्वरूपं ।अनन्तं सर्वव्यापकं ।इत्येवं तस्य बह्मणः वर्णनं तैत्तीरीयोपनिषदि प्रसिद्धमस्ति।

अनुवाद -ब्रह्म स्वयंप्रकाशी असल्यामुळे वस्तुतः अवेद्य नाही अर्थात् अपरोक्ष म्हणजेच अनुभवण्यासारखे आहे तरीही ते परोक्ष म्हणजेच अगोचर होते.ते ब्रह्म सत्यं ज्ञानम् अनन्तं अशा लक्षणांनी प्रसिद्ध आहे.

---

[1] तैत्तिरीयोपनिषद् २.१.१

या ठिकाणी ब्रह्माची विलक्षणता सांगितली जात आहे. एखादी वस्तू स्वप्रकाशी असूनही दिसत नाही असं म्हणणे तर्कसंगत दिसत नाही परंतु जिथे ब्रह्माचे वर्णन करण्याच्या प्रयत्नात वेद देखील सफल होत नाहीत असे म्हटले जाते तिथे इतरांचे काय? ब्रह्म प्रकटच आहे पण दिसत नाही असे समर्थ रामदास सुद्धा सांगतात.

वस्तु प्रगटची असे। पाहता कोणासीच न दिसे। नाना साधनी सायासे। न पडे ठायी।।दासबोध आ ३ स ५ द १

सतिकोशशक्ति उपाधौ सम्भवतः तस्य जीवतेश्वरते।
नोचेत्तयोरभावात् विगतविशेषं विभाति निजरूपम्।।२१।।

अन्वयः - सतिकोशशक्ति उपाधौ तस्य जीवतेश्वरते संभवतः नोचेत्तयोरभावात् विगतविशेषं निजरूपं विभाति।

व्याख्या -सतिकोशशक्तीति। यदा कोशशक्ति उपाधिरूपेण निमित्तरूपेण अस्ति तदा। जीवता नाम जीवत्वं तस्यभावस्त्वतलौ पा ५.१.११९। तथा ईश्वरता नाम ईश्वरत्वं संभवतः उत्पद्यते।नो चेत् यदि जीवता तथा ईश्वरता न स्तः नाम एतयोः अभावात्। विगतः विशेषः यस्मात् स विगतविशेषः। नाम आत्मा निजरूपेण नितरां जायते। पूर्णतः जायते स्वधर्मैः नाम स्वस्वरूपेण प्रकटः भवति।

अनुवाद -उपाधिरूप कोशशक्ति असताना जीवता व इश्वरता असे दोन भाव भासतात नाहीतर म्हणजेच जीवता व ईश्वरता या भावांचा अभाव असताना शुद्धस्वरूप असं आत्मस्वरूप प्रकट होतं. या ठिकाणी कोशांना उपाधिरूप[1] मानलेले दिसते म्हणजेच कोश हे परमार्थाने खरे नसतात व आत्मज्ञानावरील आवरणच असतात. आणि म्हणूनच पंचकोशांवर विवेक करण्याचा विचार १२ व्या आर्येत मांडलेला आहे.

सति सकलदृश्यबाधे न किमपि अस्ति इति लोकसिद्धं चेत्।
यन्न किमपि इति सिद्धं ब्रह्म तदेवेति वेदतः सिद्धम्।।२२।।

---

[1] उपाधिः स्वसामीप्यादिना अन्यस्मिन् स्वधर्मारोपसाधनम् (न्यायकोश)

अन्वयः -सकलदृश्यबाधे सति न किमपि अस्ति इति लोकसिद्धं चेत् (तर्हि)न किमपि इति यत् सिद्धं तदेव ब्रह्म इति वेदतः सिद्धम्।

व्याख्या -सकलेति।कलया सह यथा स्यात्तथा सकलं।सकलं दृश्यं सकलदृश्यं तस्य बाधः सकलदृश्यबाधः। यदा समग्रदृश्यस्य बाधः नाम निरासः भवति। तदा तस्मात् कारणात् न किमपि अस्ति शून्यमेव अवशिष्टम्। इति लोकसिद्धं लोके सिद्धं। नाम जनै अनुभूतम् इति यदि उच्यते। तर्हि अस्माकं मतेन भवद्भिः यत् शून्यरूपेण वर्णितं तदेव ब्रह्म इति वेदतः( पञ्चम्यास्तसिल् पा.५. ३.७ ) आम्नायेभ्यः सिद्धमेव।

अनुवाद - समस्त दृश्यपदार्थांचा निरास झाल्यावर आता काहीच उरले नाही असा जो प्रसिद्ध अनुभव त्यात जे काहीच उरले नाही असे म्हटले जाते त्यालाच वेदांनी ब्रह्म असे म्हटलेले आहे.कानाचा कान डोळ्याचा डोळा अशा भाषेत उपनिषदे ज्याचे वर्णन करतात ते प्राथमिक अवस्थेतील साधकाला शून्यरूप भासते.कानाचा कान व डोळ्याचा डोळा कसा असेल असे वाटते.

अशा प्रकारे दृश्यनिरस्त केलेल्या पण तत्त्वमसि या महावक्याचे चिंतन न केलेल्या साधकांना सदैव प्रकाशमान असणारे आत्मतत्त्व परोक्षच राहते हे पुढील आर्येत सांगतात.

एवमपि विरहितानां तत्त्वमसि इत्यादि वाक्यचिन्तनया।
प्रतिभाति एष परोक्षवदात्मा प्रत्यक् प्रकाशमानोऽपि।।२३।।

अन्वयः - एवमपि तत्त्वमसि वाक्यचिन्तनया विरहितानां एष प्रत्यक् प्रकाशमानोऽपि आत्मा परोक्षवत् प्रतिभाति।

व्याख्या - एवमिति।एवम् अनेन प्रकारेण यैः दृश्यनिरासः कृतः तथा शून्यमेव अवशिष्टम् इति मन्यन्ते तादृशाः ये तेषां निर्देशः एवं शब्देन भवति। तत्त्वमसि इत्येतस्य महावाक्यस्य चिन्तनविरहिता ये तेषां एषः निरूपणविषयभूतः प्रत्यक प्रतिक्षण प्रकाशमानः सन्नपि आत्मा परोक्षवत् नाम अगम्यवत् भासते।

अनुवाद -अशाप्रकारे ज्यांना दृश्यजगताचे वैय्यर्थ्य कळले व सर्व जग शून्यवत् भासू लागले त्यांना आत्मदर्शन होऊ शकेल अशी शंका मागील आर्येतील दुस या चरणावरून येइल.तिचे निरसन करण्यात

येत आहे.ज्यांनी तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांचे चिंतन केले नाही त्यांना सर्वत्र सर्वकाळी प्रकाशमान असणारे आत्मतत्त्व अगोचरच राहते.

आता तत् त्वम् असि या पदांचे सखोल चिंतन व गुरु कृपा यांच्या योगाने ते आत्मतत्त्व क्षणात प्रकट होते हे सांगतात.

तस्मात्पदार्थशोधनपूर्वकं वाक्यस्य चिन्तयन्नर्थम्।

देशिकदयाप्रभावात् अपरोक्षयति क्षणेन चात्मानम्।।२४।।

अन्वयः - तस्मात्पदार्थशोधनपूर्वकं वाक्यस्य अर्थम् चिन्तयन् (तथा) च देशिकदयाप्रभावात् (साधकः) क्षणेन आत्मानं अपरोक्षयति।

व्याख्या - तस्मादिति। यत् गते श्लोके वर्णितं तस्मात्कारणात्। पदानामर्थः पदार्थः। तस्य शोधनं नाम सम्यगर्थागमः।तत् प्राप्य पश्चात् महावाक्यस्य चिन्तनं कृत्वा। दिशति सम्यक् परमार्थम् इति देशिकः। तस्य दयया करुणया शिष्यः क्षणेन नचिरात् नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा इत्येवं यथा अर्जुनेन भगवत्प्रसादात् ज्ञानं प्राप्तं तथा। आत्मानं अपरोक्षयति यत् परोक्षं तत् प्रत्यक्षं करोति।[1] स्वरूपं जानाति इत्यर्थः।

अनुवाद - म्हणून तत् त्वम् असि या तीनही पदांचा नीट बोध करून घेउन संपूर्ण महावाक्याचा अर्थ सनजून घेणारा साधक दयाळू व समस्त संशयांच्या पलीकडे गेलेल्या गुरु च्या कृपाप्रसादाने क्षणात आत्मतत्त्वास जाणून घेतो[2].

तत्त्वमसि महावाक्यविचारः

तत्वमसि वाक्यातील पदांचे निरूपण २५ ते २९

देहेन्द्रियादि धर्मान् आत्मनि आरोपयन् अभेदेन।

कर्तृत्वादि अभिमानीबोधः स्यात् त्वं पदस्य वाच्योऽर्थः।।२५।।

अन्वयः - देहेन्द्रियादि धर्मान् आत्मनि अभेदेन आरोपयन् ( यः) कर्तृत्वादि अभिमानीबोधः स्यात् सः त्वं पदस्य वाच्योऽर्थः।

[1] सुप् आत्मनः क्यच्।पा ३.१.८

[2] यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ।तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः।।श्वेताश्वतर ६.२३

व्याख्या - देहेति। दिह् उपचये क्रमेण मांसवसादीन् संगृह्य[1] वर्धते इति देहः। इन्द् स्पन्दने+रक् नित्यस्पन्दनशीलत्वात् चक्षुरादीनि इन्द्रियाणि। देहः च इन्द्रियाणि च देहेन्द्रिये। तयोः धर्मान् सहजगुणान् आत्मनि स्वरूपे आरोपयन् स्थापयन्। कथं स्थापयन् इति दर्शयति अभेदेन एकरूपत्वेन।ये के देहेन्दियाणां धर्माः ते सर्वे स्वरूपस्यापि इति प्रकारेण अध्यासं[2] कृत्वा। कर्तृत्वादि गुणाः आत्मन एव अतः अहमेव कर्ता इत्येवं य अभिमानः स एव त्वं पदस्य वाच्यः शब्दगम्यः अर्थः।

अनुवाद - मी म्हणजे देह आहे ही इन्द्रिये माझी आहेत व हे सर्व आत्मतत्त्वाशी एकरूप आहेत. तसेच मीच कर्ता भोक्ता आहे अन्य कोणी नाही असा जो भाव जीवाच्या अन्तःकरणात उद्‌भवतो तोच तत्त्वमसि महावाक्यातील त्वं पदाचा वाच्यार्थ होय.

देहाहन्ता इन्द्रियाणां साक्षी तेभ्यो विलक्षणत्वेन।
प्रतिभाति योऽवबोधः प्रोक्तोऽसौ त्वं पदस्य लक्ष्योऽर्थः।।२६।।

अन्वयः - देहाहन्ता इन्द्रियाणां साक्षी तेभ्यो विलक्षणत्वेन प्रतिभाति (इति एतादृशः) योऽवबोधः प्रोक्तोऽसौ त्वं पदस्य लक्ष्योऽर्थः।

व्याख्या -देहान्तेति।देहविषयकःआत्मभावःअहन्ता नाम देहाहन्ता। तथैव श्रोत्रादि इन्द्रियाणां ये अनुभवाः तेषां यः साक्षी। अकर्ता सन्नपि द्रष्टा। केवल द्रष्टा सुखदुःखादयाः इन्द्रियाणां सन्ति न मम तैः कोऽपि संबन्धः एष एव साक्षीभावः। अनेन भावेन युक्तः अस्मि। अर्थात् तेभ्यो विलक्षण भिन्नलक्षणः अस्मि इति एतादृशः य अवबोधः यत् ज्ञानं तदेव त्वं पदस्य लक्ष्योर्थः सूचीतार्थः।

अनुवाद - देह अहंभाव आणि इन्द्रियांचा साक्षी बनून त्यांच्यापेक्षा वेगळेपणे स्वतःला समजण्याची जी ज्ञानावस्था तीच त्वं पदाचा लक्ष्यार्थ.मागील आर्येत त्वं पदाचा वाच्यार्थ सांगितला व येथे लक्ष्यार्थ सांगितला एखाद्या गोष्टीचे पूर्ण ज्ञान होण्यासाठी वाच्य व लक्ष्य अशा दोन्ही अर्थांचे ज्ञान आवश्यकच असते.

त्वं पदाच्या निरूपणानंतर आता तत् पदाचे निरूपण करतात.

---

[1] देह शब्दाचे आचार्यकृत निरूपण मज्जास्थिमेदःपलरक्तचर्मत्वगाह्वयैर्धातुभिरन्वितम् ।वि चू ७४

[2] अध्यासः परत्र पूर्वदृटष्टावभासः आपल्या कल्पनेतील भावांचा अन्य पदार्थावर आरोप.

जन्माद्यस्य यतः या सूत्रावरील भाष्यात तत् पदाच्या वाच्यार्थाचे विस्तृत निरूपण वाचावयास मिळते.

वेद अवसानवाचासंवेद्यं सकलजगदुपादानम्।

सर्वज्ञतादि उपेतं चैतन्यं तत्पदस्य वाच्योऽर्थः।।२७।।

अन्वयः - सकलजगदुपादानम् अवसानवाचासंवेद्यं इति वेद। सर्वज्ञतादि उपेतं चैतन्यं तत्पदस्य वाच्योऽर्थ इति वेद।

व्याख्या - सकलेति। सकलजगतः उपादानं मूलकारणं यत् दैवतादि रूपेण जनैः स्वीकृतम् तत् अवसानं नाम विनाशः विनाशशीलम्।तथा वाचा संवेद्यं अर्थात् देवतानां रूपगुणादयः वर्णयितुं शक्यते इति जानीहि।

किन्तु जनैः स्वीकृतं इदं जगदुपादानं भ्रमूलकं तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदम् उपासते इति शृतिवचनात्।सर्वं जानाति इति सर्वज्ञः।तस्य भावः सर्वज्ञता।सर्वज्ञतादि शब्देन कर्तृत्व-भोक्तृत्वादि गुणांनां ग्रहणं भवति।एतैः गुणैः उपेतं युक्तं यत् चैतन्यम् अर्थात् ब्रह्म।तत्त्वमसि वाक्यस्थितस्य तत् पदस्य वाच्योऽर्थः इति वेद।

अनुवाद - संपूर्ण जगाचे उपादान[1] म्हणून जे लोकांनी स्वीकारलेले आहे ते विनाशशील व केवल नामरूपात्मक आहे असे जाण[2] तत् पदाने सूचित होणारे नव्हे.इथे कर्ता म्हणून ज्या नाना प्रकारच्या अवतारांचे किंवा दैवतांचे ग्रहण सर्वसामान्य माणसे करत असतात त्याचा विचार घेतला आहे आणि सर्वज्ञत्वादि लक्षणांनी युक्त असे चैतन्य हे तत्त्वमसि महावाक्यातील तत् पदाचा वाच्यार्थ हे दाखवले आहे.

विविधोपाधिविमुक्तं विश्वातीतं विशुद्धमद्वैतम्।

अक्षरम्[3] अनुभववेद्यं चैतन्यं तत्पदस्य लक्ष्योऽर्थः।।२८।।

अन्वयः - विविधोपाधिविमुक्तं, विश्वातीतं, विशुद्धम्, अद्वैतम्, अक्षरम्, अनुभववेद्यं, चैतन्यं तत्पदस्य लक्ष्योऽर्थः।

---

[1] उपादानं – कार्यान्वितं कारणं यथा घटादेर्मृदादि। सर्वलक्षणसंग्रहः ८३०

[2] तदैव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते।केनोपनिषत् १.४

[3] अक्षर अक्षरं ब्रह्म परमम्। भ गी ८.३

व्याख्या - विविधेति। विभिन्नाः विधयः विविधाः।विविधैः उपाधिभिः विमुक्तं[1] विशेषेण मुक्तम् उपाधिरहितम् इत्यर्थ। विश्वस्य अतीतं परे विद्यमानं। विशेषेण शुद्धं विशुद्धम्।द्विधा भावः द्वैतं। न द्वैतं यस्मिन् तत् अद्वैतम् एकमात्रं। क्षर् सञ्चलने न सञ्चलति स्थिरं वर्तते इति अक्षरम्। अनुभवैः ज्ञानगम्यं नेन्द्रियगम्यं।चैतन्य चेतनायुक्तं इति एतादृशैः विशेषणैः यत् वर्ण्यते तत् महावाक्यस्थितस्य तदीत्यस्य पदस्य लक्ष्योऽर्थः।

अनुवाद - वेगवेगळ्याप्रकारच्या उपाधींपासून मुक्त परिमाणरहित अत्यंत निर्मल एकमात्र अविनाशी केवल अनुभवगम्य अर्थात् बुद्धिगम्य नसलेले व चैतन्यशील असे जे ब्रह्म ते तत्त्वमसि महावाक्यातील तत् पदाचा लक्ष्यार्थ होय.

तत् व त्वं पदांच्या खुलाशानंतर आता असि पदाची भूमिका तयार करतात.

सामानाधिकरण्यं तदनुविशेषण विशेष्यताचेति।
अथ लक्ष्यलक्षकत्वं भवति पदार्थात्मनां च सम्बन्धः।।२९ ।।

अन्वयः - सामानाधिकरण्यं तदनु विशेषण विशेष्यता च इति अथ लक्ष्य लक्षकत्वं ( एवं प्रकारेण) पदार्थात्मनांच संबंधः भवति।

व्याख्या- समानमिति।समानं साधारणम् अधिकरणं सामानधिकरणं। तस्य भावः सामान्याधिकरण्यं यथा हि शूरः प्रजाहितदक्षः रघुः अत्र शूरः तथा प्रजाहितदक्षः एतयोः विशेषणयोः रघुरेव अधिकरणम्। तथा च विशेषण विशेष्यता यथा हि मधुरदुग्धं मधुरं दुग्धं अन्यच्च लक्ष्य लक्षकत्वं बकादि खगानां धवलत्वं।एवप्रकारेण पदार्थात्मनां संबन्धः साहचर्य भवति।

अनुवाद -एकच अधिकरण असणे जसे की शिवाजी एक शूर राजा होता या वाक्यात शूर व राजा या दोन्ही शब्दांचे शिवाजी नावाचा एकच पुरुष अधिकरण आहे.अशा प्रकारे अधिकरण समान असणे तसेच

[1] न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।भ गी ९.९

विशेषणाचा विशेष्याशी व लक्षणाचा लक्ष्याशी अशा प्रकाराने पदार्थाचे व चैतन्याचे एकमेकांशी संबंध होत असतात.

समानाधिकरण म्हणजे काय हे समजावून सांगण्यासाठी पुढील आर्या.

एकत्र वृत्तिरर्थेशब्दानां भिन्नवृत्तिहेतूनाम्।
सामानाधिकरण्यं भवति इत्येवं वदन्ति लाक्षणिकाः।।३0।।
अन्वयः - एकत्र वृत्तिरर्थेशब्दानां भिन्नवृत्तिहेतूनाम् सामानाधिकरण्यं भवति इत्येवं लाक्षणिकाः वदन्ति।
व्याख्या -एकत्रेति।एकत्र एकस्मिन् अर्थे स्थाने विशेष्ये वा येषां वृत्तिः ते एकत्रवृत्तिरर्थाः शब्दाः।तेषामेकत्रवृत्तिरर्थानां। भिन्ना च असौ वृत्तिः भिन्नवृत्तिः भिन्नवृत्तिरेव हेतुः येषां ते भिन्नवृत्तिहेतवः येषां भिन्नवृत्तिहेतूनां।समानम् अधिकरणं समानाधिकरणं तस्य भावः सामान्याधिकरण्यं भवति संभवते इति लाक्षणिकाः लक्षणविचारकाः वदन्ति।यथा हि रामस्य तुङ्गः कृष्णवर्णः अश्र्वः अस्मिन वाक्ये तुङ्गः तथा कृष्णवर्णः इत्येतयोः विशषणयोः अधिकरणरूपेण कश्र्चिदश्र्वः अस्ति अतः अत्र सामानाधिकरण्यम् उच्यते।
अनुवाद -भिन्नार्थक विशेषणांचे एकाच विशेष्याच्या ठिकाणी अवस्थान म्हणजे सामानाधिकरण असे लाक्षणिक म्हणतात.शिवाजी द्रष्टा व पराक्रमी राजा होता. या वाक्यात द्रष्टा व प्राक्रमी या दोन विशेषणांचे अधिकरण शिवाजी ही एकच व्यक्ती आहे.
अगोदर समानाधिकरण्य दाखवून आत्म्याच्या ठिकाणी प्रत्यक्षत्व व परोक्षत्व असे भिन्न वाटणारे गुण असतात व ते लक्षणेनेच समजून घ्यावयाचे असतात हे पुढील आर्येत सांगतात.

प्रत्यक्षं त्वं परोक्षं त्वं परिपूर्णत्वं च सद्वितीयत्वम्।
इतरेतरविरूद्धं तत् इह भवितव्यं एव लक्षणया।।३१।।
अन्वयः - त्वं प्रत्यक्षं (असि) परोक्षं च (असि),(त्वयि) परिपूर्णत्वं सद्वितीयत्वं च (विद्यते) तत् (एतत्) इतरेतरविरूद्धं इह लक्षणया एव भवितव्यम्।( मूळ संहितेत प्रत्यक्षं त्वं परोक्षं त्वं प्रत्यक्षं त्वं परोक्षं त्वं

असा पाठ आहे पण व्याख्या करताना व अर्थ लावण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षत्वं व परोक्षत्वं असा पाठ घेतला आहे)

व्याख्या -प्रत्यक्षत्वेति। प्रत्यक्षं नाम अक्ष्णः प्रति पुरतः गोचरः दृष्टिगोचरम् इत्यर्थः तस्य भावः प्रत्यक्षत्व तस्य भावस्त्वतलौ।5.1.139' सूत्रेण । एवमेव परोक्षत्व नाम अगोचरत्व।तथा परिपूर्णत्व सर्व व्यापकत्व सद्वितीयत्व नाम लघ्वाकरत्व । इति एते इतरः च इतरः च इतरेतरः। इतरेतरेषु विर द्धाः विभिन्नाः भावाः ब्रह्मणि आरोप्यन्ते तत्त्वचिन्तकैः।एतत् आरोपणं लक्षणया एव उपपद्यते।

अनुवाद -तू प्रत्यक्ष आहेस तसेच परोक्ष ही आहेस, तुझ्यात परिपूर्णत्व आहे तसेच सद्वितीयत्व ही आहे असे हे परस्परांशी विरूद्ध असणारे भाव या लोकी लक्षणेद्वाराच दाखविले जाऊ शकतात.

तुझ्यात प्रत्यक्षत्व व परोक्षत्व तसेच परिपूर्णत्व व सद्वितीयत्व असे एकमेकांहून भिन्न विरूद्ध असणारे भाव केवल लक्षणेच्याद्वारेच समजले जाऊ शकतात.

अरे लक्ष्मण माणूस नाहीस तू तर देव आहेस या वाक्यात एक माणूस समोर उभ्या असलेल्या सामान्य जीवाचे जीवपण नजरेआड करून त्याच्या एखाद्या कृतीमुळे त्याच्यात देवत्व पाहात आहे. इथे जीवाचे अपूर्णत्व लक्षात न घेता त्याच्या ठिकाणी देवाचे पूर्णत्व लक्षणेद्वारा आरोपित केले आहे.अशाच रीतीने लक्षणेने एकमेकांच्या विरूद्ध असणारे भाव लक्षणेने एका ठिकाणी आरोपित केले जातात.

मानान्तरोपरोधे मुख्यार्थस्य अपरिग्रहे जाते।
मुख्याविनाकृतेऽर्थे या वृत्तिः सैव लक्षणा प्रोक्ता।३२।।

अन्वयः - मानान्तरोपरोधे (यदा मानान्तरोपरोधः तथा) मुख्यार्थस्य अपरिग्रहे(अपरिग्रहः) जाते (भवति) (तदा) मुख्याविनाकृतेऽर्थे( मुख्यार्थस्य त्यागं अकृत्वा) या वृत्तिः सैव लक्षणा प्रोक्ता।

व्याख्या -मानान्तरोपरोधे इति। अनन्तरं मानं प्रमाणं मानान्तरं तस्य उपरोधः संरक्षा स्वीकारः एव मानान्तरोपरोधः।मुख्य अर्थः मुख्यार्थः। तस्य अपरिग्रहः नाम त्यागः यदा भवति।मुख्याविना न विना अविना मुख्यस्य अविना[1] मुख्याविना।मुख्याविनाकृतेऽर्थे नाम मुख्यार्थस्य अंशतः त्यागं कृत्वा।या वृत्तिः

[1] अविनाभावः--व्याप्यनिष्ठःव्यापकनिरूपितधर्मः।४४६ सर्वलक्षणसंग्रहः

यः अर्थः गृह्यते।स एव लक्षणेति प्रोक्ता उच्यते। यथा हि गङ्गायां घोषः अस्मिन् वाक्ये गङ्गायां इत्यस्य अधिष्ठानार्थं त्यक्त्वा गङ्गासामिप्यं गृह्यते।

अनुवाद -जेंव्हा प्रधानरूपाने दिसणा या मुख्यार्थाचा अंशतः त्याग करून वेगळाच एखादा अर्थ घेतला जातो च त्यातून वेगळाच अर्थ सूचवला जातो तेंव्हा त्या प्रकारच्या रचनेला लक्षणा किंवा लक्षणेने अर्थ बोध असे म्हणतात.

निखिलमपि वाच्यमर्थं त्यक्त्वा वृत्तिस्तदन्वितेन या अर्थे।
जहति इति लक्षणा स्यात् तु गङ्गायां घोषवत् अत्र न ग्राह्या[1]।।३३।।

अन्वयः - निखिलमपि वाच्यमर्थं त्यक्त्वा तदन्वितेन अर्थे या वृत्तिः (सा) जहति इति गङ्गायां घोषवत् लक्षणा स्यात् अत्र तु न ग्राह्या।

व्याख्या -निखिलमिति।निर्गतं खिलं यस्मात् तत् निखिलम् अखिलम्। वाच्यम्अभिधागतम् अर्थं वाच्यार्थं त्यक्त्वा विहाय। तदन्वितं तस्मिन् अनुगतं।तेन तदन्वितेन अर्थेन नाम तत्स्थं कमपिअर्थं स्वीकृत्य। या वृत्तिः अर्थग्रहणं भवति सा 'जहति'इत्याख्यया विख्याता लक्षणा भवति।अत्र गङ्गायां घोषः इति साहित्यशास्त्रस्य प्रसिद्धम् उदाहरणं स्थापयित्वा तत्वमसि वाक्यस्य अर्थनिर्धारणे जहत् लक्षणा न योग्या इति दर्शितम्।

अनुवाद -वाच्यार्थाचा संपूर्ण त्याग करून आनुषंगिक अर्थ घेउन जे अर्थघटन केले जाते ते गङ्गायां घोषः या प्रसिद्ध संस्कृत वाक्याप्रमाणे जहद् लक्षणेचे[2] बोधक होते, ते ह्या ठिकाणी म्हणजेच जीवब्रह्मऐक्य स्थापनेच्या वेळी घेता येणार नाही.

इयम् अजहति इति कथिता शोणो धावतिवदत्र न ग्राह्या ।
वाच्यार्थम् अत्यजन्त्या यस्यावृत्तेः प्रवृत्तिरन्यार्थे।।३४।।

---

[1] वाच्यार्थमखिलं त्यक्त्वा वृत्तिःस्याद्या तदन्विते।गङ्गायां घोष इतिवज्जहति लक्षणा हि सा।।३३ तत्त्वोपदेश शंकराचार्य

[2] I मुख्यार्थबाधे तद्योगे रूढितोऽथ प्रयोजनात।
अन्योऽर्थो लक्ष्यते यत् सा लक्षणारोपिता किया।।काव्यमीमांसा २.१२

अन्वयः इयम् अजहति इति कथिता वाच्यार्थम् अत्यजन्त्या यस्यावृत्तेः शोणो धावतिवत् अन्यार्थे प्रवृत्तिः (सा अपि) अत्र न ग्राह्या ।

व्याख्या - इयमिति। अजहत् अथवा अजहत्स्वार्था इत्यख्यया प्रसिद्धा लक्षणा। वाच्यार्थम् अभिधागतार्थं अत्यक्त्वा। यस्यावृत्तेः नाम अर्थघटनं। यथा शोणो धावति इत्यस्य वाक्यस्य अर्थघटनप्रसङ्गे यथा कमपि आरक्तवर्णयुक्तम् अश्वं धावमानं दृष्ट्वा यदा तस्य वर्णनं शोणो धावति इति एतैः शब्दैः कियते तदा शोणवर्णम् अत्यक्त्वा शोणवर्णयुक्तः अश्वः धावति इति लक्षणया ज्ञायते।

सा अत्र तत्त्वमसि वाक्यस्य अर्थनिर्धारणे न ग्राह्या।अजहत् लक्षणा बोधयितुं शोणो धावति इति प्रसिद्धवाक्यम् उदाहरणरूपेण स्थापितम्।

अनुवाद - ही अजहत् अशा नावाने ओळखली जाणारी वाच्यार्थाचा त्याग न करता जी शोणो धावति या प्रसिद्ध वाक्याप्रमाणे जिथे वाच्यार्थ न सोडताही अन्यार्थाकडे प्रवृत्ति दिसते.अशा प्रकारच्या लक्षणेचे ग्रहण इथे करता येणार नाही.

दोन प्रकारच्या लक्षणांचे निरूपण करून महावाक्याच अर्थ समजून घेण्यासाठी त्यांचे निरूपयोगित्व दाखवले .आता महावाक्याचा यथार्थ अर्थ समजण्यास उपयोगी अशा लक्षणेचे निरूपण करतात .

जहदजहतीति सास्याद् या वाच्यार्थैकदेशमपहाय।
बोधयति चैकदेशं सोऽयं द्विज इतिवत् आश्रयेदेनाम्।।३५।।

अन्वयः या सोऽयं द्विज इतिवत् वाच्यार्थैकदेशमपहाय बोधयति एकदेशं। सा जहदजहति इति स्यात् एनाम् आश्रयेत्।

व्याख्या -या इति।या अन्यैका सोऽयं द्विजः इतिवत् यथा। इत्यस्य वाक्यस्य अर्थनिर्धारणप्रसंगे यथा वाच्यार्थस्य एकदेशं नाम कश्चित् भागं बोधात्मकविवरणम् अपहाय त्यक्त्वा। बोधयति एकदेशं अवशिष्टभागः गृह्यते। ईदृशी या लक्षणा सा जहदजहत् अथवा भागत्यागलक्षणा इति उच्यते। एनाम् भागत्यागलक्षणामाश्रयेत् नाम तत्त्वमसि वाक्यस्य अर्थनिर्धारणे वाक्यस्य कस्यचित् भागं विहाय अवशिष्टभागस्य आधारेण अर्थघटनं कार्यम्।

अनुवाद -या प्रकारासच भागत्यागलक्षणा असेही म्हणतात.मुख्य वाक्यातील काही भागाचे ग्रहण व काही भागाचा त्याग करून जेंव्हा अर्थबोध होतो तेंव्हा ही लक्षणा मानली जाते.या प्रकाराचे प्रसिद्ध उदाहरण म्हणून   सोऽयं देवदत्तः  हे वाक्य सांगीतले जाते.

त्या काळी त्या स्थळी पाहिलेला देवदत्त नावाचा पुरुष व आता ह्यास्थळी दिसत असणारा पुरुष एकच आहे असा वाक्यार्थ आहे.पण त्या काळी व त्या स्थळी असणारा देवदत्त या स्थळी व या काळी असू शकत नाही कारण तो काळ परत येउ शकत नाही( त्या काळाचे परोक्षत्व सोडले) व त्या देवदत्तात कालानुरूप काही बदलही झालले असणारच  त्यामुळे तोच हा देवदत्त हे विधान चूक ठरते. पण ते स्थळ व तो काळ सोडून त्यातील देवदत्ताचे ग्रहण केले जाते व त्या आधाराने व्यवहारही चालतात.

आत्मज्ञान होण्यासाठी या प्रकारच्या लक्षणेचा आश्रय करावा असे लेखक सुचवीत आहे.

ते परमतत्त्व तूच आहेस  या वाक्यातील परमतत्वातील सर्वज्ञत्व सोडून द्यायचे व जीवातील अल्पज्ञत्व सोडायचे व दोन्हीकडचे फक्त चैतन्यत्व घ्यायचे म्हणजे ब्रह्मात्मैक्यज्ञाान होऊ शकेल.

तत्त्वमसि वाक्याचा नेमका अर्थ लक्षणेच्या आधाराने कसा समजून घ्यायचा  हे कळण्या साठी पुढची आर्या

सोऽयं द्विज इति वाक्यं त्यक्त्वा परोक्षापरोक्षदेशाद्यम्।

द्विजमात्रलक्षकत्वात् कथयति ऐक्यं पदार्थयोः उभयोः।।३६।।

अन्वयः - परोक्षापरोक्षदेशाद्यं त्यक्त्वा द्विजमात्रलक्षकत्वात सोऽयं द्विज इति वाक्यं उभयोः पदार्थयोः ऐक्यं कथयति।

व्याख्या - परोक्षेति। परोक्षम् अक्षणः परं अपरोक्षं प्रत्यक्षं च परोक्षापरोक्षं। परोक्षापरोक्षः देशः परोक्षापरोक्षदेशः। स एव आदि यस्य स परोक्षापरोक्षदेशाद्यम्। अगोचर तथा गोचर पदार्थानां वर्णनम् भागशः त्यक्त्वा तत्र वर्णित द्विजस्यमात्र ग्रहणं कृत्वा यथा सोऽयं द्विजः इत्येवं देवदत्तस्य नाम कस्यचित् पुरुषस्य ग्रहणं कियते तद्वाक्यं सः तथा अयं पदार्थयोः ऐक्यं दर्शयति।

अनुवाद -परोक्ष अपरोक्ष देशादिविचार सोडून देऊन द्विज या शब्दावरच लक्ष केंद्रित केले असता तोच व हा या दोन शब्दांचे ऐक्य दाखवले जाते.व काही काळापूर्वी अन्य देशी भेटलेला जो ब्राह्मण तोच आज इथे दिसत आहे या सत्याचा स्वीकार केला जातो

अशा प्रकारे तत्त्वमसि या अतिशय गहन वाक्याचा खुलासा लेखकाने आपल्यासमोर ठेवला आहे .

तद्वत् तत्त्वमसीति त्यक्त्वा प्रत्यक् परोक्षतादीनि।

चिद्वस्तु लक्षयित्वा बोधयति स्पष्टम् असि पदेन ऐक्यम्।।३७।।

अन्वयः -तद्वत् प्रत्यक् परोक्षतादीनि त्यक्त्वा चिद्वस्तु लक्षयित्वा तत्त्वमसीति(वाक्यस्य असि इति पदम् ) असि पदेन स्पष्टम् ऐक्यं बोधयति।

व्याख्या - तद्वदिति। यथा पूर्वोक्तं सोऽयं देवदत्तः इत्यस्मिन् वाक्ये।प्रत्यक् पुरोवस्थितं। परोक्षता अगोचरता इत्यादि त्यक्त्वा विहाय। केवल चिद्वस्तु चैतन्यं लक्षयित्वा मनसि कृत्वा ।तत्त्वमसि वाक्यस्थं असि पदं उभयोः पदयोः ऐक्यं अभेदः बोधयति निरूपयति।

अनुवाद -त्याच प्रकारे प्रत्यक्ष व दृष्टिआड अशा सीमांच्या पलीकडे जाऊन चिद्वस्तूवर लक्ष ठेवून तत् पदाशी संलग्न असलेले सर्वज्ञत्व सर्वकर्तृत्व घेऊन व त्वं पदाबरोबर असणारे अल्पज्ञत्व अल्पशक्तित्व सोडून तत्त्वमसि ह्या वाक्यातील असि पद जीव व ब्रह्म यांचे ऐक्य दाखवते.

इत्थं बोधितम् अर्थ महतावाक्येन दर्शितैक्येन।

अहमित्यपरोक्षयतां वेदो वेदयतिवीतशोकत्वम्।।३८।।

अन्वयः - महतावाक्येन दर्शितैक्येन इत्थं अर्थ बोधितम्। अहमित्यपरोक्षयतां च वीतशोकत्वं वेदःआम्नायः वेदयति।

व्याख्या- महतेति। महत् वाक्यं महावाक्यं। तेन महतावाक्येन दर्शितम् ऐक्यं। तेन दर्शितेन प्रकटितेन इत्थम् बोधितं।किं बोधितमिति पृष्टे। जीवब्रह्मणो अभेद स्थापितः।अनेन प्रकारेण अहमेव तत् ब्रह्म इति न परोक्षम् इति अपरोक्षं।अपरोक्षमिव आचरति अपरोक्षयति।तस्य भावः अपरोक्षयता अनुभूति तथा

तस्माज्जातं वीतशोकत्वं वीतः विशेषेण इतः शोकः वीतशोकः तस्य भावः वीतशोकत्वं शोकराहित्यं वेदः प्रकटयति।

अनुवाद -अशाप्रकारे महावाक्याने जीव ब्रह्माचे ऐक्याचा बोध करून दिला.या मार्गाने वेद मीच ते ब्रह्मस्वरूप आहे असे ज्ञानाचे व शोकराहित्याचे निरूपण करतात.

शंका बहुधा वेदवाक्ये ही कर्मपर दिसून येतात तर मग तत्त्वमसि हे वाक्य जीव व ब्रह्म यांचा अभेद दाखवते असे कसे म्हणता?

प्रायः प्रवर्तकत्वं विधिवचसां लोकवेदयोर्दृष्टं।

सिद्धं बोधयतोऽर्थं कथमेतद् भवति तत्त्वमस्यादेः। ।३९। ।

अन्वयः - प्रायः लोकवेदयोः विधिवचसां प्रवर्तकत्वं दृष्टम्। (तर्हि) कथम् एतद् (महावाक्यम्) तत्त्वमस्यादेः सिद्धं अर्थं बोधयतः भवति।

व्याख्या - प्राय इति बहुशः। लोकः च वेदः लोकवेदौ च तयोः।विधेः वाक्यं विधिवाक्यं।तेषां विधिवचसां वेदवाक्यानां प्रवर्तकत्वं कर्मचोदकत्वं।नाम जनेषु तथा वेदेषु विधिवाक्यानां ग्रहणं प्रवर्त करूपेण कियते। नाम विधिवाक्यानि वेदवाक्यानि कर्मपराणि सन्ति इति मान्यता वर्तते।तर्हि कथं कस्मात् कारणात् एतत् तत्त्वमसि महावाक्यं सिद्धस्य प्रसिद्धंस्य अर्थस्य बोधकं ज्ञानपरं भवति इति उच्यते।

अनुवाद - प्राधान्याने लोकांमध्ये वेदवाक्ये ही प्रवर्तक म्हणजेच कर्मपर असतात असं मानलं जात असूनही कशी बरे ही वाक्ये तत् त्वम् असि या वाक्याने सांगीतलेला ब्रह्मपर अर्थ सांगतात असे म्हणता?

संबंधः

वेदवाक्यांचे कर्मपरत्व प्रसिद्ध असताना तत्त्वमसि हे वाक्य ज्ञानपर आहे असे कसे बरे म्हणता? या शंकेचे उत्तर ४० व्या आर्येत देतात .केवळ विधिवाक्येच नव्हे तर अभिलषित वस्तूचे ज्ञानही मनुष्यास कर्मप्रवृत्त करते हे स्पष्ट करतात .

विधिरेव न प्रवृत्तिं जनयति अभिलषित वस्तुबोधोऽपि।
राजा याति सुतो अभूत् इति बोधेन प्रवर्तते लोकः।।४०।।

अन्वयः - विधिरेव प्रवृत्तिं जनयति (इति)न। अभिलषित वस्तुबोधः(अपि प्रवृत्तिं जनयति)(यथा हि )। राजा याति सुतोऽभूत इति बोधेन प्रवर्तते लोकः।

व्याख्या - विधिरिति।यद्वाक्यं विधायकं चोदकं स विधिः।इति न्यायेन चोदकं वाक्यमेव प्रवृत्तिं नाम उत्कटरागजन्यः प्रयत्नविशेषः।तं जनयति उत्पादयति इति न सत्यम्।तर्हि किमपरं प्रवृत्तिजनकं ? आचरणविषयकः नियमः एव जनेषु कर्मविषयकी प्रेरणा उत्पादयति इति न अभि+लष् कान्तौ विशेषरूपेण इच्छिता अभिलषिता वस्तु अभिलषितवस्तु। तस्याः बोधः ज्ञानम् अभिलषितवस्तुबोधः अपि कर्मविषयकी प्रेरणा उत्पादयति। यथा हि । राजा याति इति श्रुत्वा स परिवारेण[1] सह गच्छन् स्यात् अवर्णनीया सा शोभा अवश्यं द्रष्टव्या इति मनसि कृत्वा जनाः धावन्ति कर्मपरा च भवन्ति। एवमेव सुतोऽभूत इति श्रुत्वा पुत्रजन्मो नाम महतो लाभ इति विचिन्त्य जनाः उत्सवम् आरभन्ते अद्य पितृऋणात् मुक्तोऽहम् इति चिन्तयन्ति।एवं विधिवाक्यं विना अपि जनाः प्रवृत्तिपरा भवन्ति।

अनुवाद - ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत्[2].यासारखी वाक्ये प्रवृत्तिपरक आहेत म्हणून सर्व वेदवाक्ये प्रवृत्तिपर आहेत असे म्हणता येत नाही.काही अन्य वाक्ये सुद्धा मनुष्यास कर्मप्रवृत्त करत असतात. जसे राजा निघाला असे ऐकून त्याचा लवाजमा, रथ, घोडे यांची शोभा पाहाण्याच्या इच्छेने लोक धावू लागतात.तसेच मुलगा झाला हे ऐकल्याबरोबरच पुत्रमुख न पाहताच पेढे वाटणे, देवास नमस्कार करणे अशा कृतीस लोक प्रवृत्त होतात.

अशा रीतीने पूर्वपक्षाचा आक्षेप कसा निराधार आहे हे वेदान्तबोधकारांनी स्पष्ट केले आहे.

---

[1] यथा राजासौ गच्छति इत्युक्ते सपरिवारस्य राज्ञो गमनम् उक्तं भवति तदवत् शारीरक भाष्य १.१.१

[2] स्वर्गकामो ज्योतिष्टोमेन यजेत्।एककामःसर्वकामो वाऽयुगपत्कामयेताहार पृथक्त्वे वा।।१।।आपस्तम्ब श्रौतसूत्रे प्र ९ काण्डिका २ सूत्र १

गुरूमहिमा

ऐक्यपरैः श्रुतिवाक्यै आत्मा शश्वत्प्रकाशमानोऽपि।

देशिकदयाविहीनैः अपरोक्षयितुं न शक्यते पुरुषैः। ।४१। ।

अन्वयः - ऐक्यपरैः श्रुतिवाक्यै शश्वत्प्रकाशमानोऽपि आत्मा देशिकदयाविहीनैः पुरुषैः अपरोक्षयितुं न शक्यते।

व्याख्या- ऐक्यपरैः इति।एकात्मपरैः परशब्दः इष्टवाची महाभाष्य १.२.५ अभेदबोधकैः। ऐक्यमेव दर्श्यते यैः तादृशैः वेदवाक्यैः। शश्वत् संततं प्रकाशमानः। बोधगम्यः सन्नपि आत्मा। देशिकस्य दया देशिकदया गुरोः कृपादृष्टिः इत्यर्थः। देशिकदया तया विहीनः देशिकदयाविहीनः पुरुषः। तैः देशिकदयाविहीनैः पुरुषैः साधकैः अपरोक्षयितुं साक्षात्कर्तुं न शक्यते। गुरुकृपामहती अत्र विशेषरूपेण स्थापिता।

अनुवाद -तत्वमस्यादि जीवब्रह्माभेदबोधक उपनिषद्वाक्यांनी नित्य आत्मा जाणण्याजोगा असूनही गुरूकृपा नसलेल्या साधकांना तो गोचर होत नाही.दासबोधातही हाच विचार समर्थ रामदासांनी खालीलप्रमाणे मांडलेला दिसतो.

नाना साधने पाहता।बाणती सद्गुरुकरिता।

सद्गुरु विण सर्वथा।सन्मार्ग नसे। ।१८। ।

प्रयोग साधने सायास।नाना साक्षेपे विद्याभ्यास।

अभ्यासे काही गुरु गम्यास। पविजेत नाही। ।१९

जे अभ्यासे अभ्यासिता नये। जे साधने असाध्य होये।

ते हे सद्गुरुविण काय। उमजो जाणे। ।ओ २० स ५ दशक ४

संबंध ४१ व्या आर्येत गुरुकृपेची आवश्यकता सांगून आता पुढे पूर्वपक्षाने उपस्थित केलेली शंका विचारात घेतात.

विरहितकाम्यनिषिद्धो विहितानुष्ठानविमलितस्वान्तः।

भजति स्वयमेव बोधं गुरुणा किमिति त्वया न मन्तव्यम्। ।४२। ।

अन्वयः - विरहितकाम्यनिषिद्धो विहितानुष्ठानविमलितस्वान्तः (साधकः) स्वयमेव बोधं भजति (तत्र ) गुरुणा किम् इति त्वया न मन्तव्यम्।

व्याख्या - विरहितेति। विशेषेण रहितः विरहितः। काम्यं च निषिद्धं च काम्यनिषिद्धे। काम्यनिषिद्धकर्माणि येन निषिद्धानि त्यक्तानि स विरहितकाम्यनिषिद्धः। विहितं च असौ अनुष्ठानं विहितानुष्ठानं। तेन विहितानुष्ठानेन विमलितं मलरहितं। यस्य स्वस्य अन्तःकरणं सः विहितानुष्ठानविमलितस्वान्तः। साधक इति शेषः। स्वयमेव स्वबलेनैव बोधं ज्ञानं भजति प्राप्नोति। अतः गुरुणा किं? नाम गुरोः का आवश्यकता इति त्वया पूर्वपक्षप्रतिपादकेन न मन्तव्यं मनसि न कार्यम् इति भावः।

अनुवाद - ज्या साधकाने काम्य व निषिद्ध कर्मांचा त्याग केला आहे व त्यायोगाने ज्याचे अन्तःकरण निर्मल झाले आहे त्याला आपोआपच आत्मबोध होइल तेथे गुरु ची काय गरज ? असे तू समजू नकोस.

कर्मभिरेव न बोधः प्रभवति गुरुणा विना दयानिधिना।
आचार्यवान् हि पुरुषो वेद[1] इत्यर्थस्य वेद सिद्धत्वात्।।४३।।

अन्वयः - दयानिधिना गुरूणा विना (गुरूकृपाविना इत्यर्थ) कर्मभिरेव बोधः न प्रभवति हि आचार्यवान् पुरूषो वेद इत्यर्थस्य वेद सिद्धत्वात्।

व्याख्याः - दयानिधिनेति। दयायाः निधिः दयानिधिः। दयानिधिगुरु तेन गुरु णा विना अर्थात् गुरोः कृपाविना। कर्मभिः एव कर्मानुष्ठानभिरेव विहितकाम्यादिभिः बोधः ज्ञानं न प्रभवति जायते। हि यतः आचार्यवान् आचार्ययुक्तः पुरुषः साधकः वेद जानाति आचार्यवान् पुरुषो वेद (छान्दोग्योपनिषद् ) इत्यस्य भावस्य श्रुतिसिद्धत्वात्। वेदोऽपि एष एव विचारः स्थापयति इति भावः।

अनुवाद -दयासागर गुरूच्या कृपेशिवाय नुसत्या कर्मानुष्ठानाने म्हणजेच वर्ण आश्रमानुसार विहित कर्मांचे काटेकोर पालन केले तरीही बोध काही होत नाही.कारण आचार्यवान् म्हणजेच गुरु असलेल्यासच अर्थात् गुरु स शरण गेलेल्यासच ज्ञान होते असं वेदांनी सिद्ध केलेले आहे.

शंका वेदांनी म्हटले असले म्हणजे ते स्वीकारलेच पाहिजे यास आधार काय?

---

[1] आचार्यवान् पुरुषो वेद तस्य तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्ये अथ सम्पत्स्य इति।।छान्दोग्य ६.१४.२

वेदो अनादितया वा यद्वा परमेश्वर प्रणीतया।

भवति परमं प्रमाणं बोधो नास्ति स्वतः च परतो वा। ।४४। ।

अन्वयः - वेदः अनादितया वा यद्वा परमेश्वर प्रणीतया परमं प्रमाणं भवति, स्वतः च परतो वा बोधः नास्ति।

व्याख्याः - वेदः इति। श्रुतिवाङ्मयं न आदिः विद्यते यस्य सः अनादि तस्य भावः अनादिता तया। अथवा कदा जातः इति न ज्ञायते इत्यर्थः अनादितया। अथवा परमः च असौ ईश्वरः परमेश्वरः सर्वश्रेष्ठ शासकः तेन प्रणीतः तस्मात् परमेश्वरप्रणीतत्वात्[1]। परमं श्रेष्ठं प्रमाणं ज्ञानसाधनं भवति।स्वतः आत्मनः प्रयत्नात् वा अन्येन केनापि मार्गेण ।परतः अन्यस्य सहायेन बोधः ज्ञानं नास्ति।

अनुवाद - वेद हे अनादि[2] असल्यामुळे किंवा परमेश्वररचित असल्यामुळे सर्वश्रेष्ठ प्रमाण आहेत.आत्मबोध हा स्वतःच्या प्रयत्नांनी अथवा अन्यकोणाच्या म्दतीने होत नाही तर वेदांच्या अनुशीलनानेच होतो.

नापेक्षते यदन्यत् यदपेक्षन्ते अखिलानि मानानि।

वाक्यं तत् निगमाना[3] मानं ब्रह्मादि अतीन्द्रियावगतौ। ।४५। ।

अन्वयः - (वेदः)यत् न अन्यत् अपेक्षते (किन्तु)यत्(यं ) अखिलानि मानानि अपेक्षन्ते तत् निगमानां वाक्यं मानं (भवति) ब्रह्मादि अतीन्द्रियावगतौ।

व्याख्याः - यदिति।यत् नाम वेदः।स स्वतःप्रमाणत्वात् अन्यप्रमाणं न अपेक्षते। किन्तु न खिलं अखिलं तानि अखिलानि समस्तानि अन्यानि साधनानि तु स्वमतसिद्ध्यर्थं वेदवचनानां सहायम् अपेक्षन्ते।तत् वेदवचनं श्रुतिवाक्यं मानं प्रमाणं भवति कुत्र ब्रह्मादि ब्रह्मा आदि येषां ते विष्ण्वादयः। अतीत

---

[1] अस्य महतो भूतस्य निःश्र्वसितं यदृग्वेदः बृहदारण्यक २.४.१0 शास्त्रयोनित्वात् ब्र सू १.१.२
अहं दा गृणते पूर्व्यं वस्वहं ब्रह्मं कृणवं मह्यं वर्धनम्।ऋ १0.४९ येथे ब्रह्म शब्दाचा अर्थ वेद असा आहे.

[2] वेदांच्या कालाविषयी मतभेद दिसतात काही विद्वान ख्रिस्तपूर्व २५0 तर काही विद्वान ख्रिस्तपूर्व ६५00 असा काल वेदरचनेचा मानतात त्यामुळेच त्यांना अनादि म्हणत असावेत.

[3] निगमो नाम कल्पतरोर्गलितं फलम्। भागवत १.३.३

इन्द्रियेभ्य अतीन्द्रियाः तेषाम् अवगति अतीन्द्रियावगतिः। तस्याम् अतीन्द्रियावगतौ दिव्यदेवतानां ज्ञानं बोधः वा श्रुतिवाक्यानाम् आधारेण एव शक्य इति अर्थः।

अनुवाद - जी वेदवाक्ये परमेश्वरप्रणीत असल्यामुळे किंवा अनादि असल्यानेअन्य कोणत्या प्रमाणाची अपेक्षा करीत नाहीत पण ज्यांची अन्य प्रमाणे अपेक्षा करतात अशी निगमवाक्ये ब्रह्मादि अतीन्द्रिय गोष्टींचे ज्ञान होण्यास कारणीभूत ठरतात.

ब्रह्मासारख्या अतीन्द्रिय वस्तूच्या ज्ञानासाठी वेदवाक्यांहून अन्य प्रमाण नाही हा विचार शंकराचार्यांनीही तत्त्वोपदेश या ग्रंथात **20** व्या श्लोकात अगदी असाच मांडला आहे.

अपेक्ष्यतेऽखिलैर्मानैर्न यन्मानमपेक्षते।वेदवाक्यं प्रमाणं तद्ब्रह्मत्मावगतौ मतम्।।

वेदवाक्याहून अन्य कशालाही प्रमाण मानू नये.४६ ते ४९

मानं प्रवोधयन्तं बोधं मानेन ये बुभुत्सन्ते।

एधोभिः एव दहनं दग्धुं वाञ्छति ते माहात्मानः।।४६।।

अन्वयः (निगमवाक्येभ्यः अन्यत्) मानं प्रवोधयन्तं ये मानेन बोधं बुभुत्संते ते महात्मानः एधोभिः एव दहनं दग्धुं वाञ्छति।

व्याख्या -मानमिति। मानं प्रबोधयन्तं निगमवाक्येभ्यः अन्यत् किमपि प्रमाणं मत्वा।मानेन नाम तेन प्रमाणेन ये जिज्ञासवः बोधं ज्ञानं बुभुत्सन्ते[1] बोद्धुमिच्छान्ति।अन्यप्रमाणैरपि ज्ञानप्राप्तिः शक्या इति मनसि कृत्वा ये यत्नशीलाः भवन्ति।ते महात्मानः महान् आत्मा येषां ते।महात्माशब्दः अत्र स्तुतिपरः न अपि तु निन्दासूचकः।एधोभिः शुष्ककाष्ठैः एव दहनं नाम अग्निः तं दग्धुं वाच्छन्ति।अर्थात् यत् भक्ष्यम् अस्ति तदेव भक्षकरूपेण पश्यन्ति इत्यर्थः।अनेन अन्यप्रमाणस्य स्वीकारः मूर्खवत् व्यवहार इति दर्शितम्।

अनुवाद -वेदवाक्यांहून अन्य कोणतेतरी प्रमाण बरोबर मानून त्याच्या सहाय्याने जे ज्ञानप्राप्तीची अपेक्षा करतात,त्यांचे असे समजणे म्हणजे सर्पणानेच अग्नीस जाळण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणे मूर्खपणाचे आहे.

तत्त्वोपदेश नावाच्या आपल्या ग्रंथात शंकराचार्यही असाच विचार मांडतात

प्रमाणं बोधयन्तं तं बोधं मानेन ये जनाः।बुभुत्सन्ते त एधोभिर्दग्धुं वाञ्छति पावकम्।।१४

---

[1] धातोःकर्मणः समानकतृकादिच्छायां वा।पा ३.१.७

वेदोऽनादिरमुष्य व्यञ्जक ईशः स्वयंप्रकाशात्मा।

तदभिव्यक्तिमुदीक्ष्य प्रोक्तोऽसौ सूरिभिः प्रणीत इति।।४७।।

अन्वयः - वेदः अनादिः अस्ति अमुष्य व्यञ्जक ईशः स्वयंप्रकाशात्मा अस्ति (वेदानां) तदभिव्यक्तिम् उदीक्ष्य असौ सूरिभिः प्रणीतः इति प्रोक्तः।

व्याख्या - वेद इति।वेदः विद्यन्ते-ज्ञायन्ते-लभन्ते वा एभिर्धर्मादि पुरुषार्थाः आम्नायः। न आदिः आरम्भः यस्य सः अनादिरस्ति। अस्य व्यञ्जकः प्रकाशकः ईशः। स्वयंप्रकाशात्मा स्वेनैव प्रकाशितः यस्य आत्मा स स्वयंप्रज्ञः अस्ति। वेदानां तदभिव्यक्तिं तस्मात् ईश्वरात् वेदानां प्रादुर्भावः उदीक्ष्य ज्ञात्वा मनसि कृत्वा।असौ वेदः सुरिभिः देवैः प्रणीतः रचितः इति उच्यते।

अनुवाद - वेदवाङ्मय हे अनादि अर्थात् कधी लिहिले गेले हे माहीत नसलेले आहे व त्यास ईश्वराने प्रकट केले, जो ईश्वर स्वयंप्रकाशी आहे व त्याने वेदांस प्रकट केले म्हणून वेद हे ईश्वराने रचले असे म्हणतात. 'अस्य महतो भूतस्य निःश्र्वसितं यदृग्वेदः बृहदारण्यक २.४.१0

रूपाणामवलोके चक्षुरिवान्यन्न कारणं दृष्टम्।

तद्वद् अदृष्टावगतौ वेदवदन्यो न वेदकोहेतुः।।४८।।

अन्वयः - (यथा) रूपाणाम् अवलोके चक्षुः इव न अन्यत् कारणं दृष्टं तद्वत् अदृष्टावगतौ वेदवदन्यो न वेदकोहेतुः।

व्याख्या - रूपाणामिति। यथा रूपाणाम् घटपटादिस्थूलपदार्थाणाम्।अवलोके दर्शनविधौ। चक्षुः नयनम् इव न अन्यत् किमपि कारणं साधनं दृष्टं विद्यते। तद्वत् तथा एव अदृष्टावगतौ न दृष्टम् अदृष्टं ब्रह्म। तस्य अवगतिः नाम तद्विषयकं वा आत्माविषयकं ज्ञानं। तत्र या अवगतिः प्रवेशः दृष्टावगतिः तस्याम् अननुभूतबह्मज्ञाने इत्यर्थः वेदवद् वेदतुल्यः न कोऽपि अन्यः वेदकः ज्ञापकः हेतुः साधनम् इत्यर्थः।

अनुवाद - जसे घटपटादि स्थूलवस्तूचे आकलन होण्यासाठी डोळ्याहून अन्य कोणतेही साधन उपयोगी नाही तसेच सूक्ष्म अशा ब्रह्माचे ज्ञान होण्यासाठी वेदाहून अन्य कोणतेही साधन नाही.रूपाचे ज्ञान हे इंद्रिय व विषय यांच्या संयोगाने होत असते.ब्रह्म हे इंद्रियातीत असल्याने त्याच्या ज्ञानासाठी तेवढ्याच योग्यतेचे उच्च साधन हवे व ते साधन वेदांशिवाय अन्य कोणतेही असू शकत नाही.

निगमेषु निश्चितार्थं तंत्रे कश्चिद्यदि प्रकाशति।

तदिदमनुवादमात्रं प्रामाण्यं तस्य सिद्धयति न किञ्चित्।।४९।।

अन्वयः - यदि कश्चिद् निगमेषु निश्चितार्थं तंत्रे[1] प्रकाशति ( तर्हि) तत् इदम् अनुवादमात्रं (अस्ति) तस्य प्रामाण्यं न किञ्चित् सिद्धयति।

व्याख्या - यदीति।यदि अत्र संशयप्रदर्शकः। संयोगवशात् कश्चिद्वाक्यांशः निगमेषु वेदेषु निश्चितार्थं स्थापितविचारान् ।अन्यत्र तंत्रग्रंथे प्रकाशते निरूपयति।नाम वेदे दार्शिताः विचाराः तंत्रे अपि सन्ति इति प्रतिपादयति। तर्हि तत् प्रतिपादनम् अनुवादमात्रं द्वयसज्दघ्नञ्मात्रचः पा ८.२.३७ अनुवचनमात्रमस्ति न तत्र किमपि नूतनविचारप्रदर्शनम्।अतः तस्य प्रामाण्यं प्रमाणरूपेण ग्रहणं किञ्चिदपि लेशमात्रमपि नोपपद्यते।

अनुवाद - जर एखाद्या तंत्र ग्रंथात वेदविचारांची मांडणी आढळली व त्यावरून तंत्रातही तेवढ्याच योग्यतेचे विचारप्रदर्शन आहे असे कोणी म्हणेल तर ते विचारप्रदर्शन म्हणजे वेदवचनांचा केवल अनुवाद आहे असे समजा.आणि म्हणूनच अशा तंत्रग्रंथातील विचारांना प्रमाणाचा दर्जा देणे अजिबात योग्य नाही.

अद्वैत

अंशद्वयवति निगमे साधयति द्वैतमेव कोप्यंशः।

अद्वैतमेव वस्तु प्रतिपादयति प्रसिद्धमपरोंशः।।५० ।।

[1] तंत्र इतरेतराभिसंबद्धस्यार्थसमूहस्योपदेशः न्यायकोश
तंत्र -- तंत्रशास्त्र हे मुख्यतः मूर्तिपूजेचे शास्त्र होय.उपासनाकांड असेही या शास्त्रास म्हणतात.त्या त्या इष्ट देवतेचे तत्त्वज्ञान,देवतेच्या आराधनेचे किंवा साधनेचे विविध बीजमंत्र,अनेक यंत्रे, चके, मंडले, तंत्रशास्त्राचे विषय असतात.तसेच मुख्य देवतेच्या परिवार देवतांची सांगोपांग स्वरूपे व मूर्ति मंदिररचनेचे प्रकार, मंदिर व मूर्ती यांच्या प्रष्ठिापनेचे उत्सव, रथयात्रा यांचे विवरण तंत्रशास्त्रात मिळते.त्याचप्रमाणे शिष्य, गुर अथवा आचार्य, दीक्षा, अभिषेक, पूजाप्रकार, होम, जपविधि, मंत्रयोग, पुरश्चरण, इष्टकामप्राप्तीचे व सिद्धीप्राप्तीचे म्हणजेच अलौकिक वा अद्भूत चमत्कार निर्माण करणारे शक्तिसाधनेचे विधि म्हणजे जादूचे विविध प्रकार इत्यादि तंत्रशास्त्राचे विषय होत.
तंत्राचे व्यवस्थित समग्र विषयवार ग्रंथ निर्माण झाले तेंव्हा त्यांचे ज्ञान, योग, किया, आणि चर्या हे चार पाद म्हणजे विभाग ठरले.
ज्ञानपादात तत्त्वज्ञान, योगपादात षडंगयोग, कियापादात मूती व मंदीररचना, चर्यापादात पूजविधि सागितले असतात.

अन्वयः - कोऽपि अंशः अंशद्वयवति निगमे द्वैतमेव साधयति (किन्तु)अपरोंशः प्रसिद्धम् अद्वैतवस्तुमेव प्रतिपादयति।

व्याख्या - कोऽपीति। कश्चिदंशः पादः भागः वा।द्वयोः अंशयोः समाहारः अंशद्वयः। अंशद्वयवत् द्वाभ्यामंशाभ्याम् युक्तः क्त-क्तवतू निष्ठा पा १.१.९६( निष्ठा ३.२.१0२ भूतार्थवृत्तेर्धातोर्निष्ठा) अंशद्वयवति निगमे वेदे। द्वैतं द्विधा इतं द्वीतं तस्य भावो द्वैतं। जीवब्रह्मणोः भेदः साधयति प्रदर्शयति।किन्तु अपरोंशः अपरः अन्यः अंशः भागः। प्रसिद्धम् प्रकर्षेण सिद्धः प्रसिद्धः तं प्रसिद्धम् अंशम् अद्वैतवस्तुं जीवब्रह्मणोः ऐक्यविषयम् एव स्थापयति।

अनुवाद - दोन अंशांनी युक्त अशा वेदातील एक अंश जीव व ब्रह्म यांचा भेद दाखवतो परंतु अन्य अंश मात्र जीव व ब्रह्म यांचे ऐक्य स्थापतो.

भेददर्शक प्रमाण—द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं ।मुंडकोपनिषत् ३.१

अभेददर्शक प्रमाण—यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह।

मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति।।कठोपनिषत् २.१.१0

अद्वैतमेव सत्यं[1] तस्मिन् द्वैतमसत्यमध्यस्तम्।

रजतमिव शुक्तिकायां मृगतृष्णायामिवोदकस्फुरणम्।।५१।।

अन्वयः - अद्वैतमेव सत्यं तस्मिन् असत्यं द्वैतम् अध्यस्तम्।(यथा हि) शुक्तिकायां रजतम् (तथा च) मृगतृष्णायाम् उदकस्फुरणम् इव।

व्याख्या -अद्वैतमिति। न द्वैतम् अद्वैतम्।जीवब्रह्मणोः ऐक्यं नाम अद्वैतं। तदेव सते हितं सत्यं तथ्यं। तस्मिन् अद्वैते द्वैतं नाम जीवब्रह्मणोः द्विधाभावः पृथगत्वम् अध्यस्तम् आरोपितम्।कथमध्यस्तम् इति दृष्टान्तेन निरूपितम्।यथा जले पतितां शुक्तिकां दृष्ट्वा तस्मिन् रजतनाणकस्य आरोपः भ्रमकारणात् कियते तथैव मृगतृष्णिकायां मृगमरीचिकायां जलस्य स्फुरणम् आभासः भ्रमकारणादेव भवति।

---

[1] सत्यम्--अबाधितज्ञानविषयः।सर्वलक्षणसंग्रहः३१0३

अनुवाद - वस्तुतः अद्वैत हेच खरे पण त्या अद्वैतावर द्वैताचा आरोप केला जात असतो.हा आरोप कसा होतो ते समजविण्यसाठी व्यवहारातील दृष्टान्त देतात.हौदाच्या तळाशी पडलेला शिंपला पाहून त्याच्या चमकदारपणामुळे हा रूपयाच असल्याचा आरोप केला जातो तसेच भरदुपारी तापलेल्या हवेमुळे दूर अंतरावर पाण्याचा भास होतो.जीव व ब्रह्म यांचे ऐक्य असूनही अज्ञानामुळे म्हणजेच अध्यासामुळे त्यांना वेगळे मानले जाते.

संबंध

अद्वैत[1] सत्य असून त्यावर द्वैत आरोपित होते या मताला सिद्ध करण्यासाठी स्वतःच पूर्वपक्षाचे द्वैतावरच अद्वैताचा आरोप होतो असे जर आम्ही म्हटले तर असे मत मांडून त्याचा निरास करतात.

आरोपितं यदि स्यादद्वैतं वस्त्ववस्तुनि द्वैते।

युक्तं नैव तदा स्यात्सत्येध्यासो भवत्यसत्यानाम्। ।५२। ।

अन्वयः - यदि अद्वैतं वस्तु अवस्तुनि द्वैते आरोपितं स्यात् तदा युक्तं नैव स्यात् (यतः सर्वदा) सत्ये असत्यानाम् अध्यासो[2] भवति।

व्याख्या -यदीति।यदि अत्र पक्षान्तरप्रदर्शनाय। न द्वैतं विद्यते यस्मिन् तत् अद्वैतं। वस्तु[3] नाम परमार्थेन सत्यपदार्थः।अवस्तुनि द्वैते नाम विनाशशीले। अस्मद्-युष्मद्प्रत्ययेन निर्दिश्यमाणे जडपदार्थे आरोपितं स्यात् अध्यस्तं स्यात् तर्हि तत् अयुक्तमेव यतः सर्वदा सत्ये असत्यानाम् अध्यासो आरोपः जनैः कियते। कदापि असत्ये सत्यस्य आरोपः नोपपद्यते।

अनुवाद -जर अद्वैत वस्तूचा म्हणजे अंतिम सत्याचा आरोप भौतिक जगतावर केला तर ते योग्य ठरणार नाही कारण विनाशशील जगातील पदार्थ ख-या अर्थाने सत्य नसताात त्यामुळे त्यांच्यामध्ये सत्य शोधणे चूक ठरेल.तसेच हेही लक्षात ठेवले पाहिजे की नेहमी सत्यावरच असत्याचा आरोप होत असतो.

---

[1] अद्वैतम्-- सजातीयविजातीयस्वगतभेदशून्यम्।सर्वलक्षणसंग्रहः ८०

[2] अध्यासो नाम अन्यत्र अन्यधर्मावभास

[3] ब्रह्मास वस्तू असे म्हणणे -- वस् निवासे (भ्वादि) व आच्छादने (अदादि) असे दोन अर्थ दिसतात व सर्वामध्ये राहणे व सर्वाना व्यापणे या ब्रह्माच्या दोन्ही गुणांचे वस्तू शब्द यथार्थ वर्णन करतो.

द्वैतावर अद्वैताचे किंवा अद्वैतावर द्वैताचे आरोपण नाही म्हणता तर दुस याच एखाद्या पदार्थावर त्यांचे आरोपण मानावे या पूर्वपक्षाच्या मताचे निराकरण.

यद्यारोपणमुभयोस्तद्व्यतिरिक्तस्य कस्यचिदभावात्।
आरोपणं न शून्येन अस्मादद्वैत सत्यता ग्राह्या।।५३।।

अन्वयः - यदि उभयोः आरोपणं(अन्यत्र कल्प्यते तर्हि) तव्यतिरिक्तस्य कस्यचित् अभावात् शून्येन न आरोपणं(शक्यम्)अस्मात् अद्वैतसत्यता ग्राह्या।

व्याख्या- यदीति।यदि पक्षान्तरे। उभयोः द्वैताद्वैतयोः अन्यस्मिन् पदार्थे आरोपणं अध्यासः कल्प्यते। तर्हि तव्यतिरिक्तस्य द्वैताद्वैतयोः व्यतिरिक्तस्य अन्यस्य अभावात् ।अर्थात् शून्येन रिक्तेन अत्यन्ताभाववत् पदार्थे। नाम शून्ये द्वैताद्वैतयोः आरोपः न शक्यः। अतः अस्मात्कारणात् अद्वैतस्य सत्यता ग्राह्या स्वीकार्या इत्यर्थः।

अनुवाद -जर दोघांचा द्वैत व अद्वैत यांचा अन्य कोणत्यातरी पदार्थावर आरोप मानला तर ते ही शक्य नाही कारण या दोघांव्यतिरिक्त तिसरा पदार्थ नसल्यामुळे शून्यावरच तो आरोप मानल्यासारखे होइल जे योग्य नाही.म्हणून अद्वैताची सत्यता स्वीकारणे योग्य होइल.

५0 व्या आर्येपासून इथवर प्रतिपक्ष स्वतःच स्थापन करून त्याचे खंडन करत अद्वैत सिद्ध केले.आता स्वतःचे विचार मांडून अद्वैत सिद्ध करतात.

प्रत्यक्षाद्यनवगतं श्रुत्या प्रतिपादनीयमद्वैतं।
द्वैतं न प्रतिपाद्यं तस्य स्वयमेव लोकसिद्धत्वात्।।५४।।

अन्वय- अद्वैतं प्रत्यक्षाद्यनवगतं (प्रत्यक्षादिभिः प्रमाणैः अनवगतम् अतः)श्रुत्या प्रतिपादनीयम् (अस्ति) द्वैतं न प्रतिपाद्यं तस्य स्वयमेव लोकसिद्धत्वात्।

व्याख्या - अद्वैतमिति। अद्वैतं जीवब्रह्मणोः अभेदः ब्रह्मात्मैक्यं वा। प्रत्यक्षादिभिः[1] प्रमाणैः प्रमाता येन प्रमिमीते तत् प्रमाणं। तादृशैः नैकैः प्रमाणैः न अवगतम् अनवगतं। साधयितुं स्थापयितुं न शक्यते। तत् तु शृत्या वेदवाक्यैः एव प्रतिपाद्यमस्ति। द्वैतं न प्रतिपाद्यम् द्वैतस्य प्रतिपादनं स्थापनं न आवश्यकं तस्य द्वैतस्य लोकसिद्धत्वात्। लोके सिद्धं लोकसिद्धं तस्य भावः लोकसिद्धत्वं तस्य भावस्त्वतलौ ५.१.११९ तस्मात् लोकसिद्धत्वात् नाम द्वैतं तु स्वयमेव सिद्धं वर्तते सर्वेषाम् अनुभवगम्यं वर्तते।

अनुवाद -अद्वैत हे प्रत्यक्षादि प्रमाणांनी सिद्ध होउ शकत नाही तर ते केवळ उपनिषद्वाक्यांनीच सिद्ध होउ शकते.द्वैत सिद्ध करण्याची आवश्यकता नसते कारण ते तर प्रसिद्ध व सर्वांच्या अनुभवाचे असते.मी-माझे व तू-तुझे असा भाव जगात सर्वत्र दिसतो एवढेच नव्हे तर त्याच्या आधाराने जगातील सर्व व्यवहार चालत असतात.

अद्वैतं सुखरूपं दुःसहदुःखं सदा भवेत् द्वैतम्।
तत्र प्रयोजनं स्यात्प्रतिपादयति श्रुतिस्तदेवासौ।।५५।।

अन्वयः - असौ अद्वैतं सदा सुखरूपं भवेत् श्रुतिः तदेव प्रतिपादयति। दुःसहदुःखं द्वैतं तत्र प्रयोजनं स्यात्।

व्याख्या - असाविति। असौ वर्ण्यमानं अद्वैतं ५० तः वर्ण्यमानं ।सदा सर्वदा नित्यं सुखरूपं सुखाकारं भवेत् भवति। अतः श्रुतिः तदेव अद्वैतं प्रतिपादयति निरूपयति। अस्य विपरीतं वर्तते द्वैतं। दुःसहदुःखं दुःखेन सहते इति दुःसहं च असौ दुःखं दुःसहदुःखं । द्वैतकल्पना यदि स्वीकियते तर्हि अहंशब्देन वर्ण्य मानः जीवः तथा सर्वज्ञातादि गुणैः संपन्नः ईश्वरः एतयोः भेदकारणात् दुःखानुभवः भवति। अतः एव अद्वैतप्रतिपादने श्रुतीनां कृते द्वैतं प्रयोजनं कारणं भवति।

---

[1]**पूर्वोत्तरमीमांसादर्शनांने** विचारात घेतलेल्या प्रमाणांची संख्या ६ असून त्यांची नावे अशी प्रत्यक्ष,अनुमान,उपमान, शब्द, अर्थापत्ति व अनुपलब्धी . **वैशेषिक-** प्रत्यक्ष व अनुमान, **न्याय-** प्रत्यक्ष अनुमान ,उपमान, शब्द, **योग व सांख्य-** प्रत्यक्ष, शब्द व अनुमान

अनुवाद -सर्वदा सुखरूप असलेल्या अद्वैताचे प्रतिपादन उपनिषदे करत असतात व असे अद्वैताचे निरूपण करण्यासाठी द्वैतच कारणरूपाने असते.अर्थात द्वैतभावनेपासून जिज्ञासूची सुटका व्हावी म्हणून अद्वैताचे निरूपण श्रुतिमाता करते.

निगमगिरा प्रतिपाद्यं वस्तु यदानन्दरूपमद्वैतम्।

स्वाभाविकस्वरूपं जीवत्वं तस्य केचन ब्रुवते।।५६।।

अन्वयः - यद् आनंदरूपमद्वैतं वस्तु निगमगिरा प्रतिपाद्यं (अस्ति) तस्य स्वाभाविकस्वरूपं जीवत्वं (इति) केचन ब्रुवते।

व्याख्या -यदीति। यत् आसमन्तात नन्दतीति आनन्दरूपं शोकरहितं। अद्वैतं न द्वैतं विद्यते यस्मिन् तत् विभागहीन।ं वस्तु ब्रह्मतत्वं। निगमानां गिः निगमगिः तया निगमगिरा वेदवाण्या प्रतिपाद्यं निरूपणीयं अस्ति। तस्य ब्रह्मणः स्वाभाविकं स्वभावात् जातं स्वरूपं सहजरूपं नाम जीवत्वम् इति केचन अन्यमतवादिनः वदन्ति।

अनुवाद -जे वेदमंत्रांनी स्थापलेले शोकरहित अद्वैत ब्रह्म ते स्वाभाविकरूपाने जीवाचे स्वरूपच आहे असे काही लोक मानतात. ते ब्रह्म वेगळे नसून ख-या अर्थाने जीवच आहे जीवच ब्रह्मरूप होत असतो.

ब्रह्म हे जीवाचे रूप या मताचे खण्डन करण्यासाठी पुढील आर्या.

जीव

स्वाभाविकं यदि स्याज्जीवत्वं तस्य विशदविज्ञप्तेः।

सकृदपि न तद्विनाशं गच्छेदुष्णप्रकाशवदवह्नेः।।५७।।

अन्वयः - तस्य विशदविज्ञप्तेः जीवत्वं यदि स्वाभाविकं स्यात् (तर्हि) तत् सकृदपि वह्नेः उष्णप्रकाशवत् विनाशं न गच्छेत्।

व्याख्या - तस्येति।तस्य ब्रह्मणः। कीदृशं ब्रह्म तद्वर्णितम्।विशदा विज्ञप्तिः यस्य सः शदृल् शातने विशेषेण शादिता विशदा परिष्कृता इत्यर्थः। विज्ञप्तिः ख्यातिः। तस्य ब्रह्मणः जीवत्वं जीवभावत्वं।

यदि पक्षान्तरबोधकः। स्वाभाविकं अकृत्रिमं स्यात् तर्हि तत् सकृत् एकवारमपि वह्नेः अग्नेः उष्णता तथा प्रकाशवत् विनाशं न गच्छेत् नष्टं न स्यात् इत्यर्थः।जीवस्य मृत्युः तु अनुभवसिद्धः।

अनुवाद - अतिशय विस्तृत व निर्मल अशी कीर्ति असलेल्या ब्रह्माचे जीवत्व जर स्वाभाविक मानले तर जसे अग्नीच्या ऊष्णतेचा व प्रकाशाचा स्वाभाविकतेमुळे नाश होत नाही हे गुण अग्नीबरोबर सदैव असतात व अग्नी असेपर्यन्त नष्ट होत नाहीत तसे या जीवास प्राप्त झालेले ब्रह्मत्वही नष्ट होणार नाही. जीवाचे ब्रह्मत्व मानणारा वादी पुन्हा जीवास ब्रह्मत्व कसे प्राप्त होते हे सांगण्यासाठी प्रमाण देतो.

यद्वदअयोरसविद्धं काञ्चनतां याति तद्वदेवासौ।

जीवः साधनशक्त्या परतां याति इति केचित् इच्छन्ति।।५८।।

अन्वयः - यद्वद् रसविद्धम् अयः कांचनतां याति तद्वदेव असौ जीवः साधनशक्त्या परतां याति इति केचित् इच्छन्ति।

व्याख्या- यद्वद् इति। यथा येन प्रकारेण रसेन विद्धं रसविद्धम्। वनस्पतीनां रसेन संस्कृतं अयः लोहं कांचनतां सुवर्णमयत्वं याति प्राप्नोति। तद्वदेव तेनैव प्रकारेण असौ जीवः। साधनं नित्यानित्यादि चत्वारि साधनानि। साधनानि एव शक्तिः साधनशक्तिः। तया साधनशक्त्या परतां ब्रह्मतां याति ब्रह्मत्वं प्राप्नोति इति केचन इच्छन्ति। एवमेव भवति इति तेषां विश्वासः।

अनुवाद -ज्याप्रमाणे धोत्रा इत्यादि वनस्पतींच्या रसाच्या प्रकियेनंतर लोखंडाचे सोन्यात रूपांतर होते (किमया[1]) तसेच साधनचतुष्टयाच्या अनुसरणाने जीव ही ब्रह्मावस्था मिळवतो असे काही लोक मानतात. असं व्हायला पाहिजे असे यांना खात्रीने वाटते.लोखंडाचे अग्नीच्या संगतीने प्रकाशमयत्व व दाहकत्व दृष्टांतरूपाने देण्याचा प्रघात प्राचीन काळापासून दिसतो.जसे उपाधीच्या म्हणजे संगतीच्या योगाने लोखंडात दाहकत्व दिसते तसेच लोखंडाच्या संगतीने अग्नीही साकार झाल्याचे दिसते.

उपाधिसंबंधवशात् परमात्मा ह्युपाधिधर्माननुभाति तद्गुणः।

---

[1] किमया—हलक्या धातूचे उच्च धातूत रूपांतरकरण्याची कल्पना मध्ययुगात आकमकांबरोवर भारतात आली असावी. पण यात सत्य कमी व बनवाबनवी जास्त असावी असे दिसते. लक्ष्मणशास्त्री सांस्कृतिक कोशा च्या आधाराने.

अयोविकारान् अविकारीवह्निवत् सदैकरूपोऽपि परः स्वभावात्।।विवेकचूडामणी १९१

प्रतिवादी पुन्हा जीव व ब्रह्म यांचे ऐक्य तात्पुरते असल्याचा मुद्दा मांडतात

तदिदं भवति न युक्तं गतवति तस्मिन् चिरेण रसवीर्ये।
प्रतिपद्यते प्रणांशं हैमो वर्णोप्ययः समारूढः।।५९।।

<u>अन्वयः</u> - तदिदं (भवतां कथनं) युक्तं न भवति (यतः) तस्मिन् रसवीर्ये गते चिरेण हैमो वर्णः समारूढः अयः अपि प्रणांशं प्रतिपद्यते।अयसः हेमवर्णः नष्टः भवति इत्यर्थः।

<u>व्याख्या</u> -तदिदमिति। इदं जीवब्रह्मणोः ऐक्यत्वदर्शकं कथनं युक्तं न भवति नोपपद्यते इति किन्तु एतन्नोपपद्यते। कस्मान्नोपपद्यते। तस्मिन् हैमवर्णसमारूढे अयसि। रसः च वीर्यः च रसवीर्ये।गते प्रकियाद्वारा आरोपित रसादयः यदा प्रभावहीनाः भवन्ति तदा चिरेण दीर्घकालेन अयसः हैमवर्णः प्रणांशं विनाशं प्रतिपद्यते लयं गच्छति इत्यर्थः।एवमेव जीवस्य ब्रह्मत्वं कालेन नष्टं भवतीति सूच्यते।

अनुवाद -जीवाचे व ब्रह्माचे ऐक्य जे तुम्ही लोहाच्या रसप्रकियेने होणा-या सुवर्णाच्या उदाहरणाने प्रतिपादले ते योग्य नाही कारण रसप्रकियेने लोहावर समारूढ झालेले सुवर्णमयत्व कालांतराने नष्ट होते असा अनुभव आहे व तसेच जीवाच्या बाबत घडत असते.

जीवत्वमपि तथेदं बहुविधसुखदुःखलक्षणोपेतम्।
गतमिव साधनशक्त्या प्रतिभात्येव प्रयाति न विनाशम्।।६०।।

अन्वयः - तथा इदं बहुविधसुखदुःखलक्षणोपेतं जीवत्वमपि साधनशक्त्या गतमिव प्रतिभात्येव न विनाशं प्रयाति।

व्याख्याः - तथेति। यथा पूर्वं अयसः दृष्टान्तेन स्थापितं। बहवः विधाः बहुविध। सुखं च दुःखं च सुखदुःखे। तयोः लक्षणं सुखदुःखलक्षणं। तेन सुखदुःखलक्षणेन उपेतं युक्तं बहुविधसुखदुखलक्षणोपेतं। जीवत्वं जीवभावः। अपि च साधनानि एव शक्तिः साधनशक्तिः। तया साधनशक्त्या गतमिव नष्टमिव

प्रतिभाति एव नाम भ्रमं जनयति वस्तुतः न विनाशं गच्छति। विविधैः साधनैरपि जीवस्य जीवत्वं न नश्यति स ब्रह्मत्वं न आप्नोति इति भावः।

अनुवाद - नाना प्रकारच्या सुखदुःखलक्षणांनी युक्त असे जीवत्व साधनेच्या बळाने लयाला गेले व ब्रह्मत्व प्राप्त झाले असे वाटते पण हे वाटणे भ्रमात्मक असते. जीवत्व नष्ट होत नाही.

तस्मात् स्वतो यदि स्यात् जीवः सततं स एव जीवः स्यात्।
एवं यदि परमात्मा परमात्मैवायमिति भवेद्युक्तम्। ।६१ । ।

अन्वयः -तस्मात् स्वतः यदि जीवः स्यात् सततं सः जीवः एव स्यात् एवं यदि परमात्मा (स्यात्) परमात्मैवायमिति भवेद्युक्तम्।

व्याख्या- तस्मादिति। तस्मात्कारणात् । पूर्वोक्तश्लोके यदुक्तं तेनाधारेण यदि स्वतः चेत् जीवः असुधारकः स्यात् । तर्हि स सततं अविरतं जीवः एव स्यात् जन्मजन्मनि। तथा साधनाभ्यासानंतरमपि तस्य परमात्मस्वरूपप्राप्तिः वक्तुं न शक्यते। एवमेव यदि कश्चिद् परमात्मा भवेत् तर्हि स सततं परमात्मा एव स्यात् तस्य परमात्मत्वं कदापि लयं न गच्छेत् इति कथनं योग्यमेव।

अनुवाद -त्यावरून म्हणजेच मागील आर्येत प्रतिपादल्याप्रमाणे जीवास साधनेच्यायोगाने मिळणारे ब्रह्मत्वही भ्रमरूप असल्यामुळे जीव हा कायम जीवच राहतो व परमात्मा कायम परमात्माच राहतो असे म्हणणे योग्य ठरेल.

भेदवादी पुन्हा एकदा जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याविषयी असहमती दर्शवतात

यदि वा परेण साम्यं जीवश्चेद्भजति साधनबलेन।
कालेन तदपि कियता नश्यत्येवेति निश्चितं सकलैः। ।६२। ।

अन्वयः -यदि जीवः साधनबलेन परेण साम्यं भजति चेत् कियता कालेन तदपि नश्यति एव इति निश्चितं सकलैः।

व्याख्या -यदीति। अत्र यदि शब्देन अनिश्चितता सूचिता। जीवः यदि साधनमेव बलं साधनबलं तेन साधनबलेन[1] साधनचतुष्टयाचरणेन परेण ईश्वरेण साम्यं  भजति प्राप्नोति। तर्हि कालेन कियता कालान्तरेण नाम अनिश्चितकालेन। तस्य यत् परेण साम्यं पूर्वमनुभूतं तत् नश्यति इति सकलैः विद्वद्भिः निश्चितं घोषितम् इत्यर्थः।

अनुवाद जर साधनेच्या सामर्थ्याने जीवाने ईस्वराशी समरसता मिळवली तर ती काही काळाने म्हणजेच नक्की माहीत नसलेल्या अवधीत नाहीशी होते व जीव पुन्हा जीवस्वरूपास प्राप्त होतो असे विद्वान लोकांनी निश्चित केले आहे. म्हणजेच अगोदरच घोषित केले आहे.

तस्मात् परं स्वकीयं मोहं मोहात्मकं संसारम्।

स्वज्ञानेन जहित्वा पूर्णः स्वयमेव शिष्यते नान्यत्।।६३।।

अन्वयः - तस्मात् स्वकीयं मोहं मोहात्मकं परं संसारम् स्वज्ञानेन जहित्वा स्वयमेव पूर्णः शिष्यते नान्यत्।

व्याख्या - तस्मादिति।तस्मात् शब्देन विद्वद्भिः यत् गतपद्ये घोषितं तमधिकृत्य विरोधः प्रदर्श्यते अत्र।परं स्वकीयं तीव्रतया स्वस्य इदम् इति।मम आत्मन इति भावःयमधिकृत्य जायते तत्।मोहः चित्तवैचित्त्यं।मोहात्मकं मोहेन पूर्णम्।संसारं संसरति जीवः जन्ममृत्युचके यस्मात् स संसारः। ममेदमिति भावेन यस्यविषये विकाराः जायन्ते ।तस्माच्च जीवः जन्ममृत्युचक्रे पुनः पुनः पतति। तं संसारं भौतिक पदार्थान्। स्वस्य ज्ञानं स्वज्ञानम् आत्मज्ञानं।तेन स्वज्ञानेन जहित्वा त्यक्त्वा। स्वयमेव नाम उपाधिरहितः पूर्णः ब्रह्मरूपः शिष्यते नान्यत्।

अनुवाद - जीव हा कायम जीवच राहतो या पूर्वपक्षाने मांडलेल्या मागील आर्येतील मताचे खंडन या ठिकाणी केले जात आहे.माझे माझे म्हणून जो संसार म्हणजे भोवतालच्या जगातील पदार्थाविषयी जी आसक्ती जीवाने जोपासली असते व जी मोहरूप, सर्वांना मोहात पाडणारी असते तिचा ज्ञानोदय झाल्याने त्याग करून शेवटीपरिपूर्ण असा जीवच फक्त शिल्लक राहतो अन्य काहीच नाही.

---

[1] साधनबलेन—नित्यानित्यविवेक, इहामुत्रफलविराग,शमादिसंपत् व मुमुक्षुत्व या चार साधनांना इथे लेखकाने बल असे म्हटले आहे. साधन हे साधकाहून भिन्न असते व बल हे साधकाचे असते असा व्यवहारातील अनुभव पण इथे ही ४ साधनेच बलरूप मानली आहेत कारण या साधनांचे आचरणच बल आहे. यांचे प्रामाणिक आचरण करणारा निश्चितच प्रगति साधतो असा अनुभव आहे.

सत्यज्ञानानन्दं प्रकृतेः परमात्मरूपमद्वैतम्।
अवबोधयन्ति निखिलाः श्रुतयः स्मृतिभिः समं समस्ताभिः।।६४।।

अन्वयः - निखिलाः श्रुतयः समस्ताभिः स्मृतिभिः समं प्रकृतेः सत्यज्ञानानंदम् अद्वैतं परमात्मरूपम् अवबोधयन्ति।

व्याख्या -निखिला इति। निर्गतं खिलं निखिलं समस्तं।श्रुतयः वेदवचनानि सर्वेवेदमन्त्रा इत्यर्थः।समस्ताभिः सकलैः स्मृतिवाक्यै[1]ः समं सह। प्रकृतेः प्रकृतितः स्वभावतः यत् सत्यज्ञानानंदं सत्यं च ज्ञानं च आनंदं सत्यज्ञानानंदमयम् अस्ति तत् । द्विधा इतं द्वीतं तस्य भावः द्वैतं न द्वैतं अद्वैतं द्वैतभावरहितं परमः च असौ आत्मा परमात्मा तस्य रूपं परमात्मरूपं अवबोधयन्ति निरूपयन्ति।

अनुवाद - जीव हा कायम जीवच राहतो या पूर्वपक्षाने मांडलेल्या मागील आर्येतील मताचे खंडन या ठिकाणी केले जात आहे.सगळे वेदमंत्र सर्व स्मृतिवाक्यांसह प्रकृतीने म्हणजे स्वभावतःच सत्यज्ञानानंदमय असलेले व एकमात्र म्हणजेच अद्वैत असे जे परमात्मस्वरूप त्याचा बोध करून देतात .

एकत्वबोधकानां निखिलानां निगमवाक्यजालानाम्।
वाक्यान्तराणि सकलान्यभिधीयन्तेऽस्य शेषभूतानि।।६५।।

अन्वयः - निखिलानां एकत्वबोधकानां निगमवाक्यजालानां सकलानि वाक्यांतराणि अस्य शेषभूतानि अभिधीयन्ते।

ॐकारसारसोल्लसदात्मसुखामोदमत्तभृंगोऽहम्।।११४।।

अन्वयः - अहम् ओषधीनाम् ओजः ।अहम् ओतप्रोतायमानभुवनः।ॐकार सारः अहम्।सोल्लसद् आत्मसुखामोदमत्तः भृङ्गः अहम्।

व्याख्या -अहमिति।अहं ज्ञानानुभूत्या प्रसन्नः।ओषधीनाम् ओजः बलं रोगनिवारकशक्ति अस्मि।ओतः च प्रोतः च ओतप्रोतः ओतप्रोतायमानं।भवति अत्र इति भुवनम्।सर्वथा परिपूर्ण भुवनं अस्मि नाम सर्वार्थेन भुवनं व्याप्य तिष्ठामि।ॐ कारस्य सारम् ओंकारसारम्। अर्थात् ॐ शब्देन निर्दिश्यमाणं ब्रह्म

[1] वाक्यम् ः आकाङ्क्षायोग्यतासन्निधिमत्पदसमुदायः।आकांक्षा योग्यता व सन्निधि यांनी युक्त अशा पदांच्या समूहास वाक्य असे म्हणतात.

अस्मि।उल्लासेन यथा स्यात् तथा सोल्लसत्। सदा सर्वदा आत्मनः आत्मविषयकं यत् सुखं आमोदः च तस्यानुभवेन मत्तः अतीव आनंदितः भृङ्गः भ्रमरः अहम्।

अनुवाद -मीच औषधींमधील तेज म्हणजेच रोग नष्ट करणारी शक्ती आहे.मीच जगताच्या प्रत्येक कणात व्यापून राहिलो आहे.ॐ कार साररूपाने ज्या ब्रह्मतत्वाचा बोध करवतो ते ब्रह्म मी आहे.आत्मसुखाच्या अनुभवाने उत्पन्न होणा या सुगंधाने उन्मत्त झालेला एखादा भुंगाच मी आहे.

औ

औषधमहम् अशुभानाम् औपाधिकभेदजालरहितोऽहम्।

औदार्यातिशयोऽहं विविधचतुर्वर्गवितरणपरोऽहम्।११५।।

अन्वयः -अशुभानाम् औषधम्[1] अहमस्मि।अहम् औपाधिकभेदजालरहितः अस्मि।अहम् औदा- र्या तिशियः अस्मि।अहं विविधचतुर्वगवितरणपरः अस्मि।

व्याख्या -न शुभं अशुभं।तेषाम् अशुभानाम् अनिष्टानाम् अवांछितप्रसंगानाम् औषधं नाम निवारकोऽहम्।उपाधिजन्यः औपाधिकः। तस्मात् जातं भेदजालं भेदोत्पादकं जालं।अनेके भेदाः ते नास्ति अस्मिन्निति भेदजालरहितः अहम् अस्मि।उदारतायाः उद्+आ+ रा दाने उदारः तस्मात् उदारता तस्यभावस्त्वतलौ औदार्यं तस्य औदार्यस्य अतिशयः औदार्यातिशयः दानशीलोऽहम्।विविधानां चतुर्णा ब्राह्मणादि अथवा अण्डजादि वर्गाणां वितरणं नाम सृजनं विविधचतुर्वर्गवितरणं तत्पर अस्मि एतान् सर्वान् सृजामि इत्यर्थः।

अनुवाद -मी अशुभांचे औषध आहे म्हणजेच जसे औषधांनी रोगांचे निवारण होते तसेच ब्रह्मरूप अशा माझे स्मरण सर्व अनिष्टांचे निवारण करते.स्त्री-पुरुष, विद्वान-मूढ, सुन्दर- कुरूप इत्यादि उपाधींमुळे उत्पन्न होणा या अनेक भेदभावांच्या पलीकडे आहे.अतीशय उदार तसेच सर्वप्रकारची सृष्टी उत्पन्न करणारा मीच आहे.

[1] अपुष्पाः फलवन्तो ये ते वन्स्पतयः स्मृताः।पुष्पिणः फालिनश्चैव वृक्षास्तूभयतः स्मृताः।।मनुस्मृतिः१.४७

अं

अंङ्कुशमहमखिलानाम् अहंतयामत्तवारणेन्द्राणाम्।

अंबरमिव विमलोऽहं शंबररिपुजातविकृतिरहितोऽहम्। ।११६। ।

अन्वयः - अहंतया मत्तानां अखिलानां वारणेन्द्राणां अहम् अंकुशमिव (अस्मि)।अम्बरमिव विमलोऽहम्।शम्बररिपुजात विकृतिरहितोऽहम्।

व्याख्या -अहंतयेति।अहंता कर्तृत्वभोक्तृत्वादिभावयुक्तता। तया अहंतया मत्तः अहमेव श्रेष्ठः इतिभावयुक्तः तेषाम् अखिलानां सर्वेषां वारणेन्द्राणां गजेन्द्राणाम् अंकुशमिव नियंत्रकमिव अस्मि।अम्बरमिव आकाशमिव।विगतः मलः यस्मात् स विमलः दोषरहितः अस्मि।शंबरस्य रिपुः शम्बररिपुः मदनः।तस्मात् शम्बररिपोः जातः शम्बररिपुजातः विकृतिः दोषः कामभावना तेन रहितः अयुक्तः अस्मि।कामादयाः विकाराः मां न पीडयन्ति इति भावः।

अनुवाद -अहंकाराने माजलेल्या समग्र गजेंद्रांचा म्हणजेच उन्मत्त पुर षांच्या साठी मी नित्यानित्यवस्तुविवेकाच्या बळाने अंकुशाप्रमाणे आहे.आकाश जसे डागरहित निरभ्र असते तसा मी विमल आहे.शंबराचा जो शत्रु मदन त्याच्यामुळे उत्पन्न होणा-या कामविकारापासून मी मुक्त आहे.[1]

आ

आत्मविकल्पमतीनामस्खलदुपदेशगम्यमानोऽहम्।

अस्थिरसुखविमुखोऽहं सुस्थिरसुखबोधसम्पदुपचितोऽहम्। ।११७। ।

अन्वयः -अहम् आत्मविकल्पमतीनाम् अस्खलद् उपदेशगम्यमानः (अस्मि)। अस्थिरसुखविमुखोऽहम्। सुस्थिरसुखबोध सम्पदुपचितोऽहम्।

व्याख्या -अहमिति।बोधपूर्णचित्तं यस्य सः। विकल्पो नाम भेदः।आत्मनः स्वरूपविषये विभिन्नानां भेदानां सम्यक् चिन्तने येषां मतिः ते आत्मविकल्पमतयः।तेषां आत्मविकल्पमतीनाम् न स्खलद् अस्खलद् सुस्थिरः।यो उपदेशः तेन उपदेशेन गम्यमानः ज्ञायमान अस्मि।न स्थिरम् अस्थिर। अस्थिरं च असौ सुखं

[1] शंबरासुर नावाच्या दैत्याचे कामदेवाशी शत्रुत्व होते व कामदेवाने कृष्णपुत्र प्रद्युम्नाच्या अवतारात याचा वध केला अशी आख्यायिका आहे.

अस्थिरसुखं। तस्मात् विमुखः अस्थिरसुखविमुखः। नाम तेषां सुखानां क्षणभङ्गुरता ज्ञात्वा तेभ्यः पराङ्गमुखोऽहम्। सुष्ठु स्थिरं सुस्थिरं। तस्मात् सुस्थिरसुखात् यः बोधः स सुस्थिरसुखबोधः। स सुस्थिरसुखबोध एव सम्पद् तेन उपचितः परिपूर्णोऽहम्।

अनुवाद -आत्मचिंतनात ज्यांची बुद्धी रमली आहे अशा साधकांना जे ज्ञान गुरुकडून स्थिर अशा उपदेशद्वारा मिळते ते मीच आहे. अस्थिर नाशिवंत सुखांकडे मी नित्यानित्यविवेक व इहामुत्रफलविराग यांच्या अभ्यासाने पाठ फिरविली आहे. सुस्थिरसुखबोध हीच संपत्ती. अशा संपत्तीने मी परिपूर्ण आहे.

क

करुणारसभरितोऽहं कवलितकमलासनादिलोकोऽहम्।

कलुषहरवीक्षणोऽहं कल्मषसुकृतोपलेशरहितोऽहम्।।११८।।

अन्वयः - करुणारसभरितोहं। खवलितकमलासनादिलोकोऽहं। कलुषह्। रवीक्षणोहम्।

कल्मषसुकृतोपलेशरहितोऽहम्।

व्याख्या –करुणारसेति। करुणा कृ+उनन् करोति मनः आनुकुल्याय करुणः टाप् करुणा। करुणायाः रसः करुणारसः अनुकम्पारसः। तेन करुणारसेन भरितः परिपूर्णोऽस्मि। कवलित ग्रस्तः व्याप्तः। कमलमेव आसनं यस्य सः कमलासनः ब्रह्मा। ब्रह्मा एव आदि येषां ते त्रिदेवाः। तेषां लोकाः कमलासनादिलोकाः। तान् लोकान् व्याप्य तिष्ठामि इत्यर्थः। कलुषं पापं हन्ति इति कलुषहः अहम्। रवि इक्षणोऽहम् सूर्य इव सर्वसाक्षी। कल्मषं च सुकृतं च कल्मषसुकृते तयोः कल्मषसुकृतयोः उपलेषः अल्पांशः कल्मषसुकृतोपलेषः तेन रहितः शून्यः अहम्। यद्यपि सर्व पश्यामि तथापि केनापिलिप्तः न भवामि इति एषः विशेषः ब्रह्मभावं दर्शयति।

अनुवाद -मी कर णेच्या भावाने परिपूर्ण आहे. अकारण कर णा हा ईश्वराचा गुण आहे. कमलासनाने म्हणजेच ब्रह्मदेवाने व अन्य दोन देवांनी निर्मिलेल्या सर्वलोकांना व्यापून राहिलो आहे. मी पापनाशक आहे. सूर्याप्रमाणे सर्वकाही पाहात असूनही पापपुण्याचा किंचितही लेप मला लागत नाही.

आतापर्यंत ब्रह्माच्या सकारात्मक विशेषणांच्या स्वरूपात स्वतःचे वर्णन केले आता नकारात्मक विशेषणांचा वापर करून स्वतःची स्थिती सांगतात.

ख

खगानामगोचरोऽहं खातीतोऽहं खपुष्पभवनोऽहम्।

गन्तव्योऽहं अनीहैर्गत्यागतिरहितपूर्णबोधोऽहम्। ।११९। ।

अन्वयः -अहं खगानाम् अगोचरः (अस्मि)।अहं खातीतः (अस्मि)।अहं खपुष्पभवनः (अस्मि)।अनीहैः गन्तव्योऽहम्।अहं गत्यागतिरहितः पूर्णबोधः (अस्मि)।

व्याख्या - अहमिति।ज्ञानभूमिकायामारूढः अहं।खे गच्छति इति खगः।तेषां खगानां कृते अपि अगोचरः।उत्तुङ्गाकाशे विहारकारणात् खगाः सर्वं द्रष्टुं प्रभवन्ति तथापि अरूपत्वात् ते मां न पश्यन्ति इति अर्थः।खस्य आकाशस्य अतीतः खातीतः।मम काऽपि सीमा नास्ति।खस्य पुष्पं खपुष्पं तस्य खपुष्पस्य भवनः खपुष्पभवनः नाम काऽपि मिथ्या कल्पना अर्थात् स्थानरहितोऽहम।ईहा लिप्सा न ईहा विद्यते येषां ते अनीहाः। तैः गन्तव्योऽहं अर्थात् गतिविरहितोऽहम्।एवं प्रकारेण गतिः च अगतिः च गत्यागती। तया रहितः गत्यागतिरहितः सर्वव्यापकः। तथा पूर्णः च असौ बोधः पूर्णबोधः।सम्यग् ज्ञानवान् अहमस्मि।

अनुवाद - आकाशविहारी पक्ष्यांनाही मी रूपरहित असल्यामुळे दिसू शकत नाही.मी आकाशाच्या पलीकडचा म्हणजे अमर्याद आहे.माझ्या स्वरूपाची कल्पना करणे आकाशपुष्पाची कल्पना करण्यासारखे आहे.ज्यांना कोणतीच इच्छा नाही अशांचे जे गन्तव्य म्हणजे काहीच नाही ते माझे स्वरूप आहे.जाणेयेणे नसलेला म्हणजे सर्वव्यापक व पूर्णबोध असा मी आहे.

घ

घनतरमोहतमिस्त्रकरपरिध्वंसभानुनिकरगेहम्[1]।

घटिकावासररजनीसंवत्सरयुगकल्पकालभेदोऽहम्। ।१२०। ।

अन्वयः - घनतरमोहतमिस्त्रकर-परिध्वंसभानुनिकरगेहं(गेहोऽहम्) घटिकावासररजनी संवत्सरयुगकल्प-कालभेदोऽहम्।

[1] भानुनिकरगेहं हा शब्द खरा भानुनिकरगेहोऽहम् असा असावयास हवा।पाठोपाठ येणारे एकच व्यंजन लेखनिकाकडून गाळल्या जाण्याच्या सर्वसामान्य दोषाचे म्हणजे Haplology चे हे उदाहरण आहे.येथे गेह शब्दातील ह व अवग्रहानंतर येणारा अहं मधील ह या दोहोंपैकी एक ह लेखनिकाने गाळलेला आहे.

व्याख्या - घनतरेति।घनः निविडः द्विवचनविभज्योपपदे तरवीयसुनौ पा ५.३.५७ इति सूत्रेण अधिकघनः।मोहरूप तमिस्त्रः तमः तस्य घनतरमोहतमिस्त्रकरः।तस्य परिध्वंसः येन भवति स घनतरमोहतमिस्त्रकरपरिध्वंसभानुः।तस्य ज्ञानरूपसूर्यस्य निकरः उपचयः। घनतरमोहतमिस्त्रकरपरिध्वंसभानुनिकरस्य गेहम् निवासोऽहम्।घटिका प्रायेण अर्धहोरामात्रकालः।वासरः दिवसः।रजनी निशा।संवत्सरः हायनं। युगं पञ्चवर्षाणां समुहः।कल्पो नाम मनुष्यानां ४३२000000 वर्षाणि।इत्येवं यः कालभेदः क्रियते स अहमेवास्मि।

अनुवाद -अतिशयदाट अशा मोहरूप अंधाराचा नाश करणारा ज्ञानसूर्य मी आहे.घटिका, दिवस, रात्र, संवत्सर, युग, कल्प अशा प्रकारे अखंडकालाचे वेगवेगळे अवयव मीच आहे.

च

चरदचरात्मकोऽहं चतुरमतिश्लाघ्यमानचरितोऽहम्।

चपलजनदुर्गमोऽहं चञ्चलभवजलधिपारदेशोऽहम्।।१२१।।

अन्वयः - चरदचरात्मकोऽहं चतुरमतिश्लाघ्यमानचरितोऽहम् अहं चपलजनदुर्गमः (अस्मि)।अहं चञ्चलभवजलधिपारदेशः (अस्मि)।

व्याख्या - चरदचरात्मकेति। चरत् च अचरत् च चरदचरदे। चरदचरत्स्वरूपः चरदचरात्मकः अहं अर्थात् चराणां तथा अचराणां रूपेण अहमेव तिष्ठामि।चतुरा मतिः येषां ते चतुरमतयः। तैः चतुरमतिभिः श्लाघ्यमानं प्रशंसनीयं यस्य चरितं सः चतुरमतिश्लाघ्यमानचरितः। अहमपि तथा एव अस्मि।चपलः च असौ जनः चपलजनः।चञ्चलमतिः इत्यर्थः।तादृशाणां जनानां कृते दुःखेन गम्यते इति दुर्ग मः।कष्टसाध्यः अस्मि।चञ्चलः च असौ भवजलधि चञ्चलभवजलधिः।तस्य चञ्चलजलधेः पारदेशः जलधिम् उल्लङ्घ्य वर्तमानः देशः चञ्चलभवजलधिपारदेशः अहमस्मि।भव एव सागरः तम् भवसागरमुल्लङ्घ्य तिष्ठामि न मे किमपि भयं भवसागरात् इति भावः।

<u>अनुवाद -</u> मी चराचरपदार्थांच्या रूपाने नटलेला आहे.बुध्दिमान मनुष्यांनी कौतुक करावे असे माझे आचरण आहे.चंचलबुद्धी लोकांना कष्टानेच माझे ज्ञान होउ शकते.चंचल अशा भवसमुद्रास ओलांडून

पलीकडे असणा या शाश्वत प्रदेशात मी राहतो. सर्वसामान्य लोकांना वाटणारी भवसागराची भीती मला वाटत नाही.

छ

छंदसिन्धुनिगूढज्ञानसुखाह्लाद मोदमानोऽहम्।

छलपदविहितमतीनां छन्नोऽहं शान्तिमार्गगम्योऽहम्।।१२२।।

अन्वयः - छंदः सिन्धुनिगूढज्ञानसुखाह्लादमोदमानोऽहम्। अहं छलपदविहितमतीनां छन्न: (अस्मि)। अहं शान्तिमार्गगम्यः (अस्मि)।

व्याख्या- छन्देति। छन्दः[1] पद्यमयरचना। छन्दः एव सिन्धुः छन्दःसिन्धुः। अथवा छन्दस् नाम वेदः तस्मिन् निगूढं गुप्तं ज्ञानं छंदःसिन्धुनिगूढज्ञानं। तेन यत् सुखम् च आह्लादः च छंदः सिन्धुनिगूढज्ञानसुखाह्लादः। तेन मोदमानः हृष्टोऽहम्। छलः कपटं छलपदे विहिता मतिः येषां छलपदविहितमतयः। तेषां छलपदविहितमतीनां कृते अहं छन्नः गुप्तः छादितः अस्मि। अहं शान्तिमार्गेण गम्यः ज्ञेयः अस्मि।

अनुवाद - वेदांमधील छंदबद्ध[2] मंत्रांमध्ये जे ज्ञान व उच्चकोटीचा आनंद लपलेला आहे त्या आनंदाने मी प्रफुल्लित होणारा आहे. कपटबुद्धीच्या लोकांसाठी मी अप्राप्य अदृश्य आहे. शांतिमार्गाने जाणा या साधकांसाठी मी सुलभ आहे.

ज

जलजासनादिगोचरपञ्चमहाभूतमूलभूतोऽहम्।

जगदानंदकरोऽहं जन्मजरारोगमरणरहितोऽहम्।।१२३।।

अन्वयः - अहं जलजासनादिगोचरपंचमहाभूतमूलभूत: (अस्मि)। अहं जगदानन्दकरः (अस्मि)। अहं जन्मजरारोगमरणरहितोऽस्मि।

---

[1] छंद शब्दाने पद्यमयरचना ह्या अर्थाप्रमाणेच वेद असाही अर्थ घेतला जाऊ शकतो. वेदातील जे गुप्त ज्ञान ते कळल्यामुळे होणारे सुख व आनंद यांनी मी प्रसन्न आहे.

[2] छंद – काव्यातले छंद प्रसिद्ध आहेत. संस्कृत साहित्यात अनुष्टुप, त्रिष्टुप, जगति, बृहति, गायत्री, पङ्क्ति असे काही छंद प्राधान्याने वापरलेले दिसतात. पण पद्यरचनेचे विभिन्न प्रकार एवढेच छंद या शब्दाचे स्थान नसून छंद हे वेदांच्या सहा अंगापैकी एक मानले गेले आहे व वेदांचे यथार्थ ज्ञान मिळवण्यासाठी इतर पाच अंगांबरोबर छंदशास्त्राचेही अध्ययन महत्वाचे मानले जात असे.

व्याख्या - अहमिति।जले जायते इति जलजः।जलजमेव आसनं यस्य सः जलजासनः ब्रह्मा। स एव आदि येषां ते जलजसनादयः त्रिदेवाः इत्यर्थः।तेषां त्रिदेवानां गोचरः इन्द्रियगम्यः जलजासनादिगोचर। नाम तेषां स्वाधीनानां पञ्चमहाभूतानां मूलभूतः तेषां महाभूतानाम् उपादानमस्मि इत्यर्थः।अहं जगतः कृते आनन्दं करोमि आनन्दमुत्पादयामि। ये मां यथार्थं जानन्ति ते आनन्दे निमज्जन्ति इति भावः। जन्म शरीरधारणं जरा वृद्धावस्था रोगः आमयत्वं मरणं शरीरनाशः एतैः विकारैः रहितोऽहम्।षड्भावातीतोऽहम्।

अनुवाद - ब्रह्मादि देवांचे नियंत्रण असलेल्या पंच महाभूताांचे मूलभूत म्हणजेच उपादानकारण मी आहे.मला यथार्थ जाणणा यांसाठी आनंदकर आहे.जन्मादि विकार मला बाधत नाहीत.

झ

हुंकृति-हुंकृति-सिञ्जित-बृंहितमुखविविधनादभेदोऽहम्।

झटितिघटितात्मवेदनदीपपरिस्फुरितहृदयभवनोऽहम्।१२४।।

अन्वयः - अहं हुंकृति हुंकृति सिञ्जित बृंहितमुखविविधनादभेदः अस्मि। झटिति घटितात्मवेदनदीपपरिस्फुरितहृदयभवनोऽहम्।

व्याख्या - अहमिति।आत्मानुभूतिः येन प्राप्ता स अहं।हुंकार[1] एकः मन्त्रवर्णः।तस्य पुनःपुनः उच्चारेण भूषणानां ध्वनिरिव मधुरध्वनिः जायते स एव शिञ्जितध्वनिः। बृंहितमुख प्रसारितमुख।मुखं प्रसार्य ये विविधाः नादाः विविधनादाः निर्मियन्ते तेषां भेदाः विविधनादभेदाः अहमेवास्मि।झटिति वेगेन घटितम् आत्मवेदनं तदेव दीपः।झटिति- घटितात्मवेदनदीप तेन परिस्फुरित प्रकाशित। हृदयमेव भवनं हृदयभवनं।परिस्फुरितहृदयभवनं यस्य स परिस्फुरितहृदयभवनः अहमेवास्मि।

अनुवाद -हुंकाराच्या पुन्हा पुन्हा होणा-या उच्चाराने उत्पन्न होणारा व दागिन्यांच्या आवाजासारख्या मंजुळ ध्वनीप्रमाणे असणारा आणि मुखविवर पूर्ण उघडून उत्पन्न होणा-या वेगवेगळ्या नादा[2]प्रमाणे माझे

---

[1] हुंकाराचा छांदोग्योपनिषदात १.१३.३ मध्ये असा संदर्भ मिळतो अनिरूक्तस्त्रयोदश स्तोभःसंचरो हुंकार ः हुं हे प्रब्रह्माचे निदर्शक आहे.

[2] नाद वरिवस्यारहस्य नावाच्या गंथात नादाची व्याख्या अशी दिली आहे बिंदु अर्धचद्रिका रोधिनी नाद नादांत शक्ति व्यापिका उन्मनी आणि समनी या ९ नादांना एकत्रपणे नाद अशी संज्ञा दिली आहे.

अन्य एका मतानुसार कुंडलिनी जागरणाचे लक्षण म्हणजे नादाचे स्फुरण.

स्वरूप आहे. माझ्या अंतरंगात अचानक प्रकाशित झालेल्या आत्मज्ञानरूप दीपाने हृदयभुवन झगमगून गेलेला मी आहे. (गणादिं पूर्वमुच्चार्य इत्यारभ्य नादः सन्धानं ।)

ज्ञ

ज्ञानमहं ज्ञेयमहं ज्ञाताहं ज्ञानसाधनगणोऽहम्।

ज्ञानाज्ञानविनाकृतमकृतकमस्तित्वमात्रमेवाहम्। ।१२५। ।

अन्वयः - ज्ञानमहं ज्ञेयमहं ज्ञाताहं ज्ञानसाधनगणोऽहं ज्ञानाज्ञानविनाकृतम् अकृतकम् अस्तित्वमात्रम् एवाहम्।

व्याख्या -ज्ञानमहमिति। ज्ञानम् अर्थप्रकाशः। अत्र तु आत्मस्वरूपज्ञानमेव ज्ञानसंज्ञामर्हति। ज्ञेयं ज्ञानविषयम् अहमेव। ज्ञाता ज्ञानश्रयः यः जानाति स अपि अहमेव। ज्ञानप्रक्रियायां विभिन्नानि साधनानि सहायभूतानि भवन्ति तेषां गणः समुहः ज्ञानसाधनगणः अहमेव भवामि। ज्ञानं च अज्ञानं च ज्ञानाज्ञाने। ते ज्ञानाज्ञाने विना कृतं तयोः उपेक्षां कृत्वा। न कृतकम् अकृतकम् स्वाभाविकम् इत्यर्थः। अस्तित्वमात्रम् रूपगुणधर्मरहितं केवलास्तित्वमात्रमेव अहमस्मि।

अनुवाद - ज्ञानक्रिया मी आहे,ज्ञेयवस्तु म्हणजे ब्रह्म मीच आहे, जाणणाराही मीच आहे तसेच ज्ञानप्राप्तीची जी साधने तीही मीच आहे. ज्ञानाज्ञानाच्या पलीकडील अकृत्रिम व स्वाभाविक असे जे केवल अस्तित्व हे माझे स्वरूप आहे. त्रिपुटीचा[1] निरास केला आहे.

---

नादः- संवृते गलविवरे यत्कण्ठनिनादकरणम्. सर्वलक्षणसंग्रहः १५०७
योगशास्त्रानुसार नाद म्हणजे चंद्रकोर व बिंदु अशा चिन्हाने दर्शवला जाणारा ध्वनी. (ललीता सहस्त्रनाम हिंदी भाष्य)

[1] त्रिपुटि-- त्रयाणां पदार्थानां ज्ञातृज्ञानज्ञेयरूपाणां समाहारः। मी ज्ञाता ज्ञान व ज्ञेय या तीहीच्या पलीकडचा सर्वव्यापक आहे हे सुचविले आहे.

त

तत्त्वातीतपदोऽहं तदन्तरेस्मीति भावरहितोऽहम्।

तामसदुरधिगमोऽहं तत्त्वंपदबोधबोध्यहृदयोऽहम्। ।१२६। ।

अन्वयः -अहं तत्त्वातीतपदः अस्मि। तदन्तरेस्मि इति भावरहितोऽहम्। तामसदुरधिगमोहम्। तत् त्वं (इत्येतयोः) पदयोः बोधः पदबोधः (तेन) बोध्यहृदयोऽहम्।

व्याख्या - अहमिति। ज्ञानवान् इत्यर्थः तत्वात् अतीतः तत्त्वातीतः। तत्वातीतं पदं स्थानं तत्र तिष्ठामि अतः तत्त्वातीतपदः अस्मि। तत्त्वज्ञानेन यस्य पदस्य बोधः भवति तस्मादपि परः अहम्। अहं तत् परमं तत्वम् अस्मि यत् अन्तरे अन्तर्भागे अस्ति। अतः सांसारिकवस्तुभिः अचलायमानं मम स्वरूपम् इति भावरहितोऽहम्। तामसाः तमोगुणयुक्ताः ये तेषां कृते अहं दुरधिगमः दुःखेन अधिगम्यः। ते माम् तत्वतः ज्ञातुं न प्रभवति। तत् च त्वं च इत्येतयोः पदयोः बोधः पदबोधः तेन पदबोधेन बोधितं हृदयं यस्य सः पदबोधबोध्यहृदयोहं।

अनुवाद सर्व तत्वांच्या पालीकडचा आहे. आत हृदयगुहेत राहणारे तत्व आहे असे जे उपनिषदे सांगतात तसा मी आहे. तमोगुण युक्तांना मी कष्टाने प्राप्त होतो. तत् त्वम असि या पदांच्या बोधाने हृदय परिपूर्ण झालेला मी आहे.

द

दैवतदैत्यनिशाचरमानवतीर्यञ्-महीधरादिरहम्।

देहेन्द्रियरहितोऽहं दक्षिणपूर्वादिदिग्विभागोऽहम्। ।१२७। ।

अन्वयः अहं दैवतदैत्यनिशाचरमानवतीर्यञ्-महीधरादि (अस्मि)। अहं देहेन्द्रियादिरहितोऽस्मि।

अहं दक्षिणपूर्वादि दिग्विभागः अस्मि।

व्याख्या -अहमिति। आत्मानुभूत्या परिपूर्णः। दैवत देवताविशेषः। दैत्यः दितेः अपत्यः पुमान् राक्षसः। निशायां चरतीति निशाचरः। भूतप्रेतादयः। मनोः अपत्यं मानवः मनुष्याः। तिर्यक् कुटिलम् अञ्चतीति पश्वादयाः अहमेव अस्मि। महीं धारयतीति महीधरः। पृथिवि शेषनागेन शिरसि धृता इति पुराणेषु पठ्यते अत्र महीधरादि शब्देन सर्वेषां विशेषसामर्थ्यवतां ग्रहणं भवति। एतानि ममैव रूपाणि। एवं

सत्यपि देहं च इद्रियं च देहेन्द्रिये।ताभ्यां देहेन्द्रियाभ्यां रहितोऽहम्।दक्षिणपूर्वादि दिङ्गनामानि सर्वासां दिशानाम् स्वरूपेन अहमेव तिष्ठामि।

अनुवाद -मागील आर्येत नकारात्मकविशेषणांच्या सहाय्याने साधकाने आपली सिद्धावस्था वर्णिली.आता वेगळ्या पद्धतीने वर्णन करतात.दैवत म्हणजे दिव्यशक्तियुक्त अंतरिक्षातील शक्तींपासून ते पाताळात असणा या शेषनागापर्यंत सर्वकाही मीच आहे.असे असूनही देहेंद्रियरहीत आहे असे म्हणून आपले अवयवराहित्य दाखविले आहे.दक्षिणादि दिशांच्या स्वरूपात मीच आहे असे म्हणून सर्वव्यापकत्व दाखविले आहे.अशा रीतीने सर्वव्यापकत्व अवयवरहितत्व ही जी ब्रह्माची लक्षणे आहेत ती माझ्याठीकाणीही आहेत हे दाखवून दिले आहे.

ध

धर्माधर्ममयोहं धर्माधर्मादिबोधरहितोहं।

धार्मिकजनसुलभोहं धन्योहं धातुरादिभूतोहं।।१२८।।

अन्वयः -धर्माधर्ममयोऽहं धर्माधर्मादिबोधरहितोऽहम् धार्मिकजनसुलभोऽहं धन्योऽहं धातुरादिभूतोऽहम्।

व्याख्या - धर्मेति।धर्मः[1] च अधर्मः च धर्माधर्मौ।ध्रियते लोको अनेन इति धर्मः।धर्मविरुद्धःअधर्मः। शास्त्रविहितानुचरणं धर्मः। तथा शास्त्रविरुद्धाचरणम् अधर्मः इति उच्यते।अहं धर्माधर्ममयः उभावपि मयि स्तः इत्यर्थः। धर्मः च अधर्मः च धर्माधर्मौ आदि शब्देन वर्णाश्रमानां ग्रहणं भवति। एतेषां यः बोधः स धर्माधर्मादिबोधः।तेन रहितः धर्माधर्मादिबोधात् परः अस्मि। धार्मिकः च असौ जनः धार्मिकजनः।यः निष्ठापूर्वकधर्माचरणं करोति सः धार्मिकः तस्य कृते अहं सुलभः।अहं धन्यः[2] आत्मज्ञानानुभूतिकारणात् भाग्यवान् अस्मि।धातूनाम् आदिभूतः धातुरादिभूतः पृथिव्यादिपञ्चमहाभूतानाम् आदिभूतः उत्पन्नः अस्मि।अहमेव जगतः उपादानकारणम् इत्यर्थः।

अनुवाद - मी धर्माधर्म कल्पनांना व्यापून राहिलो आहे परंतु धर्माधर्मादिबोध मला होत नाहीत म्हणजेच मी धर्मधर्माच्या पलिकडे आहे.निष्ठेने धर्माचरणकरणा-या साधकांना माझी प्राप्ती सहज

[1] धर्मः धरति लोकान् इति। सर्वलक्षणसंग्रहः१४७८

[2] धन्यः धनगणं लब्धा ४.४.८४ धन्यः अस्मि इति वादः धन्यवादः।धनगणशब्दाभ्यां द्वितीयसमर्थाभ्यां लब्धा इत्येतस्मिन्नर्थे यत् प्रत्ययो भवति।

होते.आत्मानुभूती आल्याने मी स्वतःला धन्य भाग्यशाली समजतो.सर्व भूतांचे आदिभूत असा मी जगताचे उपादान आहे.

न

नामादिविरहितोऽहं नरकस्वर्गापवर्गरहितोऽहम्।

नादान्तरविदितोऽहं नानाविधनिखिलनिगमसारोऽहम्।।१२९।।

अन्वयः -नामादिविरहितोऽहं नरकस्वर्गापवर्गरहितः अहम्। नादान्तरविदितोऽहम्।

नानाविधनिखिलनिगमसारोऽहम्।

व्याख्या -नामादीति।नामादि शब्देन नामरूपगुणानां ग्रहणं भवति।एतैः रहितः अहम् इति उक्त्वा आत्मस्वरूपस्य निराकारत्वं सुचितम्।नरकंः नृणाति क्लेशं प्रापयति इति नरकः। स्वर्गः इन्द्रलोकः अपवर्गः मोक्षः एतैः त्रिभिः रहितः नाम एते मां न बाधयन्ति इत्यर्थः।अन्यः नादः नादान्तरः तेन नादान्तरेण विदितः ज्ञायमानोऽहम्।नानाविध विभिन्न तथा निखिल समस्त निगमानां वेदानां सारः नाम नैकानां श्रुतिवाक्यानां तात्पर्यम् अहमेवास्मि।

अनुवाद -नामरूपगुणांच्या पलीकडचा मी आहे.स्वर्ग मिळवण्याची मला इच्छा नाही नरकाचे मला भय वाटत नाही एवढेच नव्हे तर मोक्षाचीही मला आस नाही.शब्दांच्या पलिकडील जे ज्ञान त्याने मला जाणले जाऊ शकते.अनेकानेक श्रुतिवाक्यांचे सार मी आहे.

१२४ मध्ये विविधनादभेदोऽहम् असे स्वतःचे वर्णन केले व आता नादान्तरविदितोऽहम् असे सांगून मी नादांच्याही पालीकडील आहे या शब्दात एक पुढची पायरी सांगत आहेत.

प

परजीवभेदबाधकपरमार्थज्ञानशुद्धचित्तोऽहम्।

प्रकृतिरहं विकृतिरहं परिणतिरहमस्मि भागधेयानाम्।।१३०।।

अन्वयः -परजीवभेदबाधकपरमार्थज्ञानशुद्धचित्तोऽहम्।तथा प्रकृतिरहं विकृतिरहम्। भागधेयानां परिणतिः अहमस्मि।

व्याख्या -परजीवेति।परस्य जीवः परजीवः।परजीवमधिकृत्यभेदः मम जीवः तथा परस्य जीवः ।एवं यः भेदः स परजीवभेदः।तस्य बाधः येन भवति तत् परमार्थज्ञानं तेन परमार्थज्ञानेन मम चित्तं शुद्धं

जातम्।प्रकृतिः भूमिरापोऽनलो इत्यादि अष्टधा तथा जीवभूता परा यया इदं जगत् धार्यते इति भगवद्गीतायां सप्तमे अध्याये चतुर्थे च पञ्चमे श्लोके उक्तम्। प्रकृतिः ममैवरूपम्। विकृतिः जन्यत्वे सति जनकत्वम् अर्थात सृष्टिः।एतदपि ममैव रूपम्।भागधेयः भाग्यरूपः भागरूपनामभ्यो ध्येयः इति वक्तव्यसूत्रात् स्वाभिधेये धेयप्रत्ययः तेषां भाग्यरूपाणां परिणतिः पूर्णता अहमेव।

अनुवाद -आपपरभेदाचा बाध करणा-या परमार्थज्ञानाने माझे चित्त शुद्ध झाले आहे.महाभूताच्या रूपाने विलसणारी प्रकृति तसेच विभिन्नप्रकारची सृष्टी मी आहे.भाग्यवन्तांची पूर्णावस्था देखील मीच आहे.

फ

फणिधरभूधरवारणविग्रहविधृतप्रपंचसारोऽहम्।

फालतलोदित -लोचनपावक-परिभूतपंचबाणोऽहम्।।१३१।।

अन्वयः -अहं फणिधरभूधरवारणविग्रहविधृतप्रपंचसारः (अस्मि)। फालतलोदितलोचनपावक परिभूतपंचबाणोऽहम्।

व्याख्या - अहमिति।अहम् आत्मज्ञानसम्पन्नः।फणिधरः फणियुक्तः सरिसृप्। भूधरः भूमिं धारयति।इति वारण कुञ्जरः। फणिधरः च भूधरः च वारणः च फणिधरभूधरवारणाः। एतेषां विग्रहाः शरीराणि।येन विशेषेण धृतानि फणिधरभूधरवारणविग्रहविधृतः एवंरूपः। प्रपञ्चस्य सारमिव प्रपञ्चसारः अस्मि।सर्वं व्याप्य तिष्ठामि इत्यर्थः।फालं भालं तलं पृष्ठभागःफालतलं तस्मिन् यत् लोचनं फालतलोदितलोचनं। तस्मात् लोचनात् उदितः प्रस्फुरित यः पावकः फालतलोदितलोचनपावक। तेन परिभूतः अवमानितः नाशितः पञ्चबाणः मदनः। फालितलोदितलोचनपावक परिभूतपंचबाणः येन शिवेन स शिवः महादेवः अहमस्मि।

अनुवाद -सर्पादि सरपटणारे प्राणि गजादि विशालकाय प्राणि अशा सर्वांची शरीरे धारण करणारा मी प्रपंचसार म्हणजे समस्त जगताचा आधार आहे.विशाल अशा भालप्रदेशावर असलेल्या डोळ्यातील अग्नीने ज्याने पंचबाण अशा म्दनास पाराभूत केले नाश केला तो शिव मीच आहे.

ब

बद्धो भवामि न अहं बन्धान्मुक्तस्तथापि नैवाहम्।

बोध्यो भवामि नाहं बोधोऽहं नैव बोधको नाहम्।।१३२।।

अन्वयः - अहं बद्धः न भवामि (तथापि) अहं बन्धात् मुक्तः अपि नैवास्मि।अहं बोध्यः भवामि।नाहं बोधो।अहं नैव बोधको नाहम्।

व्याख्या - अहमिति।नित्यमुक्तोऽहं बद्धो न भवामि।तथापि अहं बन्धात् मुक्त इत्यपि वक्तुं न शक्यते।बन्धो नाम सत्यत्वेन ज्ञायमानो दृश्यसम्बन्धः[1]।परमार्थेन अहं नित्यमुक्तोस्मि। सामान्यदृष्ट्या तु बद्धः इत्यर्थः।अहं सश्रद्धानां कृते बोध्यो ज्ञेयः भवामि।किन्तु अहं बोधः न अर्थात् अनुभवः नास्मि नित्यमुक्तस्वरूपात्। बोधं करोति इति बोधकः।स बोधकः अहं न भवामि।यतः प्रत्येकजीवः स्वकर्म फलरूपेण स्वकर्मानुसारमेव फलं नाम बोधः प्राप्नोति तत्र नाहं कारणं भवामि।

अनुवाद - मी बद्ध होत नाही कारण मी नित्यमुक्त आहे.पण बंधातुन मुक्त आहे असेही म्हणता येत नाही कारण बद्धता व मुक्तता दोन्हीही कल्पनाच आहेत.मी बोध्य म्हणजेच जाणण्यायोग्य ब्रह्मतत्त्व आहे.बोध्य-बोध-बोधक अशा त्रिपुटिपैकी बोध मी नाही तसेच बोधकही नाही.सार रूपाने असे म्हणता येइल की मी केवल बोध्यरूप आहे.

भ

भक्तिरहं भजनमहं मुक्तिरहं मुक्तियुक्तिरहमेव ।

भूतानुशासनोऽहं भूतभवद्भव्यमूलभूतोऽहम्। ।१३३। ।

अन्वयः -मुक्तिरहं मुक्तियुक्तिरहमेव भक्तिरहं भजनमहं। भूतानुशासनोहं भूत भवद् भव्यमूलभूतोऽहम्।

व्याख्या - मुक्तिरिति।मुक्तिः निखिलबन्धराहित्येन स्थितिः।अहं बन्धरहितः अस्मि।युक्तिर्नाम स्वपक्षसाधकविपक्षबाधकप्रमाणोपन्यासः। मुक्तियुक्ती उभावपि अहमेवास्मि।भक्तिश्शब्दः भज् धातोः सिद्धः भवति भज् सेवायां सेवापरम् आचरणमेव भक्तिः।भज् भागे अहम् आराध्यस्य भागोऽस्मि अंशः अस्मि इति भावः एव भक्तिः। भज् भञ्जने आत्मनः स्वतंत्रम् अस्तित्वं भङ्क्त्वा ईश्वर एव सर्वम् इति भावः भक्तिः।भजनम् आराध्यस्य गुणगानमेव भजनम्।अहं भूतानां पृथिव्यादिभूतानाम् अनुशासनः अस्मि।भूत जातं। भवत् जायमानं। भव्य भविष्यत्। एतेषां सर्वेषां मूलभूतरूपेण अहमेव अस्मि।

अनुवाद - मुक्ति भजन व भक्ति सर्वकाही मीच आहे. सर्व भूतांवर माझीच सत्ता चालते.होउन गेलेले अत्ता होत असणारे व पुढे होणारे जे सर्वकाही आहे त्यांचा मूलाधार मीच आहे.

---

[1] बद्धः - बन्धयुक्तः - बन्ध इन्द्रियविक्षेपो मोक्ष एषां च संयमः। श्रीमद् भागवत ११.१८.२२

तात्पर्य हे की,सर्व पदार्थांचे उपादानकारण मी आहे. हे लक्षण ब्रह्माचे असल्याने लेखकाने आपले ब्रह्मस्वरूपत्व सुचवले आहे असे म्हणता येते.

म

मान्योऽहस्मि महतां मंदमतीनाममाननीयोऽहम्।

मदरागमानमोहितमानसदुर्वासनादुरापोऽहम्।।१३४।।

अन्वयः - महतां मान्य अस्मि अहम्।अहं मन्दमतीनाम् अमाननीयः अस्मि। मदरागमानमोहित-मानसदुर्वा सनादुरापोऽहम्।

व्याख्या - महतामिति।महत् शब्देन अत्र ज्ञानेन महतां ज्येष्ठानां बोधः ।महतां मान्यः महद्भिः सम्मानितः आदृतः अस्मि।मन्दा मतिः येषां ते मन्दमतयः।तेषां न माननीयः अमाननीयः अस्मि ते मद्विषये आदरं न प्रदर्शयन्ति।मदः च राग च मानः च मदरागमानाः। तैः मोहितं मानसं येषां ते मदरागमानमोहितमानसाः। तस्मात् कारणात् दुर्वासनायुक्ताः तेषांकृते दुरापोऽहम्।मदः मत्सदृशः कोऽस्तीति गर्वविशेषः।रागः अभिमतविषयाभिलाशः।मानः पुरुषान्तरेण सम्पाादितः सत्कारः।अथवा मानः नाम सर्वत्र अप्रणतिभावः।

अनुवाद - ज्ञानज्येष्ठांच्या लेखी मी आदरणीय आहे.पण मंदमती लोक मला मान देत नाहीत.ज्यांचे अन्तः करण मदरागमोहांनी मलीन होऊन दुर्वासनायुक्त झाले आहे अशांना माझे ज्ञान होणे कठीण.

य

यजनयजमानयाजकयागमयोऽहं यमादिरहितोऽहम्।

इन्द्रयमवरुणयक्षराक्षसमरूत् -कीश-वह्निरूपोऽहम्।।१३५।।

अन्वयः - यजनयजमानयाजकयागमयोऽहम्। अहं यमादि रहितः अस्मि। इन्द्रयमवरूण-यक्षराक्षसमरूत्कीशवह्निरूपोऽहम्।

व्याख्या यजनमिति।यजनं यज्ञक्रिया।यजमानः यज्ञकर्ता।याजकः यज्ञकारकः पुरोहितः। यागः मखः मयः परिपूर्णः।एतानि सर्वाणि यज्ञाङ्गानि व्याप्य तिष्ठामि इत्यर्थः।यमादि अष्टाङ्गानि यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधिः योग दर्शन २.२९

एतै साधनैः कैवल्यप्राप्तिः भवति किन्तु अहं एतैः साधनैः रहितोऽस्मि न मे काऽपि आवश्यकता एतेषां साधनानाम् इत्यर्थः।इन्द्रःसुरपतिः च वरूणःवेदोक्त देवता च यक्षःविशिष्टा योनिः च राक्षसःअसुरः च मरुत् वायुः च कीशःसूर्यः च वह्निःअग्निः च इन्द्रयमवरूणयक्षराक्षसमरूत्कीशवह्निरूपः अहम्। अहमेव एतैः रूपैः विलसामि इत्यर्थः।

अनुवाद - यज्ञसंबंधी त्रिपुटी यजनयागयजमान मीच आहे.कैवल्यप्राप्तिसाठी योगदर्शनाने सांगितलेली यमनियमादि साधने माझ्यासाठी उपयोगाची नाहीत.इन्द्रादि विशेषशक्तिरूप देवताच्या रूपाने मीच नटलो आहे.( मी कोणकोणत्या रूपात आहे हे सांगताना इंद्रापासून अग्नि पर्यंत वैदिक देवतांचा उल्लेख केलेला दिसतो।)

र

रक्षाविधानशिक्षादीक्षितलीलावलोकमहिमाहम्।

रजनीदिवसविरामस्फुरदनुभूतिप्रमाणसिद्धोऽहम्। ।१३६। ।

अन्वयः - अहं रक्षाविधानशिक्षादीक्षितलीलावलोकमहिमा अस्मि।अहं

रजनिदिवसविरामस्फुरदनुभूतिप्रमाणसिद्धोऽस्मि।

व्याख्या - अहमिति।गुरोः प्रसादात् पूर्णः। रक्षायाः विधानं रक्षाविधानं। कर्मारम्भे यत् अङ्गन्यासः दिग्बन्धनादि कियते तदेव रक्षाविधानं। तस्य शिक्षा रक्षाविधानशिक्षा।तस्यां दीक्षितः रक्षाविधानशिक्षादीक्षितः। तस्य लीलायाः अवलोकः प्रकाशः। रक्षाविधानशिक्षादीक्षितलीलावलोकः।तस्य अवलोकस्य महिमा महत्ता अहमस्मि।रजनि निशा च दिवसः अहः च विरामः सन्ध्यासमयः च रजनिदिवसविरामाः।तस्मिन् स्फुरद् या अनुभूतिः आनन्दानुभवः स एव प्रमाणं तेन सिद्धः अहम्।सन्धिकालस्य महत्त्वं सर्वेषां विषदमेवास्ति तदेव अत्र सूचितम्।अथवा विराम शब्देन प्राणयामप्रकियायाः केवलकुम्भकः सुच्यते इति गम्यते।

अनुवाद - वेगवेगळ्या धार्मिक तान्त्रिक कियांपूर्वी न्यास व दिग्बंध केले जात असतात त्यासच रक्षाविधान म्हणतात.त्या रक्षाविधानाचे विधिवत् ज्ञान मिळवून त्याप्रमाणे किया करणारे जे साधक अपार कष्ट घेत असतात त्यांचे लीलावत् अवलोकन मी करतो.संध्यासमयी केलेल्या साधनेचे फलित असे जे

ज्ञान त्याने मी सिद्ध आहे. किंवा योगमार्गातील केवलकुंभकातील समाधीने सिद्ध होणारे कैवल्य मी आहे.

येथे श्वास म्हणजे पूरक व उच्छ्वास म्हणजे रेचक यांच्यामधील विराम म्हणजे केवल कुंभक सुचवला जात आहे. याअवस्थेत श्वासाची गती थांबल्यामुळे मनाची चंचलता कमी होते व परिणामी आनंदाची अनुभूति येते असे शास्त्रविद् मानतात.

ल

लक्षणलक्ष्यमयोऽहं लाक्षणिकोऽहं लयादिरहितोऽहम्।

लाभालाभमयोऽहं लब्धव्यानामलभ्यमानोऽहम्।।१३७।।

अन्वयः - लक्षणलक्ष्यमयोऽहं लाक्षणिकोऽहं लयादिरहितोऽहम्। अहं लाक्षणिकः अस्मि। अहं लयादि रहित च अस्मि। लाभालाभमयोऽहम् । लब्धव्यानाम् अलभ्यमानोऽहम्।

व्याख्या - लक्षणमिति। लक्षणम् असाधारणधर्मः। लक्ष्यं लक्षयितुं योग्यम्। लक्षणं च लक्ष्यं च व्याप्य तिष्ठामि। लाक्षणिकः लक्षणाभिज्ञः अस्मि। लयः नाशः। लयादि शब्देन उत्पत्ति तथा अन्येषां विकाराणां ग्रहणं भवति। नित्यत्वात् विकाराः माम् न स्पृशन्ति इत्यर्थः। लाभः च अलाभः च लाभालाभौ। प्राप्तिः अप्राप्तिः च व्याप्य तिष्ठामि अतः लाभालाभमयः तत्प्रकृतवचने मयट् ५.४.२१। लब्धव्य प्राप्य तेषां लब्धव्यानां नाम ये ये पदार्थाः लब्धव्याः इति जनाः भावयन्ति तेषु अहम् अलभ्यमानोऽस्मि अर्थात् न कोऽपि माम् सहजतया प्राप्नोति। आत्मज्ञानस्य दुर्लभता दार्शिता।

अनुवाद - लक्षण म्हणजे असाधारणधर्म व लक्ष्य म्हणजे निरिक्षण करण्याजोगे,मिळवण्याजोगे मी आहे. लक्षणेस नीट जाणणारा मीच आहे. नित्यत्वामुळे लय म्हणजे नाश व त्यापाठोपाठ येणारे उत्पत्त्यादि विकार मला बाधत नाहीत. लाभ तासेच अलाभही माझेच स्वरूप आहे. लोक ज्याची इच्छा करतात अशा पदार्थात मी अलभ्य आहे. आत्मज्ञान व्हावे असे लोकांना वाटते पण ते सहज होत नसते दुर्लभ असते. जसे कठोपनिषदात म्हटले आहे. नायमात्मा प्रवचनेन लभ्यःन मेधया न बहुना श्रुतेन

व

वर्णाश्रमरहितोऽहं[1] वर्णमयोऽहं वरेण्यगण्योऽहम्।

वाचामगोचरोऽहं मनसामपदे निविष्टोऽहम्। ।१३८ । ।

अन्वयः - अहं वर्णाश्रमरहितोऽस्मि। वर्णमयः च अहम्। वरेण्यगण्यः अहम्। वाचामगोचरोऽहम्। मनसामपदे निाविष्टोऽहम्।

व्याख्या - अहमिति। अहं नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावः। वर्णा च आश्रमाः च वर्णाश्रमा। ताभ्यां रहितोऽस्मि। ब्राह्मणवैश्यक्षत्रियशूद्राः एते चत्वारः वर्णाः तथा ब्र्ह्मचर्यादयाः आश्रमाः सन्ति। एते जीवस्य आचरणं नियमन्ति। नित्यशुद्धबद्धमुक्तस्वभावत्वात् अहं बन्धमुक्तोस्मि। वर्णमयोऽहम् आद्यवर्णः ॐ इत्युच्यते ममस्वरूपम् ओंकारमयम्। वरेण्यः श्रेष्ठः। वरेण्येषु गण्यः ये केचन वरेण्याः सन्ति तेषु अहमेकः वरेण्यगण्यः। वाचामगोचरोऽहं यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह इति श्रुतिवचनात्। मनसामपदे मनसाम् चित्तानां अपदं यत्र मनसः अपि गतिः कुण्ठिता भवति तत्र निविष्टोऽहम्।

अनुवाद - मी नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव असल्यामुळे वर्णाश्रमांच्या बंधनापलीकडे आहे. आद्यवर्ण जो ॐ कार जे ब्रह्माचे चिह्न मानले जाते ते मीच आहे. श्रेष्ठ लोकांमध्ये माझी गणना केली जाते. वाचेच्या म्हणजेच अनुषङ्गाने सर्व इंद्रियांच्या पकडीवाहेर आहे. अद्भूतस्वभाव असे मनही जेथे पाय ठेवु शकत नाही अशा ठिकाणी मी आहे.

श

शमदमविरहितमनसां शास्त्रशतैरप्यगम्यमानोऽहम्।

शरणमहमेव विदुषां शकलीकृतविविधसंशयगणोऽहम्। ।१३९। ।

अन्वयः - शमदमविरहितमनसां शास्त्रशतैरप्यगम्यमानोऽहम्। अहमेव विदुषां शरणम्। शकलीकृतविविधसंशयगणोऽहम्।

व्याख्या - शमदमेति[2]। शमो नाम अन्तरिन्द्रियनिग्रहः। दमो नाम बाह्येन्द्रियनिग्रहः। शमः च दमः च शमदमौ। ताभ्यां विरहितं मनः येषां ते शमदमविरहितमनाः। तेषां शमदमविरहितमनसां कृते। शास्त्राणां

---

[1] दशश्लोकीमध्ये शंकराचार्यांनीही असाच भाव व्यक्त केला आहे.
न वर्णा न वर्णाश्रमाचारधर्मा न मे धारणाध्यानयोगादयोऽपि।

[2] शमादि-शमादिषटकं नाम शमदामोपरतितितिक्षासमाधनश्रद्धानां समूहः। आत्मनात्मविवेकः १३

शतं शास्त्रशतं।तैः शास्त्रशतैः अपि अगम्यमानः अज्ञेयः अहम्।अहमेव पूर्णबोधः विदुषां विद्वज्जनानां शरणम् आश्रयःसर्वे विद्वांसः मामेव प्रपद्यन्ते इत्यर्थः।शकलीकृत द्विधा त्रिधा अनेकशः कृत विविध संशयानां सन्देहानां गणः समूहः अहम्।संशयानां समुच्छेदकोऽहम्।संशयविरहितोऽहम्।

अनुवाद -शमदमांचा आश्रय न घेणा-या साधकांनी जरी मोठ्या प्रयत्नानी शेकडो शास्त्रांचा अभ्यास केला तरी माझे म्हणजे आत्मस्वरूपाचे ज्ञान त्यांना होणार नाही.विद्वान साधकांचा मीच आश्रय आहे.छिन्नभिन्न केलेल्या संशयांचे स्वरूप मीच आहे. म्हणजेच माझ्याठायी कोणतेही संशय राहु शकत नाहीत.साधनचतुष्टयातील शमादि संपत्तिचे महत्व शास्त्राध्यनापेक्षा मोठे आहे हे येथे दाखवले आहे.

ष

षड्भावरहितोऽहं षड्गुणरहितोऽहमहितरहितोऽहम्।

षट्कोशविरहितोऽहं षट्त्रिंशत्तत्त्वजालरहितोऽहम्।।१४0 ।। (षड्विंशत)

अन्वयः - षड्भावरहितोऽहं षड्गुणरहितोऽहम् अहितरहितोऽहं षट्कोशविरहितोऽहं षट्त्रिंशत्तत्त्वजालरहितोऽहम्।

व्याख्या -षड् भावेति। जायते अस्ति वर्धते परिणमते अपक्षियते नश्यते एते भावाः[1] न मां बाधयन्ति।षड्गुणैः रहितः षड्गुणरहितोऽहम्। षड्गुणाः समग्रऐश्वर्य धर्म यशः श्री वैराग्य मोक्ष तथा उत्पत्ति विनाश भूतानामागतिः गतिः विद्या अविद्या एते षड्गुणाः पौराणिकैः वर्णिताः।नैते गुणाः मयि सन्ति।न हितं अहितं।न मम किमपि अहितं।हितााहितविचारात् परोऽहम्।षट्कोशाणां चर्चा मयि नोपपद्यते।षटत्रिंशत् तत्त्वानि एव जालं षट्त्रिंशत्तत्त्वजालं। तस्य षट्त्रिंशत्तत्वजालेन रहितोऽहं। षट्त्रिंशत्तत्वानि[2] मां न अवरोधयन्ति इत्यर्थः।

अनुवाद - जायते पासून नश्यते पर्यंत असणारे यास्कप्रणित सहाभाव माझ्यासाठी नाहीत.ईश्वर ज्या षटगुणांनी संपन्न असतो असे म्हणतात ते गुण माझ्यासाठी महत्त्वाचे नाहीत.मी हिताच्या पर असल्याने माझे कधीही अहित होत नाही.षट्कोशांच्या पलीकडे मी आहे.सहा कोशांबद्दल

---

[1] निरूक्त १.१.२

[2] शैवागमात वर्णिलेली **36** तत्त्वे अशी **10** इन्द्रिय,**5** महाभूते, **5** विषय, मन-बुद्धी-अहंकार-शिव-शक्ति-सदाशिव ही **6** ईश्वर-शुद्धविद्या-माया-कला-विद्या-राग हे **6** व नियति-काल-पुरुष- प्रकृति हे **4** ( पूर्णता प्रत्यभिज्ञा रचयिता महामहोपाध्याय रामेश्वर झा, **1994** प्रत्यभिज्ञा प्रेस वाराणसी)

सांख्यकारिकेवरील गौडपादीय टीकेत पृष्ठ , उदर , जंघा, कटि, उरः , शिरः यांचे ग्रहण केलेले आहे . तसेच शैवागमाने स्वीकारलेल्या **36** तत्त्वांच्या पलिकडचा मी आहे .

लेखनातील अस्पष्टता लक्षात घेऊन षड्विंशत्[1] असा पाठ घेतला तर योगदर्शनाचा बोध होतो .

संवित्सुखात्मकोऽहं समाधिसङ्कल्पकल्पवृक्षोऽहम्।

संसारविरहितोऽहं[2] साक्षात्कारोऽहम् आत्मविद्यायाः। ।१४१। ।

अन्वयः - संवित्सुखात्मकोऽहम्। समाधिसङ्कल्पकल्पवृक्षोऽहम्। अहं संसारविरहितः अस्मि। आत्मविद्यायाः साक्षात्कारोऽहम्।

व्याख्या - संविदिति। सम्यक् विद् संविद्। आत्मज्ञानं एव संविद्। एवं यत् सुखं संवित्सुखं तदात्मकः अहम्। आत्मज्ञानेन यत् सुखं तदेव मम स्वरूपम् इत्यर्थः। समाधिरेव सङ्कल्पः समाधिसङ्कल्पः। तदेव कल्पवृक्षः समाधिसङ्कल्पकल्पवृक्षोऽहम्। समाधेः अनुभवेन कल्पवृक्षाश्रयेण इव समस्तकामाः परिपूर्णा इत्यर्थः। संसरति जीवः जन्ममृत्युचक्रे अनेन इति निर्वचनं संसार शब्दस्य। तादृशः संसारः मां न बध्नाति अतः संसार विरहितः। आत्मविषयकी विद्या आत्मविद्या। तस्या आत्मविद्यायाः साक्षात्कारः साक्षात्स्वरूपोऽहम्।

अनुवाद - आत्मज्ञानाचे जे सुख तेच माझे स्वरूप . समाधीचे सुख म्हणजे कल्पवृक्ष[3] अर्थात् सर्व सुखांचे आगर असा मी आहे . जन्ममृत्यच्या चक्रातून सुटका झालेला असा मी आहे . मी म्हणजे आत्मविद्येचे साक्षात् रूपच आहे .

ह

हव्यमहं कव्यमहं हेयोपादेयभावशून्योऽहम्।

हरिरहमस्मि हरोऽहं विधिरहमेवेति कारणं तेषाम्। ।१४२। ।

---

[1] योगदर्शनाने मानलेली २६ तत्त्वे अशी – १० इंद्रिये, ५ महाभूते, ५ तन्मात्रा, १ पुर ष, १ प्रकृति, मन, बुद्धी, अहंकार आणि ईश्वर।

[2] १४१ व्या आर्येशीमिळते जुळते विचार अष्टावक्रगीतेत २० व्या प्रकरणात ११ व १२ व्या श्लोकात आढळतात .
क्व माया क्व च संसारः क्व प्रीतिर्विरति क्व वा। क्व जीवः क्व च तद् ब्रह्म सर्वदा विमलस्य मे। ।११
क्व प्रवृत्तिनिवृत्तिर्वा क्व च मुक्ति क्व च बन्धनम्। कूटस्थनिर्विभागस्य स्वस्थस्य मम सर्वदा। ।१२

[3] कल्पवृक्ष – एक स्वर्गीय काल्पनिक वृक्ष,ज्याच्याखाली उभे राहून केलेली प्रत्येक इच्छा पूर्ण होते असे म्हणतात .

अन्वयः - अहं हव्यमस्मि। अहं कव्यमस्मि। अहं हेयोपादेयभावशून्योऽस्मि। हरिः अहमस्मि। हरः अहमस्मि। विधिः अहमस्मि। अहमेव तेषां कारणम् इति।

व्याख्या -अहमिति। सर्वव्यापकोऽहम्। हव्यं यज्ञप्रसङ्गे देवेभ्यः यद्यद् अग्नौ समर्प्यते तत् हव्यम् अहमेवास्मि। पितराणां स्मरणं कृत्वा आदरपूर्वकं पितरेभ्यः यद्यद् दीयते तत्सर्वं कव्यं ममैव रूपम्। इदं हेयं त्याज्यम् इदम् उपादेयं ग्राह्यम् इत्येते भावाः अल्पज्ञानां भवन्ति सर्वज्ञत्वात् एतादृशैः भावैः शून्योऽहम्। सर्वं खल्विदं ब्रह्म इत्यनेन ज्ञानेन हेयोपादेय भावरहितः। हरिः विष्णुः हरः शिवः तथा विधिः ब्रह्मा अहमेवास्मि। अहमेव हरिहरादीनां कारणमस्मि मत्तः एव ते जायन्ते इति भावः।

<u>अनुवाद</u> -देवांना अर्पण केले जाणारे पवित्र पदार्थ तसेच पितरांना संतुष्ट करण्यासाठी अर्पण केले जाणारे पदार्थ मीच आहे. सर्वं खल्विदं ब्रह्म अशी धारणा झाल्याने हे घ्यावे हे टाकावे अशा भावांचा मला स्पर्श होत नाही. ब्रह्मादि देव तथा त्यांचे कारणही मीच आहे.

क्ष

क्षालितकलुषमयोऽहं क्षपितभवक्लेशजालहृदयोऽहम्।
क्षान्ताद्यक्षरसहितविविधव्यवहारमूलमहमेव॥१४३॥

अन्वयः - कलुषमय( अपि) क्षालित अहम् (अस्मि) क्षपितक्लेशजालहृदयोऽहम्। अद्याक्षरसहित क्षान्त विविधव्यवहारमूलोऽहम्।

व्याख्या - कलुषमयेति। कलुषं पापं कलुषमयः कलुषपूर्णः सन्नपि आत्मज्ञानेन क्षालितः निर्मलीभूतोऽहम्। क्षपि क्षान्त्याम् क्लेषानां जालं क्लेषजालं। क्लेशान् सोढुं समर्थं यस्य हृदयं स क्षपितक्लेशजालहृदयः। अ कारादारभ्य क्ष यावत् क्षांताद्यक्षरसहित। विविधाःसमस्त व्यवहाराःइत्यर्थः। तेषां मूलं उद्गमः अहम्। जगतः स्मस्त व्यवहाराः मामाश्रित्य प्रवर्तन्ते इति भावः।

अनुवाद - गुरुकृपेने ज्ञानानुभूति आली व त्यामुळे पूर्वी पापी असूनही मी पापातून मुक्त झालो. हृदयास क्लेषकारक अशा अनेक घटनांना सहन करू शकणारा आहे. अ पासून क्ष पर्यंत अक्षरांनी निर्दिष्ट होणा-या सर्व व्यवहारांचे मूळ मी आहे. वस्तुतः क्ष हे स्वतंत्र अक्षर संस्कृतमध्ये नाही मराठीमध्ये क्ष व ज्ञ

ही दोन अक्षरे वर्णमालेच्या शेवटी म्हटली जातात.तंत्रशास्त्रातही क्ष या अक्षराचा उपयोग केलेला दिसतो.लेखकास तंत्रशास्त्राचे[1] ज्ञान असावे व त्यामुळे वापरात क्ष हे अक्षर आले असावे.

बहुभिः किमेभिरुक्तैरहमेवेदं चराचरविश्वम्।

सीकरफेनतरङ्गाः सिन्धोरपराणि नखलवस्तुनि[2]।।१४४।।

अन्वयः - बहुभिः किमेभिरुक्तैः अहमेवेदं चराचरविश्वं सीकरफेनतरङ्गाः सिन्धोरपराणि नखलवस्तुनि।

व्याख्या बहुभिरिति।बहुभिः नैकैः एभिः पूर्वोक्तैः उदाहरणैः इति शेषः।अहमेव आत्मानुभूतिपूर्णः।इदं दृश्यमानं चरं गतिशीलं च अचरं स्थितिशीलं च चराचरं विश्वं।कीदृशं विश्वमिति अग्रे वर्णयति।सीकराः च फेनं च तरङ्गाः च एतेषां समहारः सीकरफेनतरङ्गाः। तथा सिन्धोः सागरस्य अपराणि वस्तुनि जलचराः वनस्पतयः इत्यर्थः।नख इव लवाकार नखलव नखमिव लघ्वाकाराणि वस्तुनि।

अनुवाद - फार काय बोलावे थोडक्यात सांगायचे झाले तर मीच हे चराचरविश्व व्यापून राहिलो आहे।जसे तुषार फेस तरंग म्हणजे समुद्रच असतो तसेच सागरातील जलचर, वनस्पती इत्यादि नखाप्रमाणे लहान लहान वस्तु म्हणजे सागरच म्हटले जातात।

दुस-या चरणात दृष्टांत रूपाने आलेली पाण्याची विविध रूपे समुद्रतरंगादि न्यायाची आठावण करून देतात। शारीरक भाष्यात ५.१.२ या भोक्त्रापत्यधिकरणात आचार्य हाच दृष्टांत देतात।

समुद्रादुदकात्मनोऽनन्यत्वेऽपि तद्विकाराणां फेनवीचीतरङ्गबुद्बुदादीनामितरेतरविभाग इतरेतरसंश्लेषादिलक्षणश्च व्यवहार उपलभ्यते ।

गुरुमहती

शरणं नहि मम जननी न पिता न सुता न सोदरा नान्ये।

परमं शरणमिदं मे चरणं मम मूर्ध्नि देशिकन्यस्तम्।।१४५।।

---

[1] गौतमीयतंत्रात पुढील दोन श्लोक क्ष चा प्रयोग करणारे दिसतात.

पञ्चाशल्लिपिभिर्मला विहिता सर्वकर्मसु।अकारादि क्षकारान्ता वर्णमाला प्रकीर्तिता।

क्षार्ण मेरूमुखं तत्र कलपयेन्मुनिसत्तमः।अनया सर्व मंत्राणां जपः सर्व समृद्धिदः।।

[2] नखलवस्तुनि हा शब्द खरा नख-लव-वस्तुनि असा असावयास हवा.पाठोपाठ येणारे एकच व्यंजन लेखनिकाकडून गाळल्या जाण्याच्या सर्वसामान्य दोषाचे म्हणजे Haplology चे हे उदाहरण आहे.येथे लव शब्दातील व आणि वस्तुनि शब्दातील व या पाठोपाठ येणा-या दोन व पैकी एक लेखनिकाने गाळलेला आहे.

अन्वयः - न मम जननी न पिता नहि सुता न सोदरानि अन्ये (मम) शरणम्।( तर्हि किं शरणम) मम मूर्ध्नि देशिकन्यस्तं इदं चरणं मे परमं शरणम्।

व्याख्या - न ममेति।नहि मम स्वमाता नवा पिता तात नच सुता तनया नान्ये सोदराः बान्धवाः मम शरणं आश्रयः। एवं सर्वेषां प्रापञ्चिकसंबन्धानां आत्मज्ञानाय निर पयोगिता दर्शिता।अग्रे दर्शयति उपायः।मम मस्तके देशिकेन गुरु णा न्यस्तं स्थापितं चरणमेव मम परमं श्रेष्ठं शरणम् आश्रयः।देशिकेन मस्तके न्यस्तम् इति शब्दशः न ग्रहणीयम्।गुरु विषयकः परमादरः एभिः शब्दैः दर्शितः।

अनुवाद - माझी आई वडील,मुलगी किंवा बन्धुजन कोणीही माझे आश्रयस्थान नाहीत.तर माझ्या मस्तकी असणारे श्रीगुरुंचे पायच माझा खरा आश्रय आहे.गुरुचरणांची मस्तकावर कल्पना करून त्यांच्याविषयी परमादर दाखवला आहे.

आस्ते देशिकचरणं निरवधिरास्ते तदीक्षणे करुणा।
आस्ते किमपि तदुक्तं किमतः परमस्ति जन्मसाफल्यं।।१४६।।

अन्वयः - आस्ते देशिकचरणं तदीक्षणे निरवधिः करुणा आस्ते।किमपि तदुक्तम् आस्ते।किमतः परं जन्मसाफल्यम्[1] अस्ति।

व्याख्या - आस्तेति।आधाररूपेण देशिकस्य चरणम् उपदेशकस्य गुरोः पदकमलम् अस्ति। गुरोः ईक्षणे निर्गता अवधिः निरवधिः। अपारा करुणा अस्ति। आस्ते किमपि गुरोरुक्तं उपदेशपरं बोधपरं वाक्यम् किमपि शब्देन गुरोः प्रत्येकशब्द उपदेशवदस्ति इति सूचितम् । अतः परं एतेभ्यः परं नाम अन्यं जीवनसाफल्यं कृतकृत्यता किम् न किमपि अन्यत् इति भावः।

अनुवाद - अत्यंत करुणामय अशी दृष्टी असलेले श्रीगुरु चरण माझ्या जवळ आहेत तसेच त्यांचे उपदेशपर शब्द आहेत. गुरु ची कृपा होणे आणि साधकाचा किंवा शिष्याचा आपल्या गुरु वर विश्वास असणे या दोन दुर्मिळ गोष्टी इथे एकाचवेळी दिसून येत आहेत व यातूनच जीवनात सफलता सफलता म्हणतात ती याहून वेगळी काय असणार? असा भाव मनात उत्पन्न झालेला आहे।

[1] गुरूच्याठायी अनन्यभाव व फलस्वरूप जन्मसाफल्य श्वेताश्वतरोपनिषदात ख-या बोधाच्या रूपाने असे वर्णीले आहे। यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ।तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः।।६.२३

कारुण्यसारसान्द्राः काङ्क्षितवरदानकल्पकविशेषाः।

श्रीगुरुकटाक्षपाताः शिव शिव शमयन्ति चित्तसन्तापम्।।१४७।।

अन्वयः - कारुण्यसारसान्द्राः कांक्षितवरदानकल्पकविशेषाः श्रीगुरुकटाक्षपाताः (साधकाः) शिव शिव (जपन्तः) चित्तसन्तापं शमयन्तिः।

व्याख्या - कारुण्येति।करुणस्य भावः कारुण्यं।तस्य सारं कारुण्यसारं।तेन कारुण्यसारेण सान्द्राः कारुण्यसारसान्द्राः। घनीभूताः।काङ्क्षितं इच्छितं वरदानं काङ्क्षितवरदानं।तेन कल्पितविशेषाः। श्रीगुरोः कटाक्षानां पातः श्रीगुरु कटाक्षपाताः वृष्टिः येषु ते। शिवनामस्य सततम् उच्चारणं कुर्वन्तः साधकाः मुमुक्षुपुर षाः। चित्तस्य सन्तापं पीडां शमयन्ति विलयं नयन्ति।षड्विकारकारणात् चित्ते सन्तापः जायते किन्तु गुरु कटाक्षेन एष सन्तापः लयं गच्छति।

अनुवाद –कार ण्यरसाने भिजून घनीभूत झालेले अपेक्षित वरदानाने विशेष स्थान प्राप्त झालेले गुरुच्या कृपाकटाक्षांचे विषय झालेले साधक शिवनामाचा जप करत किंवा शिव शिव असा आनंददर्शक किंवा कल्याणपर शब्दाचा उद्गार करत अंतःकरणाचा संताप घालवतात .

या पुढील आर्या वाचकाला एकदम वेगळ्याच भूमिकेवर घेऊन जाते.एखाद्या योग्याने समाधीचा अनुभव दृष्टांतरूपााने सांगावा तसे या आर्येमध्ये दृष्टांत असला तरी गूढताही जाणवते.

कवलितचञ्चलचेतोगुरूतरमण्डूकजातपरितोषा।

शेते चित्तगुहायां चिरतरमेकैव चिन्मयी भुजगी[1]।।१४८।।

अन्वय - कवलितचञ्चलचेतो गुरूतरमण्डूकजातपरितोषा एकैव चिन्मयी भुजगी चिरतरं चित्तगुहायां शेते।

व्याख्या - कवलितेति।कवलितं ग्रसितं चञ्चलं चित्तं यया सा कवलितचञ्चलचेता। गरुतरः महाकायः मण्डूकः तस्य भक्षणेन जातः यः परितोषः गुरूतरमण्डूकजातपरितोषः। समाधानं तादृशं समाधानं प्राप्य

---

[1] सर्पाकार अशी साडेतीन वेटाळी घालून मूलाधारचकाच्या ठिकाणी असलेली कुंडलिनी शक्ती जागी होऊन जेंव्हा ऊर्ध्व गामी होते तेंव्हा शरीरातील धातूंचे शोषण करते.ही कुंडलिनी शक्ती सहस्त्रार चकात गेल्यावर योग्यास कैवल्याची प्राप्ती होते असे योगविद् मानतात.येथे मात्र ती चित्तगुहेत विश्राम करते असे वर्णन केले आहे.

एका एव अन्यस्य अभावः सूचितः। चिन्मयी चैतन्यमयी भुजगी कुण्डलिनी शक्तिः।चिरतरं दीर्घकालं चित्तरूपगुहायां शेते सुप्ता भवति।

अनुवाद - चंचलचित्त म्हणजे एखादा महाकाय बेडूकच जणु व त्याला गिळल्यामुळे तृप्त झालेल्या एखद्या सर्पीणीप्रमाणे चैतन्यमय अशी कुण्डलिनी शक्ति चित्तरूप गुहेत झोपते.

वेडकास गिळल्यानंतर सर्प सुस्त होउन पडून राहतो या व्यवहारातील अनुभवाचे प्रतिबींब येथे दिसते.

मयि सुखबोधपयोधौ महति ब्रह्माण्डबुद्‌बुदसहस्रम्।
मायामयेन मरुता भूत्वा भूत्वा मुहुस्तिरोधत्ते। ।१४९। ।

अन्वयः - मयि महति सुखबोधपयोधौ ब्रह्माण्डबुद्‌बुद्‌सहस्रं मायामयेन मरुता भूत्वा भूत्वा मुहुः तिरोधत्ते।

व्याख्या - मयीति।मदन्तःकरणे यः महान् सुखबोधः वर्तते स एव पयसः धिः आकरः पयोधिः सुखबोध एव पयोधिः सुखबोधपयोधिः तस्मिन् ब्रह्माण्डमेव बुद्‌बुदः जलविकारः तादृशानां ब्रह्माण्डानां सहस्राणि। बुद्‌बुद् शब्देन ब्रह्माण्डस्य क्षणजीवित्वं लघुता च दर्शिता आत्मज्ञानकारणात्।माया एव मर त् तेन मर ता भूत्वा भूत्वा पुनः पुनः उत्पनाः भवन्ति मुहुः पुनः तिरोधत्ते अगोचरं भवन्ति लयं गच्छन्ति।माति विश्वं यस्यां सा माया इति माया शब्दस्य निर्वचनं च एतत् समग्रदृश्यं मायाकार्यमेव इति केवलाद्वैतमतं स्पष्टं करोति।

अनुवाद - माझ्या अंतःकरणात आत्मज्ञानाने उत्पन्न झालेला जो आनंदाचा सागर त्यात सहस्रावधी ब्रह्मांडे मायारूप पवनाने जणू उत्पन्न होतात व पुन्हा विरूनही जातात.आत्मज्ञानाच्या उच्च पातळीवर असल्याने विश्वात होणा-या उलथापालथी पाण्यात उत्पन्न होउन क्षणात नष्ट होणाया बुडबुड्यांप्रमाणे मला क्षुल्लक वाटतात.

गुरु करूणयैव नावा प्राक्तनभाग्यानुकूलमारुतया।
दुःसहदुःखतरङ्गः चिरतरसंसारसागरस्तीर्णः। ।१५०। ।

अन्वयः - गुरु करूणयैव नावा दुःसह दुःखतरङ्गः चिरतरसंसारसागरस्तीर्णः। तथा च प्राक्तनभाग्यानुकूलमारूतया।

व्याख्या – गुरुकरुणयेति। गुरुणा या करुणा मयि प्रदर्शिता नाम या निर्हेतुकी दया कृता। सा करुणा एव नाव तया नावरूपकर णया। दुःसहः दुःखेन सहते इति दुःसहः। दुःसहानि दुःखानि दुःसहदुःखानि।तानि दुःसहदुःखानि एव तरङ्गाः यस्य सःदुःखतरङ्गः। चिरतरः दीर्घकालतः स्थिरः। संसारः एव सागरः संसारसागरः। तीर्णः प्लुतः लङ्घितः। अन्यत् अपि कारणम् इति दर्शयति। प्राक् पूर्वस्मिन् काले ततं प्राक्तनं।प्राक्तनं च असौ भाग्यं प्राक्तनभाग्यं। तस्य प्राक्तनभाग्यस्य अनुकूलता एव मारूतः वातः। तेन प्राक्तनभाग्यानुकूलमारूतया।

अनुवाद - पूर्वि केलेल्या सत्कृत्यांच्या फलरूप जो वेगवान व भाग्यानुकूल असा वारा त्याच्या सहाय्याने तसेच श्रीगर चे करुणामय असे जे दृष्टीक्षेप तेच जणू नौका.अशा कटाक्षानीच हा दुःखरूप लाटांनी भरलेला सहन करण्यास कठीण असा संसारसमुद्र तरून गेलो . संसार म्हणजे जन्ममृत्यूच्या चकातील आवर्तन, खरा जलमय समुद्र नव्हे; पण पूर्वापार समुद्राचे अनुलङ्घ्यत्व लक्षात घेउन संसाराची तुलना सागराशी केली जाते .

सति तमसि मोहरूपे विश्वमपश्यंस्तदेतदित्यखिलम्।

उदितवति बोधभानौ किमपि न पश्यामि किन्विदं चित्रम्। ।१५१। ।

अन्वयः - सति मोहरूपे तमसि (अहं) विश्वम् अपश्यं तत् एतद इति अखिलम। उदितवति बोधभानौ न किमपि पश्यामि किं नु इदं चित्रम्।

व्याख्या -सतीति। यदा मोहरूपतमः आसित् तदा। अहं तत् एतद् अखिलं विश्वं सद्रूपेण अपश्यम्।किन्तु यदा बोध एव भानुः बोधभानुः। तस्य उदयः जातःआत्मविषकं यथार्थ ज्ञानम् आविर्भूत। तदा अहं किमपि न पश्यामि। नाम समग्रं विश्वं मायाजनितं भ्रमरूपम् इति बोधः मनसि जायते। किम् इत्येतत् चित्रम् आश्चर्यजनकं न।निश्चयेन एतद् आश्चर्योत्पादकम्।

अनुवाद - जेंव्हा मोहरूपअंधाराचा प्रभाव होता तेंव्हा मी सगळे जग हेच खरे जग आहे अशा भावाने पहात होतो पण जेंव्हा बोधरूपसूर्याचा उदय झाला तेंव्हा मला काहीच सद्रूपाने दिसत नाहीसे झाले व हे सगळे दृश्य भ्रममूलक असल्याचे कळले केवढे हे अश्चर्य? .

इत्यात्मबोधलाभं मुहुरनुचिन्त्यं(अनुचिन्त्य) प्रमोदमानेन।

प्रारब्धकर्मणान्ते तेन परं प्राप्यते स्वकैवल्यम्। ।१५२। ।

अन्वयः - इति प्रमोदमानेन (मनसा) आत्मलाभं मुहुरनुचिन्त्य तेन प्रारब्धकर्मणान्ते परं स्वकैवल्यं प्राप्यते।

व्याख्या - इतीति। यथा गते पद्ये वर्णितं तथा। बोधं प्राप्य।प्रकर्षेण मोदमानेन प्रमोदमानेन मनसा । आत्मलाभस्य मुहुः पुनःपुनः चिन्तनं अनुचिन्तनम। अनुचिन्तनम कृत्वा। तेन आत्मलाभस्य चिन्तनेन चिन्तनद्वारा। संचितकर्मसु फलोन्मुखं प्रारब्धं[1] कर्म प्रारब्धकर्म। तेषां प्रारब्धकर्मणान्ते यदा प्रारब्धकर्मणां समाप्तिः भवति। (प्रारब्धकर्मणां भोगदेव क्षयः भवति इति उच्यते)। तदा परं श्रेष्ठं स्वकैवल्यं आत्मनः एकशेषत्वम्। अहमेव सर्व व्याप्य तिष्ठामीति अनुभूतिः प्राप्यते।

अनुवाद -अशा प्रकारे झालेल्या आत्मानुभूतीचे प्रसन्नमनाने पुन्हा पुन्हा स्मरण करत राहिले असता प्रारब्धकर्मांचा क्षय झाल्यावर साधकास त्या आत्मलाभाच्या चिन्तनाने कैवल्यस्वरूपाची प्राप्ती होते.

मोहान्धकारहरणं संसारोद्वेलसागरोत्तरणम्।

स्वात्मनिरूपणमेतत्प्रकरणवरं रक्षणीयमतः। ।१५३। ।

अन्वयः - अतः मोहांधकारहरणं संसारोद्वेलसागरोत्तरणम् स्वात्मनिरूपणमेतत्प्रकरणवरं[2] रक्षणीयम्।

व्याख्या - अत इति।अनेन कैवल्यस्वरूपस्य प्राप्तिः भवति अस्मात् कारणात्।आदौ प्रकरणस्य विशेषणानि स्थाप्यन्ते।मोह एव अन्धःकारः मोहान्धःकारः। तस्य हरणं नाशः मोहांधकारहरणं। वेलापर्यन्तं परिपूर्णः उद्वेलः।उद्वेलः च असौ संसाररूपसागरः संसारोद्वेलसागरः। तस्मात् संसारसागरात् उत्तरणं येन भवति तत् संसारोद्वेलसागरोत्तरणम। स्वात्मनः निरूपणं स्वात्मनिरूपणम्।स्वात्मनिरूपणपरं एतत् वरं

---

[1] कर्माचे तीन पोटविभाग मानले जातात. संचित- अनेक जन्मात केलेल्या कर्मांची साठलेली फळे, कियमाण-वर्तमान शरीराद्वारा केल्याजाणा-या कर्मांची फळे, प्रारब्ध-संचीतकर्मा पैकी वर्तामानकाली फलोन्मुख झालेली कर्मे.

[2] प्रकरणम् -- तत्त्वज्ञानपर लेखनाचे भाष्य, प्रकरण व स्तोत्रवाङ्मय असे स्थूलमानाने विभाग केले जातात.त्यातील भाष्यग्रंथ हे विद्वान अभ्यासकांसाठी,प्रकरणग्रंथ हे प्राथमिक अभ्यासकांसाठी व स्तोत्रवाङ्मय हे भक्तीमान लोकांना बोध व्हावा म्हणून असते असे मानले जाते.प्रकरणग्रंथ हे संवादात्मक किंवा प्रश्नोत्तरात्मक शैलीत व वाचकास विषयाचे आकलन सहज कसे होईल ह्या हेतूने लिहिलेले असतात.

प्रकरणं श्रेष्ठं प्रकरणं रक्षणीयं सावधानतया जलतैलादिभिः रक्षणीयम् अथवा पठनपाठनादि उपायैःरक्षणीयम् इत्यर्थः।

अनुवाद - म्हणून मोहरूपअंधाराचा नाश करणारे व काठोकाठ भरलेला संसारसागर तरून जाण्यास साधनभूत असणारे हे प्रकरण म्हणजेच हा प्रकरणग्रंथ सर्वप्रकारे सुरक्षित ठेवला पाहिजे. अग्नी,जल,तेल अशा पदार्थापासून जपणे तसेच अयोग्य वक्तीच्या हाती न देणे व अध्ययन अध्यापनाद्वारा लोकांच्या मनात पोहचवणे हेही रक्षणच होय.

अज्ञानतिमिरहन्ता विरचितविज्ञानपङ्कजोल्लासः।
मानसगगनतलं मे भासयति श्रीनिवासगुरुभानुः।।१५४।।

अन्वयः - श्रीनिवासगुरुभानु अज्ञानतिमिरहन्ता विरचितविज्ञानपङ्कजोल्लासः मे मानसगगनतलं भासयति।

व्याख्या - श्रीनिवासेति। श्रीयः निवासः श्रीनिवासः। अत्र श्री शब्दः ज्ञानैश्वर्य दर्शयति। श्रीनिवासाख्यः गुरु ः स एव भानुः प्रकाशकः श्रीनिवसगुरु भानुः। पुनः कीदृशः स इति वर्णयति ।अज्ञानमेव तिमिरः अज्ञानतिमिरः। तस्य हन्ता अज्ञानतिमिरहन्ता।विज्ञानमेव पङ्कजं विज्ञानपङ्कजं। तदेव उल्लासकारणं येन विरचितं स विरचितविज्ञानपंकजोल्लासः। मे मम शिष्यस्य मानसमेव गगनतलं मानसगगनतलं। भासयति प्रकाशयति।

अनुवाद -अज्ञानरूपी अंधाराचा नाश करणारे व ज्ञानरूपी कमळाच्या रूपाने आनंद आणणारे आणि सूर्या प्रमणे तेजस्वी असणारे श्रीनिवासगुरु माझे मनोरूपी आकाश प्रकाशित करतात. आत्मानुभूतीच्या आनंदाने प्रकाशीत करतात.

अखिलपरमहंसदेशिकमागमगूढार्थदर्शकं प्राज्ञम्।
आनन्दपूर्णसागरमग्नमहं नौमि शङ्कराचार्यम्।।१५५।।

अन्वयः - अखिलपरमहंसदेशिकम् आगमगूढार्थदर्शकं प्राज्ञम् आनन्दपूर्णसागरमग्नं शङ्कराचार्यम् अहं नौमि।

व्याख्या - अखिलेति।न खिलम् अखिलं सम्पूर्णमिति। परमः च असौ हंसः परमहंसः। परमवैराग्यशाली इत्यर्थः। देशिकं उपदिशति मार्गं दर्शयति इति देशिकः तं देशिकं। गुरुं पुनः कीदृशः गुरु ः आगमेषु निहितः यः गूढार्थः तं दर्शयति यः स। प्राज्ञः विशेषज्ञानवान् ।तं प्राज्ञं अहं नौमि।पुनः कीदृशः आनन्देन पूर्णः सागरः आनन्दपूर्णसागरः तस्मिन् आनन्दपूर्णसागरे मग्नं सर्वाङ्गैः आनन्दमयम् श्रीमच्छङ्कराचार्यम् अहं नौमि प्रणमामि।

अनुवाद -सर्व गुरुंमध्ये श्रेष्ठ, परमहंस या पदाचा अधिकारी असलेल्या, वेदांमधील गूढ रहस्यमय अर्थ उलगडून दाखवणा-या व आनंदाच्या समुद्रात पूर्णपणे बुडून गेलेल्या शंकराचार्यांना मी वंदन करतो.[१]

## शरीराभिमानं निन्दन्ति

स्वात्मावबोधहीनाः कुणपशरीराभिमानसन्तुष्टाः।

वारिजबुद्बुदरक्षांमूढा(रक्षामूढा) कुर्वति (कुर्वन्ति)मोहबन्धनम्[2]।।१५६ ।।

अन्वयः - स्वात्मावबोधहीनाः कुणपशरीराभिमानसंतुष्टाः वारिजबुद्बुदरक्षामूढाः कुर्वन्ति मोहबन्धनम्।

व्याख्या- स्वात्मावबोधेति।स्वस्य आत्मा स्वात्मा तस्य अवबोधः स्वात्मावबोधः। तेन विहीनाः स्वात्मावबोधरहिताः । कुणपं नाम प्राणहीनं शरीरम्। शरीरस्य विनाशशीलत्वं विस्मृत्य ये शरीराभिमानं कुर्वन्ति तस्य सौन्दर्येण वा पुष्ट्या सन्तुष्टाः भवन्ति। ते मूढाःभ्रान्ताः वारिज जलज बुद्बुदानां रक्षणनिमग्ना इव सन्ति।यथा जले समुत्पन्नाः बुद्बुदाः क्षणभङ्गुराः तथा शरीरम् इति भावः।ते मोहबन्धने निपतन्ति नाम संसारबन्धनं प्राप्नुवन्ति।

अनुवाद - आत्मज्ञानाची अनुभूति नसलेले व कुणप म्हणजे प्रेत व त्याच्याप्रमाणे असलेल्या स्थूल शरीराविषयी अभिमान ठेउन शरीराच्या सुंदरतेने आनंदीत होणारे जणु काही पाण्यावर उत्पन्न

---

[1] परमहंसः परामः श्रेष्ठः हंसः आत्मा यस्य सः।आत्मनिष्ठापूर्वकशिखासूत्ररहितः। सर्वलक्षणसंग्रहः
परमहंस यतींचा एक प्रकार.कुटीचक बहूदक हंस व परमहंस असे ४ प्रकारचे संन्यासी असतात.परमहंसांना घरदार नसते.ते सदैव फिरत राहतात.परमहंसाजवळ एकच दंड असावा असे पराशरमाधवीयात सांगितले आहे.धर्माधर्म सत्यासत्य शुद्धाशुद्ध अशा द्वंद्वांपासून ते मुक्त असतात.मृत्युनंतर परमहंसाचे दहन करत नाहीत तर पुरतात.
भारतीय संस्कृतिकोश खंड ५ संपादक पंडीत महादेवशास्त्री जोशी.

[2] कंसात घातलेले शब्द मूळ संहितेहून किंचित भिन्न पण व्याकरणदृष्ट्या बरोबर आहेत.

होणा याबुडबुड्यांच्या रक्षणाची खटपट करत असतात . असे लोक मोहबंधनात पडतात म्हणजेच जन्ममृत्यूच्या फे यात सापडतात .

जलमिव मृगतृष्णायां शुक्तौ रजतं यथा ह्याही रज्ज्वाम्। (ह्याही हे पद हि अहि असे वाचावे)
सत्यमिव सत्य एतत् कल्पितमाभाति ममपरासन्दे। ।१५७। ।

अन्वयः - जलमिवमृगतृष्णायां शुक्तौ रजतं यथा ह्याही रज्ज्वां सत्ये परासन्दे एतत् सत्यमिव कल्पितं मम आभाति।

व्याख्या - जलमिविति। मृगतृष्णायां मृगमरिचिकायां जलम्। शुक्तौ रजतं शुक्तौ रजतनाणकस्य आभासः। रज्ज्वां तमसि पतिते रज्जौ शुल्वे सर्पभ्रमः। सत्ये सद्रूपे परासन्दे ।आसन्दम् अधिष्ठानं। परमं च असौ आसन्दं परासन्दं। तस्मिन् परासन्दे नाम ब्रह्मणि। एतत् दृश्यमानं चराचर जगत् सत्यमिव नाम असत्सन्नपि सत्यमिव । कल्पितं रचितं। मम मदर्थे। आभाति गम्यते प्रतीतिम् आयाति।

अनुवाद - जसा मृगजळात होणारा पाण्याचा आभास,शिंपल्यावर होणारा चांदीचा आभास व अंधारात पडलेल्या दोरीवर होणारा सर्पाचा आभास तसेच सद्रूप अशा ब्रह्मावर हे परमार्थाने खरे नसणारे चराचर जग खरे असल्याप्रमाणे आरोपित होत असल्याचे मला जाणवते.

अखिलनिगमान्तलक्ष्यं हानोपादानहीनचिन्मात्रम्।
अनुभूतिमानगम्यं ब्रह्मैवानन्दमस्मि परिपूर्णः। ।१५८। ।

अन्वयः - अखिलनिगमान्तलक्ष्यं हानोपादानहीनचिन्मात्रम् अनुभूतिमानगम्यं ब्रह्मैवानन्दमस्मि परिपूर्णः।

व्याख्या - अखिलेति। अखिलानां निगमानां अखिलनिगमानां। समस्तानां निगमानां अन्तः अखिलनिगमान्तः। तेन लक्ष्यं अखिलनिगमान्तलक्ष्यं ।निगमग्रन्थाः यत् चिन्तयन्ति तत्। हानं त्यागः। उपादानं ग्रहणं। हानं च उपादानं च हानोपादाने ।ताभ्यां हीनं हानोपादानहीनं। पुनः कीदृशं इति दर्शयति चिन्मात्रं चैतन्यमात्रम्। अनुभूत्या एव गम्यमानं न केनापि इन्द्रियेण वा अन्येन साधनेन इत्यर्थः। परिपूर्णः ब्रह्म एव आनन्दः ब्रह्मानन्दः अस्मि।

अनुवाद - सर्व वेदसाहित्याचे एकमात्र लक्ष्य असलेले,घ्यावे किंवा टाकावे असे ज्यात काही नाही व जे केवल चैतन्यमात्र आहे, व केवल अनुभूतीनेच जाणले जाऊ शकते असे जे ब्रह्म त्यापासून होणारा परिपूर्ण असा आनंद मी आहे .

तीर्थे श्वपचगृहे वा नष्टस्मृतिरपि परित्यजन् देहम्।

ज्ञानसमकालमुक्तः कैवल्यं याति हानशोक (हतशोकः)।।१५९ ।।(हानशोक ःही लेखनिकाची चूक वाटते)

अन्वयः - ज्ञानसमकालमुक्तः हतशोकः तीर्थेश्वपचगृहे वा नष्टस्मृतिरपि देहं परित्यजन कैवल्यं याति।

व्याख्या - ज्ञानसमकालेति।यस्मिन् क्षणे ज्ञानं समुत्पन्नं तस्मिन्नेव क्षणे। मुक्तः ज्ञानसमकालमुक्तः। हतः शोकः येन स हतशोकः नष्टशोकः शोकातीतः वा।तीर्थे तीर्थक्षेत्रे । काश्यां मुक्तिः इति लोकोक्तिः प्रसिद्धा एव ।नष्टा स्मृतिः यस्य सः नष्टस्मृतिः। नाम कोऽहं का मम जीवनसफलता इत्यादि विस्मृत्य जीवमानः ।परित्यजन् देहं देहत्यागं कृत्वा ।अपि कैवल्यं याति मोक्षं प्राप्नोति।यस्मिन् क्षणे ज्ञानानुभूतिः तस्मिन्नेव क्षणे साधकः मुक्तः भवति ।ज्ञानेत्तरकाले स केवल प्रारब्धकर्मणां फलानि भुङ्क्ते इति कवेः विचारः।

अनुवाद - ज्या क्षणी आत्मज्ञानाची अनुभूती येते त्याच क्षणी साधक मुक्त होतो .सर्व शोकांना नाहीसे करतो .मग त्याचा शरीरत्याग तीीर्थाच्या ठिकाणी अथवा चांडाळाच्या घरी झाला अथवा कार्याकार्याचे विस्मरण झालेले असताना झाला तरीही तो आधीच मुक्त झालेला असतो .

दासबोधातसुद्धा असाच विचार मांडलेला दिसतो

साधूचा देह खितपला।अथवा श्वनदिकी भक्षिला।

हे प्रशस्ता न वाटे जनाला।मंदबुद्धस्तिव।।

जे का जीवनमुक्त ज्ञानी।त्यांचे शरीर पडो रानी।

अथवा पडो स्मशानी। तरी धन्य झाले।।२५ .२६ दसक ७ समास १0

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।

यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।। भ गी अ ८.श्लोक ५ या ठिकाणी भगवंताने जो विचार मांडला आहे त्याच्या विरूद्ध मत इथे मांडलेले दिसते.गीताकार नामस्मरणाची, भक्तीची स्तुती करत आहेत तर वेदांतबोधकार ज्ञानाची.

हयमेधसहस्त्राण्यथवा कुरूतात ब्रह्महतलक्षाणि(कुरूतात् ब्रह्महतलक्षाणि)।

परमार्थविन्न पुण्यैर्न पापैः स्पृश्यते विमलः।।१६०।।

अन्वयः - हयमेधसहस्त्राणि अथवा ब्रह्महतलक्षाणि कुरूत ( तैः किम्?) विमलः परमार्थविद् न पुण्यैः न पापैः स्पृश्यते।

व्याख्या - हयमेधेति ।हयस्य मेधः वधः हयमेधः। अश्वमेध इत्याख्यया प्रसिद्धः। अथवा ब्रह्मयज्ञानां सहस्त्राणि अर्थात् अविरत ब्रह्मयज्ञानुष्ठानम् आचरत।एतैः कर्मभिः पुण्यसञ्चयः भवति इति विश्वासः जनेषु वर्तते।किन्तु एतादृशैः कर्मभिः पराम श्रेष्ठः च असौ अर्थः परमार्थःतं परमार्थं जानाति स परमार्थविद् न बध्यते।यतः परमार्थविद् न पुण्यैः न वा पापैः स्पृश्यते।यथा भगवद्गीतायां ४.१४ भगवता ऊक्तं न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।

अनुवाद - सहस्त्रावधी अश्वमेध केले किंवा ब्रह्मयज्ञांचे लक्षावधी अनुष्ठान असे लक्षणेने म्हटलेले आहे त्याचा अर्थ अखंड अनुष्ठान असा घेतला पाहिजे .असे आचरण केले तरी त्याने काय फळ? कारण खरा परमार्थज्ञानी साधक कोण्त्याही पुण्याने अथवा पापाने बद्ध होत नसतो.

विदितं वेदरहस्यं विदितं देहो ह्ययमनात्मेति।

विदितः पर इति च आत्मा किमतः परमस्ति जन्मसाफल्यम्।।१६१।।

अन्वयः - विदितं वेदरहस्यं विदितं देहो ह्ययमनात्मेति। आत्मा पर इति च विदितः। अतः परं किं जन्मसाफल्यम् अस्ति।

व्याख्या - विदितमिति। सम्यग् ज्ञातं वेदानां रहस्यं वेदरहस्यं। वेदे निहीतः गूढार्थः अवगत इत्यर्थः।अयं देहः मम शरीरं न आत्मा अनात्मा। देहः विनाशशीलः अस्ति अतः आत्मा इति वक्तुं न शक्यते इति विदितम्।आत्मा परः श्रेष्ठः इत्यपि सम्यग् ज्ञातम्।अतः अस्मात् परं श्रेष्ठं अन्यत् किं जन्मनः साफल्यं यथार्थता अस्ति न किमपि इति भावः।

अनुवाद - वेदांत लपलेला गूढार्थ गुरु कृपेने कळला . माझे माझे असे वाटणारे शरीर म्हणजे आत्मतत्व नाही हे कळले . आत्मतत्व अत्यंत श्रेष्ठ आहे हे कळले . याहून वेगळे ते काय जन्मसाफल्य असणार? स्वतःला ओळखणे, आपण म्हणजे जीव व परब्रह्म या संज्ञेने वर्णिले जाणारे परमश्रेष्ठ तत्त्व वेगळे नसून एकच आहेत असे कळणे म्हणजेच तत्त्वमसि या वाक्याची अनुभूति येणे . हेच वेदांत दर्शनाचे फळ होय . म्हणूनच याहून वेगळी सफलता काय असणार असा प्रश्न कवीच्या मनात आलेला आहे .

इति बोधार्याविवरणम् ।

ॐॐॐॐॐ

# वेदान्ताचे प्रधान साधन  साधनचतुष्टय

# व इतर

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।

सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग् भवेत् । ।

अशीच सर्वांची इच्छा असते तशी प्रार्थनाही सर्वत्र केली जात असते तरी तसे होताना दिसत नाही दुःखाची निवृत्ति व्हावी व सुखाची प्राप्ती व्हावी यासाठी सर्वांची धडपड सुरू असते  नाना मार्ग त्यासाठी सुचवले जातात , नाना संप्रदाय चालतात तरीही जगात सुख थोडे व दुःख फार अशीच परिस्थिती दिसते दुःखनिवृत्तीच्या उपायांमध्ये उत्तरोत्तर सुधारणा होत गेली,विचारमंथन होत राहिले व वेदान्तासारखे रत्न त्यातून निर्माण झाले वेदान्ताच्या अनुसरणाने नक्कीच दुःखाची निवृत्ती होईल असा विश्वास अनेकांना वाटला त्या वेदान्ताची थोडक्यात ओळख करून घेण्याचा प्रयत्न आपण येथे करणार आहोत

वेदांचा अन्तिम भाग अर्थात् उपनिषदे म्हणजे वेदान्त  उपनिषदे ज्ञानमहती गातात रूढार्थाने ज्याला कर्मकाण्ड म्हणतात किंवा ज्यांना इष्टपूर्त कर्मे म्हाणतात त्यांची चर्चा उपनिषदे करत नाहीत

वेदान्त ग्रंथ म्हटला की साधारणपणे देहत्रय-गुणत्रय[1] अशा त्रयी, . जड-चेतन,सुख दुःखादि द्वंद्वे,परा,पश्यन्ती, मध्यमा, वैखरी अशा वाणी जाग्रत्,स्वप्न,सुषुप्ति तुरीया अशा अवस्था अन्तःकरणादि चतुष्टये,प्राण, इन्द्रिये,कोश,भूतादि पंचके जगताचे मिथ्यात्व, ब्रह्माचे सत्यत्व,ज्ञानानेच मोक्ष कार्मानि नाही, गुरूच्या उपदेशाची आवश्यकता अशा विषयांचा विचार आलाच

जर सर्व वेदान्तग्रंथात याच विषयांची चर्चा असते तर मग त्यांचे एकमेकांपासून वेगळेपण काय? असा जर प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर असे .

प्रत्येक ग्रंथकार,व्याख्याकार आपल्यासमोर असणा-या श्रोत्यांना-वाचकांना पचेल रूचेल अशा पद्धतीने निरूपण करत असतो त्यामुळे सर्व ग्रंथात विषयांची समानता असली तरी विषयांचा विस्तार कमी अधिक प्रमाणात केलेला असतो व हेच त्यांचे वेगळेपण असते

उपनिषदात येणारी नचिकेत,भृगु,जनक,याज्ञवल्क्य,मैत्रेयी अशी अनेक पात्रे भौतिक समृद्धी किंवा पुत्रपौत्रादींची अपेक्षा करत नाहीत तर ज्या ज्ञानाने शाश्वत आनंदाची प्राप्ती होईल, अढळ समाधान प्राप्त होईल त्या ज्ञानाची अपेक्षा करताना दिसतात भौतिक समृद्धीकडे पाठ फिरविताना ते पदार्थ वाईट आहेत म्हणून त्यांचा त्याग केला जात नाही तर हे पदार्थ शाश्वत आनंद देऊ शकत नाहीत याची जाण असल्याने त्यांच्याकडे पाठ फिरविली जाते

उपनिषदे अशा शाश्वत आनंदाची वाट दाखवतात या वाटेवर चार प्रधान साधनांची मदत घ्यावी लागते. तेव्हाच आत्मानंदाची अनुभूती येऊ शकते आत्मज्ञान प्राप्त करण्यावाचून अर्थात् मी स्वतः ते परमश्रेष्ठ तत्त्व आहे याची अनुभूती आल्यावाचून मोक्ष संभवत नाही पंचदशीमध्ये (११.८) सुद्धा हाच विचार स्पष्टपणे मांडला आहे

तमेव विद्वानत्येति मृत्युं पन्था न चेतरः।

ज्ञात्वा देवं पाशहानिः क्षीणैः क्लेशैर्न जन्मभाक्।।

आणि श्वेताश्वतरोपनिषदात ३.८ मध्ये व ६.१५ तमेव विदित्वा अतिमृत्यमेति नान्यः पन्था विद्यते अयनाय या शब्दात आत्मज्ञानाचे महत्व सांगितले आहे.

अशा प्रकारे जन्ममृत्यूच्या चकातून सुटण्याचा प्रयत्न खरे पाहता प्रत्येक मनुष्याने करावयास हवा पण असे घडताना दिसत नाही अपवादानेच खरी ज्ञानपिपासा किंवा मुमुक्षा आढळते जे ज्ञानाचे अधिकारी असतात त्यांनाच ज्ञान मिळते असे जर मानले तर ज्ञानाचे अधिकारी कोण? याचा विचार करताना ज्ञान कोणाला होत नाही हे पहावे लागते.

1 ब्रह्माचे सत्यत्व व जगताचे मिथ्यात्व कळले की वेदान्त समजला

2 मोठया मोठया ऋषिमुनींना वेदान्ताचे रहस्य उलगडले नाही तिथे मला पामराला कसे कळेल

3 वेदान्त ज्ञान म्हणून काही असते याची जाणीवच नसणारे

या प्रकारच्या लोकांना कधीच वेदान्त विषय समजत नाही पण ज्यांना प्रयत्नपूर्वक साधनचतुष्टय संपादन केल्याने व गुरूकृपेने वेदान्त समजू शकेल असा विश्वास वाटतो तेच वेदान्तज्ञानाचे अधिकारी होतात

विवेकिनो विरक्तस्य शमादिगुणशालिनः।

मुमुक्षोरेव हि ब्रह्मजिज्ञासायोग्यता मता।। विवेकचूडामणी १७

वर म्हटल्याप्रमाणे ख-या मुमुक्षूसच ज्ञान मिळण्याची शक्यता असते हे खरे पण ज्ञान ज्ञान असे जे म्हणतात ते असते काय?

ज्या सद्रूप अधिष्ठानापासून या जगताची उत्पत्ती होते,ज्या सद्वस्तूव्या आधाराने हे जग राहते व ज्या सद्वस्तूत पुन्हा लीन होते त्या सद्वस्तूचे म्हणजे ब्रह्माचे ज्ञान तेही परोक्ष नव्हे तर अपरोक्ष होणे म्हणजे ज्ञान हे ज्ञान होण्यासाठी

मोक्षद्वारे द्वारपालाश्चत्वारः परिकीर्तिताः।

शमो विचारः संतोषश्चतुर्थः साधुसङगमः।।

एते सेव्याः प्रयत्नेन चत्वारो द्वौ त्रयोऽथवा।

द्वारमुद्घाटयन्त्येते मोक्षराजगृहे तथा।।

एकं वा सर्वयत्नेन प्राणांस्त्यक्त्वा समाश्रयेत्।

एकस्मिन् वशगे यान्ति चत्वारोऽपि वशं यतः।। यो वा २ - ५९ ;६० ,६१

रामाला उपदेश करताना वसिष्ठांनी साधन चतुष्टयाची व त्यातील एकेकाची सुद्धा महती सुंदर रीतीने सांगितली आहे

नित्यानित्यवस्तु विवेक ः विच् पृथग् भावे, म्हणजे निवडणे या धातूपासून हा शब्द बनला आहे भोवतालच्या सर्व पदार्थातून नित्य व अनित्य अशी वर्गवारी करून नित्य तेवढे निवडणे म्हणजे नित्यानित्यविवेक होय

वैराग्य ः याचेच दुसरे नाव इहामुत्रफलभोगविराग असे आहे या लोकातील तसेच परलेकातील भोगविषयांविषयी नकोपणाची भावना म्हणजे वैराग्य

शमादि षट् संपत्ति ः यात शम,दम,तितिक्षा,उपरती,श्रद्धा व समाधान या गुणांचा समावेश होतो

मुमुक्षुत्व : जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होऊन मोक्ष मिळावा अशी इच्छा

मोक्ष म्हणजे नेमके काय या विषयी ब-याच मतमतांतरांचा गलबला दिसतो त्याचा विचार मग करू साहित्य संगीतादी विषयही आनंद देत असतात पण या आनंदांना शाश्वत आनंद म्हणता येईल का? कोणत्याही वस्तूपासून शाश्वत आनंद प्राप्त होण्यासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी आवश्यक असतात

- ज्या गोष्टीपासून सुख अपेक्षित आहे ती वस्तू चिरकाल राहिली पाहिजे
- त्या वस्तूवरील भोगणा-याची आसक्ती कायम राहिली पाहिजे
- त्या वस्तूचा उपभोग घेणारा कायम राहिला पाहिजे

कोणत्याही भौतिक साधनास हे निकष लावले तर त्या निकषांवर अशी भौतिक साधने टिकत नाहीत कमळाच्या पानावरील दवबिंदूप्रमाणे जगातील सर्व पदार्थ अशाश्वत आहेत असे शास्त्रे पुन्हा पुन्हा सांगत असताना त्यांच्या कडून शाश्वत आनंदाची अपेक्षा करता कामा नये हे कळणे म्हणजेच विवेक जागणे यालाच नित्यानित्यविवेक असे म्हणतात

कोटयो: ब्रह्मणो याता गता सर्गपरंपरा।
प्रयाता पांसुवद् भूपाः का धृतिर्मम जीविते।।
येषां निमेषणोन्मेषौ जगतां प्रलयोदयौ।
तादृशाः पुरूषा नष्टा मादृशां गणनैव का।।योग वासिष्ठ जनकोक्तिः

मोठे मोठे राजे कस्पटासमान नष्ट झाले,ज्यांच्या डोळयांच्या उघडझापीबरोबर जगताचे उत्पत्ती-विनाश होत असत असे अवतार ही गेले तेथे माझी काय गणना? मी कशाचा मोह करावा व कशाच्या आधाराने? असे भोवतालच्या जगताचे अनित्यत्व समजणे हाच विचार श्रीमच्छंकराचार्य मांडतात

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्येत्येवंरूपो विनिश्चयः।विवेकचूडामणि२०

सोऽयं नित्यानित्यवस्तुविवेकःसमुदाहृतः।। विवेकचूडामणि २१

हे जगताचे मिथ्यात्व फक्त बाह्य जगताविषयी नसून स्वतःचे शरीरही त्यास अपवाद नाही शरीराच्या सुखासाठी आनंदासाठी अपार कष्ट करून गोळा केलेली सर्व साधने एकदा डोळे मिटले की नसल्यासारखीच असतात

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे नारी गृहद्वारे जनश्मशाने।

देहश्चितायां परलोकमार्गे धर्मानुगो गच्छति जीव एकः।। भतृहरि वैराग्यशतक ३५

मनुष्यप्राणी हा केवळ देहमय नाही, तो मी देह असे म्हणत नाही तर माझा देह,माझी इन्द्रिये, माझे मन असे म्हणतो म्हणून असे म्हणणारा जो कोणी आहे तो देहातीत इन्द्रियातीत असला पाहिजे हा कोण?कुठे राहतो? याचे ज्ञान कसे होइल? असे प्रश्न उद्भवतात

श्रीमद्भगवद् गीतेत हा अन्तर्भागात राहतो व निश्चयात्मक बुद्धी नसणारे त्याला पाहू शकत नहीत असं सुचविले आहे

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।

यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यत्यचेतसः।। १५. ११

शरीरात राहून इन्द्रियांद्वारे कर्मे घडवणारा, सुखांचा उपभोग घेणारा, अनेकानेक उपाधींच्या योगाने मी मोठा, मी शहाणा,मी कृश,स्थूल ,धनवान, दरिद्री इत्यादि समजणारा तो जीव व हा जीव म्हणजेच तत्त्वमसि या महावाक्यातील त्वं पद प्राण्याच्या अन्तःकरणात राहून अहं अशा भावाने वावरणा-या या जीवाचे वर्णन पंचदशीकार तृप्तिदीपात असे करतात

आलंबनतया भाति योऽस्मत्प्रत्ययशब्दयोः।

अन्तःकरणसंभिन्न बोधः स त्वं पदाभिधः।।७१

तेंव्हा आपल्या देहासकट बाहेरील सर्व पदार्थ हे अनित्य आहेत व आपले म्हणजे जीवाचे स्वरूप बाह्य पदार्थाहून भिन्न आहे हे समजणे म्हणजे नित्यानित्यविवेक जे साधनचतुष्टयातील पहिले अंग आहे

साधनचतुष्टयातील दुसरे अंग म्हणजे वैराग्य अथवा इहामुत्रफलभोगविराग

भगवान् शङ्कराचार्य आपल्या भगवद्गीता भाष्यात वैराग्य शब्दाची व्याख्या करताना म्हणतात दृष्टादृष्टेषु विषयेषु सम्यक् दोषानुदर्शनात् वैतृष्ण्यम्

विवेकचूडामणी मध्ये

तद्वैराग्यं जिहासा या दर्शनश्रवणादिभिः।

देहादिब्रह्मपर्यन्तं ह्यनित्त्ये भोगवस्तूनि।। २१

दर्शनश्रवणाविषयी जिहासा म्हणजे, या वस्तु कितीही मोहक असल्या तरी त्या डोळयांनी पहावयास नकोत,कानांनी ऐकावयास नकोत, त्यांचा स्पर्श नको अशी मुमुक्षूच्या मनाची जी स्थिती तिलाच वैराग्य म्हणतात ज्यांना मोक्ष हवा त्यांनी हे प्रथम संपादन केले पाहिजे

संत तुकारामांच्या एका अभंगात

स्त्रियांचा संग तो नको नारायणा ।काष्ठ वा पाषाण मृत्तिकेच्या।। ( तुकाराम गाथा अभंग ५२ ३ शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय १९७१) अशा शब्दात वैराग्य महती आढळते

मोक्षस्य हेतुः प्रथमो निगद्यते वैराग्यमत्यंतमनित्यवस्तुषु। विवेक चूडामणी ७१

अशा प्रकारे सर्वत्र वैराग्य महती वर्णिली असली तरी ते सहजासहजी उत्पन्न होत नाही इन्द्रियांच्या सहाय्याने विषयोपभोग घेण्याची स्वाभाविक प्रवृत्ती सर्व प्राणिमात्रात दिसून येते

पराञ्चिखानि व्यतृणत्स्वयंभुः (कठोपनिषद्) विधात्यानेच इन्द्रियांना बहिर्मुख केले आहे त्यामुळे प्राणी सर्वदा बाहेरच पहातात आत दडलेले आत्मतत्त्व कोणीतरी एखादाच पहातो असे दिसते

इन्द्रियांच्या बहिर्मुखतेमुळे इतर जीव प्राणास मुकतात. माणसास तर सगळेच विषय आकर्षित करत असतात, त्यामुळे त्याने अधिकच सावध असले पाहिजे असं आचार्य दाखवून देतात

शब्दादिभिः पञ्चभिरेव पञ्चत्वमापुः स्वगुणेन बद्धाः।

कुरंगमातंगपतंगमीनभृंगाः नरः पञ्चभिरंचितः किम्।।विवेक चूडामणि ७८

जर वैराग्याचे एवढे महत्त्व आहे तर इतर अध्यात्मपर शास्त्रांच्या वाचनमननादिकांचा काहीच उपयोग नाही का? ज्ञानानेच मुक्ति मिळते असे शास्त्रे सांगतात मग वैराग्याची आवश्यकता काय? असे जर कोणी म्हणेल तर त्याने हे लक्षात ठेवावयास हवे की निर्मल शुद्ध चित्तातच ज्ञान स्थिरावते व चित्ताची शुद्धता विषयांपासून सुटल्यावरच होते त्यामुळे साधनचतुष्टयात दुस-या कमांकावर असलेले वैराग्य महत्वाचे ठरते

वैराग्याची महती योगवासिष्ठातही गायलेली दिसते, माण्डव्य मुनी म्हणतात

यावत्सर्व न संत्यक्तं तावदात्मा न लभ्यते।

सर्ववस्तु परित्यागे शेष आत्मेति कथ्यते।।

शुद्ध व प्रखर वैराग्य साधल्यास आत्मज्ञान सहजच होते नुसते दाखवण्यापुरते जे वैराग्य त्याचा निषेध भगवद्गीतेत तसेच एकनाथ महाराजांनीही केला आहे

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।

इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।। ३ ६

अंतरी शुद्ध नाही भाव वरी मिरवी वैराग्यभाव।

जळो जळो त्याचे ज्ञान काय नटाचे भाषण।

टिळा टोपी दावी सोंग बकध्यानी मिरवी रंग।

शरण एका जनार्दनी त्याचा मंत्र न घ्यावा कानी।।

वैराग्याचे पुन्हा दोन प्रकार वर्णिले आहेत पहिला प्रकार म्हणजे स्मशान वैराग्य

कधी कधी प्रपंचात उत्पन्न होणा-या दुःखांमुळे विषयांविषयी,स्त्रीपुत्रांविषयी नको ही झंझट जाऊ कुठेतरी निघून तीर्थक्षेत्रास असे काही काळापुरते वाटते एखाद्या आवडत्या व्यक्तीच्या किंवा लहान वयाच्या नातेवाइकाच्या अन्त्ययात्रेस जाण्याचा प्रसंग आला तर असा भाव उत्पन्न होऊ शकतो आणि म्हणूनच याला स्मशान वैराग्य म्हणत असावेत परंतु हे वैराग्य,ही विषयांबद्दलची अनासक्ती फारकाळ टिकत नाही दैववशात् गेलेली संपत्ती पुन्हा मिळाली पुन्हा अनुकूलता प्राप्त झाली म्हणजे माणूस पुन्हा मोहात गुरफटतो, विषयसक्ती बळावते (दासबोध स्वगुणपरीक्षा)

वैराग्याचा दुसरा प्रकार म्हणजे तीव्र वैराग्य जे भोगांच्या क्षणिकतेच्या भावनेने उत्पन्न होते देवादि लोकांच्या निवासकल्पनेने तेथील सुखोपभोगांच्या वर्णनानेही त्यांचे नाशिवंतत्व लक्षात घेऊन विचलित होत नाही ते प्रखर वैराग्य याचे वर्णन इहामुत्रफलविराग अशा शब्दात केले आहे

भगवद्गीतेतही

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति। ९ २१

या शब्दात अमुत्रभोगविषयांचे नश्वरत्व दाखविले आहे  क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति असे जरी गीताकार म्हणत असले तरी कठोपनिषद्कार मात्र

इष्टापूर्त..........इमं लोकं हीनतरं वा विशन्ति अशा शब्दात हीनलोकाचीही प्राप्ती होऊ शकते हे दाखवून देतात

सार रूपाने असे म्हणता येईल की भोगविषय,या लोकीचे तसेच परलोकीचे कितीही सुंदर व आकर्षक वाटले तरी त्यांच्यावर आसक्त न होणे हेच वैराग्य

विवेकवैराग्यानंतर येणारे साधन. हणजे शमादि षट्संपत्ति

विवेकवैराग्य ज्ञानप्राप्तीसाठी पुरेसे नाही का?

आणिक या शमादि षट्संपत्तीची आवश्यकता काय? असे जर कोणास वाटले तर त्याचे उत्तर असे वैराग्य संपादून कायम ठेवण्यास विशेष सामर्थ्याचे उपाय योजले पाहिजेत व तेच शमादि षट्संपत्तीच्या  रूपाने शास्त्रकारांनी निरूपिले आहेत विवेक वैराग्याप्रमाणेच अन्तःकरणात शुद्धज्ञान स्थिर होण्यासाठी चित्ताची निर्मलता आवश्यक आहे .

शम,दम,तितिक्षा,उपरती,श्रद्धा,समाधान  या सहा गुणविशेषांना शास्त्रकारांनी संपत्ती असे म्हटले आहे लौकिकार्थाने ज्याला संपत्ती म्हणतात अशा पैसा,सोने,नाणे,जमीन-जुमला,पशुधन इ... गोष्टींना सोडून वरील गुणविशेषांना संपत्ती म्हणून त्यांचे वैषिट्य दाखविले आहे हे सहा गुण जो अंगी बाणवेल तो लौकिकार्थाने संपत्तिरहित असला तरी सर्व जगाची संपत्ती स्वाधीन असल्याप्रमाणे तो आनंदी होईल असे सुचविले आहे

मनुष्येतर प्राण्यांमध्ये स्वाभाविक प्रवृत्तीच बलवत्तर असतात व त्यामुळे विषयसुखांच्या मागे धावून ते स्वतःचा नाश करून घेतात मनुष्याला विषयसुखांचे मर्यादित सामर्थ्य कळूनही  तो त्या विकारांचे शमन न करता विषयांच्या अधीन होतो या विषयीचे आश्चर्य भर्तृहरि असं मांडतो

अजानन् दाहार्तिः विशति शलभो दीपदहने।न मीनोऽपि ज्ञात्वावृतबडीशमश्नाति पिशितम्।

विजानन्तो ह्येते वयमिह विपज्जालजटिलान्।न मुञ्चामः कामानहह गहनो मोहमहिमा।।

१८ वैराग्यशतक

मोहाचा महिमा असा अपार आहे आणि म्हणूनच त्याला जिंकण्यासाठी शमादि षट्संपत्तीची आवश्यकता आहे

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।

बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम्।।६.३४ मैत्रायण्युपनिषत्

शम- मन हे जणू सर्व इन्द्रियांचा राजाच सर्व इन्द्रियांनी आणलेल्या संवेदनांबद्दल ही चांगली ही वाईट इत्यादी निश्चय मनच करत असते अशा प्रकारच्या चांगले-वाईट, प्रिय-अप्रिय अशा निश्चयांपासून मनास अलिप्त ठेवणे म्हणजे शम

विरज्य विषयव्राताद्दोषदृष्ट्या मुहुर्मुहुः

स्वलक्ष्ये नियतावस्था मनसः शम उच्यते।। विवेकचूडामणी २२

दम- शंकराचार्य आपल्या आत्मानात्मविवेक ग्रंथात दमो नाम बाह्येन्द्रिय निग्रहः असे म्हणून पुढे श्रवणादिव्यतिरिक्त विषयेभ्यो निवृत्तिर्दमः असे स्पष्ट करतात (भगवन्नाम व तत्त्वज्ञान यांचे सतत श्रवण हा साधनेचा पाया मानला जातो म्हणून असे म्हटले असावे ). सतत बाहेरून येणारे संदेश घेऊन त्यांचे स्पंद मनास पोहचवणा-या इन्द्रियांचे संयमन म्हणजे दम होय पण इन्द्रिये बलवान असतात व मनुष्यास भरकटवतात असं गीताकारही म्हणतात असे असले तरीही प्रयत्न करायला हवा असे वसिष्ठ म्हणतात

वासना संपरित्यागे यदि यत्न करोष्यलम्।

तास्ते शिथिलता यान्ति सर्वाधिव्याधयः क्षणात्।। हा वसिष्ठांनी दाखवलेला विश्वासच दमाच्या पालनाचे महत्त्व अधोरेखित करतो

उपरती ः उपरतिर्नाम विहितानां कर्मणां विधिना परित्यागः (आत्मानात्मविवेक) शमदमाचा विचार करताना मनाच्या विकारमय भागाच्या निग्रहाचा विचार केला पण मनाच्या विचारात्मक भागाचा विचारही आवश्यक ठरतो कारण या भागामुळे प्रत्यक्ष विषयेन्द्रिय संयोग नसतानाही केवल चिन्तनाने सुखानुभव मिळवून देऊ शकतो म्हणून मनाच्या याही भागाचा निग्रह साधकाने केला पाहिजे व विषय चिन्तनरूप मनोराज्यास आळा घालून ईश्वरचिन्तनाकडे अथवा ब्रह्मचिन्तनाकडे वृत्तीस वळवले पाहिजे या साधनास

उपरती असे म्हणतात  बाह्यानालम्बनं वृत्तेः एषा उपरति उत्तमा  या आचार्यांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे सुखाच्या अपेक्षेने बाह्यपदार्थाकडे वृत्ती जाऊ न देणे म्हणजे उपरती

नुसत्या मनेराज्याने, प्रत्यक्ष विषयांशी संयोग न होता जर जीवास विषयाचा आनंद उपभोगता येत असेल तर त्यात हानी काय? नुसत्या मानसिक सुखाचाही निषेध का करावा? अशी शंका कोणी घेऊ नये  विषयचिन्तनाने होणारी अनर्थ परंपरा गीताकार  ध्यायतो विषयान्पुंसः        प्रणश्यति  इत्यादि श्लोकात २.६२सांगतातच

एखाद्या गुरास जसे काठीचा धाक दाखवून पुन्हा पुन्हा हव्या त्या दिशेने वळवले जाते तसे मनास पुन्हा पुन्हा वळवून ईश्वराभिमुख करणे हीच उपरती

ही उपरती साधण्यासाठी अगोदर सांगितलेल्या वैराग्याची मदत होते

तितिक्षा (तिज् क्षम् सहने शीतोष्णादिद्वन्द्वसहिष्णुता १३१७ सर्वलक्षणसंग्रहः)

जेंव्हा एखादा मुमुक्षु वर सांगितल्याप्रमाणे शमादींची साधना करू लागतो तेव्हा या प्रयत्नात त्याला विविधप्रकारचे आध्यात्मिक आधिभौतिक व आधिदैविक असे त्रिविध ताप भोगावे लागतात व या तापांनी विचलित न होता अभ्यास सुरूच ठेवावा लागतो   हे सर्व करताना तितिक्षा या साधनाची गरज लागते

आत्मानात्मविवेकात शंकराचार्य तितिक्षेची व्याख्या अशी करतात

सहनं सर्व दुःखानां अप्रतिकारपूर्वकम्।

चिन्ताविलापरहितं सा तितिक्षा निगद्यते।।

या श्लोकातील अप्रतिकारपूर्वकम् हा शब्द  समजावून घेणं आवश्यक आहे कुत्रा अंगावर धावून येत आहे चावू शकतो असे दिसत असून स्वतःचे रक्षण करू नये असे आचार्यांना म्हणावयाचे नसावे रोग उद्‌भवल्यास औषध न घेता आध्यात्मिक ताप समजून सहन करावे असाही अर्थ घेता कामा नये औषधोपचार करणे, शरीराचे रक्षण करणे आवश्यकच आहे पण त्यासाठी देवास साकडे घालणे योग्य नव्हे  स्वतः आचार्यांनीही असंच वागून दाखविलेले आहे गीतोपदेश ही असाच दिसतो

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः।
आगमापायिनोऽनित्यास्तां तितिक्षस्व भारत।। २ १४
तेव्हा वाट्यास येणा-या दुःखांनी विचलित न होता त्यांना सहन करतानही साधनेचा मार्ग न सोडणे म्हणजे तितिक्षा म्हणूनच शीतोष्णदिद्वन्द्वसहिष्णुता असा अर्थ तितिक्षेचा घेतला जातो .

श्रद्धा

शमादि साधनांमध्ये पाचवे साधन श्रद्धा हे होय

परवस्तू इन्द्रियगोचर नाही म्हणून ती आहे की नाही याविषयी मुमुक्षूला संशय येणारच या संशयाचे निरसन साक्षात्कार झाल्याशिवाय होणर नाही पण साधक जर अश्रद्ध असेल तर त्याला साक्षात्कार कधीच होणार नाही  या साठी श्रद्धा हवीच  आत्मानात्मविवेकात आचार्य श्रद्धेची व्याख्या अशी करतात

शास्त्रस्य गुरूवाक्यस्य सत्यबुद्ध्यावधारणम्।
सा श्रद्धा कथिता सद्‌भिः यया वस्तूपलभ्यते।।

शास्त्रे व व्यासादी आचार्यांची वचने खरी मानावीत यासाठी तर्कसंगत स्पष्टीकरण असे

१ या महात्म्यांना कोणाचीही भीड नव्हती  हे कोणाच्याही दरबारातील पण्डित नव्हते

२ सर्वसंगपरित्याग केल्यामुळे त्यांना कशाचीही अपेक्षा नव्हती

३ सर्वांचे कल्याण व्हावे म्हणून करूणेने व्याप्त हाऊन हे उपदेश करत होते

म्हणून यांची वचने सत्य मानण्यात काहीच दोष दिसत नाही

अज्ञश्च अश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति  हे भगवंताचे वचन तर प्रसिद्धच आहे  ४ ४०

समाधान

सामान्यतः आर्थिकस्थिती बरी असली,प्रकृति चांगली असली,कुटुंबात शांतता असली,परिवारात कोणासही दुःख नसले म्हणजे समाधान आहे असा अर्थ घेतला जातो पण हे झाले व्यावहारिक समाधान पण शमादि संपत्तीमधील समाधान याहून वेगळे आहे

सम्+आ+धा या उपसर्ग व धातूच्या मेलनाने सिद्ध होणारा अर्थच खालील श्लोक उलगडून दाखवत आहे .

नियतं स्थापनं बुद्धेः शुद्धे ब्रह्मणि सर्वदा।
तत्समाधानमित्युक्तं न तु चित्तस्य लालनम्।।

हे सर्व गोचर जग म्हणजे ब्रह्माचे स्वरूपच आहे असा जरी अद्वैताचा सिद्धान्त असला तरी त्यात मिसळून राहिलेली माया ओळखली पाहिजे असत्ता,जाड्य, दुःख हे मायेचे रूप तर ब्रह्म सच्चिदानंदरूप आहे हे लक्षात घेऊन शुद्धब्रह्माच्या ठिकाणी मन ठेवणे म्हणजे समाधान

मुमुक्षुत्व

आता साधनचतुष्टयातील चवथे पण अत्यंत महत्त्वाचे साधन जे मुमुक्षुत्व त्याचा विचार पाहू

संसारबन्धनिर्मुक्तिः कथं मे स्यात्कदा विधेः।
इति या सुदृढा बुद्धिर्वक्तव्या सा मुमुक्षुता।।

मोक्षस्य इच्छा मुमुक्षा असे ही निर्वचन प्रसिद्ध आहे जिज्ञासा या सन्नन्ताचे स्पष्टीकरण देतांना शंकराचार्य अवगतिपर्यन्तं ज्ञानम् अशी शब्दयोजना करतात ( ब्र सू १.१.१) त्याच धर्तीवर मुमुक्षा या सन्नंताचा मोक्ष मिळेपर्यंत तीव्र इच्छा असा करता येईल.

श्रीमद् दासबोधात ज्या चार गटात मनुष्यांची विभागणी समर्थ रामदासांनी केली आहे त्यातील मुमुक्षू ही दूसरी अवस्था आहे

विषय सुखांच्या मागे धावून आपण आत्तापर्यन्तचे आयुष्य वाया घालवले, अजिबात सद्गुणसंवर्धन केले, नाही खोटे सोंग धरून कीर्तनादी केले असे आपले दुर्गुण जाणून जो दुःखी होतो व त्या दुर्गुणांचा प्रयत्न पूर्वक त्याग करतो, संतांस शरण जातो तो मुमुक्षू

( श्रीमद् दासबोध मुमुक्षुलक्षणनिरूपण)

असा जो मुमुक्षू असतो त्याचे वर्णन भर्तृहरी असे करतात

एकाकी निःस्पृहः शान्तः पाणिपात्रो दिगंबरः।
कदा शंभो भविष्यामि कर्म निर्मूलनक्षमः।।(५९ वैराग्यशतक) अशी तीव्र तळमळ निर्माण झाली म्हणजे स्वतःला मुमुक्षू समजायला हरकत नाही मुमुक्षू साधकाने संसारत्याग केला पाहिजे, वनात गेले पाहिजे असा समज करून घेण्याचे कारण नाही समर्थ रामदास म्हणतात,

संसार त्याग न करिता । प्रपंच उपाधि न सांडता।

जनांमध्ये सार्थकता। विचारेची होय। ।द ६ स ९ ओ २४

मोक्षाची इच्छाच उत्पन्न झाली नाही म्हणजे मुमुक्षुत्वच उत्पन्न झाले नाही तर शमादी साधनांचे आचरण घडणार नाही म्हणून साधनचतुष्टयात मुमुक्षुत्व पहिल्या कमांकावर हवे असे काही लोक म्हणतील पण

प्राथमिक वैराग्य उत्पन्न झाल्यावरच साधनचतुष्टयाच्या मार्गावर चालावयास साधकाची सुरवात होते व जसजशी प्रगती होऊ लागते तसतसा तो तीव्र मुमुक्षुत्वाकडे वळू लागतो व कालांतराने मोक्षाचा अधिकारी होतो

बृहदारण्यकोपनिषदात ब्रह्मज्ञान कोणास होते याचे वर्णन करताना

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि स्थिताः।

तदा मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते। ।४.४.७

अशा रीतीने साधन चतुष्टयाच्या मार्गावर चालणारा साधक वेदान्त ज्ञानाचा अधिकारी होतो या मार्गाने जाऊन आत्मानुभूती घेणारे अनेक सिद्ध दिसतात व यातील अनेक जण सामान्य जीवन जगतानाच आत्मानुभूतीचाही आनंद घेत होते हे दिसते

व्यासमहर्षी,शुक, शंकराचार्य, समर्थ रामदास, विद्यारण्य इत्यादी अनेक निवृत्तीपर जीवन जगताना अद्वैतानुभूती घेत होते तर एकनाथ महाराज, लोकमान्य टिळक, असे अनेक कर्मयोगी सामान्य लोकात वावरत असतानाही वेदान्तपर जीवन जगत होते त्यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे मानसिक स्थैर्य अढळ रहात असे भगवद् गीतेत सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणे यांच्या आचरणात दिसत असत अशा महापुरुषांना पाहून पुढील श्लोक सार्थ झालेला दिसतो

न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले।

सर्वाशा संक्षये चेतः क्षयो मोक्ष इतीष्यते। ।अन्नपूर्णोपनिषद् २.२३

आतापार्यंत ४ साधनांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.त्या साधनांचा कम व त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध यांचा आता विचार करू.

जीवनात प्रत्यही अनुभवास येणारा संघर्ष, चांगले काम करूनही विपरीत फळ मिळणे आपोआप एखादे काम कष्टाशिवाय पार पडणे, निर्दोष व्यक्तीस त्रास व दुष्प्रवृत्त माणसांना मानमरातब मिळणे अशा गोष्टी पााहून  आजकाल काही खरे नाही अशी भावना माणसाच्या मनात उत्पन्न होते. यातूनच मग खरे काय? नित्य काय ? अनित्य काय? आपल्यापाशी काय असले पाहिजे? याचे चिंतन सुरू होते. हाच नित्यानित्य विवेक. थोडक्यात  सांगावयाचे झाले तर जीवनातील नाना बरे वाईट प्रसंग हे कारण व नित्यानित्यविवेक हे कार्य असे म्हणता येईल.

एकदा विवेक जागा झाला म्हणजे अनित्य पदार्थांची संगत नकोशी,फोल वाटू लागते व फक्त नित्य पदार्थाचा संग्रह करावा, संगती असावी  असे वाटू लागते. हेच वैराग्य.

तेंव्हा नित्यानित्यविवेक हे साधन मानले तर त्यायोगे उत्पन्न होणारे फळ म्हणजे वैराग्य असे म्हणता येईल. पाहिलेल्या व केवळ ऐकलेल्या अशा भोगसाधनांमध्ये दोष दिसून आल्यामुळे त्यांच्याविषयी नकोपणाची भावना म्हणजेच वैराग्य.

वैराग्य उत्पन्न झाले तरी ते टिकवणे मोठी अवघड गोष्ट आहे. मोठे मोठे विश्वामित्र,पराशरादी तपस्वी वैराग्यापासून चळल्याची उदाहरणे वाचावयास मिळतात. उत्पन्न झालेले वैराग्य दृढ करण्यासाठी सतत विवेक हवा व त्याबरोबरच शमादि सहा साधनांचेही आचरण हवे. तेंव्हा उत्पन्न झालेली विषयांविषयीची नकोपणाची भावना दृढ करण्यासाठी टिकवून धरण्यासाठी विवेक हवा व त्याबरोबरच शमादि साधनांचेही आचरण हवे.

अशारीतीने पहिल्या पायरीवरचा विवेक हा वैराग्याच्या पाठीशी सतत असला पााहिजे म्हणजे वैराग्य दृढ होऊ शकेल.

शम,दम,उपरति,तितीक्षा,श्रद्धा,समाधान ही सहा प्रकारची संपत्ती वैराग्यास पुष्ट करण्यासाठी आवश्यक मानली जाते. जसे भौतिक संपत्तीच्या सहायाने ऐहिक जीवन पुष्ट होते तसे या शमादी संपत्तीच्या सहाय्याने पारमार्थिक जीवन पुष्ट होते असे म्हणता येइल. ज्याच्या ठायी वैराग्य उत्पन्न झाले त्याच्यातच शमादी सफल होतात व सार्थ होतात.

वैराग्यं च मुमुक्षुत्वं तीव्रं यस्य तु विद्यते।तस्मिन्नेवार्थवन्तःस्युः फलवन्तः शमादयः।।

३0 विवेकचूडामणिः

विवेक वैराग्य व शमादी यांचा संयोग झाला म्हणजे मोक्षाविषयी तीव्र इच्छा बळावू लागते अन्य सर्व लाभ, भोग, वैभवे तृणतुल्य वाटू लागतात. रात्रंदिवस मोक्षाचाच विचार मोक्षाचेच चिंतन सुरू राहते हेच मुमुक्षुत्व.

या मुमुक्षुत्वाचे प्रयोजन मोक्ष आाहे व ते विवेक वैराग्य व शमादी संपत्तीच्या एकत्र येण्यानेच साधले जाऊ शकते. ही चार साधने वेगवेगळी दिसत असली तरी एकाचे आचरण साधले म्हणजे ते सोडून द्यावे व पुढचे साधन अंगीकारावे असे करता येत नाही. जसे एका यत्तेची परीक्षा दिली म्हणजे ती पुस्तके बाजूस सारून पुढची पुस्तके हातात घेता येतात तसे इथे करता येत नाही. या अभ्यासात सर्व साधने एकाचवेळी सोबत असावी लागतात तेंव्हाच मोक्ष या परमपुरु षार्थाची प्राप्ती होते.

## पञ्चकोश

कोश कुष्यन्ते आकृष्यन्ते फलपुष्पोत्पादकमधुमयपरागादयो यस्मिन् अशी व्याकरणगत व्युत्पत्ती कोश या शब्दाची दिली जाते. जरी हे निर्वचन वनस्पतीशास्त्राला धरून झाले असले तरी असा एक आकार ज्यात काही तरी झाकले जाते, किंवा झाकले जाऊ शकते म्हणजे कोश असे म्हणता येईल. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात विशेषतः वेदान्त दर्शनाच्या संदर्भात ५ कोशांचा विचार मांडला जातो. हे ५ कोश भौतिक अर्थाने कोश नसून तात्त्विक अर्थाने कोश आहेत. अशा अमूर्त असलेल्या कोशांच्या चर्चेचा काय लाभ ? असे म्हणावे तर पञ्चदशीतील पुढील श्लोक पहावा

गुहाहितं ब्रह्म यत्तत्पञ्चकोशविवेकतः।

बोद्धुं शक्यं ततः कोशपञ्चकं प्रविविच्यते। ३. १

तेव्हा हृदयगुहेत असलेले ब्रह्म जाणून घेण्यासाठी पञ्चकोशांचा विचार आवश्यक ठरतो. पञ्चकोश म्हणजे आत्म्याविषयीचे अज्ञान आहे ज्याच्यामुळे आत्मतत्त्व झाकले गेले आहे व जसजसे कोशांचे आवरण दूर होते तसतसे आत्मतत्त्व प्रकट होते असे म्हटले जाते.

तस्माद्वा एतस्मात्प्राणमयादन्योऽन्तर आत्मा मनोमयः। तेनैष पूर्णः।

तस्माद्वा एतस्मान्मनोमयादन्योऽन्तर आत्मा विज्ञानमयः। तेनैष पूर्णः।

तस्माद्वा एतस्माद्विज्ञानमयादन्योऽन्तर आत्माऽऽनन्दमयः। तेनैष पूर्णः। तैत्तिरीयोपनिषद् २.२.३-५

अशा प्रकारे एक एकाच्या आत असणा-या कोशांचे वर्णन वाचावयास मिळते[1]।

सर्वात बाह्यभागी असलेला व सर्वात स्थूल कोश म्हणजे अन्नमयकोश .

मातृपितृभ्यामन्ने भुक्ते सति शुकशोणिताकारेण परिणतं तयोः संयोगादेव देहाकारेण परिणमते अशी या कोशाची व्याख्या शंकराचार्य आत्मानात्मविवेकात करतात (३८).जीवाचा भौतिक देह हा मातापित्यांनी खाल्लेल्या अन्नातून आकाराला येतो,अन्नानेच त्याचे पोषण होते व शेवटी जाळल्याने अथवा पुरल्याने त्याची माती होउन पुन्हा त्या मातीतून अन्न उत्पन्न होते किंवा मनुष्ये ही देवांचे अन्न असल्याचे ही उपनिषदात वाचावयास मिळते.

प्राणमयकोश

तस्माद्वा एतस्मादन्नरसमयात् अन्यः अन्तरः आत्मा प्राणमयः तेनैष पूर्णः तैत्तिरीय २.२ या प्राणमय कोशाने अन्नमयकोशास आतून एखाद्या अस्तराप्रमाणे व्यापलेले असते असे म्हटले जाते. पुरुषाकार अशा या कोशाचे अवयव उपनिषद् असे सांगते.

प्राण हे शिर,व्यान ही उजवी बाजु,अपान ही डावी बाजु,पृथ्वी हे शेपूट व आकाश हा आत्मा असे वर्णन तैत्तिरीय उपनिषदात मिळते.

प्राण म्हणजे नाकावाटे घेतला जाणारा वायू एवढाच अर्थ उपनिषत्कारांना अभिप्रेत नाही.प्राण म्हणजे चैतन्य किंवा जीवनशक्ती हा अर्थ घेतला तरच प्राणाचे रहस्य उलगडू शकेल.जसा एकच माणूस कार्यालयात अधिकारी, घरी वडील व रस्त्यावर सामान्य नागरिक असतो तसेच एकच प्राण स्थानपरत्वे व कार्य परत्वे अपान,व्यान,उदान,समान असा अन्य ४ नावांनी ओळखला जातो.जो या प्राणांची उपासना त्यांच्या पाचही क्षेत्रात करतो म्हणजेच संयमनाने जगतो व प्राणशक्तीचा अपव्यय करत नाही तो मानवी जीवनाची पूर्ण मर्यादा जगतो.

शरीरात जसे मस्तकाचे स्थान व महत्त्व दोन्ही सर्वोपरी असते तसेच या शरीराकार प्राणमय कोशात मुख्य प्राणाचे स्थान शिर असल्याचे श्रुती सांगत आहे.स्थानपरत्वे जरी एकच प्राण वेगवेगळ्या नावांनी

---

[1] तैत्तिरीय उपनिषदातील २.२.३-५ या मंत्रात आलेल्या कल्पनेचा विस्तार करून शंकराचार्यांनी पंचकोश नावाची संकल्पना रूढ केली. भारतीय तत्त्वज्ञान श्रीनिवास दीक्षित.पृ ३१९

ओळखला जात असला तरी मस्तकाच्या ठिकाणी राहणारा प्राण हा सर्वाहून अधिक महत्त्वाचा आहे हे श्रुती येथे सांगत आहे.

असे जरी या प्राणमयकोशाचे महत्त्व सांगितले असले तरी त्याच्या सामर्थ्याला मर्यादा आहेत व त्यांचे यथार्थ वर्णन पञ्चदशीकार असे करतात,

पूर्णो देहे बलं यच्छन्नक्षाणां यः प्रवर्तकः।

वायुः प्राणमयो नासावात्मा चैतन्यवर्जनात्।।३.५

प्रस्तुत प्रबंधाचा विषय असलेल्या वेदान्तबोध ग्रंथातही प्राणमयकोशाचे आत्मत्व नाकारलेले आहे.ते असे

कोशः प्राणमयोऽयं वायुविशेषो वपुष्यवत् छिन्नः।

अस्य कथमात्मता स्यात् क्षुत्तृष्णाभ्याम् उपेयुषःपीडाम्।।10 वेदान्तबोध

बोली भाषेत सुद्धा भुकेने किंवा तहानेने प्राण व्याकूळ झाले असे म्हणण्याचा प्रघात आहेच.तसेच प्राणांचे भांडण वर्णन करताना उपनिषदांनी त्यांना भावभावनांनी युक्त रंगविले आहे.अर्थात विकारयुक्त प्राण सर्वसमर्थ असूच शकत नाहीत.

मनोमयकोश

तस्माद्वा एतस्मात्प्राणमयात्।अन्योऽन्तर आत्मा मनोमयः।। तैत्तिरीय २.२

प्राणमयाच्या आतील कोश म्हणजे मनोमयकोश.हा मनोमयकोशही प्राणमयाप्रमाणे पुरुषाकार आहे. यजुर्वेद हे शिर,ऋग्वेद ही उजवी बाजू,सामवेद ही डावी बाजू वेदोक्त आदेश हा आत्मा व अथर्ववेदातील ऋचा हा आधार असे वर्णन तैत्तिरीय उपनिषदात मिळते.कर्मकांडातील धर्माचरणाच्या सर्व नियमाचा तपशील देणा-या वेदांमधील आदेशांनी मनोमयकोशाचा मुख्य भाग कल्पिला आहे.अथर्वण वेदामध्ये सर्व भौतिक शास्त्रांचे ज्ञान समाविष्ट होते असे आपण म्हणतो तेव्हा मनोमय कोशाचे ते अधिष्ठान आहे या विधानास वेगळा अर्थ व महत्त्व प्राप्त होते कारण मनच भौतिक समृद्धीची इच्छा करत असते.

सर्व मानवी स्वभावविशेषांचे स्थान म्हणजे मनोमयकोश .व्यक्तीचे व्यक्तिमत्व कसे आहे या कोशावरून ठरते. असं जरी या मनोमयकोशाचे महत्त्व सांगितले असले तरी त्याच्या सामर्थ्याला मर्यादा आहेत व त्यांचे यथार्थ वर्णन पञ्चदशीकार असे करतात,

अहंतां ममतां देहे गेहादौ च करोति यः।
कामाद्यवस्थया भ्रान्तो नासावात्मा मनोमयः।। ३. ६

वेदान्तबोधकार सुद्धा असाच विचार व्यक्त करतात
कुर ते वपुषि अहंतां गेहादौ यः करोति ममतां च।
रागद्वेषविधेयो नासौ आत्मा मनोमयः कोशः। ।११ वेदान्तबोध

विज्ञानमयकोश

मनोमयकोशाच्या आत असणा-या या विज्ञानमय कोशाचे वर्णन श्रुतीनी खालीलप्रमाणे केले आहे. श्रद्धा हे शिर, ऋत हे उजव अंग, सत्य हे डावं अंग, योग म्हणजे चित्तैकाग्र्य हा आत्मा व महः नावाचा परमात्मा हे त्याचे पुच्छ असे वर्णन आहे.

मस्तक हे शरीराचे अत्यंत महत्वाचे अंग आहे त्याचं स्वरूप विज्ञानमयकोशात श्रद्धा हे आहे. श्रद्धा म्हणजे आपण स्वतःच विवेकपूर्वक आत्मसात केलेल्या ध्येयधोरणाशी तद्रूप होउन ते सातत्याने आचरणात आणण्याचे आपल्या अन्तःकरणातील धैर्य. यालाच सोप्या शब्दात आत्मविश्वास म्हणता येईल. आत्मविश्वास असल्याशिवाय आपण आपली कामे नीट पार पाडू शकत नाही.

ऋत हे विज्ञानमय पुरुषाचे उजवे अंग आहे. ऋत म्हणजे बौद्धिकरीत्या पटवून घेतलेली व परिशीलन केलेली श्रुतिग्रंथांची सारतत्त्वे. किंवा ऋत म्हणजे त्रिकालाबाधित देशकालाच्या सीमांच्या पलीकडे असणारे सत्य. सोप्या भाषेत सत्य म्हणजे श्रुतींची सारतत्त्वे जगण्यात आणण्यासाठी लागणारे धैर्य.

योग हे विज्ञानमय पुरुषाचे धड किंवा मुख्य भाग असे म्हटले आहे. योग म्हणजे योगासने किंवा प्राणायमादि अंगे असा अर्थ इथे अभिप्रेत नाही. युज् म्हणजे जोडणे, मनाच्या द्वारा आजचे आपले अपूर्ण जीवन सत्याच्या उदात्ततर व महान संकल्पनेशी जोडण्याच्या किंवा जीवाच्या परमात्म्याशी संबंध जोडण्याच्या प्रयत्नास योग म्हणतात.

असा हा अतिशय महत्वपूर्ण कोशदेखील आत्मा नाही असे विद्यारण्यमुनी मानतात.

लीना सुप्तौ वपुर्बोधे व्याप्नुयादनखाग्रगा।
चिच्छायोपेतधीर्नात्मा विज्ञानमयशब्दभाक्।।३. ७

याही विषयी पञ्चदशीकार व वेदान्तबोधकार यांचे मतैक्य दिसते
सुप्तौ स्वयं विलीना बोधे व्याप्ता कलेवरं सकलम्।
विज्ञानशब्दवाच्यो चित्प्रतिबिंबानबुद्धिः अप्यात्मा।।१२ वेदान्तबोध

आनन्दमय कोश

या कोशाचे वर्णन करताना उपनिषद् अधिक सूक्ष्म भाव भावनांचा आधार घेताना दिसते. या पुरुषाकार कोशाचे प्रिय हे शिर, मोद हे दक्षिण अंग,प्रमोद हे उत्तर अंग, आनंद हा आत्मा,ब्रह्म हे पुच्छ किंवा अधिष्ठान असे म्हटले आहे. ज्ञानेन्द्रिये जगातील विषयांच्या संपर्कात येतात व आनंदाचा अनुभव घेतात अशा अनेक आनंदमय अनुभवांनी हा कोश बनलेला असतो.

प्रिय हे शिर म्हणजे काय? जेव्हा प्रिय वस्तु अथवा व्यक्ती जवळ नसते पण नुसत्या तिच्या चिन्तनाने जो आनंद अनुभवास येतो तोच प्रिय व तोच पुरुषाकार आनंदमयकोशाचे शिर.

मोद हे उजवं अंग म्हणजे काय? हा जो मोद आहे तो प्रियाहून सूक्ष्म आहे. जेव्हा प्रिय वस्तु अथवा व्यक्ती जवळ असते तेव्हा जो आनंदानुभव येतो तोच मोद.

प्रमोद म्हणजे प्रियवस्तु अथवा व्यक्ती नुसती जवळ नसते तर प्रेम करणारा तिचा उपभोग घेत असतो, तेव्हा होणा-या आनंदास प्रमोद म्हटले आहे. पुरुषाकार आनंदमयकोशाचे हे डावे अंग आहे.

आनंद हा आत्मा असं ऋषी म्हणतात प्रिय मोद व प्रमोद या तीनही अवस्थांमध्ये आनंद समान आहे तोच आत्मा म्हणून सांगितला आहे. या सर्व प्रकारच्या आनंदाचे अधिष्ठान वस्तुतः सर्वव्यापक ब्रह्मच आहे अशा अर्थाने आनन्दमय कोशाचा आधार ब्रह्म सांगीतले आहे.

असा हा सर्वाहून सूक्ष्म कोशदेखील आत्मा नाही असे विद्यारण्यमुनी मानतात.

कदाचित्कत्वतो नात्मा स्यादानन्दमयोऽप्ययम्।
विम्बभूतो य आनन्दः आत्माऽसौ सर्वदास्थितेः।।३. १०

आनन्दमयाचे आत्मत्व वेदान्तबोधाने ही नाकारलेले आहे

सुप्तिगतैः सुखलेशैःअभिमनुते यः सुखीभवामीति ।

आनंदकोशनामा असौ अहंकारः कथं भवेदात्मा । ।**13** वेदान्तबोध

आनन्दमयाचीही अनुभूती आकाशातील ढगाप्रमाणे कधी येते कधी येत नाही म्हणून त्याला आत्मा म्हणता येत नाही .

अन्नमयापासून आनन्दमयापर्यन्त उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाणारे हे कोशच आत्मस्वरूप असल्याचा भ्रम जीवास बंधनात टाकतो . आत्मा हा कोशांचा द्रष्टा व नियामक असल्यामुळे कोश त्याच्या स्वाधीन असले पाहिजेत हे जेव्हा लक्षात येते तेव्हा जीवाची कोशांविषयी आसक्ती सुटते व पञ्चकोशांच्या विवेकाने जीव मुक्तीच्या मार्गास लागतो .

| कोश | क्लेश | अनुभव |
|---|---|---|
| अन्नमय | अविद्या | मी देह आहे, भोवती दिसणारे अनुभवास येणारे जग खरेच आहे |
| प्राणमय | अस्मिता | माझी इन्द्रिये (इन्द्रियांनाच उपनिषदांनी प्राण म्हटलेले आहे) जाणतात ते बरोबरच असते, मी म्हणतो तेच खरे |
| मनोमय | राग | एखाद्या पदार्थाविषयी आसक्ती, लालसा,हवेसे वाटणे हा मनाचा गुणधर्म |
| विज्ञानमय | द्वेष | बुद्धीच्या सहाय्याने एखादा पदार्थ वाईट ठरवून त्याच्यापासून दूर राहणे त्याला टाळण्याचा प्रयत्न करणे |
| आनन्दमय | अभिनिवेश | कधी कधी मी आनंदाचा अनुभव घेतो म्हणजे मी आनंदरूप नाही तर देहाकार आहे अमुक लिंगाचा अमुक धर्माचा अमुक वर्णाचा आहे असे वाटणे व त्याविषयी अभिमान बाळगणे . |

तैत्तिरीय उपनिषदानेच पंचकोशांच्या निरूपणानंतर पुढे त्यांच्या आत्मत्वाचे निराकरणही केले आहे।

अस्माल्लोकात्प्रेत्य एतमन्नमयमात्मनमुपसंक्रम्य ।२.१0

## लक्षणाविचार

वाच्यार्थ द्योतकार्थ व ज्ञापकार्थ

वाच्यार्थ ज्या धातुपासून शब्द उत्पन्न झालेला असतो त्या धातूच्या अर्थानुसार होणारा अर्थ

द्योतकार्थ संदर्भानुसार घेतला जाणारा अर्थ जसे की राम असे म्हटल्यावर दाशरथी, जामदग्न्य किंवा यदुवंशीय हे ठरवण्यासाठी संदर्भ लक्षात घ्यावा लागतो

ज्ञापकार्थ शब्द कानावर पडल्यावर शब्दविषय असलेल्या वस्तूचे अनेक गुणविशेष जाणवतात तो ज्ञापकार्थ.एखाद्या व्यक्तीस भीम म्हणताच त्याचे बलसंपन्नत्व, प्रचंड आहार, विशाल शरीर या सगळ्या गोष्टींचे ज्ञान होते.

शब्दाचे वाच्यार्थ व लक्ष्यार्थ असे दोन अर्थ मानले जातात. जेव्हा अभिधागत अर्थ सोडून अन्य रूढ असा अर्थ घेतला जातो तेंव्हा त्याला लक्षणागत अर्थ असे म्हणतात. रोजच्या व्यवहारात आपण असे अनेक प्रयोग करत असतो.एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षक जेंव्हा फार शहाणा आहेस असे म्हणतात तेंव्हा आपलं काय बरे चुकले असा मुलास प्रश्न पडतो, एखाद्या गरीब स्त्रीचे वर्णन लंकेची पार्वती या शब्दात तर कृश माणसाचे वर्णन पाप्याचे पितर असे केले जाते.

या व्यवहारातील शब्दप्रयोगांना शास्त्रीय व्याख्येत बांधण्याचे काम शास्त्रकार करतात.

मुख्यार्थाचा त्याग करून पण रूढीच्या आधाराने अथवा काहितरी हेतू ठेवुन अर्थघटन केले जाते व त्यातून वेगळाच अर्थ सुचवला जातो तेंव्हा त्या कियेला लक्षणा असे म्हणतात[1].या लक्षणेचे पुढे जहत् , अजहत् व जहदजहत् असे तीन प्रकार होतात.याच प्रकारांना जहत्स्वार्था,अजहत्स्वार्था व जहदजत्स्वार्था असेही म्हणण्याचा प्रघात दिसतो.या तीनही प्रकारांचे स्पष्टीकरण असे.

---

[1] काव्यप्रकाशकार मम्मट आपल्या काव्य प्रकाश या प्रसिद्ध ग्रंथाच्या दुस-या उल्लासात १२ व्या सूत्रात म्हणतात

मुख्यार्थबाधे तद्योगे रूढितोऽथ प्रयोजनात्।

अन्योऽर्थो लक्ष्यते यत् सा लक्षणारोपिता किया।।

जहत्/ जहत्स्वार्था  हा जहाति  या धातूपासून हा शब्द सिद्ध झालेला दिसतो.जेंव्हा भाषेत प्रयोग करताना मुख्यार्थाचा त्याग करून अन्यच अर्थ घेतला जातो तिथे स्वार्थाचा त्याग दिसून येत असल्याने जहत्स्वार्था असं त्याचे वर्णन केले जाते. याचे प्रसिद्ध उदाहरण म्हणजे

गङ्गायां घोषः  गंगेवर गौळिवाडा आहे हे वाक्य ऐकल्यावर ऐकणारा माणूस बोलणा-यास वेडा ठरवत नाही गंगेच्या पाण्यावर गौळिवाडा असूच शकत नाही असं म्हणत नाही तर गंगेच्या काठी असलेल्या गौळिवाडयाच्या मानसिक चित्राने तेथील थंड वारा,पवित्र वातावरण  व अशा ठिकाणी राहणा-या गायींचे दूध किती गुणकारी असेल असे मनात येऊन सहजच  वा छान  असं म्हणून जातो. इथे गङ्गायां या सप्तम्यन्त पदाचा अधिकरणभावाने वर,खाली, आत अथवा मध्ये असा मुख्य अर्थ सोडून गंगेच्या काठी असा अन्यच अर्थ घेतला जातो.अशा प्रकारची अन्य काही व्यवहारातील उदाहरणे अशी  पाहुण्यांना सोडायला गाडीवर जातो  ,  विद्यार्थ्यांनी वर्ग डोक्यावर घेतला  , श्रोते स्वरानंदात डुंबत होते  .

अजहत्स्वार्था

या ठिकाणी अ या उपसर्गाचा नकारात्मक अर्थ घेणे अभिप्रेत आहे.ज्या उदाहरणात पदाचा मुख्य अर्थ म्हणजेच स्वार्थ सोडला जात नाही त्याच्या आधारानेच वाक्याचा अर्थ लावला जातो त्याठिकाणी अजहत्स्वार्था लक्षणा मानली जाते. या प्रकारचे प्रसिद्ध उदाहरण  श्वेतो धावति  हे आहे.पांढरा हा रंगवाचक शब्द म्हणजे विशेषण आहे व त्याचे धावणे मानता येत नाही असे न म्हणता पंढरा घोडा धावतो असा अर्थ घेतला जातो. इथे पांढरा रंग सोडला जात नाही तर धावण्याच्या कियेबरोबर त्याचा अन्वय मानला जातो.

या प्रकाराचे दुसरे उदाहरण  कुन्ताः प्रविशन्ति  इथे भाले प्रवेश करतात असा शब्दशः अर्थ न घेता भाले धारण करणारे पुरूष प्रवेश करतात असा अर्थ घेतला जातो.मुळ वाक्यातील कुन्ताः या शब्दाचा संपूर्ण त्याग न करता त्या भाल्यांना घेउन चालणारे पुरुष हा अर्थ घेतात.

व्यवहारात  घराला जाग आली  हे वाक्य याच लक्षणेचे उदाहरण मानता येइल.

जहदजहत् लक्षणा

या प्रकारासच भागत्यागलक्षणा असेही म्हणतात.मुख्य वाक्यातील काही भागाचे ग्रहण व काही भागाचा त्याग करून जेंव्हा अर्थबोध होतो तेंव्हा ही लक्षणा मानली जाते.या प्रकाराचे प्रसिद्ध उदाहरण म्हणून सोऽयं देवदत्तः हे वाक्य सांगीतले जाते.

त्या काळी त्या स्थळी पाहिलेला देवदत्त नावाचा पुरूष व आता ह्यास्थळी दिसत असणारा पुरूष एकच आहे असा वाक्यार्थ आहे.पण त्या काळी व त्या स्थळी असणारा देवदत्त या स्थळी व या काळी असू शकत नाही कारण तो काळ परत येऊ शकत नाही( त्या काळाचे परोक्षत्व सोडले) व त्या देवदत्तात कालानुरूप काही बदलही झालले असणारच त्यामुळे तोच हा देवदत्त हे विधान चूक ठरते. पण ते स्थळ व तो काळ सोडून त्यातील देवदत्ताचे ग्रहण केले जाते व त्या आधाराने व्यवहारही चालतात.

या साहित्यविषयक चर्चेचा वेदान्ताशी काय संबंध?

महावाक्य म्हणजे मोठा आशय सांगणारे वाक्य.महावाक्य या नावाप्रमाणे हे मोठे वाक्य नसते तर मोठा आशय सांगणारे छोटे वाक्य असते. अशी चार महावाक्ये पासिद्ध आहेत व खूप मोठा आशय कमी शव्दात सांगण्यासाठी त्यांची योजना असल्यामुळे ती वाक्ये अधिकारी व्यक्तीकडून समजून घेण्याचा प्रघात आहे. आतापार्यन्त ज्या लक्षणाविषयाची चर्चा आपण केली त्या लक्षणेच्या सहाय्याने या महावाक्यांचा आशय समजून घेता येतो.

चार महावाक्ये अशी

| | | |
|---|---|---|
| प्रज्ञानं ब्रह्म | ऋग्वेद | ऐतरेयोपनिषद् ५. १ |
| अहं ब्रह्मास्मि | यजुर्वेद | बृहदारण्यकेपनिषद् १ . ४. १० |
| तत्त्वमसि | सामवेद | छान्दोग्य ६ . ८. ७ |
| अयमात्मा ब्रह्म | अथर्ववेद | माण्डूक्योपनिषद् २ . ५. १९ |

या वाक्यांवरून सर्वोच्च ज्ञानाचा बोध करून घेण्यासाठी मार्गदर्शन हवे.या पैकी तत्त्वमसि हे वाक्य फार प्रसिद्ध असून ते समजून घेताना लक्षणेचा कसा उपयोग होतो ते पाहू.

तत् त्वम् असि अशा ३ पदांचा अर्थ लावताना

तत् म्हणजे ते ब्रह्म किंवा ईश्वरतत्त्व

त्वम् म्हणजे तू जीव या संज्ञेने वर्णिला जाणारा

असि म्हणजे आहेस असा जीव व ब्रह्म यांचे ऐक्य दाखवणारा शब्द

तेंव्हा तीनही पदांनी मिळून ते ब्रह्म तू आहेस असा बोध सुचवला जातो.

आता इथे जहदजहत् लक्षणा कशी उपयोगी पडते ते पाहू.

तत् या पदातील ईश्वराचे सर्वज्ञत्वादि गुण सोडून चैतन्यत्व लक्षात घेतले जाते व त्वं या पदाने सुचवलेल्या जीवाचे अज्ञानमयत्वादि गुण सोडून चेतनत्वाचे ग्रहण केले जाते. याप्रमाणे काही भागाचे ग्रहण व काही भागाचा त्याग होत असल्याने या लक्षणाप्रकारास जहदजहत् अथवा भागत्यागलक्षणा असे म्हणतात.

अशा रीतिने या प्रकरणात साधनचतुष्टय,पञ्चकोश व लक्षणा या वेदान्तातील महत्वाच्या संकल्पनांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. एकदा का या कल्पना स्पष्ट झाल्या की वेदान्तबोध या शोधनिबंधाचा विषय असलेल्या ग्रंथातील विषय अवघड वाटणार नाही.

ॐॐॐॐॐॐ

# उपसंहार

ग्रंथाचे नाव आपल्याला ग्रंथाचा विषय काय आहे हे सांगते. संशोधनाचा विषय असलेला ग्रंथ बोधार्या व वेदान्तबोध या दोन नावांनी ओळखला जातो. बोधार्या नावात बोध व आर्या ही दोन पदे आहेत आणि बोध करून देणा-या आर्या हे लक्षात येते पण कोणत्या विषयाचा बोध हे स्पष्ट होत नाही. याउलट वेदान्तबोध या शीर्षकात वेदान्त व बोध ही दोन पदे दिसतात. हा एक सामासिक शब्द आहे. समासाचा विग्रह वेदान्ताचा बोध असा करता येतो व प्रस्तुत ग्रंथ वेदान्त विषयावर प्रकाश टाकत असेल हे नावावरून लक्षात येते. थोडासा वेगळा विचार केला व वेदान्त हाच बोध असा विग्रह मानला तर वेदान्ताच्या मार्गाने जाणे खात्रीने आत्मज्ञानाचे साधन बनते हा अर्थ लक्षात येतो. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वेदान्ताचे मूर्धन्य स्थान लक्षात घेतले तर वेदान्त हाच बोध ही फोड अधिक बरोबर वाटते.

अगदी अशाच पद्धतीने समर्थ रामदासांनी दासबोधात वेदान्ताची महती मांडलेली दिसते.

ग्रंथ मात्र महाराष्ट्र ।त्याहून संस्कृत श्रेष्ठ।

त्या संस्कृतामध्ये स्पष्ट। थोर तो वेदान्त।।

त्या वेदान्तापरते काही।सर्वथा श्रेष्ठ नाही।

जेथे वेदगर्भ सर्वही। प्रगट झाला।।ओवी ३६,३७ समास ६ दशक ५

एकदा का वेदान्ताच्या मार्गावर वाटचाल सुरु केली, वेदान्ताच्या शिकवणीप्रमाणे वागायला लागले म्हणजे परिणामी बोध होणारच हा विश्वास लेखकाने शीर्षकातच व्यक्त केला आहे असे म्हणता येईल.

वेदान्तावर दीर्घकाळ चिंतन मनन होऊन वेदान्त दर्शनाच्या अद्वैत,विशिष्टाद्वैत शुद्धाद्वैत द्वैताद्वैत व द्वैत अशा शाखा[1] निर्माण झाल्या पण केवलाद्वैत या शाखेचा प्रचार मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने या केवलाद्वैत मताचा विचार मांडलेला दिसतो.

---

[1] वेदांताच्या शाखा :-

| | | |
|---|---|---|
| अद्वैत | शंकराचार्य | इ स ७०० ते ८०० |
| विशिष्टाद्वैत | रामनुज | इ स १०१६/१०१७ |
| द्वैताद्वैत | निंबार्काचार्य | इ स १११४ |
| द्वैत | मध्वाचार्य | इ स ११९७ |
| शुद्धाद्वैत | वल्लभाचार्य | इ स १४७९ |

आदि शंकराचार्य या शाखेचे प्रवर्तक मानले जात असले तरी त्यांच्या पूर्वीही हा अद्वैत विचार प्रतिपादला गेला होता असे दिसते.

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः। ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।।

हा जीव व ब्रह्माचे ऐक्य सांगणारा शंकराचार्यांचा प्रसिद्ध श्लोक अद्वैत परंपरेचे जणू घोषवाक्यच झाला आहे. ब्रह्मज्ञानावलीमाला नावाच्या एका शंकराचार्यांच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या स्तोत्रात वरील श्लोक थोडा वेगळा मिळतो

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर। अनेन वेद्यं सच्छास्त्रमिति वेदान्तडिण्डिमः।।२०

प्रस्तुत ग्रंथातही

ब्रह्म त्वमेवतस्मान्नाहं ब्रह्मेति मोहमात्रमिदम्।

मोहेन भवति भेदः क्लेशास्सर्वे भवन्ति तन्मूलाः।।६।।

या शब्दात लेखकाने जीव व ब्रह्म यांचे अद्वैत दाखवले आहे. तूच ब्रह्म आहेस हा विचार मांडल्यावर काय ब्रह्म नाही हे सांगणे आलेच. तैत्तिरीयोपनिषदातील २.२.३,४,५ या मंत्रांच्या आधारे शंकराचार्यांनी प्रथम पंचकोशांचा विचार मांडला. ते अन्नमयादि ५ कोश हे ब्रह्म नाहीत हे ९ ते १३ या आर्यामध्ये आटोपशीरपणे सांगितले आहे. पंचकोशांवर विवेक करणा-यास पंचक्लेश त्रास देत नाहीत हे लेखकाचे सांगणे[1] योगदर्शनातील अविद्यादि पंचक्लेशांची[2] आठवण करून देते.

या पुढे येणारे तत्त्वमसि या महावाक्याचे पदशःकेलेले निरूपण लक्षणेचा विचार विस्ताराने मांडते. गङ्गायां घोषः शोणो धावति तसेच सोऽयं द्विजः अशा परंपरेने रूढ असलेल्या वाक्यांचा यथायोग्य उपयोग करीत लेखक जीवब्रह्मैक्य सहज दाखवतो.

काम्य व निषिद्ध कर्मे त्यागून विहित कर्म यथासांग केले असता अंतःकरण मलरहित होईल व आपोआपच ज्ञान प्राप्त होईल मग गुरुकृपेची काय आवश्यकता? असा पूर्वपक्ष स्थापन करून गुरुकृपेची महती सांगितली आहे.

---

[1] न क्लेशपञ्चकमिदं भजते कृतकोशपञ्चकविवेकः।
अत एव पञ्चकोशान्कुशलधियस्संततं विचिन्वन्ति।।७

[2] अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाःक्लेशाः। साधनपाद सूत्र ३

कर्मभिरेव न बोधः प्रभवति[1] गुरुणा विना दयानिधिना।
आचार्यवान् हि पुर षो वेदेत्यर्थस्य वेद सिद्धत्वात्।।४३

या आर्येतील आचार्यवान् ही पुरुषो वेद हा वाक्यांश छांदोग्य उपनिषदातील (छान्दोग्य ६.१४.२ )आहे व उपनिषदानी सुद्धा आचार्य कृपेचे महत्त्व मान्य केले आहे हे दाखवून पूर्वपक्षाच्या आक्षेपाचे निराकरण केले आहे. तसेच जिज्ञासू वाचकास छांदोग्य उपनिषद् वाचण्यास प्रवृत्त केले आहे. येथे श्वेताश्वतरोपनिषदातील गुरुभक्तीविषयक यस्य देवे पराभक्तिः यथा देवे तथा गुरौ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः।। ६.२३ या मंत्राचे स्मरण होते.

यानंतर वेदमहती सांगतांना वेदवाक्यांहून अन्य कशासही प्रमाण मानणे हे चुकीचे आहे हे दृष्टांत देऊन समजावले आहे. येथे वेदांना स्वतः प्रमाण मानण्याच्या परंपरेचा अभिमान दिसून येतो.

एधोभिरेव दहनं दग्धुं वांछति ते महात्मानः ४६

सर्पणानेच अग्नीस जाळतो असे समजणे जसे मूर्खपणाचे तसेच व तेवढेच वेदवाक्यांहून अन्य कशाने ज्ञान होईल असे समजणे मूर्खपणाचे आहे. असे समजणा-या मनुष्यास उपहासाने महात्मानःम्हटले आहे. टीका करतानाही कठोर शब्द न वापरण्याचा लेखकाचा हा प्रयोग कौतुकाचा वाटतो.

द्वैताद्वैताचा विचार उलगडून दाखवताना अद्वैत हेच सत्य व या सत्यस्वरूप अद्वैतावरच द्वैत अध्यस्त होत असते हे सप्रमाण सिद्ध केले आहे. शिंपल्यावर भासणारे रूपे, मृगजळात भासणारे पाणी असे पूर्वाचार्यानी वापरलेले दृष्टांत देऊन जगाचे मिथ्यात्व दाखविले आहे. येथेच वाचकांचा श्रीमच्छङ्कराचार्यांनी मांडलेल्या अध्यासविषयाशी सहजच परिचय होतो.

प्रत्यक्षाद्यनवगतं श्रुत्या प्रतिपादनीयमद्वैतम्।
द्वैतं न प्रतिपाद्यं तस्य स्वयमेव लोकसिद्धत्वात्।।५४

अद्वैत हे प्रत्यक्षादी प्रमाणांनी अवगत होऊ शकत नाही त्याचे ज्ञान होण्यासाठी श्रुतींचेच सहाय्य घ्यावे लागते पण द्वैताचे प्रतिपादन करावे लागत नाही कारण ते मी-माझे, तू तुझे अशा स्वरूपाने सर्वांच्या अनुभवाचे असते. द्वैताचे दुःखमयत्व लक्षात घेऊनच श्रुतीवाक्ये सुद्धा सदैव अद्वैताचेच निरूपण करत असतात.

[1] कर्माचरणाचा अतिरेकी आग्रह धरणा-या लोकांना समजावून सांगितले जात आहे.

अद्वैतं सुखरूपं दुःसहदुःखं सदा भवेत् द्वैतम्।
तत्र प्रयोजनं स्यात्प्रतिपादयति श्रुतिस्तदेवासौ।।५५

पुढे जीव व ब्रह्म यांची चर्चा करताना जीव व बह्म कधीच एक असू शकत नाहीत या पूर्वपक्षाच्या विचाराचे रसप्रक्रियेने हलक्या धातूंवर अल्पकाल येणा-या सोन्याच्या झळाळीचा दृष्टंत देऊन शेवटी श्रुतीच अद्वैत सांगत आहे असा निर्वाळा दिला आहे.

चार महावाक्यांची जरी तत्त्वबोधासाठी आवश्यकता मानली जात असली तरीही तत्त्वमसि या वाक्याचे महत्व काही वेगळेच आहे असे दिसून येते.काही लोकांच्या मते भगवद्गीतेतील पहिले सहा अध्याय तत् पदाचे, पुढचे सहा त्वम् पदाचे व शेवटचे सहा असि पदाचे निरूपण करतात.शंकराचार्य विरचित दशश्लोकीमध्ये सुद्धा तत्त्वमसि चे निरूपण आहे असे मानले जाते. त्याच परंपरेस अनुसरून वेदान्तबोधकारही ६५ व्या आर्येत इतर सर्व वाक्ये म्हणजे तत्त्वमसि या महावाक्याचे सार काढून घेतल्यावर उरलेले तत्त्व आहे असे म्हणतात.

ज्ञान व कर्म हा पूर्वापार चर्चेत असलेला विषय लेखकाने सोडलेला नाही.ज्ञानकर्मसमुच्चयावर शंका उपस्थित करून ७० व्या आर्येत मोह म्हणजेच अज्ञान व त्याच्या निवृत्तीसाठी ज्ञानच एकमेव साधन आहे हे समजवण्यासाठी सूर्याचा दृष्टांत योजला आहे.

आत्म्याचे वर्णन करताना श्रुती अरूप, असंग, गुणातीत इत्यादि विशेषणे वापरत असतात.या विशेषणातील असंगत्वाचे निरूपण दृष्टांत देऊन प्रभावीपणाने केले आहे.

रज्वादेरूरगाद्यैः संबंधवदस्य दृश्यसंबन्धः।
सततमसंगोऽयमिति श्रुतिरमुमर्थमेव साधयति।।७२

आत्मा जरी जीवाच्या रूपाने वेगवेगळ्या प्रसंगात अहंभावाने गुंतलेला दिसत असला तरी दोरीवर भासणा-या सर्पाचा जेवढा संबंध दोरीशी असतो तेवढाच आत्म्याचा जगातील व्यवहाराशी असतो हे स्पष्ट केले आहे.असाच विचार कठोपनिषदातही मध्ये वाचावयास मिळतो[१], अर्थात् जगातील सर्व घटना व

---

[1] सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षुर्न लिप्यते चाक्षुषैर्बाह्यदोषैः।एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा न लिप्यते लोकदुःखेन बाह्य।।
२.२.११

पदार्थ यांना आधारभूत असूनही त्यांच्या गुणदोषांचा संग आत्यास होत नाही. बृहदारण्यकोपनिषदातसुद्धा याज्ञवल्क्य-गार्गी संवादात वर खाली आत बाहेर,झालेले,असणारे, होणारे काय आहे? असा प्रश्न विचारल्यावर उत्तर रूपाने ते अक्षर, असंग, अगन्ध इत्यादी विशेषणे वापरून आत्याचे वर्णन केलेले आहे. यावरून लेखकाचा उपनिषदांचा व्यासंग लक्षात येतो.

७७ ते ७९ या आर्यांमध्ये असद्वादाचा थोडक्यात समाचार घेतलेला दिसतो. दृष्टांत देऊन असत् चे जगत्कारणत्व नाकारले आहे. तुटे वाद संवाद तो हीतकारी या मनाच्या श्लोकातील उक्तीप्रमाणे शास्त्र व युक्तीनेही असद्वाद सिद्ध होत नाही असे म्हणून वाद संपवून टाकत विषय पुढे नेला आहे.

जे जे काही दिसते ते खरे नाही तर भ्रम आहे परमार्थाने खरे नाही हे केवलाद्वैतवाद्यांचे मत वेदान्तबोधकारांनाही मान्य आहे. त्यामुळे जगताविषयी सत्यत्वबुद्धी असणा-या माणसांना अपक्वचित्त असे म्हणून अशी सत्यत्वबुद्धी पुनःपुनःजन्ममृत्यूचे कारण बनते हे स्पष्ट केले आहे.

मी मी अशी जी अनुभूती येत असते ते अन्य काही नसून ब्रह्माचेच अस्तित्व असते असे अहंकाराचे स्वरूप उलगडून दाखवण्यासाठी तापलेल्या लोखंडाचे उदाहरण दिले आहे. तप्त लेखंडाच्या गोळ्यात जे दाहकत्व व प्रकाशमयत्व अनुभवास येत असते ते त्या लोखंडाच्या गोळ्याचे नसून त्याचा ज्या अग्नीशी संग झालेला असतो त्या अग्नीचे असते. त्याच प्रमाणे अहंकाराचे अस्तित्व सुद्धा ब्रह्मामुळे असते[1].

शेवटच्या १०५ पासून १४३ पर्यंतच्या आर्या म्हणजे लेखकाच्या बुद्धीकौशल्याचा अद्भूत नमूना आहे. अ पासून क्ष पर्यंत एक एक वर्ण घेऊन अर्थगर्भ अशा आर्या रचल्या आहेत. साहित्याच्या प्रांतात अशा प्रकारे चमत्कृतिपूर्ण, कळण्यास कठीण अशा रचना करण्याची परंपरा दिसून येते. महाकवी भारवीच्या किरातार्जुनीय काव्यातील पहिल्या ३ सर्गांना त्यांच्या कठीणतेमुळे पाषाणत्रय असे म्हणतात. श्रीहर्षकृत नैषधीयचरितम् च्या बद्दल तर नैषधम् विद्वद् औषधम् असे म्हटले जाते. अशा रचना करण्यात संत संन्यासीही मागे नाहीत. वासुदेवानंदसरस्वतींची अनेक स्तोत्रे मंत्रगर्भस्तोत्रे म्हणून

---

[1] हा तप्त लोखंडाच्या गोळ्याचा दृष्टांत दुस-या एकाा अंगानेही योजलेला दिसतो. लोहार लाल तापलेल्या व त्यामुळे अग्नीरूप भासणा-या लोखंडााच्या गोळ्यावर घणाचे प्रहार करून हवा तो आकार देत असतो. वरवर पाहता लोहाराच्या घणाचे घाव अग्नीस बसत आहेत असे वाटते पण अग्नी निराकार असल्याने त्यास मार बसत नसतो तसेच शरीराच्या संगतीने अत्मा सुखदुःखे भोगतो असे वाटते.

प्रसिद्ध आहेत, ज्यात प्रत्येक चरणातील पहिल्या पहिल्या अक्षराच्या जुळणीने किंवा एकाखाली एक येणा-या शब्दातील अक्षरांच्या जुळणीने मंत्र तयार होत असतो म्हणून त्यांना मंत्रगर्भस्तोत्रे म्हणतात.

वेदांतबोधाचा लेखक तत्त्वज्ञ व ज्ञानमार्गी असला व ग्रंथाचा विषय वेदांत असला तरीही लेखकाने आत्मानुभूतीचे वर्णन करताना आपले हे कौशल्य दाखवून दिले आहे. यातील विशेष असा की हा १०५ ते १४३ आर्यांचा गट कठीण न होता प्रसादगुणयुक्त झाला आहे.

सुखदुःख या जोडीने मनुष्यजीवन नेहमीच व्यापलेले असते. सर्वसामान्य माणसाची सुखाची धाव इंद्रियसुखापर्यंतच असते पण परमार्थबुद्धीने वागणा-या माणसास इंद्रियसुखाच्या मर्यादा कळलेल्या असतात . परमार्थी माणसाचा सुखाविषयीचा दृष्टीकोन कसा व्यक्त होतो ते पुढील वाक्यांशात दिसते.

इन्द्रियसुखविमुखोऽहं निजसुखबोधानुभूतिभरितोऽहम्।१०७

अस्थिरसुखविमुखोऽहं सुस्थिरसुखबोध संपदुपचितोऽहम्।११७

आतील सुखाची गोडी लागलेला साधक बाह्य सुखापासून लांब राहतो कारण बाहेरील सुख अस्थिर आहे हे त्यास पक्के समजलेले असते. इथे

जेणे मक्षिका भक्षिली जाणीवेची तया भोजनाची ऋची प्राप्त कैची या मनाच्या श्लोकातील ओळीची आठवण सहजच होते.

१३१ व्या आर्येत मी मदनाच्या प्रभावाबाहेर आहे म्हणजेच मदनाचे बाण माझ्यासमोर पराभूत होतात हे सांगतांना सुंदर अनुप्रासयुक्त शब्दयोजना केली आहे. एक तत्त्वज्ञानी सिद्धहस्त कवीही असू शकतो हे दाखविले आहे.

फणिधरभूधरवारणविग्रह विधृतप्रपंचसारोऽहम्।

फालतलोदित लोचनपावक परिभूतपंचबाणोऽहम्। ।१३१

१४० व्या ष या वर्णाने सुरू होणा-या आर्येत सहा व त्याच्या पटीत येणा-या आकडयांच्या उपयोगाने आत्मानुभूतीनंतरची स्वतःची अवस्था वर्णिली आहे.

षड्भावरहितोऽहं षड्गुणरहितोऽहमहितरहितोऽहम्।

षट्कोशविरहितोऽहं षट्त्रिंशत्तत्त्वजालरहितोऽहम्। ।१४०

यातील वेगवेगळ्या अंकांनी निरूक्तापासून तंत्रापर्यंत अन्य शास्त्रांचे संदर्भ वाचकांच्या डोळ्यासमोर येतात. सहा भाव, सहा गुण इत्यादी सर्वांच्या पलीकडचा मी आहे म्हणजेच माझे स्वरूप निर्गुण निराकार आहे हे सांगून ब्रह्माशी साम्य दाखविले आहे.

संस्कृत वर्णामध्ये संयुक्ताक्षर म्हणून ओळख असलेल्या क्ष लाही लेखकाने वर्ज्य मानले नाही व क्ष ने सुर होणारी आर्या रचली आहे. हा क्ष वर्ण तंत्र ग्रंथात वापरलेला आढळतो.

क्षांताद्यक्षरसहित विविधव्यवहारमूलमहमेव। ।१४३

अ पासून क्ष पर्यंत म्हाणजेच शब्दांनी वर्णन करता येतील अशा सर्व व्यवहारांचे मूळ मी आहे या शब्दात आपले सर्वव्यापक स्वरूप वर्णिले आहे.

शेवटचा दिस गोड व्हावा म्हणजेच जीवनात कृतार्थता अनुभवता यावी अशी प्रत्येक समजुतदार माणसाची इच्छा असते. असे झाले म्हणजे जन्म सफल झाला असे मानले जाते. वेदांतबोधकार अशी आनंदाची स्थिती अनुभवत आहे व त्यासाठी कारण झाली आहे गुरुकृपा.

आस्ते देशिकचरणं निरवधिरास्ते तदीक्षणे करूणा।
आस्ते किमपि तदुक्तं किमतः परमस्ति जन्मसाफल्यम्। ।१४६

योगशास्त्रात कुंडलिनीचे अद्भूत वर्णन वाचावयास मिळते. वेदांतबोधकारांचाही योगशास्त्राचा प्रत्यक्ष अनुभव असला पाहिजे असे १४८ वी आर्या वाचल्यावर लक्षात येते.

कवलितचंचलचेतो गुरूतरमण्डूकजातपरितोषा।
शेते चित्तगुहायां चिरतरमेकैव चिन्मयी भुजगी। ।१४८

एखादा मोठा बेडूक गिळल्यामुळे तृप्त झालेला एखादी सर्पिणी जसा सुस्त व शांत पडून राहते तसेच चंचल अशा चित्ताचा घास घेऊन चैतन्यमय अशी कुंडलिनी हृदयरूपी गुहेत चिरकाल निद्रा घेत आहे. येथे कवीने रेखाटलेले चित्र परंपरागत योगशास्त्राहून थोडे वेगळे (कुंडलिनी ब्रह्मरंघ्रात पोहोचते व योगी सिद्धावस्थेस जातो) असले तरीही योग्यास ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार अनुभव येत असतात असेही मानले जाते.

लेखकाचे आणखी एक वेगळेपण जाणवते ते म्हणजे लेखकाने कुठेही स्वतःच्या नावाचा उल्लेख केलेला नाही . याचे दोन अर्थ दिसतात

पहिला म्हणजे लेखक प्रसिद्धिपराङ्मुख असावा व ग्रंथलेखन स्वान्तःसुखाय केले असावे .

दुसरा अर्थ असा असावा की परोपकारासाठी जे काम केले त्याचे श्रेय घ्यायचे नाही .

जर ग्रंथ कोणी नकलून घेतला असे म्हणावे तर नक्कल करणा-यानेही मी अमूक ने अमूक ग्रामी अमूक देशी हे काम केले इत्यादि उल्लेख केले नाहीत .

यावरून लेखक व लेखनिक दोघेही उच्च मूल्ये जपणारे असावेत असे वाटते .

१६0 आर्यांचे परीक्षण करत असताना अनेकानेक विशेष दृष्टीस पडतात त्या सर्वांचा परामर्श घेणे या उपसंहाराच्या छोट्याशा प्रकरणात अवघडच आहे . येथवर लेखकाच्या कृतीचे रसग्रहण करण्याचा प्रयत्न केला . इथून पुढे लेखनिकाच्या कृतीचे परीक्षण करू .

१ दुस-या आर्येत निहितसकलसन्देह ही लेखनिकाची चूक वाटते निहत सकलसन्देह अधिक बरोबर वाटते .

२ दयालुं शब्द दयाळुं अशा पद्धतीने लिहिला आहे असाच ळ चा प्रयोग अनेक ठिकाणी आहे यावरून लेखनिक भारताच्या दक्षिण पश्चिम भागतील असावा असे म्हणता येते .

३ अनेक ठिकाणी द व ध यांचा संधी चुकीच्या पद्धतीने लिहिलेला दिसतो . एकतर लेखनिक संस्कृत जाणत नसावा किंवा नकलून घेण्याचे काम फारच घाईने करवून घेण्यात आले असावे .

४ दीर्घ उकार दाखविताना अक्षराच्या खाली दोन ह्रस्व उकार देणे लेखनिकावर जुन्या शैलीचा प्रभाव दाखवतो .

५ श हे अक्षर श्र च्या जवळ जाणारे दिसते हा ही जुन्या शैलीचा प्रभाव आहे .

६ लेखनिकाच्या चुका नंतर अन्य कुणा जाणकार माणसाने दुरुस्त केल्या असाव्यात .

७ ९९ ह्या आर्येचा कमांक गुजरात प्रांतात वापरल्या जाणा-या शैलीशी साम्य दाखवितो .

८ ल जेथे जेथे जोडाक्षराच्या स्वरूपात आहे तेथे तेथे लेखनिकाने अर्धा न लिहिता पूर्ण ल लिहून लिहिला आहे .

साराचे सार म्हणजेच उपसंहाराचे सार मांडावयाचे झाले तर ते पुढीलप्रमाणे असेल.

नॅशनल मॅन्युस्क्रिप्ट मिशन च्या संकेतस्थळावर उपलब्ध माहितीनुसार हा ग्रंथ सदाशिव ब्रह्मेंद्र स्वामी या थोर तत्त्वज्ञ संतकवीचा आहे. पण संशोधनासाठी घेतलेल्याा हस्तलिखितात कुठेही लेखकाच्या नावाचा उल्लेख आढळत नाही. यामुळे ग्रंथाचा लेखक अज्ञात आहे असेच म्हणावे लागते. हस्तलिखिताच्या काही पानांवर १८४0 असा वॅटरमार्क दिसतो त्याच्यावरून लेखनिकाने ग्रंथ १८४0 नंतर नकलून घेतला असावा असे म्हणता येते. सदााशिवब्रह्मेंद्रस्वामीचा काळही इसवी सनाचे १७ वे ते १८ वे शतक मानला जातो. या पार्श्र्वभूमीवर काही निष्कर्ष काढता येतात.

काळाच्या या टप्प्यावर देशभरात अद्वैतविचार चांगला स्थिर झाला होता. विशिष्टाद्वैतापाासून द्वैतापर्यंत सर्व मतांवर भरपूर चिंतन झाले होते व देशाच्या विशिष्ट भूभागात या विभिन्न मतांचे अनुयायी एकवटले होते. देशाच्या उरलेल्या सर्व भागात मात्र अद्वैतविचार मानणारे बहुसंख्येने होते. (कदाचित आजही अद्वैतमत मानणा-यांची संख्या मोठी असेल.)

अद्वैताची शिकवण दृढमूल झाली होती तिच्या आणखी प्रचाराची अन्य मतांच्या खंडनाची गरज उरली नव्हती. यामुळेच वेदांतबोध ग्रंथात खंडनात्मक विचार फारसे दिसत नाहीत. फक्त ७४ ते ८0 या आर्यामध्ये असद्वादाचे निराकरण केलेले दिसते.

केवलाद्वैताची शिकवण दृढमूल झाली होती या विचाराचे समर्थक पुष्कळ होते पण सर्वसामान्य माणसांना यातील गहन तत्त्वे समजली होती असे म्हणता येणार नाही. याच विचाराने सर्वसामांन्याना कळेल अशा भाषेत वेदांत तत्त्वे सांगण्यास लेखक उद्युक्त झाला असावा. भौतिक सुखांचा अतिरेकी पाठलाग सोडून ख-या व शाश्वत सुखाचा शोध घेण्यास सर्वसामान्यांना प्रवृत्त करावे म्हणून सोप्या भाषेत लेखकाने लेखन केले आहे. किम्, नु, खलु अश्या बोलीभाषेत वापरल्या जाणा-या अव्ययांच्या प्रयोगाने व दृष्टांत देऊन तत्त्वबोध सहज कसा होईल हे लेखकाने पाहिले आहे. या साठी आर्या या गेय व सर्वत्र ज्ञात छंदाचा लेखकाने उपयोग केला आहे. सामान्य माणसांविषयी वाटणारी कळकळ यातून व्यक्त होते. लेखकाचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे असे वाटते.

शोधनिबंधात असलेल्या प्रकरणांचा सारांश

प्रकरण पहिले ः प्रस्तावना

कोणत्याही ग्रंथात अपरिहार्य असणारे प्रस्तावना प्रकरण वाचकांना वेदान्तबोध अथवा बोधार्या या ग्रंथाची थोडक्यात ओळख करून देते. शोधनिबंधाचा विषय म्हणून या ग्रंथाची निवड का व कशी झाली याविषयी माहिती देते. वेदान्त या अर्थगर्भ शब्दाच्या व्याख्या इथे वाचावयास मिळतात. वेदान्त या विषयाची व्याप्ती त्यात असणा-या विशिष्टाद्वैतादि मतांवरून आपल्याला कळते. वेदान्तबोधकार यातील केवलाद्वैत शाखेचे पक्षधर असल्याचे दिसून येते.

हस्तलिखिताचे संशोधन करण्यास असलेला वाव तसेच मार्यादांचाही विचार येथे केलेला आहे. ग्रंथरचना करताना ग्रंथकाराच्या मनात असलेले विचार यथार्थ अनुवादित करण्यातील कठीणता तसेच पूरक निबंधात मांडलेल्या माहितीस मर्यादा आहेत हे इथे मान्य केले आहे.

प्रकरण दुसरे ःवेदान्तबोध विवरण

या प्रकरणात मूळ आर्या,अन्वय,संस्कृत व्याख्या व मराठीत अनुवाद दिलेला आहे. आर्यांचे विषयवार गट कल्पून प्रत्येक गटास समर्पक नाव देण्यात आले आहे. संस्कृत व्याख्या लिहितांना आवश्यक त्या ठिकाणी पदांचे व्याकरणविषयक स्पष्टीकरण देऊन शब्दबोध नीट होईल हे पाहिले आहे. जेथे जेथे आवश्यक वाटले तेथे तथे तळटीपांच्या स्वरूपात जास्तीची माहिती ससंदर्भ दिलेली आहे ज्यामुळे वाचकांस विषय समजण्यास मदत होईल. तळटीपांच्या मदतीने लेखकाचा वेदान्तेतर विषयांचा अभ्यासही उलगडून दाखविला आहे. अनेक ठिकाणी दासबोधातील अवतरणे दिल्याने वेदान्तविचार प्रतिपादण्यात मराठीग्रंथकार व मराठी भाषा मागे नाही हे दिसून येते.

प्रकरण तिसरे ःसाधनचतुष्टय पंचकोश इत्यादि

हे प्रकरण वेदान्तविषयक वेगवेगळ्या संकल्पनांना वाहिलेले आहे. केवळ वेदान्तविषयक ग्रंथ वाचून त्यात निरूपित परमोच्च तत्त्व जो मोक्ष, तो मिळत नाही, त्यासाठी काही आचरणविषयक पथ्ये पाळावी लागतात काही साधना करावी लागते. नित्यानित्यविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमादि संपत्ती व मुमुक्षुत्व या चार पायाभूत गोष्टी समजून आचरण्याचा प्रयत्न असेल तरच वेदान्तविषयात प्रगती साधता येते म्हणून या प्रकरणात त्यांचा विस्ताराने विचार मांडला आहे. देहासक्ती कमी करणारे पांच कोशांचे

निरूपण तसेच लक्षणा विषयाचीही चर्चा या प्रकरणात आली आहे.या प्रकरणातही योगवासिष्ठ, विवेकचूडामणी, पंचदशी अशा ग्रंथातील उद्धरणांनी विषय प्रौढ केला आहे.लक्षणा या साहित्यविषयक कल्पनेचा महावाक्यांचा अर्थ उलगडून दाखविताना कसा उपयोग होतो हेही या प्रकरणात वाचावयास मिळते.

चार साधनांच्या कमाविषयी चर्चा करून ही चारही साधने सारख्याच महत्त्वाची आहेत त्यात एकानंतर दुसरे असा आचरणविषयक कम लावता येत नाही हे स्पष्ट केले आहे.

प्रकरण चवथे ः हस्तलिखितशास्त्र

शोधनिबंधाचा विषय असलेला ग्रंथ हस्तलिखिताच्या स्वरूपात असल्याने हस्तलिखितशास्त्राचे थोडेतरी ज्ञान हवेच. हस्तलिखितशास्त्राचे महत्त्व, हस्तलिखितांचे वर्गीकरण, हस्तलिखितात आढळणारे दोष व त्यांची कारणे, लेखनिकांच्या हातून घडणा या चुका, वाईट लेखनिकांची लक्षणे अशा सगळ्या विषयांची चर्चा संक्षेपाने या प्रकरणात केली आहे.दासबोधातील लेखनकियानिरूपण या समासातील लेखनिकास दिलेल्या सूचना हस्तलिखितशास्त्राचे महत्त्व कसे दाखवून देतात हे दिलेल्या अवतरणांवरून कळून येते. हस्तलिखितशास्त्राच्या निकषांवर वेदान्तबोधाच्या हस्तलिखिताचे केलेले परीक्षण व त्या अधारे लेखकाविषयी व लेखनिकाविषयी काढलेले निष्कर्ष या प्रकरणात वाचावयास म्ळितात.

प्रकरण पाचवे ः उपसंहार

नावाप्रमाणेच यात सर्व प्रकरणांचे सार आले आहे.आर्यांचे जे विषयवार गट कल्पिले आहेत त्या विषयांचा संक्षेपाने परामर्श येथे आला आहे.लेखकाची किंवा लेखनिकाची शैली ,कागदाचा प्रकार, कागदावरील वॉटरमार्क ,विशिष्ट अक्षरांचे लेखन अशा अनेक अंगांनी विचार करून लेखकाचा काळ कल्पून काही मते नोंदवली आहेत.

या काळात केवलाद्वैत विचार मांडतांना खंडनमंडनात्मक विचारांपेक्षा शास्त्रीय मांडणीपेक्षा सोप्या मांडणीची गरज होती.

लेखकाने वेदान्तप्रचाराचा लोककल्याणाचा हेतू मनात धरून सोप्या व गेय अशा आर्या छंदाचा उपयोग केलेला दिसतो.यामुळे जुन्या पारायणपद्धतीने जाणा या साधकांसही हळु हळु वेदान्तबोध कळू शकेल.

आत्मानुभूतीचे सुंदर वर्णन करताना लेखकाने आपल्या बुद्धिकौशल्याचा कसा परीचय दिला आहेहे इथे उलगडून दाखवले आहे. औपनिषदिक विचारांचा आधार घेत घेत लेखकाने कसा सोप्या भाषेत बोध करून दिलेला आहे हे इथे मांडले आहे. आत्मानुभूतिचे वर्णन करताना लेखकाचा तंत्रशास्त्रविषयक अभ्यास कसा दिसून येतो ते इथे वाचावयास मिळते.

## वेदान्तबोधाचे वेगळेपण

ग्रंथ केवलाद्वैत परंपरेचा असल्याने लेखक केवलाद्वैतमताच्या मर्यादेबाहेर जात नाही असे असले तरीही काही गोष्टी वेगळ्या म्हणून दाखविता येतील.

आर्या या लोकात रूढ असलेल्या छंदाचा वापर.

संवादात्मक अव्ययांचा उपयोग करून आपले निरूपण सोपे करणे.

पूर्वसुरींनी योजलेले दृष्टांत वापरून त्यांच्या विचारांशी जवळीक दाखविणे.

मी असा आहे व असा नाही अशा दोन्ही प्रकारच्या वर्णनांनी अप्रत्यक्षपणे केलेले ब्रह्मनिरूपण जे साधकाने नेमके काय मिळवण्याचा प्रयत्न करावा हे वाचकांना चांगल्या रीतीने उलगडून दाखविते.

## पुढील शोध/संशोधनाच्या संधी

सदाशीवब्रह्मेन्द्रस्वामींच्या नावावर National Mission for Manuscripts च्या संकेतस्थळावर बोधसार नावाचे एक ३६ पानांचे हस्तलिखित ‘ओरिएन्टल इन्स्टिट्युट’ अद्वैत बडोदा येथे असल्याचे कळले. बोधार्या या ग्रंथात ज्या पद्धतीने वेदान्ताचे तत्त्वज्ञान सोपे करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे तसाच प्रयत्न बोधसार या ग्रंधातही केला आहे का हे पाहता येईल.

तसेच १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जर कही वेदान्तविषयक लेखन झाले असेल तर ते शोधून त्यांचा अभ्यास करताना त्यावर बोधार्या चा काही प्रभाव दिसतो का हे पहता येईल.

ॐॐॐॐॐ

# संदर्भग्रंथ सूची

मूळ संस्कृतग्रंथ ग्रंथ नामे अकारानुक्रमाने


१ अमरकोशः,अमरसिंह,संपादक,झळकीकर,वामन, तृतीयावृत्ती, सरकारी मध्यवर्ती ग्रंथभांडार, १८८६

२ अष्टादश -उपनिषदः,(प्रथमखण्ड) ,संपादक लिमये,वि. प.आणि वाडेकर,रं.द. , वैदिकसंशोधनमंडलम्, पुणे, १८८0

३ अष्टावक्रगीता, संपादक व भाषांतरकार,बापट.कृ.म,रघुवंश प्रकाशन,

४ आत्मबोध , शंकराचार्य, चिन्मयानंद, अनुवादक,भाजेकर, म. वि., सेन्ट्रल चिन्मय.ट्रस्ट,पवई,मुम्बई,१९७६

५ आत्मानात्मविवेक , शंकराचार्य, द्विवेदी शिवप्रसाद, चौखंबा संस्कृत प्रतिष्ठान,वाराणसी ,१९९८

६ काव्यप्रकाश, मम्मट, झळकीकर वामनाचार्य कृत बालबोधिनी टीका, भांडारकर ओरीएंटल इन्स्टीट्युट, पुणे, १९५0

७ कैवल्योपनिषद्, संपादक संसारे, श्री.द., सेन्ट्रल चिन्मय.ट्रस्ट,पवई,मुम्बई,१९८४

८ छान्दोग्योपनिषद्,(सानुवाद, शाङ्करभाष्यसहित),गीताप्रेस, गोरखपुर, नववी आवृत्ति, १९९३

९ तैत्तिरीयोपनिषद्, चिन्मयानंद,सेन्ट्रल चिन्मयट्रस्ट,पवई,मुम्बई,१९८६

१0 पातञ्जलयोगसूत्राणि, संपादक आगाशे काशीनाथ,आनन्दाश्रमसंस्कृतग्रन्थावलिः,पुणे,१९१९

११ बृहदारण्यकोपनिषद् (सानुवाद,शाङ्करभाष्यसहित),गीताप्रेस, गोरखपुर,नववी आवृत्ति, १९९५

१२ ब्रह्मसूत्रशाङ्करभाष्य, मराठी भाषांतरकार अभ्यंकर,वासुदेव,संपादक—अभ्यंकर, काशीनाथ, डेक्कन.एज्युकेशन, सोसायटी,पुणे १९५७

१३ ब्रह्मसूत्रशाङ्करभाष्यम्, संपादक पणशीकर,वासुदेव,निर्णयसागर प्रेस,मुंबई,१९१५

१४ भगवद्गीता (शांकरभाष्यसहित),अनुवादक, गोयन्दका,श्रीहरिकृष्णदास, गीताप्रेस,गोरखपुर

१५ मै>युपनिषद्,संपादक पणशीकर,वा. ल.,चौखंबा विद्याभवन,वाराणसी,१९९५

१६ विवेकचूडामणिः, शंकराचार्य, संपादक संसारे श्री.द., सेन्ट्रल चिन्मयट्रस्ट ,पवई. मुम्बई,१९८४

१७ विवेकचूडामणिः, शंकराचार्य, संपा. पुरोहित भाईशंकर., संस्कृतसेवासमिति ,अहमदाबाद,१९८५

१८ शतश्लोकी, शंकराचार्य, प्रकाशक काळे ,अशोक नरहर,मुंबई,१९१९

१९ शब्दरत्नमहोदधि, शाह,अंबालाल प्रेमचंद्र(संपादक) विजयनीति सुरीश्वरजी जैन ट्रस्ट, अहमदाबाद, १९८८

२० श्रीदासबोध, समर्थ रामदास,संपादक पांगारकर,लक्ष्मण रामचंद्र,ढवळे प्रकाशन,मुंबई,१९८८

२१ श्रीपंचदशी, श्रीविद्यारण्यमुनि, संपा.पीतांबरजी ,संस्कृति संस्थान, बरेली,१९७२

२२ श्रीपंचदशी, श्रीविद्यारण्यमुनि, संपादक गर्दे. बाबा, जगद्हितेच्छु छापखाना, पुणे, १९०२

२३ श्रीमनुस्मृति, मराठी अनुवादक बापट,विष्णुशास्त्री, गजानन बुक डेपो, मुंबई,१९९८

२४ श्रीमद्भागवत-महापुराण, गीताप्रेस,गोरखपुर,१९९४

२५ श्रीललितासहास्रनाम, (सौभाग्यभास्कर. संस्कृत.व्याख्येसह), भारतभूषण,चौखंभा संस्कृत सीरीज, वाराणसी ,१९८९

२६ श्वेताश्वतरोपनिषद्,मोडक,बा.रा ,जयंत प्रकाशन,नागपूर,१९७६

२७ षडदर्शनम् , अनुवादक-स्वामी जगदीश्वरानन्द सरास्वती,विजयकुमार गोविन्दराम हासानन्द़दिल्ली,२०१०

२८ संक्षेपशारीरकम्, सर्वज्ञात्ममुनि, संपादक स्वामी.योगींद्रानंद, चौखंबा.विद्याभवन. वाराणसी १९८७

२९ सर्वलक्षणसंग्रह, भिक्षु,गौरीशंकर, चौखंभा संस्कृत सीरीज, वाराणसी ,२००४

३० सिद्धान्तविन्दुः, मधुसूदनसरस्वती, अच्युतग्रंथमाला,काशी,१९५६

### इतर ग्रंथ -सूची -लेखक नामे –अकारानुक्रमाने

१ खंडकर,अरूंधती.आद्यशंकराचार्य जीवन आणि विचार,श्रीविद्याप्रकाशन, पुणे , १९९७

२ गर्दे, बाबा,ब्रह्मसिद्धान्तमाला, श्रीरामतत्त्वप्रकाश छापखाना ,बेळगाव ,१९१०

३ झा, रामेश्वर,पूर्णता प्रत्यभिज्ञा, प्रत्यभिज्ञा, प्रेस, वाराणसी, १९९४

४ देशपांडे,गणेश यंबक,भारतीय साहित्यशास्त्र,पॉप्युलर बुक डेपो,मुंबई,१९५८

५ दीक्षित,श्रीनिवास,भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन , कोल्हापूर, सातवी आवृत्ती,२००३

६ पै.नागेश.विश्वनाथ,परमार्थपरव्याख्यानमाला अथवा वेदान्तशास्त्राची मूलतत्त्वे, भाग 1, कर्नाटक छापखाना,मुम्बई,१९१०

७ भीमाचार्य ,न्यायकोशः, संपादक-अभ्यंकर, वासुदेव, भांडारकर ओरीएंटल इन्स्टीट्युट, पुणे,१९९६
८ वर्णेकर,श्रीधर भास्कर,संस्कृत वाङ्मयकोश,प्रथमखंड,भारतीय भाषापरिषद, कलकत्ता, १९८८
९ स्वामी किशोरदास,भारतीय दर्शन और मुक्तिमीमांसा, रामतीर्थ मिशन ,१९९८

इंग्रजी संदर्भग्रंथ

*1 Dharmadhikari,T.N.,A Mannual on Manuscriptology and Textual criticism,Pune,2011*

*2 Katre,S.M.,Gode.P.K.,Introduction to Indian Textual Criticism,Deccan Collage,Pune,1954*

*3 Kothari,C.R.,Research Methodology, New age International Publishers, New Delhi,2009*

*4 Clark,T.T.,The Philosophy of Upanisadas,T & T Clark, Edinberg,1919*


*5 Jha,V.N.,Dalai,B.K., Concordance of Conceptual Upanisadic Terms,Centre for Advance Studies in Sanskrt, University of Pune.*


आन्तरजाल-संदर्भ

१ *http://www.advaita-vision.org/tag/prakarana-grantha*

२ *http://sanskritdocuments.org/sites/snsastri/nirvanashatkam.pdf*

३ *http://www.vedanta.gr/wp-content/uploads/2012/03/3*


॥श्री॥ बोधार्याप्रारंभ ॥श्री॥


॥बो॥ श्रीगणेशायनमः॥श्रीगुरुचरणद्वंद्वं वंदेहंमथितदुस्सहद्वंद्वं॥भ्रां
तिग्रहोपशांतिंपांसुमयंयस्यभसितमातनुते॥१॥देशिकवरंदयाळुं
वंदेहंनिहितसकलसंदेहं॥यच्चरणद्वयमद्वयमनुभवमुपदिशति
तत्वमस्यर्थं॥२॥संसारदावपावकसंतप्तस्सकलसाधनोपेतः॥
स्वात्मनिरूपणनिपुणैर्वाक्यैश्शिष्यःप्रबोध्यतेगुरुणा॥३॥ना
हमितिवेत्तियोसौसत्यंब्रह्मैववेत्तिनास्तीति॥अहमस्मीतिवि
जानन्ब्रह्मैवासौस्वयंविजानाति॥४॥अस्तित्वयमित्यस्मिन्

## श्रीगणेशाय नमः

श्रीगुरुचरणद्वन्द्वं वन्देहं मथितदुस्सहद्वन्द्वम्[1]।

भ्रान्तिग्रहोपशान्तिं पांसुमयं यस्य भसितम् आतनुते।।१।।

देशिकवरं दयालुं[2] वन्देहं निहतसकलसन्देहम्[3]।

यच्चरणद्वयमद्वयम् अनुभवमुपदिशति तत्त्वमस्यर्थम्।।२।।

संसारदावपावकसन्तप्तस्सकलसाधनोपेतः।

स्वात्मनिरूपणनिपुणैर्वाक्यैः शिष्यः प्रबोध्यते गुरुणा।।३।।

नाहमिति वेत्ति योऽसौ सत्यं ब्रह्मैव वेत्ति नास्तीति।


अहमस्मीति विजानन्ब्रह्मैवासौ स्वयं विजानाति।।४।।

---

[1] चरणाच्या शेवटी येणारा अनुस्वार लेखनिकाने मकाराच्या स्वरूपाात लिहीला नाही.

[2] संस्कृतमध्ये नसणा-या ळ या वर्णाचा प्रयोग लेखनिकाने केलेला दिसतो.

[3] मूळ शब्द निहितसकलसन्देहं असा आहे पण पाठ घेताना निहतसकलसन्देहं असा योग्य मानला आहे.


वो-॥ र्थेकस्यास्तिसंशयःपुंसः॥ तत्रापिसंशयश्चेत्संशयितायस्स ॥घ॥
एवभवसित्वं॥५॥ब्रंह्मत्वमेवतस्मान्नाहंब्रंह्मेतिमोहमात्रमि
दं॥मोहेनभवतिभेदःक्लेशास्सर्वेभवंतितन्मूला॥६॥नक्लेश
पंचकमिदंभजतेकृतकोशपंचकविवेकः॥अतएवपंचको
शान्कुशलधियस्संततंविचिन्वंति॥७॥अन्नप्राणमनोम
यविज्ञानानंदपंचकोशानां॥एकैकांतरभाजांभजतिविवे २
कात्प्राकाशतामात्मा॥८॥वपुरिदमन्नमयाख्यःकोशोना

अस्ति स्वयमित्यस्मिन्नर्थे कस्यास्ति संशयः पुंसः।

तत्रापि संशयश्चेत्संशयिता यस्स एव भवसि त्वम्।।५।।

ब्रह्म त्वमेव तस्मान्नाहं ब्रह्मेति मोहमात्रमिदम्।

मोहेन भवति भेदः क्लेशास्सर्वे भवन्ति तन्मूलाः।।६।।

न क्लेशपञ्चकमिदं[1] भजते कृतकोशपञ्चकविवेकः।


अत एव पञ्चकोशान्कुशलधियस्सन्ततं विचिन्वन्ति।।७।।

अन्नप्राणमनोमयविज्ञानानन्दपञ्चकोशानाम्।

एकैकान्तरभाजां भजति विवेकात्प्राकाशतामात्मा।।८।।

---

[1] क्लेश शब्द लिहीताना पूर्ण क लिहून त्याच्या खाली ल तो देखिल जुन्या पद्धतीने लिहिलेला दिसतो.



वपुरिदमन्नमयाख्यः कोशो नात्मा जडो घटप्रायः।

प्रागुत्पत्तेः[1] पश्चात्तदभावस्यापि दृश्यमानत्वात्।।९।।

कोशः प्राणमयोऽयं वायुविशेषो वपुष्यवच्छिन्नः।

अस्य कथमात्मता स्यात्क्षुत्तृष्णाभ्याम्[2] उपेयुषः पीडाम्।।१0।।

कुरुते वपुष्यहंतां गेहादौ यः करोति ममतां च।

रागद्वेषविधेयो नासावात्मा मनोमयः कोशः।।११।।

सुप्तौ स्वयं विलीना बोधे व्याप्ता कलेवरं सकलम्।


विज्ञानशब्दवाच्या चित्प्रतिबिम्बानबुद्धिरप्यात्मा[3]।।१२।।

---

[1] प्रागुत्पत्तेः हा शब्द लिहिताना लेखानिकाने संहितेत प्रागुप्ततेः अशी चूक केलेली आढळते.

[2] क्षुत्तृष्णाभ्यामुपेयुषः हा शब्द लिहिताना ष व ण यांच्या जुळणीने बनणारा ष्णा विचित्र पद्धतीने लिहिलेला दिसतो.

[3] बुद्धि शब्द त व ध यांचा संधी अशा स्वरूपात लिहिला आहे.


॥बो॥ वामीति॥ आनंदकोशनामासोहंकारःकथंभवेदात्मा॥१३॥ ॥ध॥
यःस्फुरतिबिंबभूतःसभवेदानंदएवसकलात्मा॥प्रागूर्ध्वम
पिचसत्वादविकारित्वादबध्यमानत्वात्॥१४॥अन्नमयादे
रस्मादपरंयदिनानुभूयतेकिंचित्॥अनुभवितान्नमयादेर
स्तीत्यस्मिंनकश्चित्प्रलापः॥१५॥स्वयमेवानुभवत्वाद्यद्य
प्येतस्यनानुभाव्यत्वं॥सकृदप्यभावशंकानभवेद्बोधस्व
रूप सत्तायाः॥१६॥अनुभवतिविश्वमात्माविश्वेनासोन

सुप्तिगतैः सुखलेशैरभिमनुते यः सुखीभवामीति।

आनन्दकोशनामा सोऽहंकारः[1] कथं भवेदात्मा।।१३।।

यः स्फुरति बिम्बभूतः सभवेदानन्द एव सकलात्मा।

प्रागूर्ध्वमपि च सत्त्वादविकारित्वादबध्यमानत्वात्।।१४।।


अन्नमयादेरस्मादपरं यदि नानुभूयते किञ्चित्।

अनुभवितान्नमयादेरस्तीत्यस्मिन्न कश्चित्प्रलापः।।१५।।

स्वयमेवानुभवत्वाद्यद्यप्येतस्य नानुभाव्यत्वम्।

सकृदप्यभावशङ्का न भवेद्बोधस्वरूपसत्तायाः।।१६।।

[1] विसर्गाचा संधीप्रकीयेनंतर होणारा अवग्रह टाळला आहे.



अनुभवति विश्वमात्मा विश्वेनासौ न चानुभूयेत्[1]।

न खलु प्रकाश्यतेऽसौ विश्वमशेषं प्रकाशयन्भानुः।।१७।।

तदिदं तादृशमीदृशमेतावत्तावदिति च यन्न भवेत्।

ब्रह्म तदित्यवधेयं नो चेद्विषयो भवेत् परोक्षं च।।१८।।

इदमिदमिति प्रतीते वस्तुनि सर्वत्र बाध्यमानेऽपि।

अनिदमबाध्यं तत्त्वं[2] सत्त्वादेतस्य न च परोक्षत्वम्।।१९।।


नावेद्यमपि परोक्षं भवति ब्रह्म स्वयंप्रकाशत्वात्।

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेत्येतस्य लक्षणं प्रथते।।२०।।

---

[1] अनुभूयेत् या विध्यर्थ पदात शेवटी येणारा त हा अर्धा म्हणजे पायमोडका हवा.

[2] तत्व शब्द तत्त्व असा हवा. सत्वात् याही पुढील शब्दात हीच चूक दिसून येते.



सति कोशशक्त्युपाधौ सम्भवतस्तस्य जीवतेश्वरते ।

नोचेत्तयोरभावात् विगतविशेषं विभाति निजरूपम्[1]। ।२१। ।

सति सकलदृश्यबाधे न किमप्यस्तीति लोकसिद्धं[2] चेत् ।

यन्न किमपीति सिद्धं ब्रह्म तदेवेति वेदतः सिद्धम्। ।२२। ।

एवमपि विरहितानां तत्त्वमसीत्यादिवाक्यचिन्तनया।

प्रातिभात्येष परोक्षवदात्मा प्रत्यक्[3] प्रकाशमानोऽपि। ।२३। ।

तस्मात्पदार्थशोधनपूर्वकं वाक्यस्य चिन्तयन्नर्थम्।


देशिकदयाप्रभावादपरोक्षयति क्षणेन चात्मानम्। ।२४। ।

---

[1] निजरूपम् ह्या शब्दात रूप शब्दातील दीर्घ उकार एकासएक असे दोन उकार जोडून लिहिलेला दिसतो . तसेच अनुस्वाराच्या जागी हलन्त म योजला नाही .

[2] सिद्ध शब्द लिहीताना सबंध आर्येत 3 ठीकाणी चुकीच्या पद्धतीने लिहिला गेला आहे .

[3] प्रत्यक् शब्द लिहिताना अर्धा क दाखवण्यासाठी दिलेले चिह्न दीर्घ उकारासारखे दिसते .


र्त्वाद्यभिमानीबोधःस्यात्वंपदस्यवाच्योर्थः॥२५॥देहाहं
तेंद्रियाणांसाक्षीतेभ्योविलक्षणत्वेन॥प्रतिभातियोवबो
धःप्रोक्तोसौत्वंपदस्यलक्षोर्थः॥२६॥वेदावसानवाचासंवे
द्यंसकलजगदुपादानं॥सर्वज्ञताद्युपेतंचैतन्यंतत्पदस्य
वाच्योर्थः॥२७॥विविधोपाधिविमुक्तंविश्वातीतंविशुद्धम
॥५॥ द्वैतं॥अक्षरमनुभववेद्यंचैतन्यंतत्पदस्यलक्षोर्थः॥२८॥सामा ॥५॥
नाधिकरण्यंतदनुविशेषणविशेष्यताचेति॥अथलक्ष्य

देहेन्द्रियादिधर्मानात्मन्यारोपयन्नभेदेन।

कर्तृत्वाद्यभिमानी बोधः स्यात्त्वंपदस्य वाच्योऽर्थ[1]ः।।२५।।

देहाहंतेन्द्रियाणां साक्षी तेभ्यो विलक्षणत्वेन।

प्रातिभाति योऽवबोधः प्रोक्तोऽसौ त्वंपदस्य लक्ष्योऽर्थ[2]ः।।२६।।

वेदावसानवाचासंवेद्यं सकलजगदुपादानम्।

सर्वज्ञताद्युपेतं चैतन्यं तत्पदस्य वाच्योऽर्थः।।२७।।

विविधोपाधिविमुक्तं विश्वातीतं विशुद्धमद्वैतम्।

अक्षरमनुभववेद्यं चैतन्यं तत्पदस्य लक्ष्योऽर्थः।।२८।।


सामानाधिकरण्यं तदनु विशेषणविशेष्यता चेति।

अथ लक्ष्यलक्षकत्वं भवति पदार्थात्मनां च सम्बन्धः।।२९।।

---

[1] २५ते २८ सगळ्या आर्यात अवग्रहाचा वापर टाळलेला दिसतो।

[2] लक्ष्य शब्द २६ व २८ या दोनही आर्यांमध्ये लक्ष असा चुकीच्या पद्धतीने लिहिला आहे.


॥बो॥ लक्षकत्वंभवतिपदार्थात्मनांचसंबंधः॥२९॥एकत्रवृत्तिर ॥ध॥
र्थेशब्दानांभिन्नवृत्तिहेतूनां॥सामानाधिकरण्यंभवतीत्ये
वंवदंतिलाक्षणिकाः॥३०॥प्रत्यक्षंत्वंपरोक्षंत्वंपरिपूर्णत्वंच
सद्वितीयत्वं॥इतरेतरंविरुधंननइहभवितव्यमेवलक्ष
णया॥३१॥मानांतरोपरोधेमुख्यार्थस्यापरिग्रहेजाते॥
मुख्याविनाकृतेर्थेयावृत्तिःसैवलक्षणाप्रोक्ता॥३२॥निखिल
मपिवाच्यमर्थंत्यक्त्वावृत्तिस्तदन्वितेन्यार्थे॥जहतीतिल

एकत्रवृत्तिरर्थे शब्दानां भिन्नवृत्तिहेतूनाम् ।

सामानाधिकरण्यं भवतीत्येवं वदन्ति लाक्षणिकाः । ।३0 । ।

प्रत्यक्षंत्वं परोक्षंत्वं परिपूर्णत्वं च सद्बितीयत्वम्[1]। प्रत्यक्षत्वं परोक्षत्वं

इतरेतरविरुद्धं[2] तत् इह भवितव्यमेव लक्षणया । ।३१ । ।

मानान्तरोपरोधे मुख्यार्थस्यापरिग्रहे जाते ।

मुख्याविनाकृतेऽर्थे या वृत्तिः सैव लक्षणा प्रोक्ता । ।३२ । ।

निखिलमपि वाच्यमर्थ त्यक्त्वा[3] वृत्तिस्तदन्वितेऽन्यार्थे ।


जहतीति लक्षणा स्यात् गङ्गायां घोषवदत्र न ग्राह्या । ।३३ । ।

---

[1] क्ष या अक्षरावर अनुस्वार चूक दिसतो प्रत्यक्षत्वं परोक्षत्वं हा पाठ योग्य आहे

[2] विरूधं असा मूळ संहितेत असलेला शब्द विरूद्धं असा वाचावयास हवा .

[3] त्यक्त्वा ह्या शब्दातील क्त्वा क त व अशा 3 व्यंजनांपासून बनलेला आहे . जागा वाचवणयासाठी लेखनिकाने तो विचित्र पद्धतीने लिहिलेला दिसतो .


क्षणास्यात् गंगायां घोष इति वदत्र न ग्राह्या ॥ इयमजहतीति
कथिता शोणो धावति वदत्र न ग्राह्या ॥ ३३ ॥ वाच्यार्थमत्यजं
त्या यस्या वृत्तेः प्रवृत्तिरन्यार्थे ॥ ३४ ॥ जहदजहतीति सा स्या
द्या वाच्यार्थैकदेशमपहाय ॥ बोधयति चैकदेशं सोयं द्विज
इति वदाश्रयेदेनां ॥ ३५ ॥ सोयं द्विज इति वाक्यं त्यक्त्वा परो
॥५॥ क्षापरोक्ष देशाद्यं ॥ द्विजमात्रलक्षकत्वात् कथयत्यै
क्यं पदार्थयोरुभयोः ॥ ३६ ॥ तद्वत् त्वमसीति त्यक्त्वा ॥५॥
प्रत्यक्परोक्षतादीनि ॥ चिद्वस्तु लक्षयित्वा बोधयति स्पष्टमसिपदेनै

इयमजहतीति कथिता शोणो धावतिवदत्र न ग्राह्या ।

वाच्यार्थमत्यजन्त्या यस्याः वृत्तेः प्रवृत्तिरन्यार्थे ।।३४[1]।।

जहदजहतीति सा स्याद्या वाच्यार्थैकदेशमपहाय।

बोधयति चैकदेशं सोऽयं द्विज इतिवदाश्रयेदेनाम्।।३५।।

सोऽयं द्विज इति वाक्यं त्यक्त्वा परोक्षापरोक्षदेशाद्यम्।

द्विजमात्रलक्षकत्वात् कथयत्यैक्यं पदार्थयोरभयोः।।३६।।


तद्वत् तत्त्वमसीति त्यक्त्वा[2] प्रत्यक्परोक्षतादीनि।

चिद्वस्तु लक्षयित्वा बोधयति स्पष्टमसिपदेनैक्यम्।।३७।।

---

[1] आर्यांना क्रमांक देताना 33 हा आकडा लेखनिकाने 34 व्या आर्येचा एक चरण झाल्यावर दिला आहे व 34 वी आर्या एका चरणाची झाली आहे.

[2] 33 व्या आर्येची तळटीप पहावी.



इत्थं बोधितमथ महता वाक्येन दर्शितैक्येन।

अहमित्यपरोक्षयतां वेदो वेदयति वीतशोकत्वम्।।३८।।

प्रायः प्रवर्तकत्वं विधिवचसां लोकवेदयोर्दृष्टम्।

सिद्धं[1] बोधयतोऽथ कथमेतद्भवति तत्त्वमस्यादेः।।३९।।

विधिरेव न प्रवृत्तिं जनयत्यभिलषितवस्तुबोधोऽपि।


राजा याति सुतोऽभूदिति बोधेन प्रवर्तते लोकः।।४0।।

ऐक्यपरैः श्रुतिवाक्यैरात्मा शश्वत्प्रकाशमानोऽपि।

देशिकदयाविहीनैरपरोक्षयितुं न शक्यते पुरुषैः।।४१।।

---

[1] सिद्ध शब्द चुकीच्या पद्धतीने लिहिला आहे.



विरहितकाम्यनिषिद्धो विहितानुष्ठानविमलितस्वान्तः।

भजति स्वयमेव बोधं गुरुणा किमिति त्वया न मन्तव्यम्।।४२।।

कर्मभिरेव न बोधः प्रभवति गुरुणा विना दयानिधिना।

आचार्यवान् हि पुरुषो वेदेत्यर्थस्य[1] वेदसिद्धत्वात्।।४३।।

वेदोऽनादितया वा यद्वा परमेश्वरप्रणीततया।

भवति परमं प्रमाण[2] बोधो नास्ति स्वतश्च परतो वा।।४४।।


नापेक्षते यदन्यद्यदपेक्षन्तेखिलानि मानानि।

वाक्यं तन्निगमानां मानं ब्रह्माद्यतीन्द्रियावगतौ।।४५।।

---

[1] 'आचार्यवान् हि पुरुषो हे लिहितांना लेखनिकाने वान् या प्रत्ययापूवी हि लिहिलेला दिसतो. तसेच वेदेत्यस्य इथे य अक्षर प सारखे दिसत.

[2] इंग्रजी व्ही V ची खूण करून मध्ये घातलोले मा अक्षर नंतर तपासणा-याने घातल्याचे लेखनावरून कळते.


॥बो०॥ धोभिरेवदहनंदग्धुंवांछंतितेमाहात्मानः॥४६॥वेदोनादिरमु ॥ध॥
ष्यव्यंजकईशः स्वयंप्रकाशात्मा॥तदभिव्यक्तिमुदीक्ष्यप्रोक्तो
सौसूरिभिःप्रणीतइति॥४७॥रूपाणामवलोकेचक्षुरिवान्यन्न
कारणंदृष्टं॥तद्वददृष्टावगतौवेदवदन्योनवेदकोहेतुः॥४८॥
निगमेषुनिश्चितार्थंतंत्रेकश्चिद्यदिप्रकाशयति॥तदिदमनुवा
दमात्रंप्रामाण्यंतस्यसिध्यतिनकिंचित्॥४९॥अंशद्वयवति
निगमेसाधयतिद्वैतमेवकोप्यंशः॥अद्वैतमेववस्तुप्रतिपादय

मानं प्रबोधयन्तं बोधं मानेन ये बुभुत्सन्ते ।

एधोभिरेव दहनं दग्धुं वाञ्छति ते महात्मानः । ।४६ । ।

वेदोऽनादिरमुष्य व्यञ्जक ईशः स्वयंप्रकाशात्मा ।

तदभिव्यक्तिमुदीक्ष्य प्रोक्तोऽसौ सूरिभिः प्रणीत इति । ।४७ । ।

रूपाणामवलाके[1] चक्षुरिवान्यन्न कारणं दृष्टम् ।

तद्वददृष्टावगतौ वेदवदन्यो न वेदको हेतुः । ।४८ । ।

निगमेषु निश्चितार्थं तंत्रे कश्चिद्यदि प्रकाशयति ।


तदिदमनुवादमात्रं प्रामाण्यं तस्य सिद्ध्यति न किञ्चित् । ।४९ । ।

अंशद्वयवति निगमे साधयति द्वैतमेव कोप्यंशः ।

अद्वैतमेव वस्तु प्रतिपादयति प्रसिद्धमपरोंऽशः । ।५० । ।

---

[1] रूपाणामवलोके या शब्दात रू लिहिताना दीर्घ रू दाखवण्यासाठी विचित्र खूण दिलेली दिसते .



अद्वैतमेव सत्यं तस्मिन् द्वैतमसत्यमध्यस्तम्।

रजतमिव शुक्तिकायां मृगतृष्णायामिवोदकस्फुरणम्[1]।।५१।।

आरोपितं यदि स्यादद्वैतं वस्त्ववस्तुनि द्वैते।

युक्तं नैव तदा स्यात्सत्येध्यासो भवत्यसत्यानाम्।।५२।।

यद्यारोपणमुभयोस्तद्व्यतिरिक्तस्य कस्यचिदभावात्।

आरोपणं न शून्ये तस्मादद्वैतसत्यता[2] ग्राह्या।।५३।।

प्रात्यक्षाद्यनवगतं श्रुत्या[3] प्रतिपादनीयमद्वैतम्।


द्वैतं न प्रतिपाद्यं तस्य स्वयमेव लोकसिद्धत्वात्।।५४।।

---

[1] तृष्णा शब्दातील ष्ण लिहितांना ष व ण यांच्या जुळणीने वनणारा ष्णा विचित्र पद्धतीने ल्हिलेला दिसतो.

[2] शून्येन शब्दातील श च्या जागी श्र लिहीलेला दिसतो.

[3] श्रुत्या शब्दातील श्रु चा उकार विचित्र पद्धतीने लिहीला असून समजून घ्यावा लागतो.



अद्वैतं सुखरूपं दुःसहदुःखं सदा भवेत् द्वैतम्।

तत्र प्रयोजनं स्यात्प्रतिपादयति श्रुतिस्तदेवासौ[1]। ।५५। ।

निगमगिरा प्रतिपाद्यं वस्तु यदानन्दरूपमद्वैतम्[2]।

स्वाभाविकस्वरूपं जीवत्वं तस्य केचन ब्रुवते। ।५६। ।

स्वाभाविकं यदि स्याज्जीवत्वं तस्य विशदविज्ञप्तेः।

सकृदपि न तद्विनाशं गच्छेदुष्णप्रकाशवद्वह्नेः[3]। ।५७। ।

यद्वदयोरसविद्धं काञ्चनतां याति तद्वदेवासौ।

जीवः साधनशक्त्या परतां याति इति केचित् इच्छन्ति। ।५८। ।

तदिदं भवति न युक्तं गतवति तस्मिन् चिरेण रसवीर्ये।


प्रातिपद्यते प्रणांशं हैमो वर्णोऽप्ययसमारूढः। ।५९। ।

---

[1] शब्दातील श्रु चा उकार विचित्र पद्धतीने लिहिला असून समजून घ्यावा लागतो.

[2] शब्दात रू लिहीताना दीर्घ रू दाखवण्यासाठी विचित्र खूण दिलेली दिसते.

[3] शब्दातील ष्ण लिहीतांना ष व ण यांच्या जुळणीने बनणारा ष्ण विचित्र पद्धतीने लिहिलेला दिसतो.


मोवर्णोप्ययःसमारूढः॥५९॥जीवत्वमपितथेदंबहुविधसुखदुः
खलक्षणोपेतं॥गतमिवसाधनशक्त्याप्रतिभात्येवप्रयातिनवि
नाशं॥६०॥तस्मात्स्वतोयदिस्यात्जीवःसततंसएवजीवःस्यात्॥
एवंयदिपरमात्मापरमात्मैवायमितिभवेद्युक्तं॥६१॥यदिवाप
रेणसाम्यंजीवश्चेद्भजतिसाधनबलेन॥कालेनतदपिकियता
नश्यत्येवेतिनिश्चितंसकलैः॥६२॥तस्मात्परंस्वकीयंमोहंमो
हात्मकंचसंसारं॥स्वज्ञानेनजहित्वापूर्णःस्वयमेवशिष्यतेना

जीवत्वमपि तथेदं बहुविधसुखदुखलक्षणोपेतम्।

गतमिव साधनशक्त्या[1] प्रतिभात्येव प्रयाति न विनाशम्।।६0।।

तस्मात् स्वतो यदि स्यात् जीवः सततं स एव जीवः स्यात्।

एवं यदि परमात्मा परमात्मैवायमिति भवेद्युक्तम्।।६१।।

यदि वा परेण साम्यं जीवश्चेद्भजति साधनबलेन।

कालेन तदपि कियता नश्यत्येवेति निश्चितं सकलैः।।६२।।


तस्मात् परं स्वकीयं[2] मोहं मोहात्मकं संसारम्।

स्वज्ञानेन जहित्वा पूर्णः स्वयमेव शिष्यते नान्यत्।।६३।।

---

[1] साधनशक्त्या हा शब्द साधनशक्पा असा दिसतो संदर्भानुसार समजून घ्यावा लागतो.

[2] स्वकीयं असा पाठ इथे घेतला आहे. लेखनात लेखनिकाने बरेच एकावर एक लेखन केलेले दिसत.



सत्यज्ञानानन्दं प्रकृतेः परमात्मरूपमद्वैतम्[1]।

अवबोधयन्ति निखिलाः श्रुतयः स्मृतिभिः समं समस्ताभिः। ।६४। ।

एकत्वबोधकानां निखिलानां निगमवाक्यजालानाम्।

वाक्यान्तराणि सकलान्यभिधीयन्तेऽस्य शेषभूतानि। ।६५। ।


यस्मिन् मिहिरवदुदिते तिमिरवदपयान्ति कर्तृतादीनि।

ज्ञानं विरहितभेदं कथमेतद्भवति तत्त्वमस्यादेः। ।६६। ।

कर्मप्रकरणनिष्ठं ज्ञानं कर्माङ्गमिष्यते प्राज्ञैः।

भिन्नप्रकरणभाजः कर्माङ्गत्वं कथं भवेत् ज्ञप्तेः। ।६७ । ।

[1] परमात्मरूपमद्वैत शब्दात रू लिहिताना दीर्घ रू दाखवण्यासाठी विचित्र खूण दिलेली दिसते .



भेदौ कर्मज्ञानात्मकावुभौ कांडौ॥ एवं सति कथमनयोरंगांगित्वं प
रस्परं घटते॥६८॥ ज्ञानं कर्मणि न स्यात् ज्ञाने कर्मेदमपि तथा न स्या
त्॥ इह कथमनयोरुभयोस्तपनतमोवत्समुच्चयो घटते॥६९॥ त
स्मान्मोहनिवृत्तौ ज्ञानं न सहायमन्यदर्थयते॥ यद्वद्दुस्तरतिमि
रप्रध्वंसने सहस्रांशुः॥७०॥ ज्ञानं तदेव विमलं साक्षी विश्वस्य
भवति परमात्मा॥ संबध्यते न धर्मैः साक्ष्यगतैरेष सच्चिदानंदः॥७१॥
रज्ज्वादेरुरगाद्यैः संबंधवदस्य दृश्यसंबंधः॥ सततमसंगोयमि

अधिकारिविषयभेदौ कर्मज्ञानात्मकावुभौ काण्डौ।

एवं सति कथमनयोरङ्गाङ्गित्वं परस्परं घटते।।६८।।

ज्ञानं कर्मणि न स्यात् ज्ञाने कर्मेदमपि तथा न स्यात्।

इह कथमनयोरभयोस्तपनतमोवत्समुच्चयो घटते।।६९।।

तस्मान्मोहनिवृत्तौ ज्ञानं न सहायमन्यदअर्थयते।

यद्वद्दुस्तरतिमिर-परिध्वंसने[1] सहस्रांशुः।।७०।।


ज्ञानं तदेव विमलं साक्षी विश्वस्य भवति परमात्मा।

सम्बध्यते न धर्मैः साक्ष्यगतैरेष सच्चिदानंदः।।७१।।

रज्ज्वादेरगाद्यैः संबंधवदस्य दृश्यसम्बन्धः।

शततमसङ्गोऽयमिति श्रुतिरमुमर्थमेव साधयति।।७२।।

[1] परिध्वंसने शब्दात काकपद दाखवून परि शब्द घतलेला कळतो पण डाव्या वाजूच्या समासात लिहिलेल्या क चा वोध होत नाही.



कर्तृ च कर्म च यस्य स्फुरति ब्रह्मैव तन्न जानाति।

यस्य न कर्तृ न कर्म स्फुटतरमयमेव वेदितुं □मते।।७३।।

कर्तृत्वादिकमेतन्मायाशक्त्या प्रतीयते निखिलम्।

इति केचिदाहुरेषा भ्रान्तिर्ब्रह्मातिरेकतो नान्यत्।।७४।।

तस्मिन् ब्रह्मणि विदिते विश्वमशेषं भवेदिदं विदितम्।

कारणमृदि विदितायां घटकरकादयाः[1] यथावगम्यन्ते।।७५।।


तदिदं कारणमेकं विगतविशेषं विशुद्धचिद्रूपम्[2]।

तस्मात्सदेकरूपान्मायोपहितादभूदशेषमिदम्।।७६।।

---

[1] मूळ पाठ घटकरकाद्या असा आहे पण घटकतकादयाःअसा पाठ अधिक सयुक्तिक वाटतो.

[2] विशुद्धचिद्रूपम् या शब्दात द व ध चा संधि मागिलप्रमाणेच चुकीने लिहिला आहे . चिद्रूप या शब्दातील दीर्घ रूकार चमत्कारिक रीत्या एकाखाली एक दोन उकार लिहून दिलेला दिसतो .


॥१०॥ नादभूदशेषमिदं॥७६॥कारणमसदितिकेचित्कथयंत्यसतोभ
वेन्नकारणता॥ अंकुरजननीशक्तिःसतिखलुबीजेसमीक्ष्य
तेसकलैः॥७७॥कारणमसदितिकथयंन्वंध्यापुत्रेणनिर्वहे
त्कार्यं॥ किंचमृगतृष्णिकांभःपीत्वोदन्यांमहीयसींशमयेत्॥
यस्मान्नसोयमसतोवादःसंभवतिशास्त्रयुक्तिभ्यां॥तस्मा
त्सदेवतत्वंसर्वेषां कारणं जगतां॥७९॥जगदाकार
तयापिप्रथतेगुरुशिष्यविग्रहतयापि॥ब्रह्माद्याकारतया ॥१०॥
भवति

कारणमसदिति केचित् कथयन्ति असतो भवेन्न कारणता।

अङ्कुरजननी शक्तिः सति खलु बीजे समीक्ष्यते[1] सकलैः।।७७।।

कारणम् असदिति कथयन्वन्ध्यापुत्रेण निर्वहेत् कार्यम्।

किं च मृगतृष्णिकाम्भः[2] पीत्वोदन्यां महीयसीं शमयेत्।।७८।।

यस्मान्न सोऽयम् असतो वादः सम्भवति शास्त्रयुक्तिभ्याम्।

तस्मात्सदेव तत्त्वं सर्वेषां भवति[3] कारणं जगताम्।७९।।

जगदाकारतयापि प्रथते गुरुशिष्यविग्रहतयापि।


ब्रह्माद्याकारतया प्रतिभातीदं परात्परं तत्त्वम्।।८०।।

---

[1] समीक्ष्यते असे रूप संदर्भानुसार लक्षात येते.

[2] शब्दातील ष्ण लिहीतांना ष व ण यांच्या जुळणीने बनणारा ष्ण विचित्र पद्धतीने लिहिलेला दिसतो.

[3] काकपद घालून भवति शब्दाची जागा बदलण्याचे कारण लक्षात येत नाही. नेहमीचा परिपाठ सोडून शब्द खाली लिहिला आहे.


॥बो०॥ प्रतिभातीदं परात्परं तत्वं॥८०॥सत्यं जगदिति भानं संसृतये ॥ध॥
स्यादपक्वचित्तानां॥तस्मादसत्यमेतन्निखिलं प्रतिपादयंति
निगमांताः॥८१॥परिपक्वमानसानां पुरुषवराणां पुरातनैः
सुकृतैः॥ब्रह्मैवेदं सकलं जगदिति भूयः प्रबोधयत्येष॥८२॥
न अनवगतकांचनानां भूषणधीरेव भूषणे हैमे॥एवमविवेक
भाजां जगति जनानां न तात्त्विकी धिषणा॥८३॥अहमालंब की
नसिद्धं कस्य परोक्षं भवेदिदं ब्रह्म॥तदपि विचारविहीनैरप

सत्यं जगदिति भानं संसृतये स्यादपक्वचित्तानाम्[1]।

तस्मादसत्यमेतन्निखिलं प्रतिपादयन्ति निगमान्ताः[2]।।८१।।

परिपक्वमानसानां पुरुषवराणां पुरातनैः सुकृतैः।

ब्रह्मैवेदं सकलं जगदिति भूयः प्रबोधयत्येषः।।८२।।

अनवगतकांचनानां भूषणधीरेव भूषणे हैमे।

एवमविवेकभाजां जगति जनानां न तात्त्विकी धिषणा।।८३।।


अहमालम्बनसिद्धं कस्य परोक्षं भवेदिदं ब्रह्म।

तदपि विचारविहीनैरपरोक्षयितुं न शक्यते मुग्धैः।।८४।।

---

[1] अपक्व शब्दातील क्व हे जोडाक्षर विचित्र पद्धतीने लिहिलेले दिसते.

[2] इथे एक काकपद काढलेले आहे पण समासात अक्षर सुचवलेले नाही व तशी आवश्यकताही दिसत नाही.



रोक्षयितुं न शक्यते मुग्धैः ॥८४॥ अहमिदमिति च मतिभ्यां सत
तं व्यवहरति सर्वलोकोपि ॥ प्रथमा प्रतीतिश्चरमा निवसति व
पुरिंद्रियादिबाह्यार्थे ॥८५॥ वपुरिंद्रियादिविषया याहंबुद्धिर्मन
त्यसौ भ्रांतिः ॥ न बुद्धिरियमतस्मिन्नध्यासत्वेन शास्यमान
त्वात् ॥८६॥ तस्मादशेषसाक्षी परमात्मैवाहमर्थ इत्युचितं ॥ अ
॥११॥ जडवदेव जडोयं सत्संबंधाद्भवत्यहंकारः ॥८७॥ तस्मात्सर्वश ॥११॥
रीरेष्वहमहमित्येव भासते स्पष्टं ॥ यः प्रत्ययो विशुद्धस्तस्य

अहमिदमिति च मतिभ्यां सततं व्यवहरति सर्वलोकोऽपि।

प्राथमा प्रतीतिः चरमा निवसति वपुरिन्द्रियादिबाह्यार्थे।।८५।।

वपुरिन्द्रियादिविषया याहंबुद्धिर्मनत्यसौ[1] भ्रान्तिः।

तद्बुद्धिरियमतस्मिन्नध्यासत्वेन शास्यमानत्वात्।।८६।।


तस्मादशेषसाक्षी परमात्मैवाहमर्थ इत्युचितम्।

अजडवदेव जडोयं सत्संबंधाद्भवत्यहंकारः।।८७।।

तस्मात् सर्वशरीरेष्वहमहमित्येव भासते स्पष्टः।

यः प्रत्ययो विशुद्धस्तस्य ब्रह्मैव भवति मुख्यार्थः।८८।।

[1] बुद्धि शब्दात द्ध हे अक्षर दोन्ही ठिकाणी चुकीच्या पद्धतीने लिहिले आहे.



गो-शब्दार्थो[1] गोत्वं तदभिव्यक्तिः प्रतीयतेर्थतया।

अहमर्थः परमात्मा तद्वद्भ्रान्त्या भवत्यहंकारः।८९।।

दग्धृत्वादिकमयसः पावकसंयोगेन भासते यद्वत्।

तद्वच्चेतनसङ्गादहमिति प्रतिभान्ति कर्तृतादीनि।।९०।।

देहेन्द्रियादिदृश्यव्यतिरिक्तं विमलमतुलमद्वैतम्।

अहमर्थ इति विदित्वा तद्व्यतिरिक्तं न कल्पयेत्[2] किञ्चित्।।९१।।

यद्वत्सुखदुःखानामवयवभेदादनेकता देहे।

तद्वदिह सत्यभेदेप्यनुभववैचि यमात्मनामेषाम्।।९२।।

---

[1] गोशब्दार्थो शब्द लिहिताना ब्द या ठिकाणी अकारणच किंवा चुकीने हरताळ लावलेला आहे.

[2] कल्पयेत् शब्द लिहिताना ल हे अक्षर अर्धे न लिहिता पूर्ण लिहिलेले दिसते.

किमिदं किमस्य रूपं[1] कथमेतदभूदमुष्य को हेतुः।

इति न कदापि विचिन्त्यं चिन्त्यम् आयेति धीमनाविश्वम्।।९३।।

दन्तिनि दारूविकारे दारूतिरोभवति सोऽपि तत्रैव।

जगति तथा परमात्मा परमात्मन्यपि जगत् तिरोधत्ते।।९४।।

आत्ममये महति पटे विविधजगच्चित्रमात्मनालिखितम्।

स्वयमेव केवलमसौ[2] पश्यन्प्रमुदं प्रयाति परमात्मा।।९५।।


चिन्मात्रममलमक्षयमद्वयमानन्दमनुभवारूढम्।

ब्रह्मैवास्ति तदन्यन्न किञ्चिदस्तीति निश्चयो विदुषाम्।।९६।।

---

[1] रूप शब्दात रू लिहिताना दीर्घ रू दाखवण्यासाठी विचित्र खूण दिलेली दिसते.

[2] केवलमसौ शब्दात ल च्या जागी ळ चा प्रयोग केला आहे. तसेच ९६ व्या आर्येत अमल शब्दातही ल च्या ऐवजी ळ दिसतो.



व्यवहारस्य दशेयं विद्याविद्येति वेद[1]-परिभाषा।

नास्त्येव तत्त्वदृष्ट्या तत्त्वं ब्रह्मैव नान्यदस्त्यस्मात्।।९७।।

अस्त्यन्यदिति मतं चेत्  तदपि ब्रह्मैव तदस्तितारूपम्।

व्यतिरिक्तमस्तिता या नास्तितया शून्यमेव[2] तत्सिद्धम्।।९८।।

तत्त्वावबोधशक्त्या स्थिरया या बाधितापि सा माया।

आदेहपातमेषामाभात्यात्मानमपि निजं विदुषाम्।।९९[3]।।

एष विशेषो विदुषां पश्यन्तोपि  प्रपञ्चसंसारम्।

पृथगात्मनो न किञ्चित्पश्येयुः सकलनिगमनिर्णीतात्[4]।।१००।।


---

[1] वेद या ठिकाणी हरताळ लावल्यामुळे वे या अक्षराऐवजी देद असा भास होतो.

[2] शून्य हा शब्द श्रून्य असालिहीला आहे.तसेच आर्येच्या शेवटी द्ध या अक्षराच्या लेखनात पुन्हा तीच चूक दिसते.

[3] आर्या संपल्यावर लिहिलेला ९९ कमांक वेगळ्या शैलीतील आहे.गुजरात प्रांतात असे ९ लिहिण्याची परंपरा दिसते.

[4] सकल शब्दात ल च्या जागी ळ .



प
किंकथनीयंकिमप्यकथनीयं॥किंकृत्यंकिमकृत्यंनिखिलंतदिति
जानतांविदुषां॥१॥निखिलंदृश्यविशेषंदृग्रूपत्वेनपश्यतांविदुषां
बंधोनापिनमुक्तिर्नचपरमात्मत्वमपिनजीवत्वं॥२॥असकृद
नुचिंतितानामव्याहततरनिजोपदेशानां॥प्रामाण्यपरमसीम्नां
निगमनमिदमेवनिखिलनिगमानां॥३॥इत्थंनिबोधितःसन्गु
॥१३॥ रुणाशिष्योहृष्यन्प्रणम्यतंपदयोः॥स्वानुभवसिद्धमर्थंस्वय ॥१३॥
मेवांतर्विचारयामास॥४॥अजरोहमक्षरोहंप्राज्ञोहंप्रत्यगात्म

किं चिंत्यं किमचिंत्यं किं कथनीयं किमप्यकथनीयम्।

किं कृत्यं किमकृत्यं निखिलं तदिति जानतां विदुषाम्। ।१०१। ।

निखिलं दृश्यविशेषं दृगूपत्वेन पश्यतां विदुषाम्।

बन्धो नापि न मुक्तिर्न च परमात्मत्वमपि न जीवत्वम्। ।१०२। ।

असकृदनुचिन्तितानामव्याहततर निजोपदेशानाम्।

प्रामाण्यपरमसीम्नां निगमनमिदमेव निखिलनिगमानाम्। ।१०३। ।


इत्थं निबोधितः सन् गुरुणा[1] शिष्यो हृष्यन्प्रणम्य[2] तं पदयोः।

स्वानुभवसिद्धमर्थं स्वयमेवान्तर्विचारयामास। ।१०४। ।

---

[1] गुरूणा शब्दात रू लिहिताना दीर्घ रू दाखवण्यासाठी विचित्र खूण दिलेली दिसते.

[2] हृष्यन् शब्दातील हृ हे अक्षर समजून घ्यावे लागते.


॥बो॥ बोधोहं॥ परमानंदमयोहं परमशिवोहं भवामि परिपूर्णः॥५॥ आ ॥ध॥
द्योहमात्मभाजामात्मानंदानुभूतिरसिकोहं॥ आबाळगोपम
खिलैरहमित्यनुभूयमानमहिमाहं॥६॥ इंद्रियसुखविमुखोहं
निजसुखबोधानुभूतिभरितोहं॥ इतिमतिदूरतरोहं भावेतरसु
खितचित्तोहं॥७॥ ईशोमहीश्वराणां ईर्ष्याद्वेषानुषंगरहितोहं॥
ईक्षणविषयमतीनां ईप्सितपुरुषार्थसाधनपरोहं॥८॥ उदयो
हमेवजगतामुपनिषदुद्यानकृतविहारोहं॥ उद्वेलशोकसागर

अजरोऽहमक्षरोऽहं प्राज्ञोऽहं प्रत्यगात्मबोधोऽहम्।

परमानन्दमयोऽहं परमशिवोऽहं भवामि परिपूर्णः।।१०५।।

आढ्योऽहमात्मभाजामात्मानन्दानुभूतिरसिकोऽहम्[1]।

आबालगोपमखिलैरहमित्यनुभूयमानमहिमाहम्[2]।।१०६।।

इन्द्रियसुखविमुखोऽहं निजसुखबोधानुभूतिभरितोहम्

इतिमतिदूरतरोऽहं भावेतरसुखितचित्तोऽहम्।।१०७।।

ईशोऽहमीश्वराणाम् ईर्ष्याद्वेषानुषङ्गरहितोऽहम्[3]।

ईक्षणविषयमतीनाम् ईप्सितपुरषार्थसाधनपरोऽहम्।।१०८।।

उदयोऽहमेव जगतामुपनिषदुद्यानकृतविहारोऽहम्।


उद्वेलशोकसागरवाडवमुखहव्यवाहनार्चिरहम्।।१०९।।

---

[1] अ चा लोप दाखवण्यासाठी आवश्यक अवग्रह देण्याचे सर्वच ठिकाणी टाळले आहे.

[2] आबाल शब्दात ल च्या जागी ळ.

[3] ईर्षा शब्द लिहीताना ष व य यंची जुळणी गोधळवून टाकणारी आहे.


मुखदूश्य
बाडवमुखवाहनाग्निरहं॥१०९॥उर्जस्वळनिजविभवैरूर्ध्वमधस्तिर्य
गश्नुवानोहं॥ऊहापोहविचारैरररीकृतवत्प्रतीयमानोहं॥११०॥
ऋषिरहमृषिगणोहंसृष्टिरहंसृज्यमानमहमेव॥ऋद्धिरहंवृद्धि
रहंतृप्तिरहंतृप्तिदीपदीप्तिरहं॥१११॥एकोहमेतदीदृशमेवमि
तिस्फुरितभेदरहितोहं॥यष्टव्योहमनीहैरंतःसुकृतानुभूति
॥१८॥ रहितोहं॥११२॥ऐक्यावभासकोहंवाक्यपरिज्ञानपावनमती ॥१८॥
नां॥ऐशमहमेवतत्वंनैशतमःप्रायमोहमिहिरोहं॥११३॥ओं

ऊर्जस्वलनिजविभवैरूर्ध्वमधस्तिर्यगश्नुवानोऽहम्[1]।

ऊहापोहविचारैरररीकृतवत् प्रतीयमानोऽहम्। ।११०। ।

ऋषिरहमृषिगणोऽहं सृष्टिरहं सृज्यमानमहमेव।

ऋध्दिरहं वृध्दिरहं[2] तृप्तिरहं तृप्तिदीपदीप्तिरहम्। ।१११। ।

एकोऽहमेतदीदृशमेवमिति स्फुरितभेदरहितोऽहम्।

यष्टव्योहमनीहैरन्तःसुकृतानुभूतिरहितोऽहम्। ।११२। ।


ऐक्यावभासकोऽहं वाक्यपरिज्ञानपावनमतीनाम्।

ऐशमहमेव तत्त्वं नैशतमःप्रायमोहमिहिरोऽहम्। ।११३। ।

---

[1] ऊर्जस्वल शब्दात ल च्या जागी ळ.तसेच दीघ रू र च्या खाली उकार जोडून.

[2] ऋद्धि शब्दात व वद्धि शब्दात द्ध हे अक्षर दोन्ही ठिकाणी चुकीच्या पद्धतीने लिहीले आहे .


।।बो।। ओजोहमोषधीनामोतप्रोतायमानभुवनोहं।।ॐकारसार ।।ध।।
सोल्लसदात्मसुखामोदमत्तभृंगोहं।।१४।।औषधमहमशु
भेद भानांऔपाधिकजालरहितोहं।।औदार्यातिशयोहं वि
र्व विधचतुर्गवितरणपरोहं।।१५।।अंकुशमहमखिलानामहंत
यामत्तवारणेंद्राणां।।अंबरमिवविमलोहंशंबररि
पुजातविकृतिरहितोहं।।१६।।आत्मविकल्पमतीनामस्खल
दुपदेशागम्यमानोहं।।अस्छिरसुखविमुखोहंसुखबोधसंपदु
सुस्थिर

ओजोऽहमोषधीनामोतप्रोतायमानभुवनोऽहम्[1]।

ॐकारसारसोल्लसदात्मसुखामोदमत्तभृङ्गोऽहम्।।११४।।

औषधमहम् अशुभानाम् औपाधिकभेदजालरहितोऽहम्।

औदार्यातिशयोऽहं विविधचतुर्वर्गवितरणपरोऽहम्।।११५।।

अङ्कुशमहमखिलानामहंतयामत्तवारणेन्द्राणाम्।


अम्बरमिव विमलोऽहं शम्बररिपुजातविकृतिरहितोऽहम्।।११६।।

आत्मविकल्पमतीनामस्खलदुपदेशगम्यमानोऽहम्।

अस्थिरसुखविमुखोऽहं[2] सुस्थिरसुखबोधसंपदुपचितोऽहम्।।११७।।

[1] ओष्धीनाम् शब्दात –हस्व इकाराचा दीर्घ व अन्य सगळ्या सुधारणा कोणीतरी अभ्यासू माणसाने नंतर केल्या असाव्या हे टाकाच्या बारीकपणामुळे कळते.

[2] अस्थिर सुखातील थ च्या जागी छ चुकून लिहीला आहे तसेच सुस्थिर शव्दातही केले आहे.



करुणारसभरितोऽहं कवलितकमलासनादिलोकोऽहम्[1]।

कलुषहरवीक्षणोऽहं कल्मषसुकृतोपलेशरहितोऽहम्[2]। ।११८। ।

खगानामगोचरोऽह[3] खातीतोऽहं खपुष्पभवनोऽहम्।

गन्तव्योऽहं अनीहैर्गत्यागतिरहितपूर्णबोधोऽहम्। ।११९। ।

घनतरमोहतमिस्रकर परिध्वंसभानुनिकरगेहोऽहम्[4]।

घटिकावासररजनीसंवत्सरयुगकल्पकालभेदोऽहम्। ।१२०। ।

चरदचरात्मकोऽहं चतुरमतिश्लाघ्यमानचरितोऽहम्।

चपलजनदुर्गमोऽहं चञ्चलभवजलधिपारदेशोऽहम्। ।१२१। ।


---

[1] कवलित शब्दात व च्या जागी ब

[2] कल्मष शब्दात ल अर्धा न लिहीता पूर्ण

[3] खगानाम् शब्दात गा दिसत नाही पण खनामगोचरोऽहम् यापेक्षा खगानामगोचरोऽहम अधिक बरोबर वाटते.

[4] भानुनिकरगेहं या शब्दात एक हो लेखनिकाने उडवला आहे, भानुनिकरगेहोऽहम् हे बरोबर वाटते। हे haplology या दोषाचे उदाहरण आहे.


नि
॥बो॥ छंदःसिंधुगूढज्ञानसुखाल्हादमोदमानोहं॥ छलपदविहित ॥ध्रा॥
मतीनां छन्नोहं शांतिमार्गगम्योहं॥ २२॥ जलजासनादिगोच
रपंचमहाभूतमूलभूतोहं॥ जगदानंदकरोहं जन्मजरारो
गमरणरहितोहं॥ २३॥ हुंकृति हुंकृति सिंजित बृंहितमुखविवि
नाद धभेदोहं॥ झटितिघटितात्मवेदनदीपपरिस्फुरितहृदयभव प
नोहं॥ २४॥ ज्ञानमहं ज्ञेयमहं ज्ञाताहं ज्ञानसाधनगणोहं॥
ज्ञानाज्ञानविनाकृतमकृमस्तित्वमात्रमेवाहं॥ २५॥ तत्वा
तक

छन्दसिन्धुनिगूढज्ञानसुखाह्लाद[1]-मोदमानोऽहम्।

छलपदविहितमतीनां छन्नोऽहं शान्तिमार्गगम्योऽहम्।।१२२।।

जलजासनादिगोचरपंचमहाभूतमूलभूतोऽहम्।

जगदानन्दकरोऽहं जन्मजरारोगमरणरहितोऽहम्।।१२३।।


हुंकृति-हुंकृति-सिञ्जित बृंहितमुखविविधनादभेदोऽहम्।

झटितिघटितात्मवेदनदीपपरिस्फुरितहृदयभवनोऽहम्।।१२४।।

ज्ञानमहं ज्ञेयमहं ज्ञाताहं ज्ञानसाधनगणोऽहम्।

ज्ञानाज्ञानविनाकृतमकृतकमस्तित्वमात्रमेवाहम्।।१२५।।

[1] आल्हाद शब्द लिहीताना ल अर्धा न लिहिता पूर्ण लिहिला आहे.


स्मीति तीतपदोहंतदंतरेभावरहितोहं॥२६॥तामसदुरधिगमोहंत
त्वंपदबोधबोध्यहृदयोहं॥२६॥दैवतदैत्यनिशाचरमानवर्ती
म र्यंमहीधरादिरहं।देहेंद्रियरहितोहंदक्षिणपूर्वादिग्विभागो दि
हं॥२७॥धर्माधर्ममयोहंधर्माधर्मादिबोधरहितोहं।धार्मि
जन कजनसुलभोहंधन्योहंधातुरादिभूतोहं॥२८॥नामादिविरहि
॥१६॥ तोहंनरकस्वर्गापवर्गरहितोहं।नादांतरविदितोहंनानाविध ॥१६॥
नि निखिलनिगमसारोहं॥२९॥परजीवभेदबाधकपरमा
२स्व

तत्त्वातीतपदोऽहं तदन्तरेस्मीति भावरहितोऽहम्[1]।

तामसदुरधिगमोऽहं तत्त्वंपदबोधबोध्यहृदयोऽहम्।।१२६।।

दैवतदैत्यनिशाचरमानवतीर्यक्[2]-महीधरादिरहम्।

देहेन्द्रियरहितोहं दक्षिणपूर्वादिदिग्विभागोऽहम्।।१२७।।

धर्माधर्ममयोऽहं धर्माधर्मादिबोधरहितोऽहम्।


धार्मिकजनसुलभोऽहं धन्योऽहं धातुरादिभूतोऽहम्।।१२८।।

नामादिविरहितोऽहं नरकस्वर्गापवर्गरहितोऽहम्।

नादांतरविदितोऽहं नानाविधनिखिलनिगमसारोऽहम्।।१२९।।

[1] अर्धी आर्या झाल्यवरच चुकून २६ हा आकडा दिला आहे.

[2] तीर्यक् शब्दातील अर्धा क गाळून य वर अनुस्वार दिलेला दिसतो.



॥ बो ॥ र्थज्ञानशुध्यचित्तोहं॥प्रकृतिरहंविकृतिरहंपरिणतिरहम ॥ ध ॥
स्मिभागधेयानां॥१३०॥फणिधरभूधरवारणविग्रहविध्य
तप्रपंचसारोहं॥फालितलोदितलोचनपावकपरिभूत
पंचबाणोहं॥१३१॥बध्दोभवामिनाहंबंधान्मुक्तस्तथापिनै
वाहं॥बोध्योभवामिनाहंबोधोहंनैवबोधकोनाहं॥१३२॥ 33
भक्तिरहंभजनमहंमुक्तिरहंमुक्तियुक्तिरहमेव॥भूतानु
शासनोहंभूतभवद्भव्यमूलभूतोहं॥१३३॥मान्योहम

परजीवभेदबाधकपरमार्थज्ञानशुद्धचित्तोऽहम्[1]।

प्राकृतिरहं विकृतिरहं परिणतिरहमस्मि भागधेयानाम्। ।१३०। ।

फणिधरभूधरवारणविग्रहविधृतप्रपञ्चसारोऽहम्।

फालतलोदित[2]-लोचनपावकपरिभूतपंचबाणोऽहम्। ।१३१। ।

बद्धो भवामि नाहं बन्धान्मुक्तस्तथापि नैवाहम्।

बोध्यो भवामि नाहं बोधोऽहं नैव बोधको नाहम्। ।१३२। ।


भक्तिरहं भजनमहं मुक्तिरहं मुक्तियुक्तिरहमेव।

भूतानुशासनोऽहं भूतभवद्भव्यमूलभूतोऽहम्। ।१३३। ।

---

[1] शुद्धचित्तोऽहम शब्दात श च्या जागी श्र तसेच द्ध चे चुकीच्या पद्धतीने लेखन.

[2] फालतलोदित हा शब्द नीट कळत नाही पण संदर्भानुसार घेतला आहे.


स्मि महतां मंदमतीनाममाननीयोहं॥ मदरागमानमोहि
तमानसदुर्वासनादुरापोहं॥१३४॥ यजनयजमानयाजक
यागमयोहं यमादिरहितोहं॥ ईंद्रयमवरुणयक्षराक्षस
मरु[illegible]वह्निरूपोहं॥१३५॥ रक्षाविधानशिक्षादीक्षितली
लावलोकमहिमाहं॥ रजनीदिवसविरामस्फुरदनुभूति
॥१२॥ प्रमाणसिद्धोहं॥१३६॥ लक्षणलक्ष्यमयोहं लाक्षणिकोहं ल ॥१२॥
यादिरहितोहं॥ लाभालाभमयोहं लब्धव्यानाममलभ्य

मान्योऽहस्मि महतां मन्दमतीनाममाननीयोऽहम्।

मदरागमानमोहितमानसदुर्वासनादुरापोऽहम्।।१३४।।

यजनयजमानयाजकयागमयोहं यमादिरहितोऽहम्।

इन्द्रयमवरुणयक्षराक्षसमरुत्कीश[1]-वह्निरूपोऽहम्।।१३५।।

रक्षाविधानशिक्षादीक्षितलीलावलोकमहिमाहम्।

रजनीदिवसविरामस्फुरदनुभूतिप्रमाणसिद्धोऽहम्[2]।।१३६।।


लक्षणलक्ष्यमयोऽहं लाक्षणिकोऽहं लयादिरहितोहम्।

लाभालाभमयोऽहं लब्धव्यानामलभ्यमानोऽहम्।।१३७।।

---

[1] हस्तलिखीतात यक्षराक्षसमरू इथपर्यंत नीट दिसत आहे इथपर्यंत घेतलेल्या प्रचीन देवता पाहता पुढे कीश या इंद्र वाचक शब्दाचा उल्लेख असावा असे वाटते.

[2] सिद्ध शब्दात इथे प्रथमच द्ध हे जोडाक्षर योग्य पद्धतीने लिहिले आहे.



वर्णाश्रमरहितोऽहं वर्णमयोऽहं वरेण्यगण्योऽहम्।

द्याचामगोचरोऽहं मनसामपदे[1] निविष्टोऽहम्।।१३८।।

शमदमविरहितमनसां शास्त्रशतैरप्यगम्यमानोऽहम्।

शरणमहमेव विदुषां शकलीकृतविविधसंशयगणोऽहम्।।१३९।।

षड्भावविरहितोऽहं षड्गुणरहितोऽहमहितरहितोऽहम्।


षट्कोशविरहितोऽहं षट्त्रिंशत्तत्त्वजालरहितोऽहम्।।१४0।।

संवित्सुखात्मकोऽहं समाधिसङ्कल्पकल्पवृक्षोऽहम्।

संसारविरहितोऽहं साक्षात्कारोऽहमात्मविद्यायाः।।१४१।।

---

[1] मनसामपदे  मनाच्या पोहोचे पलीकडील स्थानी मी आहे .


क्षात्कारोहमात्मविद्यायाः॥४१॥हव्यमहंकव्यमहंहेयोपा
देयभावश्रून्योहं॥हरिरहमस्मिहरोहंविधिरहमेवेकारणं नि
तेषां॥४२॥क्षालितकलुषमयोहंक्षपितभवक्लेशजालहृद
योहं॥क्षांताद्यक्षरसहितविविधव्यवहारमूलमहमेव॥४३॥
बहुभिःकिमेभिरुक्तैरहमेवेदंचराचरंविश्वं॥सीकरफे
॥१८॥ नतरंगाःसिंधोरपराणिनखलवस्तूनि॥४४॥शरणंनहि ॥१८॥
ममजननीनपितानसुतानसोदरानन्ये॥परमंशरणमि

हव्यमहं कव्यमहं हेयोपादेयभावशून्योऽहम्[1]।

हरिरहमस्मि हरोऽहं विधिरहमेवेति कारणं तेषाम्। ।१४२। ।

क्षालितकलुषमयोहं क्षपितभवक्लेशजालहृदयोऽहम्[2]।

क्षान्ताद्यक्षरसहितविविधव्यवहारमूलमहमेव। ।१४३। ।

वहुभिः किमेभिरक्तैरहमेवेदं चराचरविश्वम्।

सीकरफेनतरङ्गाः सिन्धोरपराणि नखलववस्तुनि[3]। ।१४४। ।

शरणं नहि मम जननी न पिता न सुता  न सोदरा नान्ये।


परमं शरणमिदं मे चरणं मम मूर्ध्नि देशिकन्यस्तम्। ।१४५। ।

---

[1] हेयोपादेयभावशून्योऽहम या शब्दात श च्या जागी श्र  चा वापर.

[2] क्लेश शदात क च्या खाली पूर्ण ल लिहिला आहे.

[3] नखलववस्तुनि ह्या शब्दातील एक व गाळून टाकला आहे व नखलवस्तुनि असा लिहिला आहे. हे haplology या दोषाचे उदाहरण आहे.



आस्ते देशिकचरणं निरवधिरास्ते तदीक्षणे करणा।

आस्ते किमपि तदुक्तं किमतः परमस्ति जन्मसाफल्यम्।।१४६।।

कारण्यसारसान्द्राः काङ्क्षितवरदानकल्पकविशेषाः।

श्रीगुरुकटाक्षपानाः शिव शिव शमयन्ति चित्तसन्तापम्।।१४७[1]।।


कवलितचञ्चलचेतोगुरूतरमण्डूकजातपरितोषा।

शेते चित्तगुहायां चिरतरमेकैव[2] चिन्मयी भुजगी।।१४८।।

---

[1] १४७ या कमांकाच्या जागी लेखनिकाने १४६0 असे काहीतरी लिहिले आहे. त्यामुळे पुढील कमांक चुकत गेले आहेत.

[2] चिरतरमेकैव या शब्दात म या अक्षरावर मात्रा द्यायची राहिली आहे.



मयि सुखबोधपयोधौ महति ब्रह्माण्डबुद्बुदसहस्राम्।

मायामयेनमरता भूत्वा भूत्वा[1] मुहुस्तिरोधत्ते।।१४९।।

गुरुकरुणयैव नावाप्राक्तनभाग्यानुकूलमारतया[2]।

दुःसह दुखतरङ्गः चिरतरसंसारसागरस्तीर्णः।।१५0।।

सति तमसि मोहरूपे विश्वमपश्यंस्तदेतदित्यखिलम्।

उदितवति[3] बोधभानौ किमपि न पश्यामि किन्विदं चित्रम्।।१५१।।


इत्यात्मबोधलाभं मुहुरनुचिन्त्यं प्रमोदमानेन।

प्रारब्धकर्मणान्ते तेन परं प्राप्यते स्वकैवल्यम्।।१५२।।

[1] काकपद घलून लिहीलेला भूत्वा शब्द वेगळ्या माणसाने लिहिला असावा असे वाटते.

[2] प्राक्तन शब्दातील क्त हे जोडाक्षर व अनुकूल शब्दातील कू चा दीर्घ उ कार चुकीचा आहे.

[3] उदितवति शब्दातील उ हे अक्षर समजून घ्यावे लागते.


न
त्तरणं॥ स्वात्मनिरूपणमेतत्प्रकरणवरं रक्षणीयमतः॥१५३॥
अज्ञानतिमिरहंताविरचितविज्ञानपंकजोल्लासः॥ मानस
गगनतलं मे भासयति श्रीनिवासगुरुभानुः॥१५४॥ अखिल
परमहंसदेशिकमागमगूढार्थदर्शकं प्राज्ञं॥ आनंदपूर्ण
सामरमग्नमहं नौमि शंकराचार्यं॥ १५५॥ स्वात्मावबोधही
नाः कुणपशरीराभिमानसंतुष्टाः॥ वारिजबुद्बुदरक्षां मू
ढाः कुर्वंति मोहबंधनं॥१५६॥ जलमिव मृगतृष्णायां शुक्तौ
रजतं यथा ह्याही रज्ज्वां॥ सत्यमिव सत्य एतत्कल्पितमा

मोहान्धकारहरणं संसारोद्वेलसागरोत्तरणम्।

स्वात्मनिरूपणमेतत्प्रकरणवरं रक्षणीयमतः।।१५३।।

अज्ञानतिमिरहन्ता विरचितविज्ञानपङ्कजोल्लासः।

मानसगगनतलं मे भासयति श्रीनिवासगुरुभानुः।।१५४।।

अखिलपरमहंसदेशिकमागमगूढार्थदर्शकं प्राज्ञम्।

आनन्दपूर्णसागरमग्नमह[1] नौमि शङ्कराचार्यम्।।१५५।।

स्वात्मावबोधहीनाः कुणपशरीराभिमानसन्तुष्टाः।

वारिजबुद्बुदरक्षामूढाः[2] कुर्वन्ति[3] मोहबन्धनम् ।।१५६।।

जलमिव मृगतृष्णायां शुक्तौ रजतं यथा ह्यहि[4] रज्ज्वाम्।

सत्यमिव सत्य एतत् कल्पितमाभाति मम परासन्दे।।१५७।।


---

[1] सागर शब्दात ग च्या ऐवजी म लिहीला गेला आहे.

[2] वारिजबुद्बुदराक्षामूढाःशब्दात क्षा वर अनुस्वार  अनावश्यक आहे.

[3] कुर्वति असे रूप मुळ लेखात आहे पण ते कुर्वन्ति असे असावयास हवे.

[4] मूळ पाठ 'यथा ह्याही' असा आहे पण यथा ह्यहि हा योग्य पाठ आहे



अखिलनिगमान्त लक्ष्यं हानोपादानहीनचिन्मात्रम्।

अनुभूतिमानगम्यं ब्रह्मैवानन्दमस्मि परिपूर्णः।।१५८।।

तीर्थे श्वपचगृहे वा नष्टस्मृतिरपि परित्यजन्[1] देहम्।

ज्ञानसमकालमुक्तः कैवल्यं याति हानशोकः।।१५९।।

हयमेधसहस्राण्यथवा कुरुताद्ब्रह्महतलक्षाणि।

परमार्थविन्न पुण्यैर्न पापैः स्पृश्यते[2] विमलः।।१६0।।

विदितं वेदरहस्यं विदितं देहो ह्ययमनात्मेति।

विदितः पर इति च आत्मा किमतः परमस्ति जन्मसाफल्यम्।।१६१।।

## इति बोधार्या /वेदान्तबोधः

[1] परित्यजन् शब्दात अर्धा त व य यांचा संधी समजून घ्यावा लागतो.

[2] सपृश्यते शब्दात स्प ला ऋ कार दिला नाही.

लेखनिकाने केलेल्या चुकांचे संकलन

**1** चरणाच्या शेवटी येणारा अनुस्वार हलन्त म नाही.

**2** अनेक ठिकाणी ल या वर्णाच्या जागी ळ चा वापर.

**3** अन्य अक्षराबरोबर ल चा संधी करताना ल हे अक्षर पूर्ण लिहीले आहे.

**4** ष बरोबर ण चा संधी विचित्र पद्धतीने लिहीला आहे.

**5** द् व ध यांचा द्ध हे संयुक्ताक्षर दाखवण्यासाठी केलेला संधी सर्वत्र चुकीच्या पद्धतीचा.

**6** कुठेही ऽ चा उपयोग केलेला नाही.

**7** दीर्घ रू लिहीताना दोन उ काराची चिह्ने एकाखाली एक दिलेली दिसतात.

**8** त्यक्त्वा शब्दात येणारा क् त् व् यांचा संधी विचित्र.

**9** श च्या जागी अनेक ठिकाणी श्र चा उपयोग दिसतो.

**10** क्व हे जोडाक्षर व्क असे काहीसे विचित्र.

**11** काही ठिकाणी व च्या जागी ब वापरलेला दिसतो.

## निष्कर्ष

चरणाच्या शेवटचा अनुस्वार म् च्या रूपााने न लिहिणे तसेच अवग्रहाचा वापर न करणे ह्या चुका बहुतेक सगळे लेखनिक करताना आढळतात। किंबहुना प्राचीन काळी अशीच पद्धत होती हे ल्क्षात येते .

ल च्या जागी ळ चा वापर लेखनिकाचे कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात या पैकी एखाद्या प्रांतातील मूळ सुचवतो .

३ ४ ५ ८ व १0 या मुद्दयात लिहिलेल्या चुकांवरून तसेच दुस-या आर्येत निहत च्या जागी निहित लिहिण्यावरून लेखनिक संस्कृतचा जाण्कार नसावा हे लक्षात येते .

श च्या जागी श्र लिहिणे म्हणजे श्री श च्या पोटात रकार देता देता बदलेलेरूप आहे .

व च्या जागी ब चा वापर सुद्धा लेखनिकाची प्राचीनता दाखवतो .

# प्रकरणग्रंथ

संस्कृत तत्त्वज्ञानग्रंथाची विभागणी स्थूलमानाने चार प्रकारे करता येते. मूळग्रंथ म्हणजे वेद,उपनिषदे, पुराणे, स्मृति,आदिकाव्ये, काही महाकाव्ये असे म्हणता येईल.या नंतर चा वर्ग म्हणजे भाष्यग्रंथ . याहून अधिक सोपे म्हणजे प्रकरणग्रंथ. या सार्वात सोपे व गेय असे साहित्य म्हणजे स्तोत्रग्रंथ.हे सगळे ग्रंथ आपापल्या मार्गाने तत्त्वज्ञानाचा बोध करून देत असतात.

भाष्ये, प्रकरणग्रंथ व स्तोत्रगंथ हे कमी अधिक प्रमाणात मूळ ग्रंथातील विषय सोपा करून वेगळ्या पद्धतीने मांडतात.सोपेपणाच्या कसोटीवर तपासल्यास स्तोत्रसाहित्य सार्वात सोपे व भाष्यग्रंथ हे अवघड असे म्हणता येईल.

या मूळ ग्रंथांच्या आधाराने त्यातील अर्थ अधिक स्पष्ट करण्यासाठी,प्रमेये उलगडून दाखविण्यासाठी जे लेखन केले जाते त्यास भाष्यग्रंथ असे म्हणतात.भाष्यग्रंथ हे प्राधान्याने विद्वान व अधिकारी अभ्यासकांसाठी असतात.यात खंडन मंडन पद्धतीचा अवलंब केलेला आढळतो. शस्त्रीयप्रमाणे, दृष्टांत यांच्या सहायाने मूळ ग्रंथातील विषय उलगडून दाखविलेला असतो. पूर्वपक्ष - सिद्धांत , शंका- समाधान अशा युक्तींचा वापर भाष्यग्रंथात दिसून येतो.

प्रकरणग्रंथ हे भाष्यग्रंथाहून या सगळ्या अंगानी वेगळे असतात.या लेखनात मूळ ग्रंथाचा प्रत्यक्ष आाधार घेतलेला नसतो.पण तत्त्वज्ञानप्रणाली मात्र घेतलेली असते.जे अभ्यासक किंवा जिज्ञासु साधक मूळग्रंथांना कठीण मानतात अथवा मूळग्रंथ त्यांना उपलब्ध होत नाहीत तसेच भाष्यग्रंथ ज्यांना क्लिष्ट वाटतात अशा जिज्ञासु साधकांना प्रकरणग्रंथ आधार ठरतात.न्याय, मीमांसा, योग ,व्याकरण अशा विविध शाखांचे प्रकरणग्रंथ त्या त्या शास्त्रातील कठीण विषय संवादरूपाने, प्रश्नोत्तररूपाने, उदाहरणे देत स्पष्ट करतात व जिज्ञासु साधकाच्या मनात त्या विषयाविषयी गोडी उत्पन्न करतात[1].एकदा विययात प्रवेश झालेला साधक नंतर भाष्ये अथवा मूळग्रंथ वाचण्यास अधिकारी बनतो.

[1] जैनदर्शनातील काही प्रकरणग्रंथ ः- सन्मतितर्कप्रकरणम् लेखक सिद्धसेन दिवाकर, न्यायखण्डखाद्यप्रकरणम् लेखक यशोविजयसुरी,'न्यायतीर्थप्रकरणम् न्यायविजयजी, अनेकान्तव्यवस्थाप्रकरणम् लेखक यशोविजय उपााध्याय, षोडषकप्रकरणम् लेखक हरिभद्रसुरी

या प्रकरणग्रंथांच्या बाबतीत आकार महत्वाचा नसतो.एका श्लोकापासून पाच-सहाशे श्लोकांएवढा आकार असलेले प्रकरणग्रंथ आहेत.गद्य पद्य तसेच गद्यपद्यात्मक असे उभयस्वरूपाचेलेखन प्रकरणग्रंथात असू शकते.

वेदान्तबोध अथवा बोधार्या हाही असाच एक प्रकरणग्रंथ[2] आहे.केवलाद्वैत परंपरेचा बोध सोप्या भाषेत करून देण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. साधनचतुष्टय,आत्मा अथवा ब्रह्म, पंचकोशांचे अनात्मत्व , महावाक्य, लक्षणा, जीवाचे व ब्रह्माचे स्वरूप, जीवब्रह्माभेद, गुर कृपा, वेदमहती, विद्याविद्या अशा अनेक विषयांचे लेखकाने सोप्या भाषेत निरूपण केले आहे.मायेचे दुर्निवारत्व ९९ व्या आार्येत मांडतांना विद्वान माणसास सुद्धा शरीर असेपर्यंत मायेचा प्रभाव जाणवत राहतो हे ठासून सांगितले आहे.

मोहान्धकारहरणं संसारोद्वेलसागरोत्तरणम्।
स्वात्मनिरूपणमेतत्प्रकरणवरं रक्षणीयमतः।।१५३

या शब्दात मोहरूपी अंधकार नाहीसे करणारे, संसाररूप सागर तारून नेणारे व आत्म्याची ओळख कर न देणारे हे प्रकरण म्हणजे प्रकरणग्रंथ सुरक्षित ठेवावा असे सुचवले आहे.

साधनचतुष्टयाचे महत्त्व लेखकाने अगदी कमी शब्दात मांडले आहे. सकलसाधनोपेतः हा एकच शब्द समग्र साधनचतुष्टयाचा विषय व साधकाच्या ठायी आवश्यक असणारी योग्यता अधोरेखित करतो.

मी स्वतः आहे किंवा नाही अशी शंका कोणास येत नाही, सदैव मी आहे हे भान सगळ्यांना असतेच व हे जे मी चे असणे आाहे तेच ब्रह्म आहे अशा शब्दात सोप्या रीतीने तत्त्वमसि ची भूमिका लेखक तयार करतो .केवलाद्वैताचा मुख्य विचार इतक्या सोप्या पद्धतीने मांडल्यास कोणास बरे समजणार नाही? २० व्या आर्येत स्वयंप्रकाशी असल्यामुळे ब्रह्म हे सर्वांना दिसावयास हवे पण ते कोणासही दिसत

---

मध्वाचार्यांच्या नावावरही १0 प्रकरणग्रंथ प्रसिद्ध आहेत . तत्त्वसंख्यान, तत्त्वविवेक, तत्त्वोद्योत,तत्त्वनिमय हे एका गटात
दुस-या खंडनत्रय या गटात मायावादखंडन,उपााधिखंडन, प्रपंचमिथ्यात्वखंडन हे ग्रंथ येतात
तिस-या गटात प्रमाणलक्षण व कथालक्षण हे दोन ग्रंथ येतात
चवथ्या गटात कर्मनिर्णय हा एक ग्रंथ येतो

[2] प्रकरणग्रंथाची व्याख्या करणारा एक सांप्रदायिक श्लोक आढळतो .
शास्त्रैकदेशसम्बद्धं शास्त्रकार्यान्तरे स्थितम्।आहुः प्रकरणं नाम ग्रन्थभेदविपश्चितः।।पराशरोपपुराण १३ . २१

नाही हे सांगतांना सहजपणे सत्यंज्ञानमनन्त ब्रह्म हे उपनिषद्वाक्य (तैत्तिरीयोपनिषद् २.१.१)सहजपणे उद्धृत करून वाचकांची उपनिषदांबद्दल अस्था वाढवली आहे.

पंचकोशांचे अनात्मत्व ज्याला कळले त्याला पाच प्रकारचे क्लेश त्रासदायक ठरत नाहीत म्हणून बुद्धीमान माणसे पंचकोशांवर विवेक करतात असे सांगून वाचकास पंचकोशांच्या पलीकडे विचार करण्याची प्रेरणा लेखक सहजच देउन जातो.

तत्त्वमसि या महावाक्याचे निरूपण पदशः करता करता लक्षणेचा विषयही वाचकांना सोपा करून दााखवला आहे.लक्षणेचा विषय समजला म्हणजे तत्त्वमसि वाक्याने जो जीवब्रह्माभेद सुचवला आहे तो स्पष्ट होतो.

वेद हे कर्मपर असतााात तर मग छांदोग्य उपनिषदातील तत्त्वमसि हे वाक्य ज्ञानपर कसे बरे होईल अशा प्रकारे चर्चा सुरु करून गुरुकृपेचे महत्व मांडले आहे.अद्वैतविचार हा सुखपूर्ण व द्वैताचा स्वीकार हा दुःखकारक असतो हे स्पष्ट करताना अद्वैत सिद्ध करण्यासाठी शृतींना प्रयत्न करावे लागतात तर द्वैत हे जगप्रसिद्ध असल्यामुळे ते सिद्ध करावे लागत नाही हे ही सांगितले आहे.

जीव व ब्रह्म यांचे निरूपण करताना वेगवेगळ्या हलक्या धातूंपाासून सोने बनवण्याच्या रूढ प्रकाराचा उल्लेख करून विषयास रंजक केले आहे.

ग्रंथकार हा केवलाद्वैत परंपरेचा असल्यामुळे ज्ञानकर्मसमुच्चयाचे खंडन करतो व त्यासाठी तपन-तम म्हणजेच सूर्य व अंधाराचा प्रसिद्ध दृष्टांत योजतो.

सर्प -रज्जु, शिंपला- चांदी, मृगजळ- पाणी, सूर्योदय-अंधार, लोखंडाचा गोळा- दाहकत्व असे अनेक पूर्वसुरींनी वापरलेले पारिभाषिक जोडशब्द लेखकाने योजलेले दिसतात व वेदान्तदर्शनाचा हा प्रकरणग्रंथ आहे हे सिद्ध होते.

प्रकरणग्रंथाविषयी आंतरजालावर शोध घेतला असता वेगळ्या वेगळ्या अंगांनी विचार करणा-या लोकांच्या व्याख्याही जवळ जवळ एकच आशय मांडतात असे दिसते.

The Monographs (called Prakarana-Granthas) are usually written in simple Sanskrt words without complex or compound sentences pointing the seeker directly to the Ultimate Reality. Some of them contain excellent

metaphors “for easy comprehension” of the abstruse and abstract teachings, some others provide tools for one’s own analysis of one’s experience and yet others provide a step by step guidance on the path of Knowledge holding the hand of the seeker gently and with compassion.

वरील व्याख्या खाली दिलेल्या संकेतस्थळावरून घेतली आहे.

http://www.advaita-vision.org/tag/prakarana-grantha/

Prakarana is defined in ‘Visnudharmottara Purana thus,

Prakarana is a text which explains some particular aspect of the sastra & deals with certain secondary questions arising out of the explanation given.

वरील व्याख्या खाली दिलेल्या संकेतस्थळावरून घेतली आहे.

http://sanskritdocuments.org/sites/snsastri/nirvanashatkam.pdf

Prakarana grantha – this is the term used to refer to authoritative commentaries on the scripture but which are not part of the prasthanatraya. It is frequently used in respect of the works attributed to Sankara such as Upadesa-sahastri, Vivekacudamani etc. The word grantha literally means "tying or stringing together" though can itself mean composition or treatise.

वरील व्याख्या खाली दिलेल्या संकेतस्थळावरून घेतली आहे.

http://www.vedanta.gr/wp-content/uploads/2012/03/3_GlossaryOf

ॐॐॐॐॐ

## वेदान्तबोध व अन्यवेदान्तग्रंथ

अंदाजे अठराव्या शतकात लिहिला गेलेला हा ग्रंथ केवलाद्वैताची शिकवण देण्यासाठी आहे हे स्पष्ट दिसते. उपनिषदे व शंकराचार्यांच्या प्रमाणभूत वाक्यांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरूपाने आधार घेत लेखकाने आपले निरूपण प्रभावी केलेले दिसते. कुठे पूर्णवाक्ये, कुठे वाक्यांश तर कुठे प्राचीन ग्रंथातील कल्पनांचा वापर केलेला आहे. दशोपनिषदे म्हणून प्रसिद्ध असणा-या ईशादि उपनिषदांशिवाय मैत्रायणी, जाबाल अशा फारश्या प्रसिद्ध नसलेल्या उपनिषदातील वाक्येही वेदांतबोधातील आर्यांना आधारभूत झालेली दिसतात. क्वचित कुठे कुठे महाभारत भगवद्गीता यांचाही आधार आढळतो. अशा रीतीने श्रुती स्मृती या दोनही प्रमाणभूत ठरलेल्या ग्रंथांतील स्वतःला आवडलेल्या विचारणीय वाक्यांचा आधार घेत लेखकाने आपले निरूपण प्रभावी केले आहे. या परिशिष्टात वेदांतबोधातील आर्या व प्रमाणभूत अन्यवाक्ये आर्यांच्या क्रमानुसार मांडल्या आहेत.

### १ तू ब्रह्मच आहेस

ब्रह्म त्वमेव तस्मान्नाहं ब्रह्मेति मोहमात्रमिदम्।
मोहेन भवति भेदाः क्लेशास्सर्वे भवन्ति तन्मूलाः।।६

तू स्वतःच ब्रह्म आहेस म्हणून मी ब्रह्म नाही असे वाटणे हा भ्रम होय. या भ्रमामुळे जीव व ब्रह्म यात भेद उत्पन्न होतो व त्या भेदातूनच सर्व क्लेश उत्पन्न होतात.

ब्रह्म या शब्दाचे वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळे अर्थ घेतले जात असले तरीही येथे मात्र सृष्टीचेआदिकारण असलेले जे ब्रह्म ते हा एक अर्थ व ज्ञान हा दुसरा अर्थ हे दोन अर्थच अभिप्रेत आहेत. हे वेदान्तबोधकारांचे मत उपनिषदातही वेगवेगळ्या प्रसंगात मांडलेले दिसते.

तत्त्वमसि हा विचार छांदोग्योपनिषदात ६.८.७ अनेक दृष्टांताद्वारा सांगितला आहे. ते परमतत्त्व तूच आहेस म्हणजे ब्रह्म आहेस हाच बोध श्वेतकेतूस केला गेला आहे.

अथातः सम्प्रत्तिर्यदा अशी सुरवात करून पुत्रमाह त्वं ब्रह्म त्वं यज्ञस्त्वं लोक इति। बृहादारण्यकोपनिषत् १.५.१७ मध्ये वडील मुलास तू सर्वकाही आहेस असा बोध करून देतात.

माझ्याद्वारा अधीत व अनधीत असे सर्व काही तूच आहेस अध्ययनाची ही परंपरा तू चालवणार आहेस अशी जाणीव करून देतात.इथे ब्रह्म शब्दाने वेद म्हणज्‍च ज्ञान हा अर्थ सुचवला आहे, तू ज्ञानस्वरूपच आहेस हे पिता पुत्रास सांगत आहे .

मांडूक्योपनिषदात  सर्वंहि एतद् ब्रह्म।अयमात्मा ब्रह्म।  असे ब्रह्माचे आत्मरूपत्व सर्वव्यापकत्व वर्णिले आाहे.वेदांबोधकारांचे मत याहून भिन्न वाटत नाही .

श्वेताश्वतरोपनिषदात  परं ब्रह्म परं बृहन्तं यथा निकायं सर्वभूतेषु गूढम्।३.७ हे वाक्य सर्वभूतांत ब्रह्माचे असणे वर्णन करत आहे .इथेही सर्वभूतात असणे हा विचार  ब्रह्म त्वमेव  या कल्पनेशी जुळणारा आहे .

## २ तत्त्वमसि।

एवमपि विरहितानां तत्त्वमसीत्यादिवाक्यचिन्तनया।

प्रतिभाति एष परोक्षवदात्मा प्रत्यक्प्रकाशमानोऽपि।।३३

या आर्येत  तत्त्वमसि  या महावाक्याचा उल्लेख आला आहे, जे छांदोग्य उपनिषदात आलेले आहे .या महावाक्याचे चिंतन जे करत नाहीत त्यांना कायम प्रकाशमान असणारे आत्मतत्त्व अदृश्य असल्यासारखे वाटते .

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति। छांदोग्य ६.११.३

अनेक दृष्टांत देऊन श्वेतकेतूस जे कायम असतच असते ते आत्मतत्त्व तू आहेस हे समजावले आहे .

ज्यांना ब्रह्मात्म्यैक्यबोध व्हावा असे वाटत असेल त्यांनी तत्त्वमसि वाक्याचे चिंतन केलेच पाहिजे हा बोध ही आर्या देत आहे .त्याचबरोबर महावाक्यचिंतन सोडून अन्य उपायांनी ज्ञानप्राप्तीची इच्छा करणा-या साधकांना  ते सदैव प्रकाशमान असणारे ब्रह्म परोक्ष म्हणजे अदृश्य राहते असे सांगून सावधही करत आहे .

## ३ आत्मा शश्वत् प्रकाशमान

ऐक्यपरैः श्रुतिवाक्यैः आत्मा शश्वत्प्रकाशमानोऽपि।

देशिकदयाविहीनैः अपरोक्षयितुं न शक्यते पुरुषैः।।४१

स्वतःच्या तेजाने सदैव प्रकाशमान असणारे आत्मतत्व गुरु कृपा नसलेल्या पुरु षांस दिसत नाही, ह्या आर्येत आम्याचे कायम प्रकाशमानत्व वर्णिले आहे. उपनिषदातही हे कायम प्रकाशमान असणे वाचावयास मिळते. ते पुढीलप्रमाणे.

छांदोग्योपनिषदात आरूणी व श्वेतकेतू संवादात मीठाच्या दृष्टांताने हे आत्म्याचे सतत असणे उलगडून दाखविले आहे. पाण्यात विरघळल्याने मीठाचे अस्तित्व दिसून येत नसले तरीही ते असते हे जीभेने जाणले जाऊ शकते तसे गुरु कृपेने आत्मतत्त्व जाणले जाऊ शकते.

तच्छश्वत्संवर्तते तं होवाच अत्र वाव किल तत्सोम्य न निभालयसे उ अत्रैव किलेति ।।६.१३.२

बृहदारण्यकोपनिषदातही याज्ञवल्क्यमैत्रेयी संवादात ह्याच मिठाच्या दृष्टांताने ते आत्मतत्त्व अनंत अपार असल्याचे समजावले आहे.

अरे इदं महद्भूतमनन्तमपारं विज्ञानघन एव।'२.४.१२

दोन्ही उदाहरणात गुरु च्या दयेनेच ते आत्मतत्त्व शिष्यास समजले आहे.

## ४ गुरु कृपा

कर्मभिरेव न बोधः प्रभवति गुरुणा विना दयानिधिना।

आचार्यवान् हि पुरुषो वेद इत्यर्थस्यवेदसिद्धत्वात्।४२

यथासांग कर्म केले तर ज्ञान होऊ शकेल तेथे गरूची काय आवश्यकता? असे पूर्वपक्षाचे मत विचारात घेऊन लेखकाने या आर्येत उपनिषद्वाक्याच्या आधाराने पूर्वपक्षाच्या विचाराचे खंडन केले आहे. आर्येतच आचार्यवान् हि पुर षो वेद हे छांदोग्योपनिषदातील वाक्य योजले आहे.

आचार्यवान् हि पुर षो वेद तस्य तावदेव चिरम्।६.१४.२

परीक्ष्य लोकान्कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन।

तद्विज्ञानार्थं स गुरु मेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।।मुण्डकोपनिषद् १.१२

याही वाक्यात ज्ञानप्राप्तीसाठी श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ गुरु कडे हातात समिधा घेउन विनम्रभावाने जाण्याचा सल्ला दिलेला आहे.ज्ञान हवे असेल गुरु स शरण जाऊन त्याच्या कृपेस पात्र व्हावयास हवे. गुरु तर ज्ञान देण्यात तत्पर असतातच शिष्यानेच शरण जाऊन आचार्यवान् होण्याची गरज असते.

दक्षिणामूर्तिस्तोत्रात वटविटपसमीपे इत्यादी श्लोकात सकलमुनिजनानां ज्ञानदातारमारात् अशा शब्दात गुरु चा ज्ञान देण्याचा स्वभावच वर्णिला आहे.

## ५ वेदांचे परमप्रमाणत्व

वेदोऽनादितया यद्वा परमेश्वरप्रणीततया।
भवति परमं प्रमाणं बोधो नास्ति स्वतः च परतो वा।।४४

या आर्येत वेदांचा उल्लेख परमप्रमाणाच्या रूपाने केला आहे.वेदांच्या ज्ञानाशिवाय अन्य कोणत्याही उपायाने बोध, म्हणजे ब्रह्मज्ञान होणार नाही हे स्पष्टपणे सांगितले आहे.

बृहदारण्यकोपनिषदात ब्रह्मज्ञानप्राप्तीची चर्चा करताना,ते ब्रह्म जाणण्याची इच्छा असणारे लोक वेदवचनांचे पुनःपुन्हा उच्चारण करत यज्ञ दान व तप करतात असे म्हटले आहे.

तमेतं वेदानुवचनेन बाह्मणाः विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसा ।बृहदा ४.४.२२

वेदवचनांना प्रमाण मानणे हे अनुवचनेन या पदामुळे स्पष्ट होते.

जाबालदर्शनोपनिषदात तर स्पष्टपणे अन्यकोणत्याही साधनाने मोक्ष होणार नाही या शब्दात वेदांचे परमप्रमाणत्व दाखवले आहे.

वेदादेव विनिर्मोक्षः संसारस्य न चान्यथा। जाबालदर्शनोपनिषद १.१८

इष्टप्राप्त्यनिष्टपरिहारयोरलौकिकमुपायं यो वेदयति स वेदः अलौकिकपदेन प्रत्यक्षानुमाने व्यावर्त्येते इति सायणभाष्ये।सर्वलक्षणसंग्रहः२८0२.इष्टाची प्राप्ती व अनिष्टाचा परिहार ज्याच्या योगाने होतो असा अलौकिक उपाय म्हाणजे वेद.या व्याख्येत अलौकिक शब्दाने प्रत्यक्षादी प्रमाणांचे निरूपयोगित्व दाखविले जाते.असे लौकिक उपायांचे निराकरण केल्याने वेदांचे स्वतः प्रमाणत्व तसेच परमप्रमाणत्व सिद्ध होते.

## ६ वेदांचे अनादित्व व ईश्वरजन्यत्व

वेदोऽनादिः अमुष्य व्यञ्जकईशः स्वयंप्रकाशात्मा।
तदभिव्यक्तिमुदिक्ष्य प्रोक्तोऽसौ सुरिभिः प्रणीत इति।।४७

वेद हे अनादि असून त्यांना प्रकाशित करणारा ईश्वर स्वयंप्रकाशी आहे.हे लक्षात घेऊनच वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असे म्हटले जाते.

या आर्येत मांडलेले अनादित्व व ईश्वरप्रणेतृत्व उपनिषदातही आढळते.

यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै।श्वेताश्वतर ६.१८

जो ब्रह्म्यास व वेदांना निर्माण करतो त्यास मी नमन करतो असा भाव या संपूर्ण वाक्यात आाहे

नचिकेतमुपााख्यानं मृत्युप्रोक्तं सनातनम्।कठोपनिषत् १.३.१६

येथे सनातन शब्द अनादित्व बोधक आहे.

अनादिनिधना नित्या वागुत्सृष्टा स्वयम्भुवा।प्रमाणचन्द्रिका

या स्मृतीनेही अनादिनिधना व नित्या या विशेषणांनी अनादित्व व स्वयम्भुवा शब्दाने बह्मनिर्मितस्वरूप मांडले आहे.

## ७ रजतशुक्तिका, मृगमरीचिका दृष्टांत

अद्वैतमेव सत्यं तस्मिन् द्वैतमसत्यमध्यस्तम्।

रजतमिव शुक्तिकायां मृगतृष्णायामिवोदकस्फुरणम्।।५१

अद्वैताचा विचारच सत्य आहे पण त्यावर द्वैताचा विचार आरोपित होत असतो.म्हणजेच जीव व ब्रह्म यात अभेद असून अज्ञानामुळे दोघांना वेगळे मानले जात असते असा केवलाद्वैताचा सिद्धांत येथे मांडला गेला आहे व त्यासाठी रजतशुक्तिका मृगमरीचिका दृष्टांतरूपाने योजले आहेत.

पूर्ववर्ती आचार्यानीही भ्रमाचे निरूपण करताना हे दृष्टांत योजलेले दिसतात.

यथा पुरोवर्तिन्येवारजते शुक्त्यादौ रजतारोपः।इदं रजतम् इति ज्ञानम्।। तर्कभाषा त. प. १

महोपनिषदाने रजतादिंच्या बरोबर अन्य दृष्टांतही जोडून विषय स्पष्ट केला आहे.

द्विचन्द्रशुक्तिकारूप्यमृगतृष्णादिभेदतः।अध्यासं प्राप्य जाग्रत्स्वप्नौ नानाविधो भवेत्।।५.१५

पाण्यात उठणा-या लाटांमुळे किंवा दोन हौदांमध्ये वंद्राची दोन प्रतिविंबे पाहून दोन चंद्र असल्याचा भास सुद्धा दृष्टांत रूपाने योजलेला आढळतो.

# ८ ज्ञानकर्मसमुच्चय

ज्ञानं कर्मणि न स्यात् ज्ञाने कर्मेदमपि तथा न स्यात्।

इह कथमनयोरूभयोस्तपनतमोवत्समुच्चयो घटते।।६९

ज्ञान श्रेष्ठ की कर्म या विषयी मतमतांतरे दिसतात.ज्ञानच श्रेष्ठ, कर्मच श्रेष्ठ व ज्ञानकर्म समुच्चयच हवा असे ३ मतप्रवाह दिसून येतात.या आर्येतही ज्ञानाच्या ठिकाणी कर्म व कर्माच्या ठायी ज्ञान असू शकत नाही असे म्हणून या दोहोंचा समुच्चय कसा मानता? अशी शंका उपस्थित केलेली आहे.याचे कारण म्हणजे शास्त्रग्रंथात आढळणारी वाक्ये.

कर्म

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः।

कुर कर्मैव तस्मात् त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्।।भ.गी.अ ४श्लोक १३

कुर्वन्नैवेह कर्माणि जीजीविषेच्छतं समाः।ईशावास्योपनिषत् २

ज्ञान

त्यज धर्ममधर्मं च उभे सत्यानृते त्यज।

उभे सत्यानृते त्यक्त्वा येन त्यजसि तत् त्यज।। म.भा.मोक्षधर्मपर्व अ १२९ श्लोक ४0

तस्मात् कर्म न कुर्वन्ति यतयः पारदर्शिनः।म.भा.शांतिपर्व अ २४१ श्लोक ७

कर्माचे निरूपयोगित्व

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म।

एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरा मृत्युं ते पुनरेवापि यन्ति।। मुण्डकोपनिषत् १.२.७

नास्त्यकृतः कृतेन। मुण्डकोपनिषत् १.२.१२

चित्तस्य शुद्धये कर्म न तु वस्तूपलब्धये।वस्तुसिद्धिर्विचारेण न किञ्चित्कर्मकोटिभिः।।विवेकचूडामणी ११

समुच्चय

विद्यांचाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह। ईशावास्योपनिषत ११

संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयं सह।ईशावास्योपनिषत १४

## ९ मोहनिवृत्तिसाठी ज्ञान हेच साधन

तस्मान्मोहनिवृत्तौ ज्ञानं न सहायमन्यदर्थयते।

यद्वद्दुस्तरतिमिरपरिध्वंसने सहस्त्रांशुः।।७0

जसे घनदाट असा अंधार दूर करण्यासाठी सूर्य अन्य कोणाच्याही मदतीची अपेक्षा करत नाही तसे ज्ञान हे मोह म्हणजेच अज्ञान नाशासाठी अन्य कोणत्याही साधनाची अपेक्षा करत नाही.हा मोहनिवृत्तीसाठी ज्ञानाचे प्रधानत्व मांडणारा विचार मुण्डकोपनिषदात वाचावयास मिळतो.

ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्ततस्तु पश्यते निष्कलं ध्यायमानः।मुण्डकोपनिषत् ३.१.८

ज्ञानादेव तु कैवल्यम्.

## १0 आत्मा नेहमीच असंग

रज्वादेः उरूगाद्यैः सम्बन्धवदस्य दृश्य सम्बन्धः।

सततमसङ्गोऽयमिति श्रुतिरमुमर्थमेव साधयति।।७२

अंधारात भासमान होणा-या दोरीवरील सापाचा दोरीशी जेवढा सम्बंध असतो तेवढाच संबंध ह्या आत्म्याचा दृश्यजगताशी सम्बंध असतो व श्रुतीही हाच विचार मांडत असते.

असङ्गो न हि सज्जते।बृहारण्यकोपनिषत् ४.२.४, ४.४.२२, ४.५.१५

असङ्गो हि अयं पुरूषः। बृहारण्यकोपनिषत् ४.३.१६

स होवाच एतद्वैतदक्षरं गार्गी .अनाकाशमसङ्गमरसं । बृहारण्यकोपनिषत् ३.८.८

आत्म्याचे असंगत्व स्पष्ट करणारा पाण्यातील सूर्यबिंबाचा दृष्टांत शंकराचार्यही विवेकचूडामणीमध्ये २१८ व्या श्लोकात देतात.

घटोदके बिम्बितमर्कबिम्बमालोक्य मूढो रविमेव मन्यते।

तथा चिदाभासमुपाधिसंस्थं भ्रान्त्याहमित्येव जडोऽभिमन्यते।।

## ११ एक जाणले असता सर्व समजल्यासारखे असते .

तस्मिन् ब्रह्मणि विदिते विश्वमशेषं भवेदिदं विदितम्।

कारणमृदि विदितायां घटकरकाद्या यथावगम्यन्ते।।७५

जसे मातीच्या एका ढेकळाचे स्वरूप कळले म्हणजे त्या मातीपासून बनलेले अन्य घट,परळ इत्यादि पदार्थ गुणवत्तेसाठी तपासण्याची गरज नाही तसेच एक ब्रह्म जाणले असता जगातील सर्व पदार्थ कळल्यासारखे असल्यामुळे त्यांच्यावर विचार करण्याची गरज नाही. हाच विचार उपनिषदात अनेक ठिकाणी वचावयास मिळतो.

येनाश्रुतं श्रुतं भवत्यमतं मतमविज्ञातं विज्ञातमिति कथं नु भगवः स आदेशो भवतीति।

छांदोग्योपनिषद् ६ .३ इथेही एक जाणले असता सर्व समजल्या सारखे असते ते काय? अशी सुरवात करून पुढे ब्रह्मज्ञानाचा विषय मांडला आहे .

आत्मा इत्येवोपासीत।अत्र ह्येते सर्व एकं भवन्ति।तदेतत्पदवीयमस्य।सर्वस्य यदयमात्मा। अनेन ह्येतत्सर्वं वेद। बृहदारण्यकोपनिषत् १ .४ .७

आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्त्या विज्ञानेन इदं सर्वं विदितम्।बृहदारण्यकोपनिषत् २ .४ .५

या दोन्ही वाक्यात आत्मा असा शब्द योजला आहे व आत्म्याच्या ज्ञानाने इतर सर्व जाणल्यासारखेच असते हे सुचवले आहे.

## १२ असद्वादाचे निराकरण

कारणमसदिति केचित् कथयन्ति असतो भवेन्न कारणता।

अङ्कुरजननी शक्तिः सति खलु बीजे समीक्ष्यते सकलैः।।७७

उपादानकारण असत आहे असे काही लोक म्हणतात पण हे चूक आहे असत् वस्तु कारण होऊच शकत नाही.शेतकरी बियाणे घेताना त्याची उगवणशक्ती पाहूनच घेत असतो. फुसक्या निःसत्व बीजापासून उत्पत्ती होत नाही म्हणजेच असतापासून उत्पत्ती होत नसते.

सद्रूप असे ब्रह्म सर्वांचे कारण आहे हा विचार श्वेताश्वतारोपनिषदात ६ .९ मध्ये पुढीलप्रमाणे वाचावयास मिळतो.

स कारणं करणाधिपाधिपो  न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः।

तर छान्दोग्योपनिषदात  असतापासून सृष्टी होऊ शकत नाही हे स्पष्ट केले आहे.

सदेव सोम्येवदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्  अशी सुरवात करून पुढे  कुतस्तु खलु सौम्येवं स्यादिति होवाच कथमसतः सज्जायतेति सत्त्वेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्।छान्दोग्य ६.२.२

या शब्दात असद्वाद योग्य नाही हे दाखवले आहे.

## १३ आत्मा साक्षीभावाने आनंद घेतो

आत्ममये महति पटे विविधजगच्चित्रमात्मनालिखितं।

स्वयमेव केवलमसौ पश्यन्प्रमुदं प्रयाति परमात्मा।।९५

आत्मा स्वतःच आपल्यामध्येच सर्व चित्रमय सृष्टी उत्पन्न करतो व तीत घडणा या घटना साक्षीभावाने पाहत आनंदी होतो.या आर्येत वर्णिलेले आत्म्याचे साक्षीभावाने आनंद घेणे उपनिषदात अनेक ठिकाणी वाचावयास म्ळिते.

स एष जीवेनाऽऽत्मनाऽनुप्रभूतः पेपीयमानो मोदमानस्तिष्ठति। छांदोग्योपनिषत् ६.११.१

या वाक्यातील  मोदमानस्तिष्ठति  हा पदसमूह साक्षित्व व आनंदमयत्व दोन्ही दाखवत आहे.

कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च।श्वेताश्वतरोपनिषत् ६.११

हे वाक्य साक्षित्व दाखवते.

स वा एष आत्मेहोशन्ति कवयः सितासितैःकर्मफलैरनभिभूत इव प्रतिशरीरेषु चरति।मैत्रायण्युपनिषत् २.७ इथेही शुभाशुभ कर्मांनी आत्म्याचे बांधले न जाणे व प्रत्येक शरीरात असणे दाखविले आहे.

मुण्डकोपनिषदात ३.१ मध्ये

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते।

तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति।।

या प्रमाणे जीव सुखदुःखांचा आस्वाद घेतो  व ब्रह्म साक्षीभावाने आनंद घेत असते हे सांगितले आहे.

## १४ ब्रह्म चिन्मात्र आनंदरूप

चिन्मात्रममलमक्षयमद्वयमानंदमनुभवारूढम्।

ब्रह्मैवास्ति तदन्यन्न किंचिदस्तीति निश्चयो विदुषां। ।९६

या आर्येत ब्रह्माची विविध विशेषणे आली आहेत त्यातील आनंदरूप हे विशेषण उपनिषदात अनेक ठिकाणी आलेले दिसते .

विज्ञानमानन्दं ब्रह्म। बृहदारण्यकोपनिषत् ३ .९ .२८

ब्रह्म हे विज्ञानरूप तसेच आनंदरूपसुद्धा आहे.

अथ यद्ब्रह्म तदमृतम्।जैमिनीयोपनिषत् १ .२६ .४

ते ब्रह्म अमृत म्हणजे अक्षर आहे.

तद्विज्ञानेन परिपश्यन्ति धीरा आनन्दरूपममृतं यद्विभाति .मुण्डकोपनिषत् २ .२ .८

आनन्दो ब्रह्मेति व्यजानात्।तैत्तिरीयोपनिषत् ३ .७ .६

## १५ ब्रह्माची विशेषणे

अजरोऽहमक्षरोऽहं प्राज्ञोऽहं प्रत्यगात्मबोधोऽहम्।

परमानंदमयोऽहं परमशिवोऽहं भवामि परिपूर्ण। ।१0५

अजर, अक्षर, प्राज्ञ, प्रत्यगात्मबोध, परमानंदमय, परमशिव, परिपूर्ण अश्या विशेषणांनी आत्मबोध झालेला साधक स्वतःच्या अवस्थेचेच जणू वर्णन करत आहे.थेट असाच अनुभव उपनिषदातील ऋषींना व  शंकराचार्यादि उच्चकोटीच्या साधकांना आलेला दिसतो.

निर्गुणः केवलात्मास्मि निराकारोस्म्यहं सदा।

केवलं ब्रह्ममात्रोऽस्मि ह्यजरोऽस्म्यममरोस्म्यहम्। ।तेजबिंदु उपनिषत् अध्याय २ मंत्र १0५

आनन्दो ब्रह्मेति व्यजानात्।तैत्तिरीयोपनिषत् भृगुवल्ली अनुवाक् ६

चिदानन्दरूप ः शिवोऽहम्। निर्वाणषटक शंकराचार्य

तदेकोवशिष्ट शिवः केवलोऽहम्।दशश्लोकी

अक्षरं ब्रह्म परमम्।भ. गी. ८.३

## १६ नाद तंत्र व इतर शास्त्रे

हुंकृति हुंकृति खिंजित बृंहितमुख विविधनादभेदोऽहम्।

झटिति घटितात्मवेदनदीप परिस्फुरित हृदयभवनोऽहम्। ।१२४

षड्भावरहितोऽहं षड्गुणरहितोहमहितरहितोऽहम्।

षट्कोशविरहितोऽहं षट्त्रिंशत्तत्त्वजालरहितोऽहम्। ।१४0

या दोन आर्या वाचल्यावर आपल्या लक्षात येते की लेखकाचा विद्याव्यासंग किती विशाल होता.

वेदांताबरोबरच आगमग्रंथांचाही अभ्यास व साधना लेखकाने केली असावी हे दिसून येते.

अनिरूक्तस्त्रयोदशः स्तोभः संचरो हुंकारः।छान्दोग्योपनिषत् १.१३.३

नादाचा विषय अथर्वशीर्षात असा मिळतो गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनन्तरं अनुस्वारः परतरः अर्धेन्दुलसितं नादः सन्धानम्

सहा भावांची मांडणी यास्कप्रणीत निरूक्तात मिळते

जायते अस्ति परिणमते वर्धते अपक्षीयते विनश्यति १.१.२

सहा गुण नीतिशास्त्रज्ञ मांडतात संधि, विग्रह,यान,स्थान, संश्रय, द्वैध

षटत्रिंशत तत्त्वांचा विचार शैवागमाने मांडलेला दिसतो.

१0 इंद्रीये, 5 महाभूते, ५ विषय अशी २0 तत्त्वे

मन बुद्धी अहंकार शिव शक्ती सदाशीव अशी ६

ईश्वर शुद्धविद्या माया कला विद्या राग अशी ६

नियती काल पुरूष प्रकृति अशी ४

( पूर्णता प्रत्यभिज्ञा रचयिता महामहोपाध्याय रामेश्वर झा, प्रत्यभिज्ञा प्रेस वाराणसी )

मूळ हस्तलिखितात षट्त्रिंशत् या शब्दात असलेली थोडीशी अस्पष्टता लक्ष्यात घेतली व षडविंश असा पाठ समजला तर सांख्यांची २५ व योग दर्शनाने मानलेले ईश्वर हे एक अशा योगदर्शनाने स्वीकारलेल्या २६ तत्त्वांच्या पलीकडचा मी आहे असा अर्थ घेता येतो .

## १७ ज्ञान होताच मुक्ति

तीर्थे श्वपचगृहे वा नष्टस्मृतिरपि परित्यजन् देहं।

ज्ञानसमकालमुक्तः कैवल्यं याति हानशोकः। ।१५९

शरीरत्यागाच्या वेळी बाह्यस्थिती कशीही असली तरी चालेल कारण साधक ज्ञान झाल्याक्षणीच मुक्त होतो.हा आर्येतील भाव श्वेताश्वतरोपनिषदात वाचावयास मिळतो.

ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः। श्वेताश्वतरोपनिषत् १.८

ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः। श्वेताश्वतरोपनिषत् १.११

विश्वस्येकं परिवेष्टितारमीशं तं ज्ञात्वा अमृताः भवन्ति। श्वेताश्वतरोपनिषद**3**।**3**.७ व ५.१३

ॐॐॐॐॐ

# ब्रह्मनिरूपण ७ ते २२

ब्रह्मनिरूपण हा सर्वच भारतीय आस्तिक दर्शनांचा प्रधान विषय असतो. ब्रह्म शब्द अनेक अर्थांनी वापरलेला दिसतो. संदर्भ बदलला म्हणजे अर्थ बदलतो. कधी ब्राह्मण म्हणून कधी ब्रह्मदेव म्हणून तर कधी वेद अशा अर्थानेही वापरला जातो. वेदान्तबोधकार मात्र उपनिषदांना अभिप्रेत असे ते परमश्रेष्ठ अविनाशी तत्त्व सुचवण्यासाठी ब्रह्म शब्द वापरतात.

ब्रह्म व आत्मा हे दोन शब्द बृंह् - वृद्धौ व आप्लृ- व्याप्तौ अशा वेगवेगळया धातूंपासून निर्माण झालेले असले तरी दोघांचा सारभूत अर्थ एकच दिसतो. हाच अर्थ लक्षात घेउन लेखकाने ७ ते १३ या आर्यांमध्ये ब्रह्मनिरूपण केले आहे. अन्नमयादि कोश आत्मतत्त्व असू शकत नाहीत हे सिद्ध करून काळाच्या पालीकडचे व आनन्दरूप बिंबाकार असे आत्मतत्व हेच ज्ञेय आहे हे दाखवले आहे.

अधीहि भगवो ब्रह्मेति असे म्हणत शरण आलेल्या शिष्यास तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व असे सांगीतल्यावर स्वप्रयत्नाने अन्नमयादि कोशांना ओलांडून आनन्दमय कोशापार्यन्त पोहोचलेला शिष्य जिज्ञासा शमल्यामुळे परत आचार्याकडे येत नाही असे तैत्तिरीयोपनिषदात वाचावयास मिळते. इथेही लेखकाने बिंबभूत आनंदच आत्मा असल्याचा निष्कर्ष काढलेला दिसतो.

ब्रह्म हे सर्वव्यापक असल्यामुळे ते समग्र विश्वाचा अनुभव घेत असते पण त्याचा अनुभव कोणी घेऊ शकत नाही. कोणाच्याही अनुभवाचा विषय होत नाही, अशी वस्तू नसेलच, असे कोणी समजू नये असेही त्याच आर्येत पुढे सुचवले आहे.

ते ब्रह्म समग्र जगाचा अनुभव घेते पण त्याचा अनुभव कोणी घेऊ शकत नाही यावरून त्या आत्मतत्त्वाचे सर्वव्यापकत्व दिसून येते हे समजवण्यासाठी सूर्याचा दृष्टान्त दिला आहे. सर्वांचा ऊर्जास्रोत व प्राणिमात्रांचे जीवनच असलेला सूर्यसुद्धा त्या ब्रह्माने व्यापलेला असल्याने तोही या ब्रह्मतत्वास प्रकाशित करू शकत नाही.

कुठल्याही पदार्थाचे वर्णन करण्यासाठी हे,ते,असे, तसे, एवढे, तेवढे अशा प्रकारच्या शब्दांची योजना करावी लागते. या पैकी कोणत्यातरी शब्दाचा आश्रय घेतल्याशिवाय कोणत्याही पदार्थाचे वर्णन,निर्देश करताच येत नाही पण वेदान्तबोधकार म्हणतात यापैकी कोणत्याही शब्दाने ज्याचे वर्णन केले जाऊ

शकत नाही तेच ब्रह्म. असे समजले नाही तर ते ब्रह्म अपरोक्ष होईल म्हणजेच इन्द्रियगोचर होईल जे सर्वथा अशक्य आहे कारण सर्व श्रुतिवाङ्मय अरूप-अगोचरादि विशेषणांनी ब्रह्माचे वर्णन करत आहे. [1]

असे सर्वव्यापक असलेले ब्रह्म जीवरूपाने कसे भासते? या प्रश्नाचे उत्तर २१ व्या आर्येत दिलेले दिसते. पंचकोशांचे सत्यत्व व प्रभाव जेथे दिसून येतो तेथे जीव व ईश्वर वेगळे भासू लागतात व जेंव्हा विवेकाने कोशांचा निरास होतो तेंव्हा आत्मतत्वाचे ज्ञान होते.

पंचकोशांबरोबर समग्र दृश्याचा विवेकाने निरास केल्यावर केवल शून्यच उरेल मग ब्रह्माचे अस्तित्व कसे सिद्ध होईल असे कोणी म्हणेल तर

यन्न किमपीति सिद्धं ब्रह्म तदेवेति वेदतः सिद्धम्।।२२

या शब्दात आपले मत वेदान्तबोधकार व्यक्त करतात. अशा रीतीने अवघ्या सात आर्यांमध्ये लेखकाने ब्रह्मनिरूपण मांडले आहे.

## तत्त्वमसि व लक्षणा २३ ते २८

ब्रह्मात्मैक्य ज्ञानाच्या अनुभूतीसाठी तत्त्वमसि या छान्दोग्योपनिषदातील अथवा अन्य एखाद्या महावाक्याच्या चिन्तनाची आवश्यकता असते. त्यातल्या त्यात तत्त्वमसि या वाक्याच्या निरूपणास विद्वान् मंडळी प्राधान्य देताना दिसतात.

तत् म्हणजे ते

त्वम् म्हणजे तू

असि म्हणजे आहेस. हा झाला शब्दार्थ. या वाक्यातील तत् पदाने नेमका कशाचा बोध होतो,त्वम् म्हणजे तू व असि म्हणजे आहेस या पदांनी सुचवलेले ऐक्य कसे जाणून घ्यायचे हे कळण्यासाठी साहित्यशास्त्रात विस्ताराने आलेला लक्षणा विषय समजून घ्यायला हवा. वेदान्तबोधकार आपल्यासाठी

---

ब्रह्म निरवच्छिन्नचैतन्य

आत्मा यच्चाप्नोति यदादत्ते यच्चात्ति विषयानिह।यच्चास्य संततोभावस्तस्मादात्मेति कथ्यते।।

सर्वलक्षणसंग्रहः५६८

हे काम सोपे करतात. मम्मटाने काव्यप्रकाशात दुस-या उल्लासाच्या १२ व्या सूत्रात खालीलप्रमाणे लक्षणेची व्याख्या केली आहे.

मुख्यार्थबाधे तद्योगे रूढितोऽथ प्रयोजनात।

अन्योऽर्थो लक्ष्यते यत् सा लक्षणारोपिता क्रिया।।

याबरोबरच एक महत्वाचा इशाराही ग्रंथकार देतात व तो म्हणजे महावाक्यांच्या चिन्तनाबरोबरच गुरुर च्या दयेची व कृपेचीही आवश्यकता आहे.

तत्त्वमसि मधील पदांचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ ग्रन्थकार नीट उलगडून दाखवितात. यानंतर शास्त्रांनी चर्चा केलेल्या जहत् अजहत् व जहदजहत् या ३ प्रकारच्या लक्षणांचे निरूपण ग्रन्थकार ३३ ते ३५ या आयामध्ये करतात.

गङ्गायां घोषः या वाक्यात असलेली जहत् लक्षणा

शोणो धावति या वाक्यात असलेली अजहत् लक्षणा

तसेच सोऽयं देवदत्तः या वाक्यात असलेली जहदजहत् लक्षणा

यांचा वेदान्ताशी असलेला संबंध लेखकाने उलगडून दाखवला आहे. पहिल्या दोन लक्षणांचा उपयोग महावाक्याचा अर्थ समजून घेण्यास उपयोगी नाही.

## महावाक्यचिन्तनाचे फळ ३८

महावाक्य उपदेश भला। परि त्याचा जप नाही बोलिला।

तेथीचा तो अर्थची घेतला। पाहिजे साधके।। दासबोध ओ ११ स ६ द ५

या ओवीत समर्थ रामदासस्वामी सुद्धा महावाक्याच्या अर्थाचे महत्व निदर्शनास आणून देत आहेत.

**1** प्रज्ञानं ब्रह्म। ऐतरेयोपनिषद् १। ५। ३

२ अयमात्मा ब्रह्म। माण्डूक्योपनिषद् १। २

३ तत्त्वमसि। छान्दोग्योपनिषद् ६। ८। ७

४ अहं ब्रह्मास्मि। बृहदारण्यकोपनिष्द १। ४। १0

अशी जरी आकाराने अत्यंत लहान पण आशयाने महान असणारी वाक्ये प्रसिद्ध असली तरी त्यांचा नुसता जप करून काही ज्ञानानुभूती येणार नाही. वाक्यामध्ये असणारा अर्थ चिन्तनाच्या योगाने गुरुच्या अनुग्रहानेच समजू शकतो.

वेदान्तबोधकारांचे ही असेच मत दिसते. म्हणून ते लक्षणेच्या सहायाने तत्त्वमसि या वाक्याचे स्पष्टीकरण करतात व या चिन्तनाचे फळही.

इत्थं बोधितमर्थं महतावाक्येन दर्शितैक्येन।

अहमित्यपरोक्षयतां वेदो वेदयति वीतशोकत्वम्।।३८

अहम् इति अपरोक्षयता म्हणजे मी प्रत्यक्ष स्वतः ते तत्व आहे अशी अनुभूती येते.

मी डॉक्टर वकील शिक्षक अशा बाह्य उपाधींच्या पलीकडचा स्त्रीपुरुषादि लिंगभेदाच्या अतीत तसेच आईवडील, मुलगा, जावई इत्यादि जन्मजन्य कौटुंबिक उपाधींच्या पलीकडचा एवढेच नव्हे तर जाड बारीक उंच बुटका अशा शारीर भेदांच्याही पलकिडचा आहे अशी अनुभूती येते. आणि फलाच्या रूपाने वीतशोकत्व म्हणजे दुःखाची निवृत्ती. पण ही निवृत्ती तात्पुरती नव्हे तर आत्यन्तिक असते. असे कशावरून, असे म्हणाल तर वेदो वेदयति वीतशोकत्वं विशेषेण ईतः वीतः वीतः शोकः वीतशोकः तस्य भावः वीतशोकत्वम्।सामान्यपणे सुखदुःखाची पुनरावृत्ती होत असते. पण महावाक्याच्या बोधानंतर होणारी दुःखनिवृत्ती कायमची असते अशी घोषणाच वेद करतात.

## महावाक्यचिन्तन व गुरु कृपा ४0 ते ४३

रामकृष्णादि अवतारी पुरुषसुद्धा गुरुभजनाविषयी तत्पर दिसतात. जवळ जवळ सर्वच अवतारी महात्मे तथा संत मुक्तकण्ठाने गुरुची स्तुती करतात. अनेक ठिकाणी देवापेक्षाही गुरु श्रेष्ठ असल्याचे मत नोंदवले गेले आहे.

देव मनुषी भाविला। मंत्री देवपणासी आला।

सद्‌गुरु न वचे कल्पिला।ईश्वराचेनि।।द **5** स **3** ओ **44**

या शब्दात समर्थ रामदासस्वामी गुरु ची थोरवी वर्णितात.

गुरु गोविंद दोउ खडे।काके लागु पाय।

बलिहारी गुरु आपनो। गोविंद दियो बताय।। संत कबीर

वेदान्तबोधकारही याच मताचे दिसतात.महावाक्यचिन्तनाने वीतशोकावस्था येते हा विचार ३८ व्या आर्येत मांडला.आता पुन्हा तोच आत्मदर्शनाचा मुद्दा घेऊन सांगतात गुरुकृपेशिवाय महावाक्यचिन्तनही कामाचे नाही.

या मताावर पूर्वपक्ष मांडतात . काम्य व निषिद्ध कर्मांचा ज्याने त्याग केला आहे व विहित कर्माच्या अनुष्ठानाने ज्याचे अन्तःकरण निर्मल झाले आहे त्याला आपोआपच आत्मज्ञान होईल तेथे गुर कृपेची काय आवश्यकता?

या पूर्वपक्षाच्या वरवर सयुक्तिक वाटणा-या आक्षेपाचे खण्डन थेट उपनिषदातील प्रमाण देऊनच करतात.

आचार्यवान् हि पुरूषो वेदेत्यर्थस्य वेद सिद्धत्वात् छान्दोग्य उपनिषदात ६.१४.२ मध्ये हा संदर्भ आला आहे.एखाद्या माणसास डोळे बांधून फिरवून अनोळखी प्रदेशात सोडल्यास तो वाट विचारत विचारत आपल्या मूळ स्थानावर येतो.तसेच गुरु च्या मार्गदर्शनाने साधक स्वरूपास प्राप्त करतो.या दृष्टांताने गुरुची महती सिद्ध होते.

## वेदमहती ४४ ते ४९

वेद हे अनादि आहेत असे म्हटले जाते.वेदांना अनादि म्हणण्याचा अभिप्राय एवढाच असतो की ते अतिप्राचीन आहेत.वेदकालाचा निर्णय करणा-या विद्वान मडळींची मते वाचून हे लक्षात येते की या वेदकालाचा निर्णय खरेच अवघड आहे.तसेच वेद हे परमेश्वरप्रणीत आहेत अशीही लोकांची श्रद्धा आहे.

याच दोन कारणांमुळे वेद हे सर्वमान्य प्रमाणग्रंथ ठरतात. यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी वेदांवाचून काही अन्य साधन असूच शकत नाही असा विश्वास लेखकाने व्यक्त केला आहे.ब्रह्मासारख्या अतींद्रिय विषयाचा अनुभव येण्यासाठी लागणारे साधनही तेवढ्याच योग्यतेचे अलौकिक व वेदांसारखे हवे. वेद हे स्वतःप्रमाण आहेत हे सांगताना

नापेक्षते यदन्यद्यदपेक्षंतेखिलानि मानानि।

वाक्यं तन्निगमानां मानं ब्रह्माद्यतींद्रियावगतौ।।४५

या शब्दात वेदांचे स्वतःप्रमाणत्व लेखक मांडतात म्हणजेच वेदांचे सांगणे सिद्ध करण्यासाठी अन्य कोणत्याही साधनाची गरज नाही.

वेदांना सोडून अन्य कशासही प्रमाण मानणे मूर्खपणाचे आहे हे आपले मत स्पष्ट करण्यासाठी लेखकाने दृष्टांत दिला आहे. या सर्पणाच्या सहाय्याने अग्नीसच जाळून टाकतो अशी जर कोणी कल्पना करेल तर ते जसे हास्यास्पद असेल तसेच ब्रह्मज्ञानासाठी वेदावाचून अन्य प्रमाणाचा आश्रय घेणे निष्फल ठरेल.असे करणा-यास उपहासाने महात्मा असे म्हटले आहे.

वेदात आलेले विचार जर अन्य कुठे आढळले तर ते केवळ अनुवाद मानावेत असे सांगतांना लेखकाच्या मनात काही तंत्रग्रंथ असावेत हे खालील आर्येवरून दिसून येते.तंत्रवाङ्मयाचे अवलोकन लेखकाने केले असावे हे यावरून लक्षात येते.

निगमेषु निश्चितार्थं तंत्रे कश्चिद्यदि प्रकाशति।

तदिदमनुवादमात्रं प्रामाण्यं तस्य सिद्ध्यति न किञ्चित्।।४९

## द्वैताद्वैत ५० ते ५६

अंशद्वयांनी युक्त अशा वेदसाहित्यातील काही एक भाग द्वैताचे निरूपण करतो म्हणजेच जीव व ब्रह्म वेगवेगळे आहेत असा विचार मांडतो तर दुसरा भाग प्रसिध्द असे अद्वैत मत मांडतो.

अद्वैत हेच खरे असते व अद्वैतावर द्वैताचा अध्यास केला जातो हे समजवण्यासाठी ग्रंथकार शुक्तिरजत व मृगमरीचिकेचा दृष्टांत योजतात.

त्याच्याउलट जर परमार्थाने खरे नसलेल्या द्वैतावर अद्वैताचा आरोप होतो असे म्हटले तर ते योग्य होणार नाही कारण नेहेमी सत्त्यावर असत्याचा अध्यास होत असतो.

जर तिसरा पक्ष म्हणजे द्वैताद्वैतांचा अन्य कोणावर अध्यास मानावयाचा म्हटला तर तेही शक्य नाही कारण या दोन कल्पनांहून वेगळे केवळ शून्यच उरेल व शुन्यावर अध्यास कसा करावा? म्हणूनच अद्वैत हेच खरे समजावयास हवे.

प्रत्यक्षादि प्रमाणांच्या पकडीत न येणारे व फक्त श्रुतींनी पतिपादित होउ शकते असे अद्वैत आहे तर द्वैत हे लोकप्रसिध्द असल्याने त्याच्या स्थापनेची आवश्यकताच नाही. द्वैत हे अतिशय दुःखोत्पादक आहे असे जाणून द्वैताला त्याज्य समजून सर्वदा सुखरूप असलेल्या अद्वैताचे श्रुतीग्रंथ प्रतिपादन करतात.

## ज्ञान कर्म ६७ ते ७0

ज्ञान व कर्म हे दोन्ही नेहेमीच वाद चर्चाना आमंत्रण देत राहिले आहेत.

१ कर्म ज्ञानास सहायक आहे.

२ कर्म ज्ञानास सहायक नाही.

३ केवळ ज्ञानानेच मुक्ति होते.

४ कर्माच्या सहाय्याने उत्तमलोकांची प्राप्ती हे सर्वोच्च ध्येय.

अशी मतमतांतरे ज्ञान व कर्म याबद्दल दिसतात. प्रस्तुत ग्रंथातही अशा प्रकारच्या मतांची चर्चा केलेली दिसते. सूर्य उगवल्यावर जसा अंधार नाहीसा होतो तसे तत्त्वमस्यादी महावाक्यात निहित अर्थाचे अज्ञाननाशक ज्ञान कसे होते? अशी जिज्ञासा प्रकट केली आहे.

बुध्दीमान लोक कर्मास प्रकरणाश्रित् विधिपरक वाक्याश्रित असे मानतात व ज्ञानास कर्माचे अंग मानतात म्हणजेच कर्माचरणाने ज्ञान होते.

१ पण भिन्न भिन्न प्रकरणांवर आश्रित असणा-या ज्ञानास कर्माचे अंग कसे मानता येईल.

२ अनुबंध चतुष्टयातील अधिकारी व विषय अश्या दोन अंगाचा उल्लेख ६८ व्या आर्येत करून या दोन निकषांवर कर्म व ज्ञान या दोन्ही कांडाचे अधिकारी व विषय भिन्न असताना कसे बरे त्यांचे अंशाशित्व मानता.

३ ज्ञानाची उपलब्धी कर्माने होणार नाही व ज्ञान्यास कर्माची ओढ वाटणार नाही असे असताना कसे बरे अंधार व प्रकाशाप्रमाणे भिन्न असणा-या ज्ञानकर्माचा समुच्चय सांगता असे २ प्रश्न उपस्थित करून ज्ञानकर्म समुच्चयाचे खंडन केले आहे.

समारोपाच्या म्हणजेच ७0 व्या आर्येत मोहनिवृत्तीसाठी ज्ञान हे कर्माच्या सहाय्याची अपेक्षा करत नाही असा सिध्दांत मांडून दृष्टांत रूपाने अंधार दूर करण्यासाठी सूर्य अन्य कोणाच्या मदतीची अपेक्षा करत नाही हे सांगितले आहे.

## परमात्म्याचे स्वरूप ७१ व ७२

मोहनिवृत्तीसाठी ज्ञान हेच एकमात्र साधन आहे.कर्मादि इतर साधने कामाची नाहीत हा केवलद्वैतवादाचा विचार ७0 व्या आर्येत सांगितला.अशा विमल ज्ञानाच्या योगेच परमात्मा विश्वाचे ज्ञान प्राप्त करतो पण सच्चिदानंदरूप असलेला हा परमात्मा समग्र विश्वाचे संपूर्ण ज्ञान असूनही विश्वाच्या कोणत्याही धर्माने लिप्त होत नाही.जगात घडणा-या सर्व गोष्टींना परमात्मा साक्षी असतो म्हणजे काय ते अकर्तृत्वे सति द्रष्टृत्वम् या सर्व लक्षणसंग्रहातील व्याख्येने अगदी स्पष्ट होते.

परमात्मा शांत असून कर्माने, गुणाने, धर्माने लिप्त होत नाही.हे नीट कळावे म्हणून वेदांतात दिला जाणारा प्रसिद्ध दृष्टांन्त ७२ व्या आर्येत देतात.

अंधारात अंधुक प्रकाशात पडलेल्या दोरीच्या तुकडयांस पाहून तो सापच आहे असा भ्रम उत्पन्न होतो व माणसास भय स्वेदादी अनुभव येतात तरीसुद्धा त्या दोरीचा सापाशी सुतराम् संबंध नसतो.जरी सर्व जगत् ब्रह्माश्रित असले व ब्रह्माने अव्याप्त असा एकही पदार्थ नाही असे म्हटले जात असले तरीही सततमसंगोऽयम् हे श्रुतिवाक्य ब्रह्म जगताच्या कुठल्याही घटनेने प्रभावित होत नाही हे प्रदर्शित करते.

## जगत्कारणत्व तथा असद्वादखंडन ७४ ते ८0

जीवाच्या ठिकाणी भासणारे कर्तृत्वादी धर्म मायेच्या शक्तीमुळे अनुभवास येत असतात असे काही लोक म्हणतात तर अन्य काही मायेच्या शक्तीस भ्रांती म्हणतात व सर्वत्र व्यापून असणा-या

बह्माचाच हा प्रभाव आहे असे म्हणतात. ७४ तेच लोक पुढे ब्रम्हाचे सर्वव्यापकत्व व जगत्कारणत्व स्पष्ट करण्यासाठी दृष्टांत देतात.

जसे एकदा मातीचे स्वरूप नीट कळले म्हणजे मातीपासून बनलेले सगळे वेगवेगळे आकार बैल,राजा,घट इत्यादी समजल्यासारखेच असतात त्यांना समजून घेण्यासाठी वेगळी खटपट करण्याची गरज उरत नाही.तसे एकदा ब्रह्माचे गुणातीतत्व, सर्वव्यापकत्व कळले म्हणजे जगातील जड चेतन सर्व पदार्थ कळल्यासारखेच आहेत.

ते ब्रम्ह कसे आहे?

एकंम् एकं सत द्वितीयं नास्ति ते एकमात्र आहे त्यावेगळा दुसरा पदार्थ नाही.

विगत विशेषम् विगतः विशेषः यस्मात् तत् त्याच्यात डावं उजवं किंवा उंचनीच अशाप्रकारचे विशेष दाखवता येत नाहीत.

विशध्दचिद्रूपम् अत्यंत शुध्द व चैतन्यमय असे आहे.

तस्मात् त्या सदेकरूप अशा ब्रह्मापासून हे विश्व कसे हे सांगण्यासाठी मोयोपहितात् असे विशेषण योजतात मायेच्या अत्यंत निकट असणा-या त्या ब्रह्मापासुन हे समग्र विश्व निर्माण झाले.

## असद्वादखंडन

असद्वा इदमग्रे आसीत् एकमेवाद्वितीयं तस्माद्वासतः

शेतकरी वियाण्याचा अगोदर नमूना घेतो व वियाण्याची उगवणशक्ती पाहूनच मग पेरणीसाठी वियाणे खरेदी करतो त्यातही वियाणे चाळून पाण्याने धुवून त्यातील असत् म्हणजेच फुसके वियाणे काढून टाकून चांगले बीजच पेरतो.या सगळयाचे तात्पर्य हेच की सतापासून उत्पत्ती होते असा सवाचा अनुभव आहे.

कारण असत् आहे असे म्हणणे किती निरर्थक आहे हे सांगण्यासाठी ७८ व्या आर्येत दोन

दृष्टांताची योजना केली आहे. वांझ स्त्रीच्या मुलाकडून काम करून घेण्याच्या किंवा मृगजळातील पाणी पिण्याने तहान भागविण्याच्या कल्पनेत जशी अर्थशून्यता आहे तशीच असत् हे जगताचे कारण मानण्यात आहेअसे दाखवून दिले आहे ७८

अशाप्रकारे शास्त्र म्हणजेच उपनिषदे  व युक्ती म्हणजे स्वपक्षसाधक व परपक्षबाधक असे प्रमाण स्थापणे अशा दोन्ही उपायांनी असत् चे कारणत्व सिद्ध होऊ न शकल्याने जगातील सर्व पदार्थाचे सत् हे एकमात्र कारण असल्याचे स्वीकारण्यात काही दोष नाही.

असे हे सत् जे जगातील सर्व पदार्थांचे उपादानकारण आहे व ते ब्रह्मादि देवता म्हणजेच सर्वश्रेष्ठ अशा शक्तींमध्ये व जगातील सर्व पदार्थांच्या रूपाने एवढेच नव्हे तर गुरु आणि शिष्यही त्या सत्चीच रूपे आहेत.

## उपनिषदांचा प्रतिपाद्य विषय ८१. ८२

अपक्व अन्तःकरणाचे जे पुरूष असतात त्यांना जग व जगातील सर्व व्यवहार परमार्थाने खरे वाटत असतात. अशा लोकांना समर्थ रामदासांनी बद्ध अशी संज्ञा दासबोधात दिली आहे दशक ५ समास ७ व असे पुरूष पुन्हा पुन्हा जन्म मृत्यूच्या आवर्तनात सापडत असतात असेही स्पष्ट केलेले आहे. उपनिषदे मात्र अशा प्रकारचे जग व जगातील व्यवहार खरे आहेत असे मानणे म्हणजे  असत्याचा स्वीकार आहे असे प्रतिपादन करत असतात.

सत्यं जगदिति भानं संसृतये स्यादपक्वचित्तानाम्।
तस्मादसत्यमेतन्निखिलं प्रतिपादयन्ति निगमान्ताः।।८१

व जे परिपक्व अम्तःकरणाचे म्हणजेच विवेक वैराग्याने युक्त असतात अशा जीवांना हे सर्व दृष्य म्हणजे ब्रह्मच आहे अशी शिकवण उपनिषिदे पुन्हा पुन्हा  देतात.

## ८३ ते ९६ ब्रह्म

या गटात पुन्हा एकदा ब्रह्मविषयक चर्चा वाचावयास मिळते. पण इथे ब्रह्मस्वरूपाबरोबरच अहंकारी, विद्वान व अज्ञ माणसाच्या समजुतीतील फरक अशा मुद्दयांचाही विचार केलेला दिसतो.

आत्मानात्म विचार नसणारे भौतिक पदार्थांचेच चिंतन करत असतात तत्त्वविषयक जिज्ञासा त्यांना कधी होतच नाही. अहंच्या आश्रयाने सिद्ध होऊ शकणारे ब्रह्म वस्तुतः सर्वांनाच समजण्यासारखे आहे कारण मी असा भाव अगदी अज्ञानी माणसापासून पंडितापार्यंत सर्वांमध्ये दिसून येत असतो तरीही आत्मानात्म विवेक नसणा-या लोकांना सर्वत्र व्यापून असणारे ब्रह्म दिसत नाही. शरीर व इंद्रियाच्या विषयी असणारी अध्यासरूप ममत्वबुद्धी त्यांच्या ठिकाणी स्थिर झालेली असते. अहं या आलंबनावर राहणारे ब्रह्म परोक्ष होण्याचे काही कारणच नसते तरीही विचारविहीन जनांस ते परोक्षच राहते. अहं अशी जी जाणीव तेच ब्रह्म होय. हा विचार स्पष्ट करण्यासाठी दृष्टांताची योजना केली आहे.

गो शब्दाने वस्तुतः सर्वच गतीशील प्राण्यांचा बोध होतो पण व्यवहारात मात्र गो या शब्दाने गाय या प्राणिविशेषाचे ग्रहण होते. तद्वतच अहं शब्दाने परमात्म्याचा बोध होतो पण भ्रांतिमुळे अहं म्हणजे शरीराकार असलेल्या मी चे ग्रहण केले जाते. लोखंडाच्या गोळ्यात अग्नीच्या संसर्गामुळे मूळचे नसलेले दाहकत्व व तोजोमयत्व आरापित होते तसेच जीवाच्याठायी नसलेले कर्तृत्वादि गुण आत्म्याच्या संसर्गामुळे आरोपित होतात.

सर्वांच्या ठिकाणी जर एकच ब्रह्म वास करते तर सुखदुःखांचे वैविध्य का दिसते ? या प्रश्नाचा खुलासा करताना म्हणतात जसे अवयव भेदामुळे एकाच शरीरात एकाच संवेदनेचे सुखदुःखरूप दिसते तसेच शरीरभेदाने सुखदुःखांचे वैविध्य दिसते[1].

विद्वान माणसासच हे जग काय आहे? याचे सत्यस्वरूप काय आहे? हे कसे उत्पन्न झाले? याच्या उत्पत्तीचा हेतु काय? असे प्रश्न पडतात. विद्वान माणसाचा दृष्टीकोनच वेगळा असतो हे समजवण्यासाठी दृष्टांत देतात. सुंदर अशा लाकडाच्या हत्तीस पाहून सामान्य माणूस म्हणेल, अरे असे वाटते की हा आत्ता चालू लागेल . तो त्याचे लाकूडपण विसरून जातो पण विद्वान माणूस त्याचे लाकडी असणे विसरत नाही. जगातील पदार्थात परमात्मा आहे व परमात्म्यात जगातील सर्व पदार्थ परमात्म्यात स्थित आहेत अशा दृष्टीने तो सर्वत्र परमात्मा पाहतो.

---

[1] यद्वत्सुखदुःखानामवयवभेदादनेकता देहे।
तद्वदिह सत्यभेदेप्यनुभववैचित्र्यमात्मनामेषाम्।।९२

दिसणा-या गोष्टीचा आधार ब्रह्म नसून दुसरेच काही आहे असे जर कोणी म्हणेल तर ते दुसरे काही म्हणजे ब्रह्मच होय कारण जगात ब्रह्माव्यतिरिक्त अन्य पदार्थच नाही .

## विद्वान मनुष्याची अवस्था ९९ ते १०३

जरी ज्ञानाच्या भूमिकेवर आरूढ झाल्याने विद्वान मायेचे स्वरूप जाणत असला तरीही त्या ज्ञान्यासही शरीर असेपर्यंत मायेच्या आधारानेच आपले व्यवहार चालवावे लागतात अशा शब्दात प्रथमच मायेचे सामर्थ्य ९९व्या आर्येत सांगून पुढे १०० व्या आर्येत ज्ञान्याची स्थिरबुद्धि दाखविली आहे . आत्म्याहून भिन्न काहीच न पाहणा-या ज्ञान्यासाठी चिन्त्य काय व अचिन्त्य काय? करण्याजोगे काय व त्याज्य काय? अतिशय अलिप्तपणे जगताकडे पाहणा-या व ज्ञानाच्या उच्चतम भूमिकेवर आरूढ अशा योग्याला बंध, मुक्ती, परमात्मतत्व हे काहीच उरत नाही.अशा साधकासाठी सर्व वेदवाक्यांचे सार म्हणजे ते अनुभवत असलेले अत्मतत्त्वच होय.

## शिष्याच्या आत्मानुभूतीचे वर्णन . १०५ ते १६०

हा शेवटचा व सर्वात मोठा असा आर्यांचा गट आहे . तत्त्वमसि चा यथार्थ बोध व गुरुकृपा झालेला शिष्य आपल्या आत्मानुभूतीचे वर्णन येथे करत आहे .

शिष्य स्वतः ब्रह्मरूपच झालेला असल्याने हे वर्णन म्हणजे ब्रह्मरूपाचेच वर्णन आहे हे जाणवते . निर्वाणषटकात किंवा दशश्लोकीमध्ये जसे तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् असा स्वतःच शिवरूप झाल्याचा अनुभव मांडला आहे तसाच काहीसा अनुभव येथे १२३, १३२, १३८, १४०, १४१, १४५ अशा आर्यामध्ये दिसून येतो . यावरून असे वाटते की सगळयाच आत्मानुभवी साधकांचे अनुभव सारखेच असतात .

हे अनुभव दोन प्रकारच्या विशेषणांचा वापर करून सांगितलेले दिसतात . अजरोऽहम् अक्षरोऽहम् भक्तिरहम् भजनमहम् तत्त्वातीतपदोऽहम् अशा अनेक सकारात्मक विशेषणांप्रमाणेच धर्माधर्म

बोधरहितोऽहम् देहेन्द्रियरहितोऽहम षड्भाव रहितोऽहम् अशी नेति नेति शी जवळीक दाखवणारी विशेषणेही वापरलेली दिसतात . या दोन्ही प्रकारच्या विशेषणांचे सर्वशक्तिमत् सर्वव्यापक नित्य अशा व निर्गुण अरूप अलक्ष्य अगोचरादि ब्रह्माच्या विशेषणांशी सारखेपण दिसते .

क्षान्ताद्याक्षरसहित व्यवहारमूलोऽहम् या १४३ व्या आर्येत आलेल्या क्ष या पाणिनीय परंपरेच्या बाहेरील वर्णाच्या वापरावरून लेखकास तंत्रविषक ग्रंथांची ओळख असावी असे वाटते .

या गटाच्या शेवटच्या भागात श्रीनिवासगुरु या आपल्या आध्यात्मिक गुरु विषयी आदर व्यक्त करून पुढे संप्रदायाचे प्रधानाचार्य असलेल्या शंकराचार्यांनाही वंदन करून आपण अद्वेत परंपरेचे असल्याचेही स्पष्ट केले आहे .

ग्रंथाच्या शेवटी ज्ञानाने व गुरु कृपेने आपले जीवन सफल झाल्याची घोषणाच जणु केलेली आहे .

ॐॐॐॐॐ

# वेदांतबोध व त्यातील दृष्टांत

दृष्टांत एक असा अलंकारप्रकार आहे ज्याच्या उपयोगाने लेखक वाचकाचे मन विषयाकडे आकृष्ट करून घेतो. विषय सोपा करणे, रंजक करणे, प्रतिपाद्य तत्त्व वाचकाच्या मनावर ठसवणे असे दृष्टांताचे काही परिणाम दिसतात.

मुख्य प्रतिपाद्य विषय मांडणारे जे विधान किंवा वाक्यांश असतो त्यास बिंबविधान व तो विषय स्पष्ट करण्यासाठी जे उदाहरण दिले जाते त्यास प्रतिबिंब विधान असे काही लोक म्हणतात[1]. प्रतिपाद्य विषय म्हणजे दार्ष्टान्तिक व तो स्पष्ट करणारे उदाहरण म्हणजे दृष्टांत. साध्या भाषेत यालाच उदाहरण देउन समजावणे असे म्हणतात.

वेदातंबोधाच्या लेखकानेही आपला विषय सोपा व परिणाम्कारक करण्यासाठी जागोजागी दृष्टांतांची योजना केली आहे,त्यातील काही निवडक दृष्टांतांचा विचार येथे करावयाचा आहे.

१ आत्मस्वरूपाचे निरूपण करताांना जगातील सर्वच पदार्थांचा प्रकाशक आत्मा आहे असे विधान केले. पुढे हा सर्व पदार्थांना प्रकाशित करणारा आत्मा स्वयंप्रकाशी व विशाल आह असेही सांगितले. पण या आत्म्याचे स्वरूप मात्र मोठे चमत्कारिक आहे हे मुख्य सांगावयाचे आहे. स्वयंप्रकाशी व सर्वव्यापक असूनही तो कोणास दिसत नाही. हे त्याचे चमत्कारिक सामर्थ्य समजाऊन सांगण्यासाठी सूर्याचा दृष्टांत दिला आहे.

न खलु प्रकाशयते असौ विश्वमशेषं प्रकाशयन् भानुः।१७

समग्र विश्व प्रकाशित करणारा व सर्व जगताचे जीवनच असणारा आपल्या सूर्यमालिकेचा सर्वात मोठा ग्रह अशा शब्दात ज्याचे वर्णन केले जाते तो सर्वशक्तिमान म्हटला जाणारा सूर्यसुद्धा त्या आत्मतत्त्वास प्रकाशित करु शकत नाही एवढे ते आत्मतत्त्व चमत्कारिक आहे.

---

[1] दृष्टान्तः- [1] दृष्टान्तःपुनरेतेषां सर्वेषां प्रतिबिम्बनम्।काव्यप्रकाश उल्लास १0 सूत्र १५५
बालबोधिनी व्याख्या – वाक्यद्वये उपमेयचाक्ये उपमानवाक्ये च एतेषामुपमानोपमेयसाधारणधर्माणां सर्वेषां प्रतिबिम्बनं बिम्बप्रतिबिम्बभावः न तु एकत्वम् इत्यर्थः दृष्टान्तः दृष्टान्तनामालङ्कार इति सूत्रार्थः।

२ वेदवाक्ये ही कर्मपर असतात, ज्ञानपर नसतात असे असताना तत्त्वमसि हे वाक्य ज्ञानपर आहे असे कसे म्हणता?

या पूर्वपक्षाच्या आक्षेपाचे निराकरण करताना विधिवाक्यांनीच कर्माची प्रेरणा मिळते असे नाही तर आवडत्या वस्तूचे स्मरणही कर्त्यास कर्मप्रवृत्त करत असते असे विधान करून त्याच्या पुष्ट्यर्थ पूर्वसुरींनी[1] वापरलेला दृष्टांत योजला आहे.

राजा याति सुतोऽभूत् इति बोधेन प्रवर्तते लोकः।४0

राजाची स्वारी निघाली आहे असे ऐकल्याबरोबर सामान्य माणसांच्या मनात राजाचे ऐश्वर्य,हत्ती घोडे, सैनिकदल, अब्दागीरी, छत्र, दास-दासी अशा अनेक गोष्टी उभ्या राहतात व ते वैभव पाहण्याच्या इच्छेने माणसे धावू लागतात. कर्मप्रवृत्त होतात.

तसेच पुत्रजन्माचे वृत्त कळताच प्रत्यक्ष पुत्रमुख न पाहताही आनंदोत्सव केला जातो. नवस फेडणे, पेढे वाटणे अशा कर्मास माणसे प्रवृत्त होतात. पितृऋणातून मुक्त झाल्याच्या आनंदात हे सर्व होत असते.

आर्येच्या पहिल्या चरणात म्हटलेला अभिलषित वस्तुबोध असा कर्मास प्रेरणा देत असतो.

तात्पर्य हे की राजा याति व सुतोऽभूत ही दोन्ही वाक्ये वेदवाक्ये नसूनही त्यांच्या श्रवणाने माणसे कर्म प्रवृत्त होत असतात. म्हणून वेदवाक्येच कर्मपर असतात हा आक्षेप योग्य नव्हे.

३ वेदमहतीचा विषय मांडतांना, ब्रह्मज्ञान होण्यासाठी वेदवाक्यांहून अन्य कोणतेही साधन उपयोगी नाही हे सांगावयाचे आहे. अन्य साधनास प्रमाण मानणे अगदीच वेडेपणाचे आहे हे समजविण्यासाठी दृष्टांत देतात:

एधोभिरेव दहनं दग्धुं वाञ्छति ते महात्मानः।४६

सर्पणाच्या सहायाने अग्नीस जाळतो अशी कल्पना करणे म्हणजे भक्ष्याने भक्षकास खाणे झाले. जे कधीच होत नसते. तसेच वेदवाक्यांहून अन्य साधनांनी ब्रह्मज्ञान होइल असे कधीच होणार नाही. असे समजणा-या पुरुषांस उपहासाने महात्मानः असे म्हटले आहे.

---

[1] ब्रह्मसूत्र शांकरभाष्य राजाऽसौ गच्छाति सपरिवारस्य राज्ञः गमनमुक्तं. ..।१.१.१

जर दग्धुं शब्दाने केवळ जाळणे असा अर्थ न घेता जाळून टाकणे म्हणजेच शुद्ध करणे हा भाव घेतला तरीही लाकडांमुळे अग्नी शुद्ध होतो असे म्हणता येत नाही.

४ दिसणा-या सगळ्या पसा-याच्या मुळाशी एकमात्र सत्स्वरूप ब्रह्म आहे.एकमात्र शब्दाने अद्वैत सुचविले जाते.अद्वैत व सत्स्वरूप ब्रह्मावर द्वैत भासते म्हणजेच द्वैताचा अध्यास केला जातो.हा सिद्धांत समजावून सांगण्यासाठी शिंपल्यावर भासणा या चांदीचा व मृगजळात भासणा या पाण्याचा दृष्टांत योजला आहे.

रजतमिव शुक्तिकायां मृगतृष्णायामिवोदकस्फुरणम्। ५१

हौदाच्या तळाशी पडलेला शिंपला त्याची स्वगत चमक व प्रकाश यांच्या योगाने चांदीच्या रूपयाचा आभास निर्माण करतो.म्हणजेच त्या शिंपल्याावर मनुष्याचे मन रूपयाचा अध्यास करते आणि तो रूपया खरा मानून मिळविण्याचा प्रयत्न सुरू करते.

तसेच अतितप्त हवेमुळे दूरवर पाण्याचा आभास होतो व वाळवंटातील प्रवासी ते पाणी खरे समजून मिळवण्याच्या उद्योगास प्रवृत्त होतात.

या दोन्ही उदाहरणात आधाररूपाने असलेला शिंपला व गरम हवा या दोन गोष्टींमुळे चांदीचा रूपया व वाहणारे पाणी भासतात तसेच समग्र जगताच्या मुळाशी आधाररूपााने अद्वैत असे ब्रह्म आहे.या आधाररूप अशा ब्रह्मामुळेच जगातील विविध पदार्थ भासतात, मनुष्य त्यांना खरे मानून वागत असतो हे दृष्टांताद्वारे दाखविले आहे.

५ जीव व ब्रह्म यांच्या स्वरूपाची चर्चा करताना आनंदरूप व अद्वैत अशा ब्रह्माचे, जीव हे स्वाभाविकरूप आहे असा विचार मांडला व लगेचच त्यावर पूर्वपक्षाचा आक्षेप नोंदवला.

आक्षेप ः स्वाभाविकं यदि स्याज्जीवत्वं तस्य विशदविज्ञप्तेः.

जर ब्रह्म व जीव यांचे ऐक्य स्वाभाविक म्हणाल तर मग ते वेगळे कसे दिसतात ? त्यांचा भेद तर सर्वांच्या अनुभवाचा आहे.आणखी असे की जर ते एक असतील तर कधीच वेगळे होणार नाहीत. स्वतःचा विचार स्पष्ट करण्यासाठी दृष्टांत देतात.

सकृदपि तद्विनाशं न गच्छेदुष्णप्रकाशवद् वह्नेः। ।५७

जसे उष्णता व प्रकाश हे अग्नीचे स्वाभाविक धर्म आहेत व ते अग्नीपासून कधीच वेगळे होत नाहीत अर्थात अग्नी आहे पण उष्णता व प्रकाश नाही असे कधीच होत नाही. तसेच जर ५६ व्या आर्येत म्हटल्याप्रमाणे जीव हा ब्रह्माचे स्वाभाविक रूप असेल तर जीव व ब्रह्म वेगळे दिसणार नाहीत.

६ बंधाचे कारण मोह म्हणजेच अज्ञान असते व अज्ञानाचा नाश झाला म्हणजे मोक्षप्राप्ती होते हा झाला सिद्धाम्त.आता या अज्ञानाच्या म्हणजेच मोहाच्या नाशासाठी ज्ञान हवे की कर्म हवे अथवा ज्ञानकर्म समुच्चय हवा अशा चर्चेनंतर स्वतःचे मत दृष्टांतपूर्वक नोंदवतात.

तस्मान्मोहनिवृत्तौ ज्ञानं न सहायमन्यदर्थयते।

यद्वद्दुस्तरतिमिरपरिध्वंसने सहास्रांशुः। ।७०

अज्ञानाचा नाश करण्यासाठी ज्ञान हे एकटेच समर्थ असते त्यास अन्य कोणाचीही कर्म,योग,भक्ती इत्यादिकांची मदत लागत नाही, जसे रात्रीचा अंधार दूर करण्यासाठी सूर्यास अन्य कोणाचीही मदत लागत नाही.

७ जगदुत्पत्तीसंबंधी वेगवेगळ्या वादांची[1] संख्या दहा इतकी आहे त्यातील असद्वादाचे खंडन केले जात आहे. असदेवेदमग्र आसीत् या विचाराचे लोक असतापासून जगताची उत्पत्ती मानतात.पण असतापासून उत्पत्ती होऊ शकत नाही कारण जे स्वतःच नाही त्यापासून उत्पत्ती कशी संभवते ? हे समजवण्यासाठी व्यवहारातील दृष्टांत दिला आहे.

अङ्कुरजननीशक्तिः सतिखलु बीजे समीक्ष्यते सकलैः ।७७

शेतकरी बियाणे घेताना तसेच पेरतांना त्याची उगवणक्षमता पाहूनच बियाणे घेत असतो. घेतलेले बीज सुद्धा परीक्षण करून त्यातील हलके व कस नसलेले बीज काढून टाकून चांगले बीजच तेवढे पेरण्यासाठी

[1] पूर्व मीमांसा व न्याय आरंभवाद, सांख्य व योग परिणामवाद,उत्तरमीमांसा विवर्तवाद तसेच बिम्बप्रतिबिम्बवाद, गोडपादांचा अजातवाद, बौद्धांचे शून्यवाद विज्ञानवाद क्षणिकवाद याखेरीज ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद असे अनेक वाद अपापल्या परीने सृष्टीचे रहस्य शोधण्याच्या प्रयत्नात निर्माण झाले.

वापरत असतो. कस नसलेले म्हणजेच असत् असे म्हणत, असे बीज निरूपयोगी म्हणून टाकून देत असतो कारण असतापासून उत्पत्ती कधीच होऊ शकत नाही. म्हणून सत् अशा ब्रह्मापासूनच जगताची उत्पत्ती मानणे योग्य आहे.

८ अहंकार व ब्रह्म असा विषय चर्चेला घेतला आहे. अहंकाराचे स्वरूप उलगडून दाखवत आहेत. मी करतो मी भोगतो मी सोसतो मी पालन करतो इत्यादी जे जे अहं प्रत्ययाचे बोधक विचार असतात त्यांच्या मुळाशी चेतन असे ब्रह्मतत्त्व असते. त्या चेतन अशा ब्रह्मतत्त्वाच्या संगतीमुळेच हे मी मी असे भान होत असते. हे कसे घडते ते समजावून सांगण्यासाठी व्यवहारात सर्वांना माहीत असलेला दृष्टांत देत आहेत

दग्धृत्वादिकमयसः पावकसङ्गेन भासते यद्वत्।
तद्वच्चेतनसङ्गादहमिति भान्ति कर्तृतादीनि।।९0

लोखंड लाल होईपर्यंत तापवले असता त्यात दाहकशक्ती येते. जवळ आलेल्या कागद पाचोळा लाकूड अशा पदार्थांस ते जाळून टाकू शकते. पण हे दाहकत्व त्या लोखंडाचे स्वतःचे नसते तर त्याचा जो अग्नीशी संग झालेला असतो त्यामुळे आलेलेअसते. तद्वत् चेतन अशा ब्रह्माशी संसर्ग झाल्याने जीवात मी मी असे स्फुरण होत असते.

ॐॐॐॐॐ

# आर्यांची अकारानुक्रमाने सूची


| | आर्या क्र | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| **अ** | | |
| अंकुशमहमखिलानाम | ११६ | ९५ |
| अंशद्वयवति निगमे | ५0 | ५२ |
| अखिलपरमहंसदेशिकम | १५५ | १२१ |
| अखिलनिगमां | १५८ | १२२ |
| अजरोऽहम् | १0५ | ८७ |
| अज्ञानतिमिरहंता | १५४ | १२0 |
| अद्वैतमेव सत्यं | ५१ | ५३ |
| अद्वैतं सुखरूपं | ५५ | ५६ |
| अधिकारि विषयभेदौ | ६८ | ६४ |
| अनवगत कांचनाना | ८३ | ७४ |
| अनुभवति विश्वमात्मा | १७ | ३0 |
| अन्नप्राणमनोमयविज्ञान | ८ | २४ |
| अन्नमयादेरस्मादपरं | १५ | २९ |
| अजरोहमक्षरोहं प्राज्ञोहं | १0५ | ८७ |
| असकृदनुचिन्तनानाम् | १0३ | ८६ |
| अस्ति स्वयमित्यस्मिन् | ५ | २२ |
| अस्त्यन्यदिति मतं चेत् | ९८ | ८३ |
| अहमालम्बनसिद्धं कस्य | ८४ | ७४ |
| अहमिदमिति च मतिभ्यां | ८५ | ७५ |
| **आ** | | |
| आत्ममये महति पटे | ९५ | ८१ |
| आत्मविकल्पमतीनाम् | ११७ | ९५ |
| आद्योहमात्मभाजाम | १0६ | ८८ |
| आरोपितं यदि स्या | ५२ | ५४ |
| आस्ते देशिकचरणं | १४६ | ११५ |
| **इ** | | |
| इत्थं बोधितमर्थं | ३८ | ४४ |
| इत्थं निबोधितः सन्गुरूणा | १0४ | ८६ |
| इत्यात्मबोधलाभं मुहुः | १५२ | ११९ |
| इदमिदमिति प्रतीते | १९ | ३१ |

| | | |
|---|---|---|
| इन्द्रियसुखविमुखोहं | १०७ | ८९ |
| इयमजहतीति कथिता | ३४ | ४२ |
| ई | | |
| ईशोमहीश्वराणाम् | १०८ | ८९ |
| उ | | |
| उदयोहमेव जगताम् | १०९ | ९० |
| ऊ | | |
| ऊर्जस्वलनिजविभवैः | ११० | ९१ |
| ऋ | | |
| ऋषिरहमृषिगणोहं | १११ | ९१ |
| ए | | |
| एकत्रवृत्तिरर्थे शब्दानां | ३० | ३९ |
| एकत्वबोधकानां निखिलानां | ६५ | ६२ |
| एकोहमेतदीदृशमेवम् | ११२ | ९२ |
| एवमपि विरहितानां | २३ | ३४ |
| एष विशेषो विदुषां | १०० | ८४ |
| ऐ | | |
| ऐक्यपरैः श्रुतिवाक्यैः | ४१ | ४७ |
| ऐक्यावभासकोहं | ११३ | ९३ |
| ओ | | |
| ओजोहमोषधीनाम् | ११४ | ९३ |
| औ | | |
| औषधमहम् अशुभानाम् | ११५ | ९४ |
| क | | |
| करूणारसभरितोहं | ११८ | ९६ |
| कवलितचंचलचेतो | १४८ | ११६ |
| कर्तृ च कर्म च यस्य | ७३ | ६८ |
| कर्तृत्वादिकमेतन्मायाशक्त्या | ७४ | ६८ |
| कर्मप्रकरणनिष्ठं ज्ञानं | ६७ | ६३ |
| कर्मभिरेव न बोधः प्रभवति | ४३ | ४८ |
| कारणमसदिति केचित् | ७७ | ७० |
| कारणम् असदिति कथयन् | ७८ | ७० |

| | | |
|---|---|---|
| कारूण्यसारसान्द्राः | १४७ | ११६ |
| किंचित्यं किमचिंत्यं | १०१ | ८५ |
| किमिदं किमस्य रूपं | ९३ | ८० |
| कुरूते वपुष्यहंतां | ११ | २६ |
| कोशः प्राणमयोऽयं | १० | २५ |
| क्ष | | |
| क्षालितकलुषमयोहं | १४३ | ११३ |
| ख | | |
| खगानामगोचरोहं | ११९ | ९७ |
| ग | | |
| गुरूकरूणयैव | १५० | ११७ |
| गो शब्दार्थो गोत्वं | ८९ | ७७ |
| घ | | |
| घनतरमोहतमिस्त्रकर | १२० | ९७ |
| च | | |
| चरदचरात्मकोहं | १२१ | ९८ |
| चिन्मात्रममलमक्षयम् | ९६ | ८१ |
| छ | | |
| छंदः सिन्धुनिगूढज्ञान | १२२ | ९९ |
| ज | | |
| जगदाकारतयापि प्रथते | ८० | ७२ |
| जलजासनादिगोचर | १२३ | ९९ |
| जलमिवमृगतृष्णायाम | ्१५७ | १२२ |
| जहदजहतीति सा | ३५ | ४२ |
| जीवत्वमपि तथेदं | ६० | ५९ |
| ज्ञ | | |
| ज्ञानं कर्मणि न स्यात् | ६९ | ६५ |
| ज्ञानं तदेव विमलं साक्षी | ७१ | ६६ |
| ज्ञानमहं ज्ञेयमहं | १२५ | १०१ |
| त | | |
| तत्त्वातीतपदोहं | १२६ | १०२ |
| तत्वावबोधशक्त्या | ९९ | ८३ |

| | | |
|---|---|---|
| तदिदं कारणमेकं | ७६ | ६९ |
| तदिदं तादृशंमीदृशम् | १८ | ३१ |
| तदिदं भवति न युक्तं | ५९ | ५९ |
| तत्त्वावबोधशक्त्या | ९९ | ८३ |
| तद्वत् तत्त्वमसीति | ३७ | ४४ |
| तस्मात्पदार्थशोधनपूर्वकं | २४ | ३५ |
| तस्मात् परं स्वकीयम् | ६३ | ६१ |
| तस्मादशेषसाक्षी | ८७ | ७६ |
| तस्मान्मोहनिवृत्तौ ज्ञानं | ७0 | ६६ |
| तस्मात् सर्व शरीरेषु | ८८ | ७७ |
| तस्मात् स्वतो यदि स्यात् | ६१ | ६0 |
| तस्मिन् ब्रह्मणि विदिते | ७५ | ६९ |
| तीर्थेश्वपचगृहे वा | १५९ | १२३ |
| द | | |
| दंतिनि दारूविकारे | ९४ | ८0 |
| दग्धृत्वादिकमयसः | ९0 | ७८ |
| देशिकवरं दयालुं | २ | १९ |
| देहेन्द्रियादि दृश्य | ९१ | ७९ |
| देहेन्द्रियादिधर्मान् | २५ | ३५ |
| देहाहंतेन्द्रियाणां साक्षी | २६ | ३६ |
| दैवतदैत्यनिशाचर | १२७ | १0२ |
| ध | | |
| धर्माधर्ममयोहं | १२८ | १0३ |
| न | | |
| न क्लेशपञ्चकमिदं | ७ | २३ |
| नापेक्षते यदन्यद्यत् | ४५ | ४९ |
| नामादिविरहितोहं | १२९ | १0४ |
| नावेद्यमपि परोक्षं | २0 | ३२ |
| नाहमिति वेत्ति योऽसौ | ४ | २१ |
| निगमगिरा प्रतिपाद्यं | ५६ | ५७ |
| निगमेषु निश्चितार्थं | ४९ | ५२ |
| निखिलं दृश्यविशेषं | १0२ | ८५ |
| निखिलमपि वाच्यमर्थं | ३३ | ४१ |

| | | |
|---|---|---|
| प | | |
| परजीवभेदबाधक | १३० | १०४ |
| परिपक्वमानसानां | ८२ | ७३ |
| प्रत्यक्षं त्वं परोक्षं त्वं | ३१ | ३९ |
| प्रत्यक्षाद्यनवगतं श्रुत्या | ५४ | ५५ |
| प्रायः प्रवर्तकत्वं | ३९ | ४५ |
| फ | | |
| फणिधरभूधरवारण | १३१ | १०५ |
| ब | | |
| बद्धोभवामिनाहं | १३२ | १०५ |
| बहुभिः किमेभिरूक्तैः | १४४ | ११४ |
| ब्रह्म त्वमेवतस्मान्नाहं | ६ | २२ |
| भ | | |
| भक्तिरहं भजनमहं | १३३ | १०६ |
| म | | |
| मयिसुखबोधपयोधौ | १४९ | ११७ |
| मानांतरोपरोधे | ३२ | ४० |
| मानं प्रबोधयन्तं बोधं | ४६ | ५० |
| मान्योहस्मि महतां | १३४ | १०७ |
| मोहांधकारहरणं | १५३ | ११९ |
| य | | |
| यः स्फुरति बिंबभूतः | १४ | २८ |
| यजनयजमानयाजक | १३५ | १०७ |
| यदि वा परेण साम्यं | ६२ | ६० |
| यद्यारोपणमुभयोः | ५३ | ५५ |
| यद्वदअयोरसविद्धं | ५८ | ५८ |
| यद्वत्सुखदुःखानाम् | ९२ | ७९ |
| यस्मान्न सोयम् असतो | ७९ | ७१ |
| यस्मिन् मिहिरवदुदिते | ६६ | ६३ |
| र | | |
| रक्षाविधान शिक्षा | १३६ | १०८ |
| रज्वादेरूरगाद्यैः | ७२ | ६७ |

| | | |
|---|---|---|
| रूपाणामवलोके | ४८ | ५१ |
| ल | | |
| लक्षणलक्ष्यमयोहं | १३७ | १0९ |
| व | | |
| वर्णाश्रमरहितोहं | १३८ | १0९ |
| वपुरिदमन्नमयाख्यः | ९ | २४ |
| वपुरिन्द्रियादिविषया | ८६ | ७५ |
| विदितं वेदरहस्यं | १६१ | १२४ |
| विधिरेव न प्रवृत्तिं | ४0 | ४६ |
| विविधोपाधिविमुक्तं | २८ | ३७ |
| विरहितकाम्यनिषिद्धो | ४२ | ४७ |
| वेदावसान वाचासंवेद्यं | २७ | ३७ |
| वेदोऽनादिरमुष्य व्यंजक | ४७ | ५१ |
| वेदोऽनादितया वा | ४४ | ४९ |
| व्यवहारस्य दशेयं | ९७ | ८२ |
| श | | |
| शरणं नहि मम जननी | १४५ | ११४ |
| शमदमविरहित मनसां | १३९ | ११0 |
| श्रीगुरूचरणद्वंद्वं | १ | १९ |
| ष | | |
| षड्भावरहितोहं | १४0 | १११ |
| स | | |
| संसारदावपावक | ३ | २0 |
| संवित्सुखात्मकोहं | १४१ | १११ |
| सति कोशशक्त्युपाधौ | २१ | ३३ |
| सति तमसि मोहरूपे | १५१ | ११८ |
| सति सकलदृश्यबाधे | २२ | ३३ |
| सत्यं जगदिति भानं | ८१ | ७२ |
| सत्यज्ञानानंदं प्रकृतेः | ६४ | ६२ |
| सामानाधिकरण्यं तदनु | २९ | ३८ |
| सोऽयं द्विज इति वाक्यं | ३६ | ४३ |
| स्वाभाविकं यदि | ५७ | ५७ |

| | | |
|---|---|---|
| सुप्तिगतैः सुखलेशैः | १३ | २७ |
| सुप्तौ स्वयं विलीना | १२ | २७ |
| स्वयमेवानुभवत्वात् | १६ | २९ |
| स्वात्मावबोधहीनाः | १५६ | १२१ |

ह

| | | |
|---|---|---|
| हयमेधसहस्त्रण्यथवा | १६**0** | १२४ |
| हव्यमहं कव्यमहं | १४२ | ११२ |
| हुंकृति हुंकृति खिंजित | १२४ | १**00** |


ॐॐॐॐॐ